
Vol No. : 4 Issue No : 3 Nov. 2018

ISSN No. : 2350-1391

NIVRJ

# NEW INTERNATIONAL VALUABLE RESEARCH JOURNAL



Chief Editor

Asst. Prof. A . V. Hingmire

Prathmesh Prakashan

Prathmesh Prakashan, Aurangabad

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 12 | **Human Recourse Development and Singareni Collieries Company Limited (SCCL)**<br>Boya Vani | 44 |
| 13 | शासकीय आरोग्य धोरणानुसार बिदर जिल्ह्यातील आवश्यक प्राथमिक आरोग्य केंद्र<br>पाटील भाग्यश्री शंकरराव | 48 |
| 14 | **Rock Material and Technique of Lord Buddha Sculptures in Nizamas Museum**<br>MandalojuSujatha | 50 |
| 15 | **ఆటల్లేవ్ - మాటల్లేవ్!**<br>ఆర్. గోపాల్ | 55 |
| 16 | सर्जनशिलतेचे मुल्य<br>प्रा. डी. जी. राजपूत | 62 |
| 17 | **संत चोखामेळा यांची दलित जाणिवेची संत कविता**<br>संदिप आसाराम खंडीभराड | 65 |
| 18 | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय**<br>**प्रा.डॉ.बिरादार बी.एम.** | 68 |
| 19 | **Transmissional and Constructivist Approaches of Instruction for Inculcating Problem Solving Ability and Reflective Thinking**<br>**Dr khan Shahnaz Bano Mohammad Ashfaque** | 71 |
| 20 | **शिक्षकांचे अध्ययन-अध्यापन-भूतकाळ,वर्तमानकाळ व भविष्यकाळ**<br>प्राचार्य डॉ. झेंडे सुखदेव सिताराम | 75 |
| 21 | **Administrative role of Teacher in Higher Education**<br>Dr. Prashant Namdeorao Patil | 80 |
| 22 | **योग साधना व विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास**<br>श्री राठोड कैलास झाबुसिंग | 85 |
| 23 | **आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक समस्या**<br>अनुपमा दिलीपराव पाटील | 87 |
| 24 | **दलित काव्यातील विद्रोह**<br>गोरे मारुती प्रभू | 89 |
| 25 | **आदिवासी आत्मकथनांतील सांस्कृतिक चित्रण**<br>डॉ. विठ्ठल केदारी | 93 |
| 26 | **लिंग आधारीत बजेट आणि वास्तवीकता**<br>**डॉ. किशोर हरिष धोटे** | 97 |
| 27 | **महानुभाव साहित्यातील 'स्त्री'**<br>**डॉ. स्मिता खोंडे** | 100 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ORIGINAL ARTICLE

# आदिवासी आत्मकथनांतील सांस्कृतिक चित्रण

डॉ. विठ्ठल केदारी
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

आदिवासींच्या आत्मचरित्र वाङ्मयाचा अभ्यास करताना सांस्कृतिक संदर्भातून विविधांगी स्वरुपाचे चित्रण पहायला मिळते. महाराष्ट्रातील प्रत्येक भागातील वेगवेगळ्या प्रातांतील व्यक्तींनी आपापले अनुभव व्यक्त केले आहेत. आपल्या संस्कृतीतील छोटे-मोठे संदर्भही त्यांनी प्रसंगानुरुप शब्दबद्ध केले आहेत. 'आदोर'मध्ये शिक्षणासंबंधी ज्यावेळी गुरुजी बोढरे पाड्यावर शिकविण्यासाठी रुजू होतात. त्यावेळीचा प्रसंग महत्त्वपूर्ण आहे. जंगलातच झोपडी उभी केली आणि शाळा सुरु झाली. परंतु थोड्याच दिवसात तो शिक्षक बदली करुन जाणे व नंतरचा मागासवर्गीय दलित मास्तर इथल्या भिलाटणीला आणि मावचींना काही पचनी पडला नाही. तो अस्पृश्य म्हणून त्याला छळून पळून लावले. अशा पद्धतीने अस्पृश्यता येथे पहायला मिळते. हा संस्कृतिभिन्नत्त्वाकडे घेवून जाणारा भेदही लक्षणीय वाटतो. हिंदू स्त्रीयांसाठीच्या 'हिंदू कोड बील' लागू करण्यासाठी नजुबाईंनी प्रयत्न केल्याचे दिसतात. स्त्रीयांच्या स्थितीविषयी त्यांना कणखर भूमिका घ्यावीशी वाटली. आपल्या समाजातील सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विवाहसंस्थेविषयी नजुबाई म्हणतात, 'आमच्या जमातीत बहू पत्नीत्त्वाची प्रथा (वहिवाट) असल्याने नवऱ्याच्या इतर बायकांबरोबर जमून घेतल्याशिवाय गत्यंतर नसते. पुनर्विवाह करु म्हणाल तर पहिला नवरा नुकसान भरपाई मागतो. न दिल्यास भीषण मारहाणीस तोंड द्यावे लागते. परिस्थिती अत्यंत वाईट आहे. सासरच्या माणसांकडून मलाही भयंकर त्रास झाला. गावोगाव भटकंती केली. कित्येकदिवस घराबाहेर राहून जेंव्हा घरी यायचे तेव्हा मारपीट, अन्याय, अत्याचार ठरलेलाच.' या पद्धतीने नजुबाई आपल्या समाजातील ह्या विवाह व्यवस्थेत स्त्रीची होणारी घुसमट व तिला सहन करावा लागणारा छळही स्पष्टपणे नमूद करतात. त्यांनी 'आदोर' मधून आदिवासी लोकांच्या आहारात दारुलाही महत्त्वाचे स्थान असते याचाही उल्लेख करतात. लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या कोताऱ्यापर्यंत सर्वांना दारु प्यावयास लागते असे त्या म्हणतात. अशी आदिवासी समाजातील जीवनशैली नजुबाई गावीत प्रामाणिकपणे चित्रित करतात. ही आदिमांची संस्कृती आदिमांच्या स्वच्छंदीपणाचाही परिचय घडविते. भिल्ल मावची या आदिवासी समाजाची जीवन जगणाची स्थिती व जगण्यातील वैविध्यता नात्यांतील सूक्ष्म बारकाव्यांच्या चित्रणाने आदिवासी समाजातील सांस्कतिक संदर्भही बारकाव्याने वाचकांसमोर येतात. नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी समाजातील युवक किसन डगळे समाजासाठी जाणीवपूर्वक कार्य करतो. त्याविषयी राधाकृष्ण नेदरकर म्हणतात, "सामाजिक जाणीव हा फार मोठा गुण तुझ्या जीवनामध्ये दिसतो आहे. ज्या सामान्य अप्रगत, आदिवासी समाजामध्ये तू जन्मास आला आहेस. त्या आदिवासी समाजाची अवहेलना केली नाहीस, उलट समाजाचा अभिमान ठेवला आहेस. समाज कार्यातून, समाज ऋणातून मूक्त होण्याचा प्रयत्न उल्लेखनिय आहे. स्वत:करीता सर्वच जगत असतात. माझे माझे म्हणत संकोचित जीवन जगतात. सर्वकाही आपणासच असावे या विचाराने जीवन जगत असतात. अशा मानवामध्ये आणि प्राण्यांमध्ये फरक फक्त शरीराचाच असतो. भ्रतुहरीच्या दृष्टीने मनुष्य शेपटा शिवाय पशूच आहे. तू मात्र समाजात निश्चितच ललानभूत



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

झाला आहेस. धार्मिक बाबतीत 'मंदीर' उभारणीसारखे महान कार्य तुझ्या हातून घडले आहे. तसेच कळसुबाई शिखर पायऱ्यांचे कार्य हाती घेतले आहेस, ते कळसास जाणारच आहे. त्यामध्ये खारीचा वाटा उचलण्याची संधी मला प्राप्त होवो हीच अपेक्षा."[१] असे किसन डगळे यांनी समाजासाठी सांस्कृतिक ठेव्याच्या दृष्टीने प्रामाणिकपणे कार्य केले. संस्कृती रक्षण आणि समाज विकास होण्यासाठी कार्य केलेले पहायला मिळते. लेखकाने संस्कृती, रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यासंबंधी चित्रण केले आहे. आदिवासी जीवनातील व व्यक्तीच्या एकात्मभावाची संस्कृती जपणारी माणसे दिसून येतात. आपल्या कुटुंबामध्ये केवळ मुली जन्मत होत्या. अशा वेळी आठव्या वेळी लेखक जन्मतो त्यावेळी श्रीकृष्णाचे नावच किसन असे ठेवण्यात येते. श्रीकृष्ण या दैवताचे मानवी जीवनातील स्थान महत्त्वाचे असल्याचा बोध यातून होतो. परंपरागत पद्धतीने जीवन जगणारे आदिवासी जुन्या प्रचलित व्यवस्था जपताना दिसतात. संस्कृतीच्या संदर्भात "दीपावलीनंतर तुलशीचे लग्न झाल्यावर रीतसर ऊस खायला सुरुवात होते असे."[२] ज्यावेळी लहान मुले ऊस खावयाला सुरुवात करतात त्यावेळी तुळशीचा विवाह हा झालेला असायचा तुलशी विवाह हा ऊस खाण्यास आल्याची सूचक घटनाच होती. याचा प्रत्यय लेखक करुन देतो. आपल्या बारा महिन्यांतील चैत्राची आठवण किसन डगळे करुन देतात. चैत्र शुद्ध चौदशीला येणारी भैरवनाथाची यात्रा आणि त्यावेळी दिले जाणारे बोकडांचे बळी यांचेही दर्शन लेखक घडवितो. शेतकरी कुटुंबातील लेखक गावापासून दूर असल्याने त्याला घरच्यांची, शेतीवरील सर्व घटकांची आठवण येई. त्याचे वर्णन करताना लेखक म्हणतो, "मी नोकरीला लागल्यामुळे मला वयाच्या अठराव्या वर्षापासून आईपासून, घरापासून नात्याच्या माणसांपासून दूर राहावे लागले घरची आई-वडिलांची, गावाची, शेतीची, आवडत्या गाई वासरांची इतकी उत्कट ओढ असायची की, एका दिवसाची सुट्टी असली की, गावी जावून आई-वडिलांना भेटायचे, त्यांच्यामध्ये राहून सुखदु:खाचा विचार करायचा माझ्या आवडत्या 'बंगाळी' गाईच्या नुसत्या दर्शनाने, तिच्या अंगाच्या ढुश्शा देण्याने, तोंडाला, अंगाला चाटण्याने ते मुके जनावर आपले ओतप्रोत प्रेम प्रकट करीत आहे. उणीव फक्त ते प्रेम शब्दामध्ये त्या मुक्या प्राण्याला प्रकट करता येत नव्हते. या भावपूर्ण स्पर्शाने मुंबईहून रात्र जागून आलेल्या प्रवासाचा सर्व भार हलका होवून जाई. मन आनंदाने आणि उत्साहाने भरुन जाई."[३] लेखकाने शेतकरी कुटुंबातील सांस्कृतिक नाते पशू, प्राणी, शेतीशी संबंधीत असणारे सर्व घटक हे आपल्या संस्कृतीने प्रेमळपणे जपलेले आहेत. त्याविषयी मानसाच्या मनातील आदर वरील प्रकारे व्यक्त केला आहे. एकूणच सांस्कृतिकदृष्ट्या ह्या घटकांचा विचार करता येतो.

बाबाराव मडावींनी विदर्भातील आदिवासी परधान जमातीची वैविध्यता टिपताना समाजातील अंधश्रद्धा दाखवून दिली आहे. सांस्कृतिक वारशातून पुढे चालत आलेली एक घटना ते सांगतात. "आपल्या शेतात पाणी यावे म्हणून माणसालाच बळी द्यावे आणि बळी दिलेल्या माणसाचे रक्ताचे खिळे शेतात टोचावेत. यामुळं पाणी येते असा त्यांचा समज ही खिळे इतरांनी विकत घ्यावेत व त्याचे भरपूर पैसे द्यावेत केवढा अघोरी प्रकार!"[४] ह्या स्वरुपाचे समज-गैरसमज परधान जमातीत होते. आपल्या समाजाची या अघोरी प्रथेतून मुक्तता व्हावी ह्यासाठी दृष्टी देण्याचे काम बाबारावांनी केले. जंगलातला शूरवीर आदिवासी वाघासोबत सामना करायचा. परंतु आज तो भित्रा बनला आहे. कारण वर्षानुवर्षे येथील प्रस्थापितांनी त्यावर अन्याय केला आहे. आजच्या या आदिवासीविषयी बाबाराव मडावी म्हणतात की त्यांना जमिनी नाहीत. खाण्यापिण्यासाठी काहीच नाही. सरकार मात्र जंगलचे राजे म्हणते आणि या राजाला पोटासाठी भिक मागण्याची वेळ आली आहे. असा परधान जमातीचा सांस्कृतिक वारसा सतत एका पिढीकडून दुसऱ्या पीढिकडे जातो आहे. असे आदिवासींचे जीवन ऱ्हदय पिळवटून टाकणारे आहे. या आदिवासी माणसाची स्वातंत्र्याच्या काळातही अवस्था कशी आहे. हे जोतीराम कोवे म्हणतात. "ये शासन आदिवासी का क्या भला करेगी आजादी मिलने के बाद भी हमारा आदिवासी नंगा रहता है - शर्म की बात है. कैसे नकली आदिवासी बनते है? शासन की आँखे मे धूल कैसी फेकी जाती है."[५] परंपरेने लादलेल्या आदिवासींच्या जगण्याचा विचार व्यक्त झाला आहे. सांस्कृतिदृष्ट्या आदिवासींना महत्त्वपूर्ण रीतीने कार्य करणे व विकासाच्या शासन घोषणा करते. परंतु त्या मूळ आदिवासींपर्यंत पोहोचत नाहीत. केवळ भाषणांनी आदिवासींचा विकास होणार नाही. तर त्याकरीता आदिवासींना मूळ प्रवाहात



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

आणून त्यांचा विकास करणे आवश्यक आहे. तरच आदिवासी समाजाचा सांस्कृतिक अंगानेही विकास होवू शकेल असेही वाटते.

मराठवाड्यातील लातूर येथील रामराजे आत्रामांनी 'उघडा दरवाजा' हे आत्मकथन लिहिले आहे. यामधून त्यांनी आपला जीवनवृत्तांत कथन केला आहे. सुरुवातीस जन्मावेळची घटना सांगातात, "तुझ्या वयाचा पाचवा दिवस, पाचव्या दिवशी सटवी येवून माणूस जन्माचं नशीब लिहीत असती, यामुळे या दिवशी घरात दिवाबत्तीचा उजेड व शांत वातावरण राहणं गरजेचं होतं. शिवाय घरातील प्रत्येक माणूस आत्मसमाधानी व आनंदी राहणे हे ही आवश्यक होते."[६] सटवी या देवतेसंबंधी आलेले चित्रण सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. कारण ह्या देवतेला जीवनामध्ये प्रत्येकाने महत्त्वाचे समजले आहे. आईने लगेच देवीला "हे माते सटवाई, माझ्या या पोराच नशीब चांगलं लिही, याला भरपूर आयुष्य दे, यानं आमचं नावं कमावू दे, याला याच्या जिंदगानीत कांहीच कमी पडु देऊ नकोस, यान राजासारखं राज करु दे."[७] अशा रीतीने लेखकाचा जन्म झाल्यावर सटवाई देवीकडे बाळाच्या संगोपणाविषयी अपेक्षा व्यक्त केलेली दिसते. परंपरागत पद्धतीने चालत आलेली ही प्रथा प्रस्थापितांप्रमाणे आदिवासी समाजातही आहे. याबरोबरच लेखकाने झुंगादेवी, माँ काली यासारख्या देवदेवतांनाही आदिवासी नवस बोलतात व ते पूर्ण न झाल्यावर देवाचा कोप झाला असे समजण्याचाही प्रघात या समाजात पहायला मिळतो. कोंबडे, बोकड, मेंढ्या, चितर, भुरळी, पान कोंबडी, कबुतर अशी देवाला नवस बोलण्याची पद्धतही येथे पहावयास मिळते. एकूणच आदिवासी समाजातील संस्कृतीवहनाने या सर्व गोष्टी आजवर चालत आलेल्या पहायला मिळतात. संस्कृती परिचयाच्या दृष्टीने ह्या सर्व गोष्टी अभ्यासकांला बऱ्याच गोष्टींची माहिती करुन देतात.

डॉ. राजेंद्र भारुड यांनी लिहिलेल्या आपल्या आत्मकथनात ते आईच्या गरोदरपणावेळी मुलगा होण्यासाठी सप्तश्रृंगीला नवस बोलल्याचे सांगतात. आणि योगायोगाने मुलगा जन्मास आला. वंशाचा दिवा आला म्हणून नावही ठेवले दीपक नवस बोलल्याप्रमाणे नवस फेडायला आई-वडील दोघेही उपवास धरुन गेले. उपवासाला वडिलांना दारु लागत असते. गडावर उन्हात पायी चढून गेले. त्यावेळी वडिलांनी सांगितल की, "काहीच नाही होवावू पोरंसले. मी द्रोपदीले धरस. तू दीपकले धर. नवस करा तं तरास सांसनाच पडी, नही त देव रागे भरी."[८] देवांविषयीचा अपार श्रद्धाभाव आदिवासी माणसांमध्ये आहे. देवाला बोललेला नवस फेडणे यांतून देवाविषयी सांस्कृतिकदृष्टीने आदिवासींच्या देवविषयक संकल्पना आंणि भूमिका प्रामाणिकपणे पहायला मिळतात. जे बोलणे ते करणं यामध्ये ते कोणत्याही प्रकारचा भेदभाव करत नाही. भिल्लांचा पारंपरिक व्यवसाय 'दारु काढण्याचा' दारु काढणे व विकणे यावर त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन अवलंबून होते. आजरपणावेळीही ते तिचा उपयोग करतात लेखक म्हणतो की मला खोकला आला की 'चेट्ट फूल' म्हणजे घसा जाळणारी बिनपाण्याची दारु प्यायला देत असत. म्हणून लेखक म्हणतो की आमच्या भिलाटीत दारु औषधासारखी वापरली जायची. अशा प्रकारे समाजातील जीवन जगण्याची पद्धतही लेखक निर्भिडपणे व्यक्त करतो. लेखकाची आईही लेकराबाळांना काही आजार होवू नये म्हणून ती साईबाबाला साकडं घालते. माझ्या मुलाबाळांऐवजी मला आजार होवू द्या. परंतु त्यांना सुखी ठेव असे म्हणणारी आई पहायला मिळते. आदिवासी भिल्ल लोक खेकडे मासे पकडतात खातात. मासे पकडून लेखकाकडे ठेवायला दिलेले मासेही त्याला नीटपणे पकडता येत नव्हते. हा काहीच कामाचा नाही म्हणून त्यास 'तेना बायका-पोरांसन पोट कसं काय भरी? शिकीसन एखादा कलार्क बननां तं बरं शे' अस म्हणून त्याची टवाळीही उडविली जात होती. भिल्ल माणूस आणि त्याची उदरनिर्वाहाची साधने येथे समाजातील सांस्कृतिक वैभव वाचकांसमोर ठेवतात. आदिवासी आत्मकथनांच्या माध्यमांतून वाचकांसमोर आदिवासींची सांस्कृतिक अंगे उलगडताना दिसतात. त्यामुळे प्रामुख्याने देव-देवतांविषयी मत-मतांतरे, त्यांच्या मनातील प्रामाणिक श्रद्धा, कल्याण करण्याविषयीची भोळी-भाबडी श्रद्धा पहावयास मिळते. याबरोबर सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठरणारी भाषासुद्धा वैभवसंपन्न असून ती प्रदेशागणिक प्रवाहीपण जपणारी दिसून येते. महादेव कोळी समाजाची भाषा नाशिक येथील आहे. त्याचवेळी आपण यवतमाळमधील परधानांचीही भाषा लक्षात येतानाच धुळे नंदुरबार मधील आदिवासी भिल्लांची भिलोरी



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

बोलीही समाजाचे सांस्कृतिक वैभव आपल्यासमोर उलगडून दाखविताना दिसते. या रीतीने आदिवासी आत्मकथनांतील सांस्कृतिक वेगळेपण लक्षात येते.

## संदर्भग्रंथ सूची


१. लोहकरे,(संपा.) डॉ. संजय 'फडकी', वर्ष २ रे अंक २ रा, १५ जानेवारी २००९, पृष्ठ क्र. ०८
२. डगळे किसन, 'ठिगळ', संवेदना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००८, पृष्ठ क्र. २२
३. तत्रैव, डगळे किसन, पृष्ठ क्र. १९६
४. मडावी बाबाराव, 'आकांत', सुधीर प्रकाशन, वर्धा, द्वितीयावृत्ती २००८, पृष्ठ क्र.५३
५. तत्रैव, मडावी बाबाराव, पृष्ठ क्र. ५७
६. अत्राम रामराजे, 'उघडा दरवाजा', प्रथमावृत्ती २००९, भूमी प्रकाशन, लातूर, पृष्ठ क्र.३०
७. तत्रैव, आत्राम रामराजे, पृष्ठ क्र. ३२
८. भारुड राजेंद्र, 'मी एक स्वप्न पाहिलं!', दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३, पृष्ठ क्र. १३


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (B)

# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा



**अतिथी संपादक :**

**डॉ. इंद्रजित जाधव**

प्राचार्य,

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

**विशेषांक संपादक :**

**डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर**

मराठी विभाग प्रमुख

बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि. पुणे

**विशेषांक सहसंपादक :**

**प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे**

**मुख्य संपादक :**

**डॉ. धनराज धनगर**

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 82 (B) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | ७२ मैल कथा ते पटकथा एक यशस्वी प्रवास | डॉ.जया कदम | 05 |
| 2 | निशाणी डावा अंगठा- रमेश इंगळे उत्रादकर | डॉ.अजित कांबळे | 10 |
| 3 | भारतीय भाषा चित्रपट आणि लोकमानस | प्रा.चारुदत्त कासार | 19 |
| 4 | पटकथा:एक दृष्टीक्षेप | डॉ.विठ्ठल केदारी | 23 |
| 5 | पटकथा लेखन प्रक्रियेचे स्वरूप | डॉ.वृंदा केळकर | 26 |
| 6 | कथा ते पटकथा : अघटित या कथेचा प्रवास | डॉ. राहूल खरात | 29 |
| 7 | पटकथा लेखन : प्रक्रिया, तंत्र व मंत्र | प्रा. हनुमंत मते | 32 |
| 8 | 'बाजीराव मस्तानी' इतिहासातील व सिनेमातील | डॉ. मधुकर मोकाशी | 36 |
| 9 | पटकथा लेखनाचे स्वरूप | प्रा. भास्कर मोरे | 40 |
| 10 | चित्रपट आणि साहित्य : काल आणि आज | प्रा. सुहास निर्मळे | 44 |
| 11 | पटकथा लेखनातील कारकीर्द | प्रा.विक्रम ओतारी | 48 |
| 12 | नटसम्राट : रंगप्रयोग ते चित्रप्रयोग एक प्रवास | अनुराधा जोशी -पत्की | 50 |
| 13 | पटकथा स्वरूप निर्मिती आणि प्रत्यक्ष आकलनातील काही समस्या | प्रा. संतोष पद्माकर पवार | 55 |
| 14 | साहित्य आणि चित्रपट | प्रा. सुलतान पवार | 60 |
| 15 | पटकथा लेखन प्रक्रिया | प्रा. सुनिता रोकडे | 63 |
| 16 | पटकथेची जडणघडण | प्रा. राणी शेंडकर | 68 |
| 17 | मराठी चित्रपटकथा व त्यांचे घटक | डॉ. प्रकाश शेवाळे | 72 |
| 18 | पटकथेचे विविध प्रकार | प्रा. संतोष शिंदे | 75 |
| 19 | पटकथा लेखन प्रक्रियेचे स्वरूप | डॉ. एन. व्ही. शिंदे | 80 |
| 20 | कोंकणी सिनेमांत पटकथेचो विकास (पलतडचो मनीस फिल्माच्या संदर्भातल्यान) | श्री. गोरक शिरसाट | 85 |
| 21 | पटकथा : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. उमेश सिरसट | 88 |
| 22 | पटकथा लेखन : संकल्पना आणि स्वरूप | सागर सुरवसे | 93 |
| 23 | पटकथा लेखन प्रक्रिया | डॉ. संदीप तापकीर | 95 |
| 24 | पटकथालेखन आणि आधुनिक तंत्रज्ञान | सिद्धार्थ तायडे | 98 |
| 25 | 'श्यामची आई' साहित्यकृती ते पटकथा | डॉ. राजेंद्र थोरात | 104 |
| 26 | साहित्य प्रकार आणि पटकथा | प्रा. बाळू तिखे | 110 |
| 27 | मराठी चित्रपट आणि पटकथा लेखन तंत्र | डॉ. ए. बी. उगले | 114 |
| 28 | पटकथेचे तंत्र : एक अभ्यास | प्रा.अनिल वळवी | 117 |
| 29 | मराठी चित्रपट गीतांचा स्वरूप शोध | डॉ. आनंद वारके | 121 |
| 30 | संवाद : पटकथा लेखनातील महत्वपूर्ण घटक | जालिंदर येवले | 126 |
| 31 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | प्रा. नितीन बटुळे | 129 |
| 32 | लघुपट, माहितीपट आणि चित्रपट | प्रा. नवनाथ गोरे | 131 |
| 33 | पटकथेचे स्वरूप व प्रकार | डॉ. अंजली मस्करेन्हस | 133 |
| 34 | ख्वाडाच्या पटकथेपासून चित्रपटापर्यंत प्रवास | प्रा. किरण गाढवे | 136 |
| 35 | पटकथा : स्वरूप आणि वैशिष्ट्ये | डॉ. पुरुषोत्तम काळे | 138 |




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 82 (B) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# पटकथा : एक दृष्टीक्षेप

डॉ. विठ्ठल केदारी
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि.बीड

मराठी साहित्याने पटकथा निर्मितीला विविध विषय पुरविण्याचे कार्य केले आहे. आज मराठी भाषेमध्ये विविध वाङ्मय प्रकारांत लेखन होते. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित निबंध, प्रवास वर्णन या विविध प्रकारच्या लेखन प्रकारांनी मराठी चित्रपटसृष्टीला आशय आणि विषय उपलब्ध करून दिलेले आहेत. खरे तर कल्पनानिर्मित विश्व चित्रपट आणि साहित्यात लेखक उभे करतो. साहित्यातून उभे केलेले जग लेखकाचे कल्पना विश्वातील जग असते. त्यांचा प्रत्यक्ष वास्तव जीवनाशी तिळमात्र संबंध नसतो. असे असले तरीही लेखकाला लेखन करण्यासाठी समाजातील अनुभवांचे बीज असते. हे अनुभव लेखक स्वत: अनुभवतो, त्यांसंबंधी त्याला आलेला बऱ्या, वाईट अनुभवांना तो लेखनातून व्यक्त करतो हे सर्व करताना त्यांकडील कल्पना शक्ती महत्त्वाचे कार्य करते. कल्पनेतून निर्माण झालेल्या विश्वाला लेखक लिखित रूप देतो. लेखकाने निर्माण केलेले साहित्य हे पटकथा तयार करण्यासाठी उपयोगी ठरते. वाचक दिग्दर्शक, निर्माते उत्कृष्ट साहित्य वाचतात आणि त्यांना आवडलेल्या कलाकृतीचा बारकाव्याने अभ्यास करतात. त्यांना आवडलेल्या, भावलेल्या कलाकृतीतील घटना, प्रसंग पात्र यांची जुळवाजुळव करतात. अशी योग्य घटना प्रसंगांची गुंतवणूक, सोडवणूक, त्यांची उकल विशिष्ट प्रकारे झाल्यावर पटकथा तयार करतात. आज मराठीतील दर्जेदार साहित्य पटकथा लेखनाकरीता निर्मात्यांना, दिग्दर्शकांसाठी विविध विषय उपलब्ध करून देते. त्यातून रसिकांना आवडणारे, सुंदर व कलात्मकता पूर्ण अशा पटकथेचे चित्रपट रसिकांसमोर येत आहेत.

आजचा काळ विज्ञान, तंत्रज्ञानाचा आहे. या काळामध्ये रसिकांसमोर मनोरंजनासाठी विविध गोष्टी आहेत. केवळ नाटक, चित्रपटांएवढाच विरंगुळा राहिला नाही. आज धावपळीच्या युगात वाचकांच्या मनात उत्कृष्ठ साहित्यातील चांगल्या गोष्टींना वाचकांसमोर आणून त्यातून समाजपयोगी गोष्टी रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य पटकथांतून घडताना दिसते. एकूणच आज ज्या पटकथा साहित्यावरून निर्माण झाल्या आहे. त्या पटकथांतून निर्माण झालेले मनोरंजनाचे प्रकार रसिक स्वीकारताना दिसतात. त्या विषयांमधून रसिकाला काहीतरी वेगळेपण प्राप्त झाल्याचे समाधान लाभते. या इच्छापूर्तीसाठी विशिष्ट अभिरूचीचा प्रेक्षक वर्ग वेगळ्या पटकथांतून निर्माण झालेल्या कलाकृतील वेगळेपण अनुभवण्याकडे वळतात.

चित्रपटाची दृश्यसंहित पटकथा असते. त्यामुळे पटकथेला विशेष महत्व प्रात होते. पटकथांशिवाय चित्रपटांमध्ये सर्व कारागिरी, यंत्रमयता, तंत्रमयता भरलेली आहे. लिखित संहितेशिवाय चित्रपट निर्माण होवू शकत नाही. याविषयी कमलेश्वर या हिंदी साहित्य अभ्यासकांनी म्हटल्याप्रमाणे "कुछ अनुभव शब्दो से परे होते है, कुछ दृश्यों से परे। इसिलिए फिल्म–लेखन में उन्हे शब्दों और ध्वनियों से बाँधना पडता। शब्दहिन दृश्य से भरा हुआ सन्नाटा कभी–कभी जो बात कह देता है, वो शब्दों से नहीं कही जा सकती। काव्य की बिम्ब क्षमता, शब्दों की विचार और दृश्य की अनुभव क्षमता के संयोग से एक सि वे दृश्य आकार पाता है। काव्य–क्षमता को कैमरा, दृश्य क्षमता को निर्देशक और विचार क्षमता के साथ–साथ सम्पूर्ण अनुभव–क्षमता की अभिव्यक्ती लेखक करता है। इसलिए कोई भी सार्थक फिल्म पहले लिखी जाती है – तब 'बनाई' जाती है।"[1] चित्रपटांकरीता पटकथा ही आत्मा असते. असे मत येथे स्पष्ट होताना लक्षात येते. पटकथा चित्रपट



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

निर्मितीतील महत्वपूर्ण घटक आहे. कॅमेरा व इतर यंत्रे ही येथे तांत्रिकता म्हणून आपणास विचारात घेता येतात. प्रभावी, नेमक्या आणि परिणामकारक पटकथेशिवाय चित्रपटाला परिपूर्णता प्राप्त होत नाही. म्हणून पटकथा जेवढी आकर्षक तेवढीच ती रसिकांवर प्रभाव पाडणारी असायला हवी. ज्यावेळी पटकथालेखक लेखन करतो त्यावेळी त्याच्या नजरेसमोर चित्रपट असतो. त्यातूनच त्याचे पटकथालेखन होते. लेखनातून पटकथा उभी होतानाच ती चित्रपटांचे रूप घेवून आकारास येत असते.

पटकथा लेखन करत असताना संहिता थेट प्रेक्षकांशी संवाद साधणारी असणे आवश्यक आहे. आपण दृश्यातून संदेश ग्रहण करतो. त्यामार्फत विषय समजावून घेतो. कथानक आस्वादतांना अथवा विषय समजावून घेताना निवदेकाचे निवेदन समजावून घेणे महत्वाचे असते. प्रेक्षक एकाच वेळी पाहणे आणि श्रवण करणे ह्या दोन क्रिया करत असतो. अशा वेळी निवेदकाची भाषा बोजड, अवघड, क्लिष्ट असेल तर आकलनावर ताण पडतो. असा वेगळा प्रेक्षक पटकथेतून आकाराला आलेला दृश्यपट पाहणार नाही. पटकथा लेखन करताना लेखनाची भाषा, प्रवाही व सहजतापूर्ण असणारी हवी. ती बोली स्वरूपाची असणे आवश्यक असते. हा संवाद श्रोत्याशी थेट होणारा असायला हवा.

पटकथा लेखन करताना काही महत्वाच्या बाबीं लेखकाने जोपासाव्यात. "पटकथालेखनासाठी पटकथाकाराकडे चित्रपट या माध्यमाच्या व्यापक अभ्यासासोबतच इतर काही गोष्टींची जाणीव असणे आवश्यक असते. दृश्यात्मकतेसोबतच कथालेखनाची गतिमानता, वेळमर्यादेचे भान, प्रेक्षकांची गुंतवणूक आणि त्यांच्या अभिरूचितील वैविध्य तंत्रज्ञानभिमुखता इत्यादी अनेक घटकांचा समावेश करता येईल. शिवाय चित्रपट निर्मितीत विशिष्ट अशा व्यावसायिक घटकांचे व्यावहारिक हित संबंध गुंतलेले असतात. दृश्य व प्रसंगांची आखणी करताना पटकथाकारास या मुद्याचेही भान बाळगावे लागते."[२] पटकथा लेखन करताना प्रामुख्याने वरील गोष्टींची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. यामुळे लेखकाने लेखनासाठी निवडलेला विषय अधिक परिणामकारक होईल व रसिक त्यावरील आधारित निर्मिती स्वीकारतील. पटकथेसाठी चांगली कथा निवडणे व त्यातून पात्ररचना, प्रसंगनिर्मिती, वेळमर्यादाचे भान, त्यांची कृती निश्चिती व्यवस्थित साध्यण्यासाठी पटकथाकाराकडे कल्पकता आणि प्रतिभा असणे महत्वाचे आहेत ज्यावेळी चित्रपट निर्माण होतो. त्यावेळी तो पाहण्यासाठी सर्व वयोगटातील रसिक येतो. त्या प्रेक्षकाचा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्तरही भिन्न–भिन्न असतो. यामुळे प्रेक्षकांच्या अभिरूचीवर परिणाम पडतो. बहुधा मुळ कथानकावरून चित्रपटामध्ये उपकथानक येत असते. अशा निर्मितीतील पात्र, प्रसंग हे पटकथाकारास पटकथेत आणावे लागतात. अशा वेळी पटकथा लेखकास मूळ कथालेखन लक्षात ठेवून उपकथानकाची निर्मिती साधावी लागते.

साहित्यावरून ज्यावेळी पटकथालेखन केले जाते त्यावेळी "रूपांतरित संहितेत कथानकाच्या स्थल–कालाची पुनर्ररचना होते. प्रसंगांचा वेगळा विचार होतो. स्वभावचित्रण करताना काही पात्रांचे विशेष बदलतात, तर काही विषय सूत्रांचा विस्तार केला जातो. काही वगळली जानात काही नव्याने निर्माण केली जातात. निवेदनाची शैली बदलते, रूपरचना बदलते."[३] अशा पध्दतीने पटकथा लिहिताना स्थल कालान्वये, ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भाने संहिता लेखनात बदल घडत असतात. हे बदल विचारात घेवून संहिता लेखन करून पटकथा सपांतरातील बदल विचारात घ्यावेत. "कुठल्याही कलाकृतीचे वाचन (मग ते साहित्य असो, नाटक असो, संगीत असो, चित्र वा शिल्प असो किंवा चित्रपट) करण्याच्या दोन दिशा असतात ज्ञगज आणि ब्वदजमगज अर्थात संहिता आणि संदर्भ संहिता म्हणजे त्या कलाकृतीला सुटेपनाने बघणे आणि निव्वळ अंतर्गत घटक व त्यांच्या संरचना रूपावर लक्ष केंद्रित करणे. दुसरी दिशा संदर्भाची, कलाकृती आणि अन्य कलाकृती



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 82 (B) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

यांचा परस्पर संबंध, कलापरंपरा, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ इत्यादी संदर्भांच्या वाचनाने संहितेच्या वाचनाला पूर्णता येते."[४] पटकथा रसिकासमोर आल्यावर ह्या सर्व भूमिकेतून समजून घेणे गरजेचे असते. त्यानुसार पात्रांचे संवाद, प्रसंगाचे चित्रण, भाषिक रचना लक्षात घेवून पटकथा लेखक आणि रसिक या दोघांनाही सजगपणे आस्वाद घ्यायचा असतो. एकंदरितच चित्रपटाचे संहितालेखन ही सर्जनात्मक कृती असते. इतर साहित्य प्रकारांच्या लेखनापेक्षा तिला स्वतंत्र व वेगळे स्थान प्राप्त होते. अलीकडीलच्या काळात 'जोगवा', 'दुनियादारी', 'शाळा', 'नटरंग', 'नटसम्राट' हे चित्रपट साहित्यावर आधारित आहेत. त्यांची पटकथा कादंबरीत नाटक यावर आधारित आहे. या चित्रपटांनी मराठी सिनेमासृष्टीत उच्चांक मिळविले. या चित्रपटांच्या पटकथा साहित्यकृतीवर आधारित आहेत. म्हणून उत्तम साहित्य हे चित्रपटांना उत्कृष्ट पटकथा देवू शकतात. वाचनाची आवड असणारे निर्माते, दिग्दर्शक साहित्यकृतीवर आधारित चित्रपट निर्मिती करण्यास पुढे येताना दिसताहेत. एकूणच चित्रपट ही सुध्दा एक ललितकला आहे. त्यामुळे त्याच्या पटकथेचे वाचन होवू शकते. या ललित कलेतून चित्रपटांतून व्यक्त झालेला सौंदर्यानुभव असतो. त्यातून जो विचार रसिकासमोर येतो त्यामध्ये तत्वज्ञान असते. यासंबंधीची जाण पटकथालेखकास असायला हवी. यातूनच चित्रपटांकरीता उत्तम पटकथा निर्माण होवू शकते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. साहित्यकृतीचे माध्यमांतर, संपा. डॉ. भारत हंडीबाग, डॉ. सदाशिव सरकटे, पृष्ठ क्र. १०७
२. तत्रैव, पृष्ठ क्र. ११२
३. तत्रैव, पृष्ठ क्र. १२६
४. मासिक 'वास्तव रूपवाणी' (फेब्रुवारी २०१३), अभिजित देशपांडे यांचा आलेख.

RESEARCH JOURNEY
Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 Special Issue- 112

# महात्मा फुले : व्यक्तित्व, विचार आणि साहित्य



मार्गदर्शक :

**डॉ. ज्योत्स्ना सोनखासकर**

प्राचार्य,

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,

सिडको, नाशिक.

कार्यकारी संपादक :

**डॉ. शंकर बोऱ्हाडे व डॉ. राहुल पाटील**

मराठी विभाग,

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,

सिडको, नाशिक.

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर (येवला)**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 112: महात्मा फुले : व्यक्तित्त्व, विचार आणि साहित्य | February-2019
UGC Approved Journal

## अनुक्रमणिका


| . | लेखाचे शीर्षक | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| | महात्मा फुले : सत्यशोधक समाज आणि तत्त्वज्ञान | डॉ.संतोष तागड | 05 |
| | महात्मा फुले यांचे साहित्य : विचार आणि लेखन | डॉ. सविता खोकले | 08 |
| | महात्मा फुले यांचे साहित्य व समाजजीवन | डॉ. द. के. गंधारे | 11 |
| 4 | म.फुले, डॉ.आंबेडकरी आणि सत्याशोधकी जलसा व साहित्य संमेलने अहवाल आणि इतिवृत्त | डॉ. मधुकर मोकाशी | 15 |
| 5 | महात्मा फुले : एक साहित्यिक | प्रा. चिंतामण धिंदळे | 21 |
| 6 | महात्मा फुलेंचा सामाजिक दृष्टीकोन | डॉ. विठ्ठल केदारी | 26 |
| 7 | सामाजिक मूल्यांचे साहित्यकार – म.ज्योतीराव फुले | प्रा. वासुदेव डोंगरदिवे | 29 |
| 8 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे साहित्यलेखन | डॉ. समिंदर घोक्षे | 33 |
| 9 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे साहित्यविचार | प्रा. योगिता भामरे | 39 |
| 10 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक विचार आणि समाजातील योगदान | प्रा.संगीता चव्हाणके | 42 |
| 11 | महाराष्ट्रातील सामाजकार्य क्षेत्रात महात्मा फुले यांचे योगदान : एक अभ्यास | प्रा.सुनिता जगताप | 45 |
| 12 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार : ब्राम्हण्यवाद व आर्थिक विषमता | प्रा. एच. आर. नेटारे व प्रा. यु. बी. देशमुख | 49 |
| 13 | समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले यांचे महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनातील योगदान | प्रा. आदिती कुलकर्णी | 53 |
| 14 | महात्मा फुले यांचा सामाजिक न्यायासाठीचा लढा | प्रा. आर. आर. सोनवणे | 57 |
| 15 | जोतिबा फुले यांचे वाङ्मयदर्शन | प्रा. हर्षला सूर्यवंशी | 61 |
| 16 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार आणि लेखन | प्रा. कविता मोराडे | 63 |
| 17 | महात्मा फुले यांच्या साहित्यसंपदेचा विविधांगी दृष्टीकोनातून अभ्यास | प्रा. नारायण शिंदे | 66 |
| 18 | महात्मा फुले यांचे साहित्य विचार आणि लेखन | डॉ. मीनाक्षी पाटील | 71 |
| 19 | महात्मा ज्योतीराव फुले यांचे तत्त्वविचार | डॉ. दिलीप पवार | 74 |
| 20 | महात्मा जोतिबा फुले यांचे वाङ्मयीन योगदान | प्रा. नामदेव गावित | 78 |
| 21 | महात्मा फुले यांच्या लेखनावरील संत तुकारामांचा प्रभाव | डॉ. संजय शिंदे | 83 |
| 22 | महात्मा जोतिबा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्ममधील विचार | डॉ. विजय पाटील | 87 |
| 23 | सार्वजनिक सत्यधर्म | डॉ. राकेश कभे | 90 |
| 24 | सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकाविषयी | प्रा. हिरा वाघ | 94 |
| 25 | शेतकरी व दीन-दुबळ्यांचे अर्थतज्ञ महात्मा ज्योतीराव फुले | प्रा. आर. के. सूर्यवंशी | 97 |
| 26 | शेतकऱ्यांच्या सामाजिक वास्तवाचे यथार्थ दर्शन 'शेतकऱ्यांचा असूड' | प्रा. विजयश्री गवळी | 101 |
| 27 | महात्मा फुले यांचे शेती व स्त्री शिक्षणविषयक विचार | अक्षय बोंबले | 104 |
| 28 | शेतकऱ्यांच्या वास्तवतेचे चिंतन | प्रा. निलेश आहेर | 109 |
| 29 | 'शेतकऱ्यांचा असूड' | डॉ. प्रतिभा घाग | 112 |
| 30 | 'शेतकऱ्यांचा असूड' मधून प्रकटणारे विचार : एक आकलन | डॉ. राहुल पाटील | 115 |
| 31 | 'शेतकऱ्यांचा असूड' : एक वाङ्मयीन आकलन | डॉ. सुरेश जाधव | 120 |
| 32 | 'शेतकऱ्यांचा असूड' : भाषिक विचार | डॉ. सुरेखा जाधव | 123 |
| 33 | शेतकऱ्यांच्या समस्येबद्दल म. ज्योतीराव फुले यांच्या विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. स्मिता पाकधाने | 127 |
| 34 | पत्रकार फुले आणि त्यांची पत्रपरंपरा | डॉ. शंकर बोऱ्हाडे | 131 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013) | February-2019
Special Issue 112: महात्मा फुले : व्यक्तित्व, विचार आणि साहित्य
UGC Approved Journal

# महात्मा फुलेंचा सामाजिक दृष्टिकोन

डॉ. विठ्ठल केदारी,
मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई

महाराष्ट्राला समाजसुधारकांची थोर परंपरा लाभली आहे. समाजविकासाठी म. फुलेंचे विचार महत्वाचे ठरतात. म. फुले यांनी समाजातील अस्पृश्यता, भेदाभेद, सवर्ण–दलित, वंचित, उपेक्षित वर्गाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कार्य केले. भारतीय समाजव्यवस्था वर्गसंघर्ष आणि वर्णव्यवस्थेचा बळी आहे. ह्या वर्णव्यवस्थेत प्रस्थापित वर्गातील घटक तळागाळातील माणसांचे शोषण करतो. प्रस्थापितांच्या शोषणाला भारतातील अस्पृश्य समाज पिढ्यानपिढ्या बळी पडला आहे. स्वत: कुणबी समाजात जन्मलेल्या म. जोतीराव फुलेंना प्रस्थापित व्यवस्थेचा रोष सहन करावा लागला.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडण–घडणीत सामाजिक समतेचा पुरस्कार म. फुलेंनी केला. रूढी, प्रथा, परंपरेने अन्यायाला, शोषणाला बळी पडलेल्या समाजाच्या दु:खाला मुखर करण्याचे कार्य म. फुलेंनी केले. समाजव्यवस्थेविरूध्द बंड पुकारणारे कृतिशील विचारांचे समाजसुधारक म.फुले आहेत. म. फुलेंनी कृतीशीलतेतून लेखनातून समाजातील उपेक्षित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. बहुजन समाजाचा विकास झाल्याशिवाय समाजाची उन्नती होणार नाही. ह्याविषयी म. फुलेंचे विचार मौलिक आहे. बहुजन समाज अडाणी, अशिक्षित, ज्ञानापासून दूर आहे. त्यांचा विकास व्हावयाचा असेल तर त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचणे गरजेचे आहे. स्त्रीया आणि दलित वर्गाला शिक्षण दिल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही यासाठी म.फुलेंनी या वर्गातील घटकांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याच्या कृतीशील विचारातूनच १८४८ मध्ये पुणे येथे शाळा स्थापन केल्या. प्रसंगी म.फुले आणि सावित्रीबाई फुले यांना या कार्यास्तव समाजाचा त्रास सहन करावा लागला. मात्र म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी या प्रसंगांतही समाजाला विकसित करण्यासाठी प्रयत्न सोडले नाहीत.

म.फुले यांना जागतिक सामाजिक समता अपेक्षित होती. त्यांच्या साहित्यातून त्यांची भूमिका स्पष्टपणे लक्षात येते. मानवाच्या जीवनातील सत्यशोधणे याकरीता सत्यशोधकाची भूमिका घेत धर्मप्रणालीतील दोष समाजासमोर आणले. धर्माचा आधार घेवून स्त्री शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रीयांना मानवी हक्क व अधिकार मिळावेत यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म शेतकऱ्याचा असूड, तृतीय रत्न यासाख्या ग्रंथातून समाजाविषयीची तळमळ व्यक्त केली. १९६० च्या दरम्यान निर्माण झालेली ग्रामीण साहित्याच्या चळवळीलाही म. फुलेंचे योगदान महत्वाचे होते. सामाजिक न्यायाकरीता म. फुलेंचे साहित्य आहे असे लक्षात येते. "नवीन ध्येयांचा प्रत्यय नष्ठ करण्याची प्रवृत्ती निर्माण होवू शकत नाही. केवळ विनाशाकरीता विनाश, म्हणून विनाशाकरीता प्रवृत्त होणे हे विध्वंसक अतएव् विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. म. फुले यांची मनोरचना अत्यंत निरामय होती. शाश्वत नैतिक सत्याच्या आधारावर त्याची विचारसरणी अधिष्ठित होती. त्यांना उच्चतर सामाजिक विकासाला कारणीभूत होणाऱ्या चिरंतर मूल्यांचा प्रत्यय आला. जोतिबा हे सत्यशोधक होते हे सत्य होते. त्या चिरंतन सत्याचे स्वरूप म्हणजे विश्वमानवाच्या मुक्ततेचा सिध्दांत हा सिध्दांत त्यांना आधुनिक पश्चिमी संस्कृतीने दिला व तो त्या काळी त्यांच्यासारख्या थोड्यांनाच घेता आला."[१] या पध्दतीने महात्मा फुले



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

यांनी सत्याचा आधार स्वीकारून आला सत्यशोधनाचा मार्ग तयार केला. समानतेचे तत्त्व संपूर्ण समाजात रूजविण्याचा विचार जगाला देणारा समाजसुधारक म. फुले होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाला म. फुले यांनी वेगळा दृष्टिकोन दिला. सामाजिक जीवनात दलित आणि स्त्रीया यांच्या विकासासाठी आयुष्यभर झिजले. त्यांच्या कार्यात प्रस्थापितांनी विविध प्रकारे अडथळेही निर्माण केले. सर्व प्रकारचा रोष पत्करून म. फुलेंनी आपले ध्यैय पूर्ण केले. इंग्रजी कालखंडात हिन्दुस्थानात शिक्षण आले परंतु ते विशिष्ट समाजापुरते मर्यादित राहिले. शिक्षण प्रक्रियेत आलेला वर्ग आपले आर्थिक हीत पाहू लागला. त्याची आर्थिक स्थिती मजबूत बनवत राहिला. शिक्षणाचे फायदे बहुजनापर्यंत पोहचत नाहीत. परिणामी बहुजन समाज आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मागास राहिला. जातिभेदाचे समाजामध्ये स्तोम माजले. परिणामी समाजाभोवती विविध पध्दतीचे पाश पसरले गेले. ब्राह्मण पुरोहितांनी वर्णव्यवस्था निर्माण केली. ही व्यवस्था ब्राह्मणशाहीचा प्राण होती. चातुवर्ण्य व्यवस्था नष्ठ झाली की ब्राह्मणी वर्चस्व नष्ट होते. हे अभिजनवर्गाला माहिती होते. म्हणून कर्मकांड, धर्मग्रंथ वगैरे उपायांनी ही व्यवस्था जखडून ठेवली. त्यांच्या मते एकच पुरूष ब्राहमणाच्या तोंडातून, बाहूतून, जांघेतून आणि पायातून निर्माण झाला. ह्या कल्पनेत बहुजन समाजाला पिढ्यानपिढ्या अडकवून ठेवले व त्यावर राज्य करत राहिले. वास्तविक हे सर्व काल्पनिक आहे. बहुजनांचा विकास व्हायचा असेल तर त्यापर्यंत ह्या सर्व गोष्टी पोहोचल्या पाहिजेत. यासंबंधीचा विचार म.फुले गुलामगिरीतून स्पष्टपणे मांडतात.

म. फुले यांचा सत्यशोधक समाजाचा मुख्य लढा पारंपरिक पुरोहितशाहीच्या विरोधी होते. कनिष्ठ स्तरातील लोकांनी जन्मभर उच्चवर्णीयांची केवळ सेवा–चाकरी करावी. अशी तरतूद धर्म संस्थेत आणि पुरोहितशाहिला जोतीबांच्या सत्यशोधक समाजाने मोठे परिवर्तन घडवून आणले. ब्राह्मणाशिवाय धार्मिक कार्य करायचे हा क्रांतिकारक विचार पुढे आला. बहुजनांना सामाजिक जीवनाचे मार्गदर्शन करण्यासाठी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथातील विचार बहुजन समाजाने स्वीकारला की त्यांचा विकास होईल. असा विश्वास म. फुलेंना वाटत होता. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथाच्या रूपाने बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाकरीता म्हणून मोठ्या कष्टाने स्वत:चा उजवा हात अर्धांगवायूने बधीर झाला असतानाही जिद्दीने डाव्या हाताने लिहून उपलब्ध करून दिला. या ग्रंथात सत्यशोधक चळवळीचे लिखित स्वरूप आणि हेच तत्वज्ञान बहुजनांच्या विकासाचे सर्वोच्च बिंदू मानले गेले आहेत. पुरूषांबरोबरच स्त्रीयांचाही विकास महत्वाचा आहे. स्त्रीयांचे प्रमुख तीन शत्रू जोतीबा यांनी सांगीतले. अंधश्रध्दा, निरक्षरता, अज्ञान हे आहेत. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते अशी धारणा म.फुलेंची होती. "अंधश्रध्देमुळे भारतातील बहुजनांची जेवढी होती झाली तेवढी हानी कोणत्याच गोष्टीमुळे झाली नाही. आजच्या विज्ञान युगात सुध्दा देव माणणारा माणूस अशिक्षितच मानावा लागेल. मग तो कितीही विद्वान असो तरी तो अशिक्षितच मानावा. एक वेळ अज्ञानी आणि अशिक्षित माणसाने देव मानला तर तो क्षम्य ठरेल. परंतु विज्ञान युगात ज्ञानी माणसाने देव मानने राष्ट्रविघातक ठरते."[२] अंधश्रध्देमुळे समाजाची हानी झाली आहे. यातून समाजाची मूक्तता होणे महत्वाचे होते.

म.फुलेंनी तृतीय रत्न या नाटकांतून सामाजिक जीवनात बहुजनांची होणारी फसवणूक सांगितली आहे. देवा–धर्माच्या नावाखाली भट–ब्राह्मणांकडून बहुजनांचे शोषण होते. ह्यासंबंधी 'तृतीयरत्न'मधून भाष्य केले आहे. भट जोशी यांचे खोटे उपदेश, भविष्य वर्तमान, ह्यागोष्टींना बहुजनांनी बळी पडू नये. ते वरवर गोड बोलत असले तरी कारल्यासारखे कडू आहेत. बहुजनांनी त्यांच्या उपदेशांना बळी पडू नये. बहुजन समाजाला कर्जाच्या खाईत उभे करून स्वत:चे हीत साधतात. धर्माच्या भीतीपोटी बहुजन समाज बळी पडतो. म.फुले यांना सामाजिक



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

सुधारणा हवी होती, आणि बहुजन समाजातील शूद्रातीशूद्रांचा उध्दार त्यांना करायचा होता. शूद्रातीशूद्रांना भट–ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून सोडावयाचे होते. म. फुलेंच्या सामाजिक विचारांच्या आणि कार्यांच्या संदर्भात सतीश जाळे म्हणतात, "महात्मा जोतिराव फुले आधुनिक महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ कृतिशील समाज चिंतक होते. त्यांचे कार्य तर मोठे आहेच. त्यांच्या विचारांची झेपसुध्दा तितकीच मोठी व विस्मयजनक आहे. हिंदू समाजातील शूद्रातीशूद्रांच्या व्यथा निःशंकपणे बोलून दाखविणारे महात्मा जोतिराव फुले आधुनिक महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते."[३] यारीतीने बहूजन समाज सामाजिक जीनामध्ये शोषणाला बळी पडला आहे. यातून त्याची मूक्तता झाल्यावर समाजाचा विकास होईल असे वाटते.

सर्व मानव ईश्वराची लेकरे आहेत. त्यांचे हक्क समान असले पाहिजेत. एकमेकांत बंधू–भावाची बांधिलकी असावी. निसर्गातील निर्मिकाने सर्वांना समान गोष्टी दिल्या आहेत. समानता जगण्याचे सूत्र घेऊन सर्वांना जीवन जगता यावे. परस्परांशी समानतेचा व्यवहार असावा. आपापसामध्ये विषमतामूलक धर्माचरण न... समदृष्टी असावी, असे त्यांना मनापासून वाटे. म्हणून सत्यावर आधारलेला, समताधिष्ठित समाज उभा करावा यासाठी सत्यधर्म ही संकल्पना म. फुलेंनी मांडली. त्याची तत्वे ठरवून दिली. यातून एक नवा समाज घडविण्याचा प्रयत्न सुरू झाला.

'शेतकऱ्याचा असूड'मधून, "शेतकऱ्यांच्या शोषणाचा महालेख म्हणजे शेतकऱ्याचा असूड होय. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या भौतिक गरजा शेतकऱ्यांच्या कष्टामुळेच पूर्ण होवू शकतात. हा शेतकरी समाज निरोगी व बळकट असला पाहिजे, ही जोतिरावांची भूमिका होती."[४] ह्या ग्रंथाच्या रचनेमागे म.फुलेंचा सामाजिक दृष्टिकोण होता. "पुरोहितवर्ग, गावकामगार आणि शासन व्यवस्थेतील नोकरशाही हे शेतकऱ्यांचे खरेखुरे शोषक आहेत."[५] अशी स्पष्ट भूमिका म. फुले व्यक्त करतात. रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांडातून शेतकऱ्यांचे शोषण होते हेही स्पष्टपणे सांगतात. "ज्या ब्राह्मणांना उच्चशिक्षण घेता येत नाही. ते संन्याशाचे सोंग घेऊन समाजातील अज्ञानी व अशिक्षित लोकांवर कसे वर्चस्व गाजवितात व त्यांची पिळवणूक करतात." असे विश्लेषण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मांडतात. त्यातून शेतकरी व शूद्रांच्या दारिद्र्यांची मीमांसा स्पष्ट होत आहे.

## समारोप :

म. जोतीराव फुले हे कृतिशील समाजसुधारक होते. त्यांनी आयुष्यभर बहुजन समाजांच्या उन्नतीचे ध्येय मनाशी ठेवून कार्य केले. दलित, स्त्रीया यांच्या विकासासाठी शिक्षण आणि समानतेचे मूल्य महत्वाचे मानून त्या संबंधी सर्वांमध्ये बंधू–भावाची वृत्ती निर्माण होण्यासाठी तत्कालीन धर्म हा आपल्या प्रगतीला पोषण नाही हे ओळखून नवा सार्वजनिक सत्यधर्म तयार करून त्याची आचरणप्रणाली समाजाला दिली.

## संदर्भग्रंथ सूची :

१. फडके य. दि. (संपा.), म.फुले समग्र वाङ्मय, पृष्ठ क्र. १६
२. प्रा. विराग गावंडे (संपा.), म.ज्योतिबा फुले साहित्य दर्शन, पृष्ठ क्र. २३
३. तत्रै व, पृष्ठ क्र. ८९
४. रानडे पुष्पा ( संपा.), समाजसुधारकांचे मराठी साहित्याला योगदान, पृष्ठ क्र. १०३
५. तत्रैव, पृष्ठ क्र. १०३
६. तत्रैव, पृष्ठ क्र. १०३



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner


Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019 SPECIAL ISSUE- 149

# दलितेतर साहित्यिकांचे दलित साहित्यातील योगदान




**अतिथी संपादक :**
**डॉ. आर.पी. भामरे**
प्राचार्य,
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, सुरगाणा, जि. नाशिक

**विशेषांक संपादक :**
**प्रा. एस.आर. पावडे**
मराठी विभाग प्रमुख,
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, सुरगाणा, जि. नाशिक

**विशेषांक सहसंपादक :**
**डॉ. वाय.डी. भामरे**
मराठी विभाग,
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, सुरगाणा, जि. नाशिक

**मुख्य संपादक :**
**डॉ. धनराज धनगर (येवला)**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 149- दलितेतर साहित्यिकांचे दलित साहित्यातील योगदान
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | दलितेतर कथा – लेखक श्री.म.माटे यांचे दलित साहित्यातील योगदान 'उपेक्षितांचे अंतरंग मधील' व्यक्ती व समाजदर्शन एक अभ्यास .... | प्रा.श्री.एन.व्ही.गवळी | 05 |
| 2 | अरुण साधू यांच्या वहिष्कृत मधील दलित जीवनाचे चित्रण | प्रा.विनोद केदारे | 10 |
| 3 | दलितेतर साहित्यिकांचे दलित कथा साहित्यातील योगदान | प्रा.विजय जाधव | 14 |
| 4 | दलित साहित्य प्रवाहातील दलितेतर समीक्षकांचे योगदान (विशेष संदर्भ : भालचंद्र फडके, रा.ग.जाधव, गो.म.कुलकर्णी आणि सदा कऱ्हाडे | प्रा.विद्या सुर्वे बोरसे | 19 |
| 5 | दलित साहित्याचे वेगळेपण | डॉ.विठ्ठल केदारी | 23 |
| 6 | दलित कथा एक आढावा | प्रा.विठ्ठल जाधव | 27 |
| 7 | महात्मा ज्योतिबा फुले अस्पृशांचे कैवारी | प्रा.ई.पी.आहेर | 31 |
| 8 | अस्पृश्योद्धारक महाराजा सयाजीराव गायकवाड | गिरीष गायकवाड | 35 |
| 9 | दलितेतर समीक्षक प्राचार्य डॉ.अविनाश सांगोलेकर यांचे दलित साहित्यसमीक्षेतील योगदान | प्रा.धनाजी उर्फ धनंजय भिसे | 40 |
| 10 | स्वातंत्र्यपूर्व काळातील दलितेतर लेखकांच्या कादंबरीतील दलित चित्रण | डॉ.प्रकाश शेवाळे | 43 |
| 11 | माहीमची खाडी एक दलिततेतराची सामाजिक जाणीव | प्रा.सोमनाथ पावडे | 48 |
| 12 | दलितेतर कथाकारांनी लिहिलेल्या दलित कथा | प्रा.युवराज भामरे | 53 |
| 13 | बाळकृष्ण कवठेकरांचे दलित समीक्षेतील योगदान | डॉ.सुदर्शन दिवसे | 57 |
| 14 | दलितेतर साहित्यिकांचे 'दलित कादंबरी' तील योगदान | डॉ.जितेंद्र बिराजदार | 70 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवले आहेत. प्रकाशक, संपादक यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय यातील लेखांचे पूनर्प्रकाशन करता येणार नाही. या विशेषांकातील लेखांतून/संशोधन निबंधांतून व्यक्त झालेली मते ही त्या संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत, त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ स्वामित्व हक्काविषयीची (कॉपी राईट्स संदर्भातील) सर्वस्वी जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 149- दलितेतर साहित्यिकांचे दलित साहित्यातील योगदान
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# दलित साहित्याचे वेगळेपण

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

मराठी साहित्यामध्ये साठोत्तरी वाङ्मय प्रकारांचे स्थान वैशिष्ट्येपूर्ण आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजातील विविध स्तरांतील घटकांना शिक्षण मिळाले. शिक्षण घेण्याकडे दलित, वंचित समाजातील तरूण–तरूणी मोठ्या संख्येने आकर्षित झाले. दलित समाजातील अनेक लेखकांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन इ. वाङ्मयप्रकारांतून झपाटून लेखन निर्मिती केली. एकूणच दलित साहित्यातील आत्मकथन या वाङ्मयाच्या निर्मितीनंतर दलित साहित्याची चर्चा राष्ट्रीय, राज्य पातळीवर जोरदारपणे व्हायला लागली. ह्या सर्व बाबींसाठी दलित साहित्याच्या भाषांतरांची किमया आहे. दलित लेखकांच्या पुस्तकांची भाषांतर झाली आणि दलित साहित्याने मराठी वाङ्मयाची ओळख सर्वदूरपर्यंत पोहोचवली. दलित साहित्याची भाषांतरे प्रामुख्याने हिंदी, इंग्रजी तसेच इतर प्रादेशिक भाषांतून झाली. त्यामुळे आत्मकथनकारांच्या रचना हिंदीमध्ये भाषांतरित झाल्याने त्या आत्मकथनांचा विचार हिंदी भाषक करू लागले. तसेच विद्यापीठीय अभ्यासक्रमात समावेश झाला. हिंदीमधील कमलेश्वर, राजेंद्र यादव, महिपसिंह, रमणिका गुप्ता, नामवरसिंह आणि मॅनेजर पांडे यांसारख्या पुरोगामी समीक्षकांनी हिंदी साहित्याच्या चर्चेत सहभाग घेतला. "दलित साहित्याची हिंदीत जोरदार चर्चा सुरू झाली होती. पण ही चर्चा संपूर्ण भारताचे लक्ष्य वेधू शकली नव्हती. जेव्हा दलित लेखकांच्या लेखनाचे इंग्रजीमध्ये अनुवाद झाले. तेव्हा मात्र विदेशात दलित साहित्याच्या चर्चेने वादळ उठले. इंग्रजीमध्ये झालेले अनुवाद हे सगळ्या प्रादेशिक भाषेत लिहिणाऱ्या दलित लेखकांच्या पुस्तकांचे होते. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेचे अस्वस्थ करणारे जातिवादी चित्र जगासमोर आले. दलित साहित्याची ओळख निर्माण झाली. विद्यापीठीय अभ्यासक्रमांमध्ये आणि संशोधनामध्ये ह्या साहित्याचा समावेश झाला. अनुवादामध्ये दलित साहित्याचा राष्ट्रीय स्तरावर उदय झाला. असा मला समज करून द्यायचा नाही."[१] एकूणच दलित साहित्याने मराठी वाङ्मयाला जागतिक पातळीवर ओळख निर्माण करून दिली.

भारतीय समाजव्यवस्थेतील दलित समाज वर्ण व्यवस्थेच्या शोषणाला अन्याय अत्याचाराला पिढ्यानपिढ्या बळी पडलेला होता. या माणसांच्या जीवनामध्ये प्रथमतः महात्मा फुले यांनी शोषणाविषयी जाणीव करून दिली. नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृतीशील विचारांतून दलित समाज आपल्या व्यथा–वेदनांना साहित्यातून व्यक्त होवू लागले. आपल्यावर झालेला अन्याय–अत्याचार, शोषण–पिळवणूक यासंबंधी लेखन करून प्रस्थापित साहित्य व्यवहारामध्ये नवप्रवृत्तीचे लेखन नवजीवनाचे चित्रण रेखाटू लागले. त्यामुळे साहित्यविश्वाला अपरिचित जीवनाचे परिचितीकरण होवू लागले. "भारतीय समाजातील वर्ण–जातीव्यवस्थेने ज्या ज्या लोकसमूहाला सर्वांगाने किंवा समर्थाने निर्माण केलेले साहित्य हे शोषित – वंचितांचे साहित्य आहे असे मी मानतो. या देशातील दलित, कष्टकरी, भटके–विमुक्त आदिवासी आणि स्त्रिया हे या अर्थाने शोषित – वंचित म्हणूनच ओळखले जातात. त्याचे कारणही तसेच आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात जातिप्रधानता असणे आणि त्यातून सवर्ण जातींनी धर्मग्रंथाच्या आधारे, अवर्ण किंवा कनिष्ठ मानल्या गेलेल्या जाती जमातींचे धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शारीरिक शोषण करणे ही प्रक्रिया या देशात अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या मार्गांनी अव्याहतपणे चालू होती आणि आजही ती चालू आहे. या



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
February-2019

प्रक्रियेविरूध्द सुमारे अडिच हजार वर्षापूर्वी तथागत गौतम बुध्दाने अष्टांगिक मार्ग निर्माण करून शील, करूणा आणि प्रज्ञेच्या आधारे 'बहुजनहिताय बहुजन सुखाय' हा मानवी विकासाचा, परिवर्तनाचा बहुमोल विचार दिला. ”[२] दलित साहित्य हे शोषणाला बळी पडलेल्या माणसांचे साहित्य आहे. त्यामुळे या साहित्यातून मानवी संघर्ष, व्यथा, वेदना आलेल्या आहेत. समाजव्यवस्थेत अगदी शेवटच्या स्थानी असलेला माणूस प्रस्थापितांच्या शोषणाला, अन्यायाला, अत्याचाराला बळी पडलेला आहे. त्याचे जीवनचित्रण दलित साहित्यातून समोरे येते. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाल्याने मोठ्या प्रमाणात शिक्षणाचे वारे सामान्य माणसापर्यंत पोहोचायला लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश दिला. या मंत्राची प्रेरणा घेवून दलित समाजाने शिक्षण घेतले. आपला उध्दार आपण केला पाहिजे. या भूमिकेतून सर्व दलित बांधव शिक्षित झाला. दलित समाजातील माणसांचे सुख, दु:ख, व्यथा–वेदना साहित्यात शब्दबध्द होताना त्या समाजाच्या म्हणून साहित्यातून व्यक्त होवू लागल्या. नवशिक्षितांच्या लेखनाने सांस्कृतिक परिवर्तन घडविण्यासाठी दृष्टी दिली. यामुळेच दलित साहित्याच्या प्रवाहाला बळ मिळाले.

मराठी साहित्यामध्ये आजपर्यंत शोषित – वंचितांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात आले नव्हते. जे चित्रण मराठी वाङ्मयात आले ते संत वाङ्मयात दिसून येते. संत परंपरेत विविध जाती–धर्मातील संतांनी साहित्याची निर्मिती केली. त्यामध्ये अस्पृश्य समाजातील संतांनी विठोबाच्या देवळाची पायरी ओलांडण्याचे धाडस मात्र केले नाही. संत तुकारामाचा अपवाद वगळता संतसाहित्यामध्ये विद्रोहाची, बंडखोरीची भाषा आलेली पहायला मिळत नाही. त्या लेखनात एक प्रकारची देवशरणता, दैववाद आणि परिस्थितीशरणता होती. संतांनी सामाजिक वास्तवाबद्दल तक्रार केली होती. मात्र ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू शकली नाही. इतर ललित साहित्यलेखनात शोषित – वंचित, जाती जमातींना फारसे काही स्थानच राहिले नाही. भारतीय समाज हा विविध जाती–जमातींचा आहे. या समाजातील शोषित–वंचित समूहांनाही आपण स्वतंत्र आहोत आणि त्यांचे स्थानही भारतीय समाजात महत्वाचे आहे. यासंबंधीची जाणीव दलित साहित्याने मराठी साहित्यविश्वाला प्रांरभी करून दिली. याच सुमारास कलावंतांनी आणि लोकशाहीरांनी भरभरून योगदान दिलेले पहायला मिळते.

दलित साहित्याच्या प्रवाहाला फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची बैठक आहे. ह्या विचारवंताच्या विचाराला सामाजिक विषमतेची जोड होती. ह्या विचारांबरोबरच विद्रोहाची जाणीव घेवून बाबुराव बागूल, डॉ. गंगाधर पातवावणे, नामदेव ढसाळ, दया पवार, राजा ढाले, ऋषिकेश कांबळे, वामन निंबाळकर, अरूण कांबळे, ज.वि. पवार, यशवंत मनोहर आणि डॉ. रावसाहेब कसबे या विचारवंतांनी वैचारिक लेखन करून दलित साहित्याचे दालन समृध्द केले. साहित्यातून वास्तविक विद्रोहाचा पुरस्कार प्रज्ञा पवार, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मीनाक्षी मून इ. कवयित्रींनी आणि नामदेव ढसाळ, त्रिंबक सपकाळे, केशव मेश्राम, भाऊ पंचभाई, शरणकुमार लिंबाळे, मनोहर जाधव, प्रकाश घोडके, लहू कानडे, लोकनाथ यशवंत, डॉ. अनिल सपकाळ, अरूण काळे इ. कवींनी आपल्या कवितांमधून काव्यविश्वाला हादरवून टाकणारे लिखाण केलेले आहे. या सर्व साहित्यिकांनी आपल्या साहित्यनिर्मितीतून समाजव्यवस्थेचा चेहरा वाङ्मयविश्वाला माहिती करून दिला. आपल्या मनातील प्रस्थापित व्यवस्थेविषयीचा रोष त्यांनी व्यक्त केला असे म्हणता येते. अलीकडील काळामध्ये आत्मकथनांच्या माध्यमातून दलित लेखकांनी आपले जीवनविश्व प्रस्थापितांसमोर मांडले. यामध्ये प्रामुख्याने शंकरराव खरात, डॉ. नरेंद्र जाधव, उत्तम कांबळे, प्र.ई. सोनकांबळे, शरणकुमार लिंबाळे, रूस्तुम अचलखांब, पार्थ पोळके, शांताबाई कांबळे, उत्तम तुपे, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर, ना.म. शिंदे इ. साहित्यिकांनी मराठी समाजमनाला नव जीवनाचे दर्शन घडविले. एकूणच लोक असेही जीवन जगतात याविषयी कल्पना



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 149- दलितेतर साहित्यिकांचे दलित साहित्यातील योगदान
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

मध्यमवर्गीय वाचकाला आली. शोषित, वंचितांच्या अमर्याद दुःखाची जाणीव मराठी सारस्वताला यानिमित्ताने झाली. आपल्या जीवनाचे उघडे–वाघडे जीवनदर्शन मांडून न्याय मागण्याची भूमिका या सर्व लेखकांची असल्याचे लक्षात येते.

दलित साहित्याने वेगवेगळ्या भाषा, बोली आणि जीवनवास्तवाला समाजासमोर आणल्याने त्यातील वास्तव स्वीकारण्याविषयी अथवा त्याच्या सत्यतेविषयी साहित्याला पेच निर्माण झाला. कारण आजपर्यंत या आशयाचे साहित्य मराठीत लिहिले गेले नव्हते. भारतीय समाजव्यवस्थेतील दलित माणूस साहित्याचा विषय झालेला नव्हता. त्या माणसाच्या जीवनाविषयी, संस्कृतीविषयी विविधता होती. "दलित एका देशात नाहीत. दलित एका धर्मात नाहीत. दलित एका प्रदेशात नाहीत. दलित एका जातीत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. ह्याला विविधता म्हणून गोंजारणार आहात का? दलितांची भाषा, प्रदेश, धर्म, कुठलाही असो त्यांची वेदना एक आहे. त्यांची जाणीव एक आहे. त्यांचे प्रश्न एकसारखे आहेत. त्यांचा भेदभावाविरोधी व्यक्त होणारा विद्रोह समान आहे. त्यामुळेच बाबासाहेब आंबेडकरांचा विचार सर्व दलितांनी आपला विचार मानलेला आहे. हे लक्षात घेतले पाहिजे."[३] असे या माणसांविषयीचे वेगवेगळ्या गोष्टीसंबंधीचे वेगळेपण साहित्यात आल्यावर प्रस्थापित साहित्याच्या वाचकाला विविध स्वरूपाच्या प्रश्नांचा सामोरे जावे लागले. कारण समाजातील जातीयता, अस्पृश्यता, भाषा, प्रदेश, धर्म यासंबंधीची विविधांगी जाणीव साहित्यातून प्रकट होवू लागली. हे स्वरूप निश्चितच वेगळ्या स्वरूपाचे होते.

या वेगळ्या प्रवृत्तीचे साहित्याला चळवळीने प्रेरणा दिली. "दलित–शोषित समाजासाठी कार्य करणाऱ्या या चळवळीतील नेतृत्वाने, शोषित, पीडित समाजाला आणि कार्यकर्त्यांना प्रस्थापित समाजव्यवस्थेला रूढी, परंपरांना, अधश्रध्दांना जगण्याच्या साधनांना नकार देण्यास प्रवृत्त केले. पण काय स्वीकारावे जगण्याची पर्यायी साधने कोणती हे सांगितले नाही. त्यामुळे दलित–शोषित समाज आणि या चळवळीतील कार्यकर्ते परावलंबी बनले. स्वावलंबनावर आधारित पर्यायी व्यवस्था किंवा तशी पार्श्वभूमी चळवळीने निर्माण केली नाही. आजच्या दलितांचे प्रश्न भारतातील सध्याची विषम समाजव्यवस्था नष्ट झाल्याशिवाय सुटू शकणार नाहीत आणि त्याशिवाय दलित चळवळीला जातीय पातळीवरून व्यापक अशा वर्गीय पातळीवर नेताही येणार नाही. म्हणून आज दलितांच्या चळवळीला ही समाजव्यवस्था मोडून टाकून सामाजिक, आर्थिक न्यायावर उभ्या असणाऱ्या क्रांतिकारी चळवळीचे स्वरूप येणे आवश्यक आहे. त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारी समाजव्यवस्था निर्माण होणार आहे."[४] असा नवा समाज निर्माण करण्यासाठी दलित साहित्य निर्माण झालेले आहे. एकूणच नवसमाजव्यवस्था आणि समाजजीवनात जीवन जगण्याची नवसंस्कृती जी मानवी मूल्यांवर उभी असेल अशी भूमिका घेवून दलित साहित्याची निर्मिती होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व भगवान गौतम बुध्दांच्या मानवतावादी दृष्टिकोण आणि म.फुले, राजर्षी शाहू महाराज या व्यक्तिमत्वांचा प्रभाव जडणघडणीत महत्वाचा होता. डॉ. बाबासाहेबांच्या याच व्यक्तित्वाचा प्रभाव दलित साहित्यावर दिसून येतो.

आज दलित साहित्य नुसतेच लोकप्रिय झाले. असे नाही तर यातून एक लोकचळवळ निर्माण झाली. अन्यायकारक जगणे बदलले पाहिजे हे सांगू लागले. दलित साहित्याने निग्रोंच्या साहित्याशी जवळीक साधणाऱ्या या चळवळीने जागतिक परिणाम प्राप्त केले आहे. जगभरातल्या दुःखितांशी असलेले आपले नाते दाखवून दिले. एक नवा समाज कसा असेल या संबंधीचा विचार दलित साहित्याने दिला.

एकूणच दलित साहित्य हे दलितांच्या समस्या आणि प्रश्नांना व्यक्त करते. जातिव्यवस्थेने आपल्यावर अन्याय–अत्याचार केले याविषयी आवाज उठविते. आपली अवहेलना व दुःख, उपेक्षा याविषयी नकार व्यक्त



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 149- दलितेतर साहित्यिकांचे दलित साहित्यातील योगदान | February-2019
UGC Approved Journal

करते. एकूणच दलितांवरील शोषण, अन्याय, अत्याचार, पिळवणुकीला विरोध करते. म्हणून दलित साहित्य हे दलितांच्या अभिव्यक्तीचे मुख्य केंद्र बनले आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. संपा. लिंबाळे शरणकुमार, भारतीय दलित साहित्य, पृष्ठ क्र. १२.
२. पुण्यभूषण आजचा काळ, आजचं साहित्य, ८३ वे अ.भा.म. साहित्य संमेलन पुणे, स्मरणिका, २०१०, पृष्ठ क्र. ७४.
३. ऊ.नि., संपा, लिंबाळे शरणकुमार, पृष्ठ क्र. २५.
४. डॉ.कांबळे नारायण, दलित चळवळीच्या दिशा एक चिंतन, पृष्ठ क्र. १८.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 SPECIAL ISSUE- 140



# Application of Language Skills

**Guest Editor :**
Dr. P. V. Rasal
Principal
MVP Samaj's Arts, Commerce & Science College,
Tryambakeshwar, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Prof. Samadhan Gangurde
Prof. Madhav Khalkar
Dr. S. J. Nikam
Dr. Chhaya Shinde
Mr. Dipak Gangurde

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | भाषिक कौशल्यांचे उपयोजन | प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे | 144 |
| 36 | मराठी भाषेतील कौशल्ये | प्रा. माधव खालकर | 149 |
| 37 | सूत्रसंचालन - एक प्रभावी कला | प्रा. नारायण पाटील | 154 |
| 38 | मुलाखत लेखन आणि भाषिक कौशल्ये | डॉ. शरद थोरात | 157 |
| 39 | भाषिक कौशल्य- मुलाखत | डॉ.विठ्ठल केदारी | 161 |
| 40 | भाषिक कौशल्य आणि करिअरच्या संधी | डॉ. गीतांजली चिने | 163 |
| 41 | भाषण :एक कला | डॉ. छाया शिंदे | 168 |
| 42 | भाषिक कौशल्ये -काळाची गरज | डॉ.अशोक भवर | 172 |
| 43 | भाषिक कौशल्य वाचन : स्वरूप, महत्त्व व उपयोजन | राहुल पाटील | 178 |
| 44 | भाषिक कौशल्ये आणि उपयोजन | डॉ. दत्तात्रय फलके | 182 |
| 45 | मराठी साहित्यातील एक माध्यम – भाषांतर | डॉ. देविदास शिंदे | 185 |
| 46 | मुलाखत लेखन | प्रा. बलराम कांबळे | 188 |
| 47 | व्यक्तिमत्व विकास व भाषिक कौशल्ये एक दृष्टीक्षेप | प्रा.विठ्ठल जाधव | 191 |
| 48 | भाषिक कौशल्य विकासातून ज्ञान व अर्थप्राप्ती | प्रा.महेश बनकर | 195 |
| 49 | भाषांतर आणि सारांशलेखन | प्रा. शालिनी पाटील | 199 |
| 50 | भाषिक कौशल्ये | प्रा. शिवाजीराव पाटील | 202 |
| 51 | भौगोलिक पर्यावरणासाठी, भाषिक कौशल्यांचा होणारा उपयोग | प्रा. शरद धट | 205 |
| 52 | भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्व विकास | डॉ.सुजाता गडाख | 208 |
| 53 | व्यक्तिमत्व विकासामधील मूलभूत भाषिक कौशल्यांचे स्थान | श्रीमती. नीता पुणतांबेकर | 212 |
| 54 | अशाब्दिक संज्ञापन | प्रा. प्रवीण गोळे | 216 |
| 55 | प्रसारमाध्यमांतील जाहिरातीसाठी आवश्यक भाषिक कौशल्ये | प्रा.वैशाली जाधव | 220 |
| 56 | मराठी भाषेतील कौशल्ये | शुभांग घोटेकर | 224 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | February-2019
Special Issue 140- Application of Language Skills
UGC Approved Journal

# भाषिक कौशल्य – मुलाखत

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि.बीड

जीवनात यशस्वी झालेल्या माणसाविषयी इतर व्यक्तींना आदरयुक्त आपुलकी असते. त्या व्यक्तीच्या स्वभावाचे व कर्तबगारीचे पैलू हेरून, हसत, बोलत त्यांच्याशी संवाद साधन ती आपल्यासमोर जिवंत करण्यासाठी त्या व्यक्तीची मुलाखत महत्वाची भूमिका बजावते. मुलाखतीतून त्या व्यक्तीचा आपणास सखोल परिचय असतो. परंतु चांगल्या मुलाखतीसाठी अथवा मुलाखत यशस्वी होण्यासाठी यशस्वी मुलाखतीसाठी आवश्यक ठरणाऱ्या गोष्टीही समजावून घ्यायला हव्यात.

दुरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे या प्रसार माध्यमातून ज्या मुलाखती घेतल्या जातात त्यामध्ये काही मुलाखती सामान्य माणसांच्याही असतात, काही कर्तबगार माणसांच्या, त्याचप्रमाणे अलौकिक आव्हाने पेलणाऱ्या माणसांच्याही असतात. असामान्य माणसांच्या जीवनात आव्हानांवर मात करण्याची क्षमता व त्याच्या जीवनातील चित्तथरारकता ज्या प्रभावावर असते. त्याच प्रमाणात सामान्य माणसाच्या जीवनामध्येही चढाओढीचे चित्रण हे वास्तवदर्शी असे असते. त्या मुलाखतकाराच्या व्यक्तिमत्वातून अनेक व्यक्तीच्या इच्छा, आकांक्षा व वास्तव जगण्याचे ती व्यक्ती प्रतिनिधित्व करत असते. त्यामूळे नायक, नायिका, गायक, गीतकार, संगीतकार, चित्रकार, शिल्पकार, उद्योगपती, क्रीडापटू, साहित्यिक, हमाल, वारीक, द्वारपाल, कामगार, मजूर इत्यादीचे जीवन हे मुलाखतकारास आव्हानात्मक असे असते. मुलाखत कोणत्या क्षेत्रातील व्यक्तींची घ्यावयाची आहे. त्या क्षेत्रासंबंधी मुलाखतकाराला माहिती असणे आवश्यक असावे. अन्यथा त्या क्षेत्रासंबंधी काहीही माहिती नसणाऱ्या व्यक्तींने मुलाखत घेतली तर मुलाखत फसण्याची शक्यता असते. अशी फसगत होऊ नये यासाठी मुलाखत यंत्र समजून घेऊन मुलाखतकाराने मुलाखत घ्यावयाला हवी. परस्परांशी संवाद साधने व्यक्तीची सहज प्रवृत्ती आहे. आपल्याला आलेले अनुभव दुसऱ्याला सांगावेसे वाटतात. वाचणारी किंवा ऐकणारी व्यक्ती ही त्या व्यक्तीच्या दु:खात अथवा आनंदात सहभागी होत असतो. आपण त्या अनुभवांचे वाटेकरीही व्हायला तयार असतो. कारण ज्या गोष्टीविषयी आपणाला आकर्षण असते. ती गोष्ट दुसऱ्याने केली की, त्या व्यक्तीविषयी आपणाला अपुलकी वाटते. त्या व्यक्तीला यशस्वी होण्यासाठी आलेले आनंदाचे व पराभवाचे क्षण व त्यांवर त्याने कशी मात केली असेल याविषयी आपणाला उत्सुकता असते. ते आपण मुलाखतीतून ऐकू शकतो अथवा वर्तमानपत्राच्या माध्यमातून वाचू शकतो.

मुलाखत कोणत्या व्यक्तीची घेतल्यावर ती समाजातील शिक्षित घटकावर परिणाम करेल यासंबंधीही मुलाखतकाराने विचारपूर्वक व्यक्तीची निवड करावयास हवी. समाजामध्ये विशेष कार्य करणाऱ्या व्यक्ती निरपेक्ष हेतूने सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या व्यक्ती उदा. प्रकाश आमटे, सिंधूताई सपकाळ, मेधा पाटकर, अण्णा हजारे, मोहन धारिया, राणी बंग, अभय बंग इ. सारख्या व्यक्ती. तसेच आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती उदा. डॉक्टर, वकील, अभियंते, संशोधक इ. ज्या माणसाबद्दल लोकांच्या मनात उत्सुकता असेल अशा प्रकारची माणसे. समाजामध्ये वैशिष्ट्यपूर्ण घटना, प्रसंगातून सहिसलामत वाचलेली व्यक्ती. अशक्य असणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखविणाऱ्या व्यक्ती, अंतराळात गेलेली पहिली स्त्री, ऑलम्पिकमध्ये सर्वाधीक सुवर्णपदक मिळविणारी व्यक्ती ऑक्सिजनविरहित एव्हरेस्ट शिखर सर करणारी व्यक्ती अशा व्यक्ती,



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

एखादी व्यक्ती, नायक, नेता, विनोदवीर, हुशार विद्यार्थी, संशोधक, गायक, गीतकार, पंतप्रधान, राष्ट्रपती ते अगदी सामान्य माणूस या सारखी एखादी व्यक्ती सारखी प्रसारमाध्यमांचा विषय होते. अशी व्यक्ती मुलाखतीसाठी निवडणे योग्य ठरते. किंवा एखादा साहित्यिक, एखादा शेतकरी मुलाखतीसाठी मुलाखतकाराने निवडणे योग्य ठरते. त्यामुळे ती व्यक्ती मुलाखतीचे आकर्षण ठरेल.

कोणालाही आपण प्रसारमाध्यमातून लोकांसमोर यावे. दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्र यांमार्फत आपणस लोकासमोर झळकावे असे वाटत असते. त्यामुळेच आजच्या काळात मुलाखत या प्रकारचे महत्व टिकून राहिलेले दिसते. मुलाखत ही दोन प्रकारे घेतली जाते. त्यातील पहिला प्रकार म्हणजे प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन घेतलेली मुलाखत व दुसरा मुलाखतीचा प्रकार म्हणजे एखादया व्यक्तीची अभ्यासपूर्वक प्रश्न काढून, त्या व्यक्तीशी चर्चा करून निश्चित जागा व वेळ ठरवून विचारपूर्वक घेतलेली मुलाखत होय. अशा दोन प्रकारे आपण एखादया व्यक्तीची मुलाखत घेऊ शकतो.

मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीने मुलाखतीची पूर्वतयारी करणे गरजेचे असते. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यावयाची आहे ती व्यक्ती कोणत्या क्षेत्रातील आहे व कोणत्या कारणासाठी मुलाखत घ्यावयाची आहे. हया गोष्टीचा विचार मुलाखतकाराने करावा. आपण कोणकोणते प्रश्न विचारणार आहोत याचे टिपणही तयार करावे. तुम्ही त्या व्यक्तीची मुलाखत घेऊन ती कोणत्या प्रसारमाध्यमासाठी देणार आहात त्यानुसार त्या व्यक्तीची मुलाखत घ्यावी. व्यक्तीला अडचणीत आणणारे प्रश्न विचारू नयेत. त्याविषयासंदर्भात माहिती जाणून घेण्याचा आपला दृष्टिकोन प्रामाणिक हवा. याविषयाची आपण तयारी केलेली असावी. कारण तयारी ही आपणास अर्धे यश देऊन जाते. मुलाखातीच्या वेळी आपण शांत असणे, सावध असणे गरजेचे असते. त्या व्यक्तीच्या बोलण्यातून एखादी गोष्ट आपणास माहिती नसलेली आली तर त्या गोष्टीची लगेच नोंद व्हावी. प्रश्नाची विचारणा आपण अल्प शब्दात करणे योग्य ठरते. ती व्यक्ती ज्यावेळी प्रश्नांचे उत्तर देईल त्यावेळी त्या व्यक्तीच्या दृष्टिकोनासंबंधी आपण टीका टिप्पणी देणे योग्य नाही. मुलाखतीतून व्यक्तीच्या कर्तुत्वाची ओळख करून घेणे, त्याचे विचार समजून घेणे. हा मुलाखतीचा उददेश असतो. आपण मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीकडून कोणकोणत्या गोष्टी मिळवू शकू याचा एक आराखडा आपणासमोर असावयास हवा. याचा फायदा आपणास हव्या असणाऱ्या गोष्टी आपण त्या व्यक्तीकडून कमीत कमी वेळात काढून घेऊ शकतो. मुलाखत व्यवस्थितपणे ध्वनिमुद्रित करावी अथवा लिहून घ्यावी. परंतु मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीने त्या व्यक्तीला जेवढे मनमोकळेपणाने बोलता येईल तेवढया प्रमाणात मनमोकळेपणाने बोलू देणेही आवश्यक आहे.

मुलाखत तंत्र व स्वरूप याविषयी आपणांस अशा प्रकारे माहिती पाहता येईल. आजच्या नव्या जगात नवा माणूस, नवा समाज आणि नवी संस्कृती यांची जडणघडण होत आहे. एखादया व्यक्तीच्या कार्याची ओळख वाचकांना व्हावी हा मुलाखत देणारा, घेणारा व वाचक यांचे समाधान केले तर ती मुलाखत यशस्वी झाली असे आपणास म्हणता आकार येईल. येथे मुलाखतीत सहभागी असणाऱ्या दोन्हीही व्यक्तीच्या कौशल्यावर मुलाखतीचे स्वरूप आकार घेत असते. किंबहुना त्यावर त्या मुलाखतीचे यश—अपयश अवलंबून असते.

**संदर्भग्रंथ**

१. माध्यमांची भाषा आणि लेखन कौशल्य – डॉ. केशव तुपे.
२. जनसंवाद आणि जनमाध्यम: सैध्दांतीक कल्पना – डॉ. जोशी श्रीपाद भालचंद्र.
३. उपयोजित मराठी – डॉ. प्रकाश मेदककर.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 SPECIAL ISSUE- 159

## Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality



**Guest Editor :**
Dr. Manjushree Bobade
Principal,
Rayat Shikshan Sanstha's
Dr. Babasaheb Ambedkar College,
Aundh, Pune 411 067

**Executive Editor of the issue :**
Dr. Vilas Sadaphal
Dr. Supriya Pawar
Prof. Eknath Zaware
Dr. Tanaji Hatekar
Prof. Kiran Kumbhar

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

**'RESEARCH JOURNEY'** *International E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)**
**Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**February-2019**

## INDEX


| | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | Dr. B.R.Ambedkar and Indian Constitution | Dr. Nalini Waghmare | 07 |
| | Dr. Ambedkar's Thoughts on Women Empowerment | D. L. Khokale | 11 |
| | Dr. Babasaheb Ambedkar's Thoughts on Annihilation of the Castes in Present Context | Dr. Rajendra N. Raskar | 14 |
| 4 | Dr. Babasaheb Ambedkar & Women Empowerment in India | Mrs. Vaishali Supekar | 16 |
| 5 | Dr. Ambedkar's Thoughts on Education | Tipusultan Inamdar | 19 |
| 6 | Dr. B. R. Ambedkar's Views on Democracy | Tansen Randive | 22 |
| 7 | Dr. Ambedkar's Thought on Education | Dr. V. D. Awari | 24 |
| 8 | Dr. Babashaeb Ambedkar : Versatile Personality | Sunil Kamble | 26 |
| 9 | भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | श्री. जीवन आयरे | 28 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार | प्रा.मेघराज औटी | 31 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बहुआयामी व्यक्तिमत्त्व | डॉ. ज्योती बिडलान | 33 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | डॉ. संजीव बोडखे | 37 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली परिवर्तनवादी चळवळ आणि दलित स्त्रीवादी भूमिपृष्ट | डॉ. सुचित्रा नाईक | 40 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि सद्य:स्थिती | डॉ. संजय गायकवाड | 47 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीव्यवस्थेबद्दलचे विचार | डॉ. मनीषा जगदाळे | 50 |
| 16 | भारतीय रिझर्व बँकेच्या स्थापनेत डॉ. आंबेडकर यांचे योगदान | डॉ. जगदीश लांजेकर | 53 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार | डॉ. विलास सदाफळ व प्रा.किरण कुंभार | 59 |
| 18 | भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. संतोष कदम | 62 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रविषयक दृष्टीकोण | डॉ. विठ्ठल केदारी | 66 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला विषयक विचार | डॉ. अनिल कोकाटे | 70 |
| 21 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. महेश कुलकर्णी | 73 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्त्व आणि दलित चळवळ | डॉ. रघुराज कुरुमकर | 77 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | डॉ. संजय लांडगे | 79 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वर्ग आणि वर्णीय संकल्पना | प्रा. नागराज मगरे | 82 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मुलनविषयक विचारांची प्रस्तुतता | सचिन ओहोळ | 86 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी व शेतकऱ्यांसंबंधी विचारांचा अभ्यास | डॉ. पराग पाटील | 88 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यघटनेविषयी विचार | प्रा. अविनाश फलके | 92 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद | नवनाथ राठोड | 95 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | डॉ. राजकुमार रिकामे | 98 |
| 30 | भारतीय जातीव्यवस्था आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. जयपाल सावन | 100 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संरक्षणविषयक धोरण | डॉ. बी. डी. तोडकर | 106 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय भूमिकेच्या वैचारिक अधिष्ठ्यांचा अभ्यास | प्रा. स्वाती साळवे | 112 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता | प्रा. एकनाथ झावरे | 115 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-20

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रविषयक दृष्टिकोण

डॉ. विठ्ठल केदारी
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व सामन्य माणसाला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. भारतातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने, स्वाभिमानाने जगण्यासाठी बळ प्राप्त करून देवून नवजीवनाचा मार्ग दाखविला. भारतीयांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. राष्ट्राची प्रगती ही जनतेच्या स्थितीवर अवलंबून असते. राष्ट्रामध्ये जनतेला महत्वाचे स्थान असून जनतेची प्रगती, विकासावस्था हे राष्ट्राचे सामर्थ्य असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहिले. संविधानातून प्रत्येकाला हक्क, अधिकार बहाल केले. त्यायोगाने भारतीय लोक आपापला विकास करायला लागले. अनेक वर्षापासून जगत आलेले लांच्छनास्पद जगणे बहुजनांनी अव्हेरले आणि माणूस म्हणून जगायला लागले, प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. सर्व जाती–धर्मातील, पंथातील लोकं आपल्या हक्क व अधिकाराने जीवन जगायला लागले. यातूनच जनतेच्या मनात राष्ट्राविषयी आपुलकी निर्माण होते.

राष्ट्रवादविषयक दृष्टिकोण समजावून घेताना डॉ. आंबेडकरांनी संविधान निर्मितीनंतर संविधानाविषयी आपली भूमिका व्यक्त केली. त्यातून त्यांच्या मनातील राष्ट्रासंबंधी मतमतांतरे स्पष्टपणे विचारात घेता येतात. डॉ. बाबासाहेबांनी भारतीयांची मानसिकता योग्य प्रकारे ओळखलेली होती. भारतीयांसंबंधी त्यांना पुरेपूर विश्वास होता. संविधानातून लोकांना दिलेली तत्त्वे त्यांच्या विकासासाठी आहेत ती तत्त्वे जनतेने अंगिकारली पाहिजेत. लोकांचे भावनिकतेमुळे नुकसान होवू नये. लोकांनी राज्यघटनेतून मिळालेल्या तत्वांना स्वीकारावे आणि आपला विकास करावा. ह्यामध्ये कोणत्याही प्रकारचा आडपडदा येवू नये. यामुळे भारताच्या भवितव्याला बाधा निर्माण होवू नये. म्हणून बाबासाहेबांनी भारतीयांची मानसिकता आणि संविधानातील तत्त्वांचा समन्वय साधण्याला विशेष महत्व दिले. यावर भारतीयांचे आणि संपूर्ण भारताचे भवितव्य घडणार आहे असा आशावाद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे असल्याचे दिसते. एकूण संपूर्ण हिंदू राष्ट्राची नवउभारणी करण्यासाठी जागतिक पातळीवरील श्रेष्ठ संविधानांचा अभ्यास करून डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेले संविधान बहुभाषिक, बहुवंशिक, बहुधार्मिक भारतीयांना एकसंघ ठेवण्यास पात्र ठरले.

डॉ. बाबासाहेबांनी संविधान निर्माण केल्यावर संविधान सभेत भाषण करताना त्यांच्या मनातील सर्व शक्यता, प्रश्न आणि संविधानासमोरील आव्हाने सांगितली. त्यातून त्यांनी भारतासमोरील मूलभूत प्रश्न सांगितल्याचे लक्षात येते. डॉ. बाबासाहेबांना देशाच्या भवितव्याविषयी चिंता वाटत होती. २६ जानेवारी १९५० ला भारत स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले. भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु हे स्वातंत्र्य भारतीय अबाधित ठेवू शकतील का? असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की ''भूतकाळात भारताने केवळ आपले स्वातंत्र्य गमावले असे नव्हे तर देशातील काही लोकांच्या बेईमानी आणि विश्वासघातामुळे गमावले गेले ही वास्तविकता मला अधिक अस्वस्थ करते. महम्मद–बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले त्यावेळी दहार राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी महम्मद–बीन कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजूने लढण्याचे नाकारले. महम्मद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे निमंत्रण देणारा जयचंद होता आणि त्याने त्याला पृथ्वीराज विरूध्द लढण्यासाठी स्वतःच्या आणि सोळंकी राजाच्या मदतीचे आश्वासन दिले, जेव्हा शिवाजी हिंदूंच्या मुक्तीसाठी लढत होते. त्यावेळी इतर मराठा सरदार आणि रजपूत



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

राज मोगल सम्राटांच्या बाजूने लढत होते. जेव्हा सीख राज्यकर्त्यांचा निपात करण्याचा प्रयत्न इंग्रज करीत होते तेव्हा त्यांचा प्रमुख सेनापती गुलाबसिंह शांत बसला आणि शिखांचे राज्य वाचविण्यासाठी त्याने शिखांना मदत केली नाही. १८५७ ला भारतातील बहुतांश भागानी इंग्रजांच्या विरूध्द स्वातंत्र्ययुध्दाची घोषणा केली, तेव्हा शीख बघ्याच्या भूमिकेतून त्या घटनेकडे बघत राहिले.[८] डॉ. बाबासाहेबांना नेमकी या इतिहासाची पुनरावृत्ती होवू नये अशी भीती वाटत होती. याकरीता आंबेडकरांनी संविधान सभेत या गोष्टीची जाणीव करून दिली. आपण भारतीय वेगवेगळ्या प्रसंगात एकमेकांना नामोहरण करण्यात अडकल्याने आपलेच नुकसान झाले. हे स्पष्टपणे लक्षात आणून दिले.

आपल्या देशामध्ये विविध जाती धर्माचे लोक राहतात. भारतीय लोक आपल्या तत्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्त्वप्रणाली मोठी माणतील हा प्रश्न आंबेडकरासमोर होता एकदा तत्वप्रणालीला माणसाने मोठेपण दिले की आपले स्वातंत्र्य धोक्यात येईल असे बाबासाहेबांना वाटत होते. आपल्या हिंदू धर्मात वर्णव्यवस्था जाती व्यवस्था आहे. ष्जाती संस्था ही हिंदू धर्माचा अविभाज्य घटक असल्यामुळे माणसां–माणसांमधील भेद पुरातन तटबंदीला सुरूंग लावण्याचे खंबीर प्रयत्न झाले पाहिजे. दुर्दैवाने जातीव्यवस्था ही नुसतीच आर्थिक समस्या नाही तर ती धार्मिक समस्याही असते. हिंदू धर्मातील तत्वज्ञान स्वतंत्र भारतातील चालू पिढीच्या इच्छेनुसार आमुलाग्र बदलले पाहिजे. पदोन्नती, कार्यक्षमता, शारीरिक व मानसिक विकास, अभ्युदय यासाठी वर्णाश्रमधर्म श्रेयस्कर नाही. माणसाचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी उचित संधी प्राप्त करण्यात त्यांची अवहेलना होते. परिणामतः नैराश्य व दुर्बलता यामुळे त्यांचा आत्मघात होता कामा नये. यासाठी जुन्या घातकी, देवांतील विचारसरणीत गढून–शाश्वत, समता व ज्ञान या मूल्यांचा पुरस्कार करणे आवश्यक आहे. आजच्या या स्पर्धेच्या युगात स्वतःला श्रेप्ठ समजणाऱ्या वर्गापेक्षा सर्व मानवाचे कल्याण यासाठी पुढाकार घेणारा युग धर्म अपेक्षित होता.[९] समाजातील धार्मिकता आपापसांमध्ये भेदभावांची दरी विस्तारताना दिसते. जनतेने आपले हीत, आपला विकास करण्यासाठी सर्वांचे कल्याण साधण्याचा विचार मनाशी बांधणे आवश्यक होते. परंतु धार्मिकता, जातियतेमुळे माणसांमाणसांतील तुटलेपण अधिक बिकट होताना लक्षात येते.

खरे तर भारत २६ जानेवारी १९५० पासून लोकसत्ताक देश झाला. भारतात लोकशाही निर्माण झाली. ही लोकशाही व्यवस्था भारतीयांना पूर्वीपासून माहिती होती. भारतात बौध्द भिखू संघ म्हणजे संसदच होती. म्हणजे भारताला संसद संसदीय पध्दत पूर्वीपासूनच ज्ञात होती. संसदेने निर्माण केलेले नियम सर्वांना बंधनकारक असत. याकाळी बसण्याची व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियमत, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली संख्या पक्ष प्रदोताने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादी बाबत असलेले नियम ह्या सर्व गोष्टी बौध्द भिख्खू संघाच्या संसदीय कामकाजात होते. ही सर्वे पध्दत भारताने गमावली आहे. आज आपल्याला नव्याने संसदीय शासन प्रणाली मिळाली आहे. म्हणून आपण ती आता गमावता कामा नये. ही व्यवस्था आपण प्रदीर्घ काळापर्यंत चालविली पाहिजे. ही पध्दती आज आपण स्वीकारत असलो तरी ती फार पूर्वी आपण गमावून बसलो, त्यामुळे ती आज आपल्याला नवीन भासणार आहे. आज आपण नव्याने लोकशाही स्वीकारली आहे. ती आपले बाह्य स्वरूप सांभाळले परंतु ती हुकूमशाहीला स्थान देईल. हा धोका अधिक संभवण्याचा आहे. कारण पक्षपध्दतीमध्ये ज्या पक्षाला बहुमत मिळेल तो पक्ष आपले वर्चस्व निर्माण करू शकेल.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी होण्यासाठी जनतेचा सक्रीय सहभाग महत्त्वाचा आहे. जनमताने आपली लोकशाही हुकूमशाहीकडे झुकण्याचा धोका आहे. संविधानासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले की, यह संविधान प्रत्यक्ष व्यवहार में लाने योग्य है। यह लैचीला है। साथ ही, शान्ति के दिनों में हो या युध्द के काल में हो, देश को एकता के सूत्र में बाँधे रखने के लिए अत्यंत प्रभावशाली और सक्षम है। यदि संविधान का सही प्रकार से अनुसरण नहीं हो पाया तो यही कहना होगा कि दोष संविधान का नही है लेकिन इंसान में बसे अवगुणों का है।[3] अशा प्रकारे भारतीय संविधानाविषयी डॉ. आंबेडकरांनी मत व्यक्त केलेले आहे. माणसां–माणसांमधील वैचारिक दृष्टिकोण देशाच्या विकासाला मारक ठरू शकतो. हे या मतावरून लक्षात येतो. संविधान कितीही चांगले असले तरी त्याची अंमलबजावणी करणारे लोक चांगल्या विचारांचे असायला हवेत. ही भूमिका महत्त्वाची आहे. राजकीय शक्ती ही देशाचा विकास करायला महत्त्वाची ठरते. "पर हमारे पास एक शक्ती हो सकती है और वह है राजनीतिक शक्ती इस शक्ती को हमें अवश्य विजित करना होंगा। इस शक्ती से लैस होकर हम अपने लोगों के हितों की रक्षा कर सकते हैं।"[4] लोकांच्या विकासासाठी राजकीय शक्ती महत्त्वाची ठरू शकेल असाही विश्वास व्यक्त केला होता.

भारतामध्ये जातीयचे स्तोम मोठ्या प्रमाणात आहे. जातीयता नष्ठ होणे आवश्यक वाटते. हिंदू धर्मातील जातीयता संपविणे म्हणजे विषाचे अमृत करू असे म्हणण्यासारखे आहे. "अर्थात ज्या धर्मात माणसाची घाण माणसाने मानली पाहिजे अशी शिकवण देण्यात येते आहे त्या धर्मात आपण जोपर्यंत आहोत तोपर्यंत जातिभेद नाहीसा होणार नाही. आपल्या मनातील जातिभेद व अस्पृश्यता नाहिशी करायची असल्यास त्यांनी धर्मान्तर करणे हा एकच रामबाण उपाय आहे."[5] समाजातील जातीयता समाजाच्या विकासातील मोठी अडसर आहे. जातीयता नष्ठ झाल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही. हिंदू धर्मात जातीयता असल्याने प्रत्येक घटक स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतो. ह्या कारणास्तव डॉ. आंबेडकरांनी धर्मान्तराचा मार्ग निवडला व धम्मदिक्षा घेतली. परंपरागत अस्पृश्यतेचे जीवन जगणाऱ्या समाजाला मानवतेची शिकवण देणाऱ्या बौध्द धम्माला अनुसरले यातून समाजाला वेगळी दृष्टी दाखवण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केला असे आपल्या लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रज्ञेने विचारवंत होते. त्यांनी स्वतःचे विचारांचे अनुकरण केले. कठोर परिश्रम आणि कार्यावरील निष्ठा यांच्या बळावर त्यांनी उदिष्टांपर्यंत वाटचाल केली. माणसाच्या जीवनात शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे मानवाचा विकास होतो. माणवाचे जीवन बदलते. जीवन बदलले की विचार बदलतात. "मानवी जीवनात शिक्षणाचे स्थान किती मौलिक आहे. याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. या पार्श्वभूमिवर बाबासाहेबांनी अमेरिकेतून आपल्या वडिलांच्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रातून दिसते."[6] आपल्या समाजाच्या उध्दारासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. याविषयी त्यांच्या मनात खात्री होती. दलित समाजाच्या दैण्यावस्थेला जबाबदार शिक्षण आहे. असे त्यांना वाटत होते. म्हणून शिक्षणाच्या प्रसार झाला पाहिजे. शिक्षणाकडे प्रत्येकाने वळले पाहिजे. शिक्षण घेवून स्वतःचा विकास केला पाहिजे असे आंबेडकरांना मनातून वाटत होते. आपण शिक्षण घेतले तर आपण मुला–बाळांना योग्य वळण लावू. स्वाभीमान, स्वावलंबन व आत्मोद्वार चळवळीची लक्षणे दिसून येतात. या भूमिकेतून त्यांचा शिक्षणासंबंधीचा दृष्टिकोन विशेष महत्त्वाचा वाटतो.

असे डॉ. बाबसाहेबांचे व्यक्तिमत्व चतुरस्र होते. घटनेचे शिल्पकार ही त्यांची ओळख आहे. सर्वसामान्यांचे कैवारी असणारे डॉ. बाबासाहेबांनी जन विकास आणि राष्ट्रविकास यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य केले. त्यांचे कार्य आणि जीवन प्रवास राष्ट्र उन्नतीसाठी होता. एकूणच त्यांच्या विचारांचा तो स्थायीभाव होता.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

राष्ट्राचा चौफेर विकास व्हावा. आधुनिक काळात भारत एक परिपूर्ण राष्ट्र म्हणून समर्थपणे जागतिक पातळीवर उभे राहावे हेच त्यांचे ध्यैय होते. शेजारच्या राष्ट्रापासून भारत सुरक्षित राहावा त्यासाठी सर्वतोपरिने सावधगिरी ठेवावी. देशातील शेतकरी वर्ग, कामगार वर्गाचे जीवन स्वाभिमानी व स्वयंपूर्ण व्हावे. स्त्रीयांचे प्रश्न, आदिवासींचे प्रश्न, निरक्षरता लोकसंया, भाषिक वाद इत्यादी सर्वांविषयी त्यांचे विचार परिपूर्ण होते. ह्या सर्वांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांकडील राष्ट्राविषयी असलेली तळमळ व्यक्त होताना दिसते. यातून नव भारत राष्ट्र घडविण्याची त्यांची इच्छा होती.

संदर्भग्रंथ सूची :

१. अक्षरदीप, संपादक मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बा.आ.म.विद्यापीठ, औरंगाबाद, पृष्ठ क्र. १०२
२. भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, आंबेडकर, भीमराव रामजी, पृष्ठ क्र. १९ (अनुवाद–घनश्याम तळवटकर)
३. डॉ. भीमराव अम्बेडकर जीवन, संघर्ष एवं विचार डॉ. माधवी त्रिपाठी, पृष्ठ क्र. २३
४. तत्रैव, पृष्ठ. क्र. ७८
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ क्र. ८१
६. राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. भूषण जोरगूलवार शहापूरकर, पृष्ठ क्र. ४२



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 Special Issue - 109 Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-research Journal**

Two Days Interdisciplinary International Conference on

# Role of Social Reformers in Nation Building

Organized by


Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

( 'B' Grade NAAC Accredited )

Sponsored by

**K.B.C. North Maharashtra University,**
Jalgaon



- EDITOR -

**Prin. Dr. Sambhaji N. Desai**

- CHIEF EDITOR -

**Mr. Dhanraj T. Dhangar**

**For Details Visit To :** www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# :CONTENTS:


Reformer : Swami Isrilaprabhupada ........ 15
ugopal (VBG DASA, Tirupati)

हिंदी के विकास में मराठी भाषिकों का योगदान ........ 18
डॉ. नाना गायकवाड

यातंत्र्य चळवळ : महिला समाजसुधारकांचे योगदान ........ 21
डॉ. प्रकाश जाधव

4 परभणी जिल्ह्यातील बी. रघुनाथ यांचे साहित्य व हैदराबाद मुक्तिसंग्राम (इ.स. १९१३ ते इ.स. १९५३) ........ 25
- डॉ. गीतांजली भीमराव बोराडे

5 समाज प्रबोधनातील दिपस्तंभ ........ 29
- प्रा.डॉ. कावळे बी.एन.

6 Role of other fields of humanities in social Reforms (Public Administration) ........ 31
- Dr. Sunil Himmatrao Patil

7 Syed Ahmed Khan & Muslim Reform In The 19th Century ........ 34
- Dr. Zoheb Hasan

8 Literature And Society ........ 36
- Dr. Anushri Mahurkar

9 सरदार रामराव गोपाळराव उर्फ बाबासोहब मिरीकर : व्यक्ती आणि कर्तृत्व ........ 40
- डॉ. अर्चना टाक

10 महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य : एक अध्ययन ........ 43
- प्रा.डॉ. कदम डी.के.

11 Gandhian Perspective on Community and Education ........ 46
- Dr. Vijaykumar Tupe
- Dr. Kalpana Jamgade

12 महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे राष्ट्र निर्मितीमध्ये योगदान ........ 50
- प्रा.डॉ. विलास घोडे

13 राष्ट्र उभारणीमध्ये सावित्रीबाईफुले यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान ........ 55
- डॉ. विठ्ठल भिमराव मातकर

14 साहित्य आणि समाज ........ 59
- डॉ. विठ्ठल केदारी

15 कर्मवीर भाऊराव पाटील यांचे देशाच्या जडणघडणीत योगदान ........ 61
- डॉ. काशीनाथ सोलनकर

16 Role of Mahatma Jotirao Phule in Nation Building ........ 63
- Dnyaneshwar M Bansode

17 भारतातील बालहक्क चळवळ ........ 65
- प्रा.डॉ. नंदा पांगुळ

18 WTO And Its Impact on Indian Agriculture ........ 69
- Prof. Nanwate N.N.

19 राजर्षी शाहू महाराज – एक कर्मयोगी ........ 73
- प्रा. सुनिता विठ्ठलराव भोसले

20 राजर्षी शाहू महाराज यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील स्थान ........ 75
- प्रा.डॉ. राजाराम प्रभाकर गावडे




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 109 : Role of Social Reformers in Nation Building February 2019

# साहित्य आणि समाज

– डॉ. विठ्ठल केदारी
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि.बीड

साहित्याचा समाजाशी अतुट संबंध आहे. माणसाचा संबंध जन्मापासून ते मृत्युपर्यंत समजातील विविध घटकांशी येत असतो. समाज लेखकाला घडवित असतो. लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्यांकडील वैविध्यता वेगळेपण ह्या गोष्टीसंबंधीचे संस्कार लेखकावर समाजामुळे झालेले असतात. समाजाशिवाय माणसाचे जीवन अपूर्ण आहे. समाज आणि साहित्य ह्या दोन्ही नाण्याच्या परस्पर दोन बाजू आहेत. साहित्याच्या निर्मितीवर समाजातील विविध घटाकांचा परिणाम होतो. साहित्याचा इतर सामाजिक शास्त्रांशी संबंध येतो. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र अशा शास्त्रांशी साहित्याचा अन्योन्य संबंध असतो. तसाच साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबंध आहे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्य समाजाचे प्रतिबिंध दाखविते समाज जसा आहे तसेच त्याचे रेखाटन लेखक घडवितो. समाजाचे हे चित्र रेखाटताना लेखक त्यांकडील वास्तवाला कल्पनेची जोड देत असतो. त्यातून तो नवविश्व साहित्यात उभे करतो. च्साहित्याचा जीवनाशी संबंध आहे, समाजाशी संबंध आहे. असे आपण म्हणतो. साहित्यातून मानवी मनातील भावनांचा आविष्कार होतो. साहित्य म्हणजे अनुभवाची अभिव्यक्ती असेही आपण मानतो. म्हणून प्रश्न असे निर्माण होतात की, हे जीवन कोणाचे? हा समाज कोणता? या भावना कोणाच्या? साहित्यातून व्यक्त होणारे अनुभव कोणाचे? साहित्यातून ज्या सुख दु:खांना उद्‌गार लाभतो ती सुख दु:खे कोणाची?'१ साहित्यातून लेखक स्वत:चा आविष्कार करत असतो. स्व हा समाजाचा घटक असतो. म्हणून तो संपूर्ण समाजविश्वाचा घटक असतो. स्व चे जे अनुभव आहेत ते अनुभव समाज भावनेचे असतात समाजाशी नाते सांगणारे असतात. च्कोणत्याही अनुभवाचे स्वरूप लाक्षणिक अर्थाने दुहेरी असते. कोणताही अनुभव हा व्यक्तीचा असतो. उपासमारीमुळे एखाद्या असहाय्य माणसाचा मृत्यु आला तर ती व्यक्ती घटना होते. तशीच ती सामाजिक घटनाही असते. एखाद्या असहाय्य व अगतिक विधवेवर बलात्कार झाला तर ती व्यक्ती घटना होते. त्याचबरोबर ती सामाजिक घटनाही असते. वैभव संपन्न माणसाने पैशाची उधळपट्टी करणे आणि पाव उसळ खाण्यासाठी आणेही मिळणे दुपापास्त आहे, म्हणून एखाद्याने खून करणे, या व्यक्ती घटना आहेत. तशाच सामाजिक घटनाही आहेत. व्यक्तिजीवन हे समाज जीवनाच्या वर्तुळातलेच एक अंतवर्तुळ असते. छ२ असे समाज जीवनातील विविध प्रसंग साहित्याला बीजे पुरवितात. समाजात घडणारे सर्व प्रकाराचे प्रसंग घटना यातून लेखकांचे संवेदनशील मन त्या अनुभवनांचा बारकाव्याने निरक्षून त्या अनुभवांना साहित्यांतून वाचकांसमोर आणते. वाचकांसमोर ह्या स्वरूपाचे अनुभव ज्यावेळेस येतात. त्यावेळी त्या अनुभवांना वैश्विकता प्राप्त होते. एकूणच सामाजिक अधिष्ठान त्यांना लाभते. कारण ह्या घटना कोणत्याही एका समाजात घडत नाही. तर त्या स र्व प्रकारच्या समाजात घडतात. म्हणून साहित्य आणि जीवनाच्या जगण्याचा अन्योन्य संबंध येतो. साहित्य हे जाणीवेतून निर्माण होते. माणवाच्या आयुष्यात जेव्हा अस्थिरतेची परिस्थिती निर्माण होते. तेव्हा त्या व्यक्तिला सावरण्याचे काम साहित्य करीत असते.

सामाजिक पर्यावरणातून विविध साहित्य चळवळी निर्माण झाल्या आहेत. दलित चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ, आदिवासी साहित्य चळवळ, स्त्रीवादी साहित्य चळवळ, यांनी स्वत:चे साहित्य निर्माण केले. स्वत:च्या समाजाचे दु:ख साहित्यातून मांडले. एकूण समाजाच्या दु:ख, वेदना, आत्मिक हुंकार साहित्यातून व्यक्त केला व आपले जीवन सर्वासमोर ठेवले. च्सगळ्या सामाजिक चळवळी, प्रबोधनाच्या चळवळी, परिवर्तनाच्या चळवळी थांबल्या आहेत. सामाजिक चळवळीतूनच साहित्याच्या चळवळी निर्माण होत असतात. सामाजिक चळवळी थंडावल्याने साहित्याच्या चळवळीही थंडावलेल्या आहेत. जणू एक जोरदार तूफान पोटात घेवून जीवघेणा सन्नाटा सर्वत्र पसरला आहे. केव्हा स्फोट होऊन विनाश घडेल हे सांगता येत नाही. छ३ या पद्धतीने आज साहित्य चळवळीचे अस्तित्त्व उरलेले आहे. यामुळे साहित्याला विशिष्ट स्वरूपाची शिथिलता मिळाली आहे. चळवळीतून निर्माण होणारे साहित्य हे समाजाचा आत्मस्वर असतो. समाजाचे दु:ख, व्यथा घेवून ते निर्माण होते. साहित्य हे विविध कप्यांना घेवून निर्माण होत असते. समाजाचे सर्वांगीण पोषण करणे, सामाजिक संवेदना टिकविणे हे मुख्य कार्य साहित्य करते. यामुळे जीवनातील उदासिनता, भयावहता नष्ट करून आनंदाचा झरा निर्माण करून माणसाच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करण्याचे सामाजिक कार्य साहित्य करते. एकूणच मानेवाच्या उद्धाराचे कार्य साहित्य करते. त्यामुळे मानवी जीवनात नवचेतना निर्माण होते आणि जीवनाला आनंदी मार्ग सापडतो.

साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध अभ्यासताना मुख्यत: साहित्य हे सामाजिक घडामोडींशी संबंधीत असते की नाही? हा भाग महत्त्वपूर्ण आहे. जर साहित्य समाजाशी संबंधीत आहे. असे म्हणताना ते कोणत्या प्रकारे संबंधीत आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. साहित्य हे बहुरंगी आहे. समाजाचा निर्मितीव्यवहाराचा फार जवळचा संबंध असतो. साहित्य आणि समाज यांविषयी पाश्चात्य अभ्यासकांनी खोलवर जावून विचार मांडले आहेत. रेमॉण्ड विल्यम्स, रिचर्ड होगार्थ, केनिथ वर्क, एफ.आर. लेव्हीस, जॉर्ज स्टायनर, एरिफ फॉम, मेकॉर्थी यांनी विचार मांडताना साहित्यसमीक्षा आणि समाजशास्त्रीय भूमिकेतून मते मांडली आहेत. साहित्य आणि समाजासंबंधी तीन मत प्रवाह पाहयला मिळतात. साहित्याचा जीवनाशी काहीही संबंध न माणनारा पॅटर, रोजर फ्राय, काईव्ह बेल यांचा कलावादी प्रवाह, साहित्यात आशयच महत्त्वाचा असतो असे मांडणारा पंथ या पंथात बोधवादी, नीतिवादी मंडळी येतात आणि या दोघोंचाही समन्वय साधू इच्छिणारा



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143 February 2019 RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 109 :* Role of Social Reformers in Nation Building

तिसरा एक पक्ष इंग्लंडमधील बहुतांशी अभ्यासक या तिसऱ्या पक्षात येतात. (मॅथ्यू अॅनोल्ड, लेव्हीस, रेमॉण्ड, होगार्थ वगैरे) अशा रीतीने साहित्य आणि समाज याविषयीच्या मत प्रवाहाविषयी पाश्चात्य साहित्य व्यवहारामध्ये मतप्रवाह पाहवयास मिळतात. चविसाव्या शतकाच्या या उत्तरार्धात साहित्याचा लंबकही अनेक कारणांनी आत्मनिष्ठ सौंदर्यवादाकडून समष्ठिनिष्ठ बांधिलकीकडे अधिकाधिक झुकत चाललेला दिसतो. या बांधिलकीचा पुरस्कार सार्त्र किंवा साहित्यातील सामाजिक संदर्भाला नव्याने प्राधान्य येवू लागले आहे. आजच्या मराठी साहित्याच्या समीक्षा व्यवहारातही त्यात कमी अधिक प्रभाव आढळतो. दलित किंवा ग्रामीण साहित्य निर्मितीत याचे आज प्रत्यंतर येते.छ४ फ्रेंच समीक्षक तेन यांनी साहित्याची पद्धतशीर पाहणी करताना समाजशास्त्रीय भूमिका स्वीकारली. त्याने साहित्याचा इतिहास १८६४ मध्ये लिहिला यातून त्याने साहित्य समीक्षेचे भोवतालची परिस्थिती आणि साहित्याचा अन्योन्य संबंध स्पष्ट करणे, हे असते ही भूमिका स्पष्ट केली आहे. तेनने साहित्य हे मानवाच्या कल्पनांचा खेळ किंवा उद्दीपित मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा, त्याच्या देशाचा इतिहास-भूगोल, संस्कृतीचा, ते लोक ज्या कालात जगली त्या काळातील युगधर्माचा एक समयावच्छेदकेरून त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो आणि या सर्व घटकांचे परिशीलन केल्यानंतरच त्या कलाकृतीचे सम्यक दर्शन होवू शकते. हे तेन यांचे म्हणणे महत्त्वाचे आहे. समाज जीवनातील घडमोडी निर्मितीप्रक्रियेत महत्त्वाच्या असतात. साहित्याची संबंधितता हा तेनच्या साहित्याविषयक सिद्धांताचा गाभा असल्याचे लक्षात येते. एकूणच समाजाचा साहित्यावर परिणाम होतो तसाच साहित्याचा समाजावर परिणाम होतो हे म्हणणे तेन यांनी विचारात घेतले नाही. असे असले तरीही तेन यांनी साहित्य हे समाजाचे अपत्य आहे, प्रतिबिंब आहे हे मत महत्त्वाचे आहे. एकूणच भूतकाळी साहित्य परंपरा व साहित्यिकांचे व्यक्तिमत्त्व, त्याची प्रकृती-प्रवृत्ती, समाजाची स्थिती-गती या सर्वांच्या परस्परसापेक्ष साकल्याने हा आरसा सिद्ध होतो असे स्पष्टपणे म्हणता येते. म्हणून साहित्य हे विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते.

समाजीवनाला केंद्रस्थानी ठेवून जीवन जाणिवा अनुभवणारे साहित्य असते. दलित साहित्याने क्रांती घडविली. सामान्य माणसाचे जीवन सर्वांसमक्ष मांडले. तसेच समग्र साहित्य समाजजीवनाची दिशा ओळखून, वस्तुस्थिती ओळखून त्यातील तणाव पाहूण त्यात अडकलेल्या समाजाचे अनुभव व्यक्त करते. साहित्य हे समाज जीवनाचे रूप आपल्यासमोर ठेवते. आपल्या भोवती विविध जाती-धर्माचे लोक आहेत. त्यांच्या विविध बोलीभाषा आहेत. त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. शेतकरी वर्ग, ग्रामीण भाग, आदिवासी समूह, दलित वर्ग, स्त्रीया अशा विविध प्रकारच्या माणसांच्या समस्या, जीवनातील प्रश्न, त्यांची संस्कृती साहित्यिक साहित्यातून अभिव्यक्त करतात. ह्या सर्व गोष्टींना कवेत घेवूनच लेखकाचे साहित्य निर्माण होते. एकूण लेखकाचे लेखन करण्याचे मुख्य साधन समाज आहे. म्हणून साहित्यातून समाज वगळता येत नाही.

**संदर्भ**

१. साहित्य विश्लेष, डॉ. सदा कऱ्हाडे, पृष्ठ क्रं. २१
२. तत्रैव, पृष्ठ क्रं. २१
३. साहित्य, समाज आणि परिवर्तन, डॉ. वासुदेव मुलाटे, समाज आणि परिवर्तन, पृष्ठ क्रं. ३५
४. मराठी साहित्यातील स्फंदने, गो.म. कुलकर्णी, पृष्ठ क्रं. ७

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 SPECIAL ISSUE- 135 (C)

# आधुनिक मराठी साहित्य : विविध प्रवाह



**Guest Editor :**
Dr. R. S. Patil
Principal,
P.S.G.V.P. Mandal's S.I.P. Arts, G.B.P. Science &
S.T.K.V.S. Commerce College, Shahada
Dist. Nandurbar [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Prof. Pankaj Shirsale
Head, Dept. of Marathi
P.S.G.V.P. Mandal's S.I.P. Arts, G.B.P. Science &
S.T.K.V.S. Commerce College, Shahada
Dist. Nandurbar [M.S.] INDIA

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
February-2019

# अनुक्रमणिका


| | ीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| | ्रिस्तपुराण : स्वरूप, विशेष आणि तत्कालीन योगदान | प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे | 07 |
| | राठीतील ग्रामीण साहित्य प्रवाह : एक चिंतन | डॉ. जितेंद्र गिरासे | 14 |
| | राठी साहित्यातील क्रांतीदर्शी विचारांची यात्रा : दलित साहित्यप्रवाह | प्रा. धनाजी भिसे | 18 |
| | ुस्लीम कवितेतील सामाजिक बांधिलकी | प्रा. युवराज भामरे | 24 |
| 5 | कोल्हाट्याचं पोर' एक सामाजिक दस्तऐवज | प्रा. पंकज शिरसाळे | 31 |
| 6 | दलित स्त्री लेखिकांचे लेखन | प्रा. देवेंद्र निकम | 33 |
| 7 | आधुनिक आदिवासी मराठी साहित्याची समीक्षा | प्रा. ज्ञानेश्वर म्हात्रे | 38 |
| 8 | स्त्रीवादी साहित्य प्रवाह | प्रा. मनीषा डोंगरे | 42 |
| 9 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोककला | डॉ. सी. एस. करंके | 45 |
| 10 | मराठी ग्रामीण साहित्याचा प्रवाह | डॉ. देविदास शेटे | 48 |
| 11 | दलित स्त्री आत्मकथनातील जीवनदर्शन | डॉ. भारती बेंडाळे | 55 |
| 12 | मराठी साहित्यातील स्त्रीवादाचे स्वरूप व जाणीवा | डॉ. दिनेश पाटील | 59 |
| 13 | अहिराणी ओवीगीतातील स्त्रीवादी चिंतन | डॉ. सुधा खराटे | 62 |
| 14 | आदिवासी काव्यप्रवाहाचे स्वरूप | प्रा. गौतम थोरात | 66 |
| 15 | ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा | डॉ. हिरालाल पाटील | 71 |
| 16 | १९९० नंतरची दलित कथा | ज्योत्स्ना इंगळे | 74 |
| 17 | आदिवासी साहित्य प्रवाहाचे योगदान | कुंडलिक पारधी | 9 |
| 18 | मुस्लिम मराठी साहित्य प्रवाह आणि मराठी कथा | डॉ. प्रशांत लगडे | 84 |
| 19 | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : एक चिंतन | डॉ. रजनी लुंगसे | 89 |
| 20 | ग्रामीण कवी ना.धों.महानोर आणि केदारनाथ सिंह यांच्या कवितेतील निसर्गचित्रण | महेश रणदिवे | 92 |
| 21 | मराठी साहित्यातील स्त्रीवाद | प्रा. मंगला चौधरी | 97 |
| 22 | ग्रामीण कादंबरी साहित्य प्रवाह | प्रा. निलेश लंगोटे | 100 |
| 23 | दलित साहित्य आणि घटनात्मक मूल्ये | डॉ. प्रकाश भामरे | 108 |
| 24 | एका पुरुषाने स्त्रीवादी दृष्टीकोनातून स्त्रीमनाचा घेतलेला शोध म्हणजे 'आई रिटायर होतेय' हे नाटक | प्रा. मंगला पाटील | 112 |
| 25 | मराठीतील विज्ञान साहित्य प्रवाह | प्रा. प्रिया नेर्लेकर | 115 |
| 26 | दलित साहित्याची संकल्पना व स्वरूप | पूनम गोसावी | 128 |
| 27 | वाहरू सोनवणे- आदिवासी साहित्य प्रवाहातील एक नामवंत कवी | डॉ. रविंद्र पाटील | 133 |
| 28 | मराठी ग्रामीण साहित्य प्रवाह | डॉ. राजेंद्र काकुस्ते | 137 |
| 29 | आनंद यादव यांच्या कादंबरीतील ग्रामीणता (गोतावळा) | प्रा.राजेंद्र निकुंभे | 140 |
| 30 | खानदेशातील दलित स्त्रियांच्या ओवीगीतातील भावविश्व | डॉ. रत्ना जवरास | 144 |
| 31 | स्त्रीवादी साहित्य | डॉ. विठ्ठल केदारी | 152 |
| 32 | आदिवासी लोककलेची विविध रूपे | डॉ. राखी सलगर | 156 |
| 33 | ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता आणि सामाजिक दृष्टीकोन | प्रा. संगिता आहिरे | 159 |
| 34 | आदिवासी साहित्य प्रवाह | डॉ. संजय महाले | 163 |
| 35 | आधुनिक मराठी साहित्य प्रवाह : विज्ञान साहित्य | डॉ.संजय शिंदे | 168 |
| 36 | आदिवासी कवितेतील विद्रोह | डॉ. सुधाकर बोथीकर | 174 |




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 135 (C)- आधुनिक मराठी साहित्य : विविध प्रवाह
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# स्त्रीवादी साहित्य

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

आज स्त्रीवादी लेखनाची परंपरा स्वतंत्रपणे निर्माण झालेली आहे. स्त्रीयांनी लिहिलेल्या लेखनाला स्त्रीवादी साहित्य म्हणावे असे नाही. भूमिका घेवून लिहिलेले लेखन म्हणजे स्त्रीवादी लेखन होय. म्हणजे स्पष्टपणे आपण स्त्रीकेंद्री लेखन म्हणजे स्त्रीवादी साहित्य असे स्पष्ट होते. याचबरोबरीने काही लेखकांचे, लेखिकांचे लेखन स्त्रीविषयक भूमिका घेवून लिहिले जाते. परंतु ते लेखक/लेखिका मी स्त्रीवादी नाही अशी भूमिका घेताना दिसतात. अलीकडील काळामध्ये स्त्रीवादी साहित्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन या साहित्याच्या निर्मितीतून स्त्रीया स्वत:चे अनुभव व्यक्त करताना दिसतात. साहित्यातून व्यक्त करताना स्वत:ला अभिव्यक्त करताना दिसतात. "स्त्रीवादी असा शब्द योजला जात असला तरी स्त्रीवाद एकाकार नाही. स्त्रीवाद अनेक आहेत. स्त्रीवादासारख्या लौकिक, सामाजिक विचारधारेचा 'स्पर्श' साहित्य वा साहित्यसमीक्षेला असावा का, याविषयी साहित्यक्षेत्रातील अनेकांना शंका असतात. स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या शोषणाच्या दु:खाविषयी, असाही अर्थ काहिंच्या मनात असतो. पण आज स्त्रीवादाचा अर्थ इतका विशिष्ट राहिलेला नाही. स्त्रीवाद ही जीवनाकडे पाहण्याची एक परिदृष्टी आहे. पुरूषसत्तेने नियंत्रित केलेले विचारविश्व वैश्विक न मानता, विश्लेषणाचे सर्व कोटिक्रम उलगडून पाहण्याचा हा यत्न आहे. स्त्री पुरूष विषमता ही विश्वातील केंद्रवर्ती विषमता आहे. त्यामुळे जगातील व्यवहारातील सर्व श्रेष्ठ–कनिष्ठ भाव, उतरंडीच्या रचना–प्रभुत्वाने आविष्कार यांचे विश्लेषण करणारी ही दृष्टी आहे. या दृष्टिकोणाला एक गाभ्याचा मूल्यभाव आहे."[१] स्त्रीवादी साहित्य स्त्रीयांच्या दु:खाचा हुंकार लेखनातून येताना लेखिकेचा म्हणून तो न येता विश्वातील स्त्रियांच्या दु:खाचा हुंकार होवून येतो. यातून स्त्रियांच्या दु:खाचा परिघ वाचकांसमोर उभा राहतो. यातून वाचकांपर्यंत स्त्रियांचे दु:ख पोहोचतानाच स्त्रीमनाचे विविध कंगोरे, जाणीवा आणि मूल्यभाव व्यक्त होतो.

अलीकडील काळातील मराठी साहित्य विविध वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींतून निर्माण होताना दिसते. तसेच विविध प्रभावांतून, संस्कारातून निर्माण झाल्याने साहित्याला वेगळे संदर्भ प्राप्त होतात. तसेच जागतिकीकरण, उदारिकरण आणि खाजगीकरणाच्या धोरणांमुळे जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात बदल होतात. त्या संदर्भाचे चित्रण साहित्यातून उमटते. ह्या सर्व बाबींचा विचार करून साठोत्तरी साहित्य आणि अलीकडील कालखंडातील साहित्य निर्माण होताना दिसते. मराठी साहित्यामध्ये स्वातंत्र्यापूर्वीपासूनच आधुनिकतावादी प्रभाव मराठी साहित्यात जाणवत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संविधानाने प्रत्येक भारतीयाला स्वातंत्र्य, समता, बंधूता याबाबतीत स्वातंत्र्य प्राप्त झाले. हजारो वर्षापासून भारतीय व्यवस्थेत स्त्री आणि अस्पृश्यांना शिक्षणाचा हक्क नव्हता. हे सर्व घटक शापित अश्वत्थामासारख्या वेदना उरी घेवून जीवन जगत होते. महिलांच्या वाट्याला वर्षानुवर्षे दास्य, अवहेलना, छळ हेच आले. या 'स्त्रीयांना' भारतीय राज्यघटनेने अधिकार दिले. स्वातंत्र्यानंतर समानता मिळाली. घटनेच्या पंधराव्या कलमानुसार स्त्री व पुरूष असा कोणताही भेदभाव भारत राष्ट्र करणार नाही. स्त्रीला तिच्या विकासासाठी सर्व दिशा खुल्या झाल्या. असे असले तरीही सामाजिक आणि आर्थिक विषमता असलेल्या भारतात समाजाचे स्वरूप एक संघ, एकात्म नाही. जात–पात, वर्ण, वर्ग इत्यादींच्या अधिष्ठानाने



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 135 (C)- आधुनिक मराठी साहित्य : विविध प्रवाह
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

समाजव्यवस्थेतील कोणतीही स्त्री अद्याप गुलामाचे जीणे जगत आहे. चूल, मूल आणि घर इ. जबाबदाऱ्याचे ओझे घेवून जगत असलेली स्त्री अजून एका कोंडलेल्या जगात आहे. तिचा गतकाल अनेक यातनांनी दु:खांनी भरलेला आहे. समकालात तिला अशांतता, अपेक्षाभंग, असमाधान आणि असुरक्षितता असा आहे. या सर्व परिस्थितीतून ती मार्ग काढून तिचे जीवन जगत आहे. याच परिस्थितीत समाजाची तिला जाणीव आहे. तळातील वर्गापासून अगदी वरच्या पातळीवरील घटकापर्यंत शिक्षण, अर्थार्जन, संततिनियमन यामुळे स्त्रीजीवन बदलताना ढवळून निघताना दिसून येते.

या सर्वातून स्त्रीच्या मनाची आणि बुध्दीची शक्ती मोठी असल्याचे दिसून येते. नवीन विज्ञानवादी जग तिला समाजायला लागले आहे. दुहिता, माता, पत्नी या गोष्टीबाबत तिचे मन पुरोगामी बनले आहे. पुरूषांप्रमाणे स्त्रीही माणूस आहे. आणि तिला पुरूषांच्याप्रमाणे/बरोबरीने जीवन जगता आले पाहिजे याविषयी स्त्रीया भूमिका घेवू लागल्या आहेत. याविषयी भालचंद्र फडके यांचे पुढील मत विचारात घेता येते. "सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात परिवर्तनाच्या बदलाच्या ज्या प्रक्रिया सुरू झाल्या आहेत त्यामुळे विलक्षण गतीने स्त्री–जीवन बदलत आहे काय? परिवर्तनाची प्रक्रिया तशी गुंतागुंतीची आणि अतिशय संथ आहे. परिवर्तनाला जी दिशा मिळत असते ती त्या त्या देशांच्या घटनेतील आदेशाशी संवादी असतेच असे नाही. कारण घटनेने फक्त हक्क देता येतात."[२] हक्क हे स्त्री उपभोगू शकते असे मात्र दिसून येत नाही. समाजात सामाजिक बदलाच्या प्रक्रियेचा वेग फार संथ असतो किंवहूना समाज कोणताही बदल स्वीकारायला सहजासहजी तयार होत नसतो. स्त्री व पुरूषांना समानता मिळाली पाहिजे असे म्हणणे सोपे नसते. स्त्री हा समाजाचा महत्वाचा घटक आहे. स्त्रीयाचा विकास झाला पाहिजे ही भूमिका स्वातंत्र्याच्यापूर्वीपासून सुरू होती. प्रभाकर मासिकात लोकहितवादी म्हणतात, "ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशात लोकांची स्थिती वाईट असते. हिंदू लोकांत फारच मूर्खपणा आहे, यास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे."[३] ही स्त्रीयांची स्वातंत्र्यापूर्वीची अवस्था होती. स्वातंत्र्यानंतर स्त्रीला सर्व क्षेत्रे मोकळी झाली. अद्यापपर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत आहे असेही लक्षात येत आहे. परंतु तो पूर्णत: बदललेला नाही. मात्र ज्यावेळेस स्त्रिच्या मनात आपण स्वतंत्र आहोत अशी जाणीव निर्माण होत नाही तोपर्यंत स्त्रीयांकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोण दूर होत नाही. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर तीनच वर्षांनी 'मेरी वुइल्स्टोन–क्रॅफ्ट' ह्यांचे 'अ व्हिंडिकेशन ऑफ द राइटस ऑफ वूमन' हे स्त्री स्वातंत्र्याचा उच्चार करणारे पहिले पुस्तक लिहिले गेले. पुढे 'सब्जेक्शन ऑफ वूइमेन' या पुस्तकातून मिल या अभ्यासकांने स्त्रीला समानतेची वागणूक मिळावी ही भूमिका घेतली. साठोत्तरी कालखंडातील वाङ्मयीन प्रवाहामधील स्त्रीवादी साहित्यप्रवाह १९७५ नंतर स्वतंत्रपणे स्त्रीवादी साहित्यलेखन आकाराला आले. १९७५ हे वर्ष स्त्रीयांसाठी महत्वाचे ठरले. स्त्रीवर्ष म्हणून या वर्षाचा आनंद साजरा झाला. १९९१ नंतर भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले आणि हळूहळू जागतिकीकरणाची संस्कृती भारतावरही कोसळली. स्त्री साहित्या संदर्भात विशेषता प्रतिभा असणाऱ्या इंदिरा संत, दूर्गा भागवंत, गोदूताई परूळेकर, इरावती कर्वे या सर्व लेखिकांनी २००० सालापर्यंत लेखनातून स्त्रीयांसंबंधीची भूमिका मांडली. इ.स. २००५ मध्ये विभावरी शिरूरकर व इरावती कर्वे यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. "१९७५ चे महिला वर्ष, नंतर आलेले महिला दशक या निमित्ताने जगभर जे विचारमंथन झाले त्याचा प्रभाव कोणी नाकारू इच्छित नाही. पण महाराष्ट्रात ज्याला चंद्रशेखर जहागिरदार 'स्वाभाविक स्त्रीवाद' म्हणतात त्याची एक भक्कम परंपरा होती. या परंपराविषयी मांडणी जहागिर अशी करतात – "स्वाभाविक अशासाठी, की तत्कालीन उदारमतवादी परंपरेचा एक भाग म्हणून कार्यरत असणाऱ्या या स्त्रीवादाचे स्वरूप एका सहजोद्गाराचे होते. आत्मभानी – जाणीवपूर्वक जोपासला



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 135 (C)- आधुनिक मराठी साहित्य : विविध प्रवाह
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

गेलेला, प्रत्यक्ष स्त्रियांच्या सक्रिय चळवळीशी संबंध असणारा किंवा स्त्रीवादाचे दार्शनिक, तात्विक अधिष्ठान असणारा असा परिष्कृत स्वरूपाचा तो स्त्रीवाद नव्हता."[४] येथे स्वाभाविक स्त्रीवादाचा टप्पा जहागिरदार सांगतात त्यामध्ये प्रामुख्याने पंडिता रमाबाई यांच्या लेखनाचा, तसेच लक्ष्मीबाई टिळक यांच्या साहित्यिक योगदानाचा काल महत्वाचा मांडतात. त्यांनी तत्कालीन व्यवस्था नाकारून ब्राह्मण्य आणि हिंदुत्व या गोष्टी बाजूला ठेवून परकायाप्रवेश केला असे म्हणता येते.

आज संस्कारीत स्त्रीवाद पहायला मिळतो. येथे उदारमतवादाची जागा 'रॅडिकल' प्रमाथी विचारसरणीने घेतली आहे. पाश्चात्य स्त्रीवादी परंपरेत आत्मभानी स्त्रीवादाचे रूप दिसून येते. यावेळी महाराष्ट्रात वेगवेगळ्या स्त्रीवादी चळवळी आणि स्त्रीयांसाठी विविध व्यासपीठे निर्माण झालेली पहायला मिळतात. याबरोबरीने विविध नियतकालिके निर्माण झाली. स्त्रीवादी लेखन झपाटून निर्माण होवू लागले.

स्त्रीयांच्या काव्यवाङ्मयात प्रामुख्याने इंदिरा संत, शांता शेळके यांच्या कविता महत्वाच्या ठरतात. इंदिरा संताच्या कविता पुरूषसत्ताक आणि पुरूषत्वाशी संवाद साधताना दिसून येतात. जे बोलायचे ते स्पष्टपणे व्यक्त करताना दिसून येतात. पुढील काळात प्रभा गणोरकर, रजनी परूळेकर, सुलभा हेर्लेकर, अनुराधा पाटील, वासंती मुझुमदार, उषा मेहता, मल्लिका अमरशेख, सुरेखा भगत, प्रज्ञा पवार, नीरजा, अश्विनी धोंगडे, सुलभा भोसेकर, संजीवनी खोजे, उषा आत्राम इ. कवियित्रींचे काव्यवैभव महत्वपूर्ण आहे. ह्या कवींच्या कवितेतून अनेकपदरी अनुभव कवितेचे शब्दशिल्प बदलले पहायला मिळते. अनेक वर्षापासूनचे पुरूषसत्ताक परंपरेचे जगणे व्यक्त करतात. स्त्रीवादी जाणीव आणि आपण जन्माला येताना मानव म्हणून जन्माला का येत नाही यासंबंधी विचार कवितेतून व्यक्त होताना दिसतो. अनेक वर्ष रतिप्रेरणेचा संदर्भ देणे ही अनौचित्याने मानीत होती. पण या नव्या काळात स्त्रीवादाने स्त्रीच्या रतिप्रेरणेच्या नियमनांचा जो विरोध केला ते नियमन नाकारणे आले. कधी भूमिका घेवून कधी स्त्रीच्या देहनिष्ठ अनुभवांचा आविष्कार प्रज्ञा पवार आपल्या कवितेतून व्यक्त करताना दिसतात. यांच्या कवितेला एक ऐतिहासिकता प्राप्त होते. "समाजाच्या परंपरेमध्ये मिथकांना एक विशेष स्थान असते मिथकांत परंपरा स्पटिकवत उपस्थित असते. पण वंचित गटाच्या हातात तीच मिथके वेगळ्या मूल्यभावाने पारखली जातात. त्याला वेगळा अर्थ प्राप्त होतो. अरूणा ढेरे यांच्या कवितेत मिथकातला गूढ भाव आणि त्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिसते. तारा भवाळकर यांच्या लेखनातून परंपरा उलटी करूण पाहण्याचा स्त्रीवादाचा देशी आविष्कार दिसतो."[५] स्त्रीवादी कवितेमध्ये विविधांगी अनुभवांना व्यक्त करताना स्त्रीया दिसताहेत.

स्त्रीवादी कथा लेखनामध्ये प्रामुख्याने कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे आणि सानिया, मेघना पेठे यांचे कथा वाङ्मय पुरोगमित्वाची भूमिका व्यक्त करताना दिसते. या लेखिका काहीशा आत्मभानाने व्यक्त होताना दिसतात. कादंबरी वाङ्मयामध्ये आशा बगे, अंबिका सरकार, विभावरी शिरूरकर, शांता गोखले, मेघना पेठे, कविता महाजन यांनी कादंबरी वाङ्मयातून स्त्रीमनाचा हुंकार व्यक्त केला आहे. आज आत्मचरित्र या प्रकारातून अनेक स्त्रीलेखिका स्वानुभवांना व्यक्त करताना दिसतात. नजुबाई गावीत, सुनीता देशपांडे, कमल पाध्ये, रागिनी पुंडलिक, मेहरूसिन्ना दलवाई, उषा डांगे, यशोधरा गायकवाड, ऊर्मिला पवार इ. स्त्रीयांनी स्व:ला व्यक्त केले आहे. यातून स्त्रीवादाचा वेगळा आविष्कार होताना दिसतो. एकूणच पुरूषप्रधान व्यवस्थेला विचारलेले प्रश्न, कुटुंबाचे विश्लेषण, याविषयी महिला भूमिका मांडताना दिसतात. यातून एक सांस्कृतिक ठेवा साहित्यात येताना दिसतो. याकडे आपण स्त्रीवादी लेखन आणि स्त्री अभ्यास या दृष्टिकोणातून याचा विचार करू शकतो.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 135 (C)- आधुनिक मराठी साहित्य : विविध प्रवाह
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

अशा प्रकारे मराठीतील स्त्रीवादी लेखनाचे क्षेत्र सातत्याने विस्तारत आहे. कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, यांसारख्या विविध वाङ्मयप्रकारांतून महिलांचे लेखन निर्माण झाले आहे. आम्ही माणूस आहोत आणि माणसांसारखे जगू द्या प्रामुख्याने ही भूमिका घेवून महिलांचे लेखन आकाराला येत आहे. त्या लेखनातून समानतेची भूमिका अपेक्षित आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. पुण्यभूषण : आजचा काळा आजचे साहित्य, ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे, २०१० स्मरणिका, पृष्ठ क्र. ८१.
२. फडके भालचंद्र, मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, पृष्ठ क्र. १०.
३. ऊ.नि., पुण्यभूषण : आजचा काळ आजचं साहित्य, पृष्ठ क्र. ८१.
४. ऊ.नि., पुण्यभूषण : आजचा काळ आजचं साहित्य, पृष्ठ क्र. ८३.
५. ऊ.नि., पुण्यभूषण : आजचा काळ आजचं साहित्य, पृष्ठ क्र. ८३.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 | Special Issue - 148 | Feb. 2019 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S
RESEARCH JOURNEY
UGC Approved Journal
Multidisciplinary International E-research Journal

# CREATIVE WRITING IN ENGLISH, MARATHI, HINDI LITERATURE AND TRANSLATION STUDIES

- GUEST EDITOR -
Prin. (Dr.) S. R. Patil

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

- EXECUTIVE EDITORS -
Mr. Hemantkumar D. Patil
Dr. V.S. Adhave | Dr. Vanita T. Pawar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

20. **Reflection of Classicism in Dr. S. R. Patil's Songs of Soul And Soil : A Trasection of Liberal Humanism** ........ 62
Dr. A. T. Gavhale

21. **The Conflicts of Anglo Indians for Identity in Manohar Malgonkar's Selected Novels** .................. 65
Mr. Sadashiv Ramchandra Rane

22. **Pu. La. Deshpande's Tee Phulrani : A Transcreation** .................. 68
Dr. Bhavana Mukutrao Patil

23. **Githa Hariharan's When Dreams Travel : A Subaltern Studies** .................. 72
Dr. Umesh Patil

24. **Depiction of Changing Human Values in Dr. Deepak Chaudhri's Selected Short Stories** .................. 75
Mr. Bhausaheb S. Desale

25. **V. S. Naipaul's India : A Miillion Mutiinies Now : A Socio - Cultural, Political and Economical Study of Contemporary India** .................. 76
Vinod Pralhad Chaudhari

26. **'Voices' of Calcutta in Anita Desai's Voices in the City** .................. 79
Dr. Anil P. Patil

27. **Untouchability in Rohinton Mistry's A Fine Balance** .................. 82
Roshan Patil

28. **Social Concern in Select Stories of Deepak Chaudhari's, Karna and Selected Stories** .................. 85
Mr. Atul Santosh Suryawanshi

29. **Creative Writing in English, Marathi, Hindi Literature and Translation Studies** .................. 88
Mr. Devidas Adhar Pardhi

30. **Contemplation : A Miniature World of the Twenty - First Century Human Faces** .................. 92
Narendra Sonu Tayade

31. **Signifcance of Dhasal's 'Man, You should Explode' : A Study in Translation** .................. 95
Dr. Jagdish S. Patil, Lalit Balkrishna Patil

32. **Political Paradox and Humour in the Short Story of Dr. Deepak Chaudhari's "Tree Plantation"** ....... 97
Prof. Chauvan Jagdish Ramdas

33. **A Study of Dr. Dipak Chaudhary's Selected Short Stories in the Light of Social Realism** .................. 99
Dinesh Wadile

34. **Shashi Deshpande the Creative Writer Analyses the Feminist Aspect and shows the Subordination of Women in the Society.** .................. 101
Jahagirdar Zinga Salunkhe

35. **Attia Hosain's Sunlight on a Broken Column : Creative Writing on Gender inequality** .................. 104
Smr. Dhiraj Ratilal Vaishnav

36. **The Role of Ideology and Tradition in Translation: A Case Study** .................. 106
Sambhaji Vaman Narute


**मराठी**


३७. **अनुवाद, कव्यानुवाद स्वरूप आणि अडथळे** .................. १०७
प्रा. डॉ. भारत भगवानराव भदाडे

३८. **युद्धकालीन अराजकचा समकालीन प्रत्यय देणारी कविता : होय, तेव्हाही गाणं असेल !** .................. १०९
छाया हरिभाऊ कदम-पवार

३९. **मराठी भाषेतील अनुवादित कविता ('ऑक्युपाय वॉल स्ट्रीट')** .................. १११
प्रा. डॉ. पंकज रघुनाथ देवरे

४०. **अनुवादित साहित्यलेखन** .................. ११३
डॉ. विठ्ठल केदारी




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# अनुवादित साहित्यलेखन

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई

अनुवाद ही प्रक्रिया सद्यस्थितीत विशेष महत्वाची ठरत आहे. अनुवादित साहित्याचे आज स्वतंत्र क्षेत्र निर्माण झाले आहे. या साहित्याला साहित्य प्रकारात स्वतंत्र स्थान मिळालेले आहे. अनुवाद करणे ही एक स्वतंत्र शाखा आहे. अनुवादाला रूपांतर, भाषांतर असे म्हटले जाते. साहित्याचा अनुवाद करताना भाषिक रूपांतराला विशेष महत्व आहे. भाषिक रूपांतर/अनुवादामध्ये होणे विशेष महत्वाचे असते. एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत रूपांतरित करताना संदर्भांन्वये, प्रदेशान्वये शाब्दिक अर्थ वेगवेगळे असतात. अशा परिस्थितीत अनुवाद प्रक्रिया कठीण होवून बसते. तसेच एका विशिष्ट भाषेतील शब्द त्यांना त्या भाषेत असलेले अर्थ प्रादेशिकतेन्वये बदलले पहायला मिळतात. या सर्व बाबी जमेस धरून अनुवादकाला समजून घेवून अनुवादाची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. अनुवादातून पून:निर्मिती होत असते. मूळ भाषेतला विचार, संकल्पना आणि आशय आपण समजून घेवू शकतो. मात्र याकरीता अनुवादकाला दोन्ही भाषांची जाण असावी लागते अनुवाद या पारिभाषिक शब्दामध्ये एक गोष्ट गृहीत धरलेली असते. ती म्हणजे मूळ लेखनात आशय व अर्थ तोच ठेवावा लागतो. अनुवादाला भाषांतर असेही म्हटले जाते बदलत्या काळान्वये भाषांतर अथवा अनुवाद हा शब्द मराठीतून अर्थविस्ताराने प्राप्त झाला आहे.

अनुवादाविषयी पुढील काही अभ्यासकांची मते जाणून घेता येतात. ए.एस.स्मिथ म्हणतात 'पूर्वीचा काळ अर्थ कायम ठेवून दुसऱ्या भाषेत रूपांतर करणे म्हणजे अनुवाद होय.' तर विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणतात 'भाषांतर करणे म्हणजे जो अर्थ एखाद्या विवक्षित भाषेत असेल तर तो दुसऱ्या भाषेत उतरविणे होय.' भोलानाथ तिवारी यांच्या मते, 'एखाद्या भाषेत व्यक्त झालेल्या विचारांना समान व सहजरीत्या दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे अनुवाद होय.' अनुवादातून काय अपेक्षित आहे याविषयी वरील अभ्यासकांच्या व्याख्या अनुवादाविषयी स्पष्टपणे भूमिका घेवून अनुवाद कशाला म्हणायचे हे स्पष्ट करतात असे दिसते.

मराठी साहित्याचा विचार करताना अव्वल इंग्रजी कालखंडातील भाषांतर युग हे याबाबतीत विचारात घेता येते. भारतातील अनेक भाषांपैकी मराठी ही एक महत्वाची भाषा होय. इंग्रजांच्या वाङ्मयातील काही कलाकृती मराठी लेखकांनी इंग्रजीतून मराठीत अनुवादित / भाषांतरित केल्या आहेत. इ.स. १८८५ च्या दरम्यान मराठी वाङ्मयामध्ये भाषांतर युग अवतरले होते असे दिसून येते. याकाळात चिपळूणकरांनी 'सॉक्रेटिसचे चरित्र', कोल्हटकरांनी 'कोलंबसाचा वृत्तांत', पंडित वैद्यनाथ शर्मा यांनी (१८४९) मध्ये 'राणा प्रतापदित्याचे चरित्र' अनुवादित केले होते. अशा रीतीने अव्वल इंग्रजी काळात भाषांतराची प्रक्रिया निर्माण झालेली पहायला मिळते.

आज अनुवाद क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. नवनवीन तंत्र ज्ञानामुळे यामध्ये वाढ होत आहे. ''आजच्या जागतिकीकरणाच्या काळात अनुवादाचे खूप महत्व आहे. जग जवळ आणण्यात जागतिकीकरण, विज्ञान-तंत्रज्ञान, प्रसार माध्यमे मोलाचा वाटा अनुवादाचा आहे. हे नाकारून चालणार नाही. हे लक्षात घेवून ज्ञानाधिष्ठित समाजरचनेतसाठी राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे स्वतंत्र राष्ट्रीय अनुवाद अभियान (National Translation) सुरू करण्यास शासनाला सुचविले आहे. तेव्हा आजच्या काळात अनुवादाला खूप महत्व येत आहे. कारण अनुवाद हा केवळ दोन भाषांना एकत्र आणण्याचे काम करत नाही, तर दोन भिन्न संस्कृतींनादेखील तो एकत्र आणतो.''[१]

यामुळे अनुवाद हे साहित्याचे क्षेत्र स्वतंत्रपणे उदयाला येते. दोन भाषांत घडणारी ही प्रक्रिया असल्याने भाषा संस्कृतींचा आविष्कार असते. म्हणून एका भाषेतील सांस्कृतिक वैभव अनुवादाने समृध्द होताना दिसते. आज मराठी साहित्यातील अनुवादाचे दालन विस्तृत झालेले आहे.

अलिकडे मराठीमध्ये अनुवादित साहित्याची स्वतंत्र परंपरा निर्माण झाली आहे. आजच्या अनुवादामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्या त्या भाषेतील प्रसिध्द, लोकप्रिय साहित्य मराठीत अनुवादित होते आहे. केवळ अभिजात असलेले साहित्य रूपांतरित होते असे नाही तर वाचनप्रिय आणि वर्तमानकालीन साहित्यही अनुवादित होताना दिसते. आज पुस्तक प्रदर्शनांतून दुसऱ्या भाषेतील अनुवादित साहित्याची पुस्तके आपल्या भाषेतील साहित्य आपल्याकडिल साहित्यापेक्षा कसे वेगळे आहे. त्यांतील आशयाची आविष्कार पध्दती कशी आहे. हे समजून घेण्यासाठी वाचक अनुवादित साहित्याच्या वाचनाकडे वळताना दिसतात. दुसऱ्या भाषेतील साहित्यात अवतरलेली रसिकता, भाषिक वेगळेपण या सर्व गोष्टींविषयी कुतूहल आणि आकर्षण आपल्या वाचकाला वाढत असते. ''कोणत्याही लेखकाला जे सांगायचे असते ते काही फक्त त्याच्या अभिव्यक्तीच्या भाषेपुरते मर्यादित नसते. ती भाषा आणि तिने निर्माण केलेल्या भाषिक आणि सांस्कृतिक अवकाशात त्यांची साहित्यकृती जरी एकरूप रूजलेली असली तरी तिचे पुनर्रोपण दुसऱ्या भाषेत करणे काही अंशी का होईना, शक्य असते. भाषांतराच्या मर्यादा लक्षात घेताही एक गोष्ट जाणवते ती ही, की लेखकाला आपल्या साहित्यकृतीतून जो संदेश पोचवायचा आहे तो त्याच्या भाषेशी घट्ट बांधलेला असला तरीसुध्दा तो दुसऱ्या भाषेतूनही तितक्याच किंवा थोड्या कमी प्रभावीपणे व्यक्त होवू शकतो. आणि म्हणूनच भाषांतराचा खटाटोप करायला


Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

भाषांतरकार धजावतात.''[२] स्वातंष्यापूर्वीच्या कालखंडात इंग्रजी, रशियन भाषेतील अभिजात कलाकृतींची भाषांतरे झालेली आहेत. पुश्किन, दस्तएवस्की, चेखव यांच्या उत्कृष्ट कलाकृतीचे अनुवाद मराठीत झाले आहेत.

२० व्या शतकामध्ये फ्रेंच भाषेतील वा. द. दिवेकर यांनी अगदी २००० जॉ-पॉल सार्त्र या अस्तित्ववादी तत्वत्वंत्याचे ले मो हे आत्मचरित्रपर पुस्तक शब्द या नावाने मराठीत आणले आहे. यामध्ये सार्त्रचे बालपण व जीवन शब्दांकित झाले आहे. ''भाषांतर करताना एका भाषेतील आशय आणि त्या साहित्यकृतीचा आकृतीबंध समजावून घेणे, तिच्यामधील संदेशवहन आणि अर्थवहनाचा बाज लक्षात घेणे आणि तिचे झालेले आकलन दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे हे घडत असते. म्हणजे आपण अवगत केलेल्या साधनांनी एखादे कुलूप उघडावे, आतले सगळे गोळा करणे आणि ते दुसऱ्या पेटीत कुलूपबंद करून त्याची किल्ली आपल्या माहितीच्या माणसाच्या हाती सुपूर्त करावी असे हे झाले या सगळ्याचे साधन असलेली भाषा तिच्या सगळ्या खुंब्या सकट, बारकाव्यासकट समजली पाहिजे. भाषांतरात भाषेच्या वापराला अतोनात महत्व येते ते यामुळेच शांता शेळके यांनी भाषांतरित केलेल्या 'चौघी जणी'च्या जगात आपण इतके रममाण होतो तो त्यांच्या भाषेवरच्या पकडीमुळे तर राम पटवर्धनांचे 'पाडस' आपल्याला म्हणूनच पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटते.''[३] भाषांतराच्या प्रक्रियेत बहुतेकवेळा भाषिक वाक्य रचना, शब्दांचे बारकावे, अतिचिकित्सपणामुळे भाषांतरातील उत्स्फूर्ततेला खिळ बसते. या भाषांतरावेळी वाचक ठेचकाळतो त्याला संदर्भासाठी वाक्य पुन्हा पुन्हा वाचावी लागतात. त्यामुळे वाक्यांत एकसंधता आढळत नाही. तसेच भाषांतरामध्ये कृत्रिम भाषा आणि तुटकपणा यामुळे ढोबळपणा भाषांतरामध्ये येतो. कित्येकदा अनुवाद मूळ आशयाच्या आणि रंजक विषयाच्या जोरावर बाजी मारून नेतानाही दिसतात. अनुवादामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ सुटण्याचा धोका असतो. मुळ संहितेपेक्षा लेखक खूप दूरही जातो. भाषांतर करताना एक प्रकारची निर्मिती प्रक्रिया घडत असते. या प्रक्रियेतील स्त्रोत भाषा जाणणारा तज्ज्ञ आणि ती भाषा न जाणणारा एक यांतील तज्ज्ञ आहे. उत्तम भाषांतरामध्ये मराठी भाषा, तिचा बाज सांभाळणारी वैशिष्ट्यो, भाषांतरातील प्रामाणिकपणा, अर्थवहन, माहितीवहन, मूळ संहितेत आवश्यक ते बदल घडताना दाखविलेला सच्चेपणा या बाबींच्या पूर्ततेची अपेक्षा भाषांतरातून अपेक्षित असते. मराठी भाषांतरामध्ये आज केल्याने भाषांतर हे त्रैमासिक १९९९ पासून सुरू आहे. हे नियतकालीक चोखंदळ वाचकांना जर्मन, स्पॅनिश, रशियन, फ्रेंच, जपानी या परकीय भाषांतील अनुवादीत साहित्य वाचण्यास उपलब्ध करून देत आहे. एकूणच आज अनुवादित साहित्याची निर्मिती वेगाने होत आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. डॉ. तुपे केशव, माध्यमांची भाषा आणि लेखन कौशल्ये, पृष्ठ क्र. १२२
२. पुण्यभूषण, आजचा काळ, आजचे साहित्य, ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे २०१०, स्मरणिका. पृष्ठ क्र. ११९
३. तत्रैव, पृष्ठ क्र. १२०



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue

International Multilingual Refereed Research Journal

# Vidyawarta®

12th and 13th February 2019



State Level Seminar on

# 'Cultural Aspects in Indian Literatur

Sponsored by

**Savitribai Phule Pune University, Pune**

Organized by,

**Department of English**

Shri MarutraoGhulePatilShikshanSanstha's

## JIJAMATA COLLEGE OF SCIENCE AND ARTS

At. Bhende (Bk). Tal. Newasa, Dist. Ahmednagar,Maharashtra State,

Winner of SPP University's Best Rural College Award &
Re-accredited at B+' Grade by NAAC (3rd Cycle), Recipient of DST-FIST 2014

**Guest Editor**
Vijay Adsure
Mohini Sathe

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## || Index ||


01) ncient Cultural Mechanism strategies in the writings and ...
mesh D., Newasa ||10

02) haracteristics of Indian culture
Prof. Dr. S. B. Kadam, Ahemdnagar ||12

03) Reflection of Social Evil Sacrifice In Chaman Nahal's Azadi
Dr. Varpe Sandip Dadabhau, Ahmednagar ||16

04) Visual Representation of Indian social life during partition riots in Indian novel
Prof. Sunil S. Deokar, Ahmednagar ||19

05) A literary study of Bhagavad Gita
Prof. Devidas N. Durgesht, Nashik ||21

06) Aspects In Indian English Literature
Prof. Dr. Hapse P. T., Ahmednagar ||23

07) Perspective of Cultural identity in Amit Chaudhuri's Fiction
Mr. Gangadhar Vithalrao Shinde ||28

08) Reflection of Educational Hypocrisy and Social Disorder in Chetan Bhagat's Novels
Mr. Rohokale Balasaheb Ambadas, Ahmednagar ||30

09) A Study of Cultural Ethos in Raj Rao's Kanthapura
Sunil Adhav, Shevgaon ||33

10) साहित्याची सामाजिकता
डॉ. विठ्ठल केदारी, अंबाजोगाई ||36

11) Alienation and Identity Crisis in the Select Novels of V.S. Naipaul
Shaikh Laikh Mahemood, Aurangabad ||38

12) Social and Political Impact on Maharashtra's Modern Urdu Short Stories
Abdul Mujahid Ansari, Khuldabad ||41

13) Exploring Greek Literature and Culture through Writings in Urdu
Dr. Abdul Rab, Aurangabad ||45


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

10

# साहित्याची सामाजिकता

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

**********

साहित्यिक हा समाजाचा घटक असतो. समाजाने त्याला घडविलेले असते. समाजातून लेखकावर संस्कार घडत असतात. जन्मत: कोणताही व्यक्ती लेखक म्हणून जन्मास येत नाही. लेखकाने समाजीवनातील अनुभवांचे संचित साठविलेले असते. साठविलेल्या संचिताला लेखक विविध दृष्टीने पाहतो. त्यांचा बारकाव्याने विचार करतो. त्यातून त्याची स्वत:ची समाजाकडे पाहण्याची दृष्टी बनते. त्या नजरेतून आजूबाजुला घडणाऱ्या गोष्टींचे सूक्ष्मपणे अवलोकन करतो. त्यातून घटना, प्रसंगाचा मानवी जीवनाशी संबंध जोडण्याचा तो प्रयत्न करतो. यातून तो समाजाला काही विचार देवून समाजाला दृष्टिकोन देण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

लेखक हा समाजाचे अपत्य असतो. समाजाला आपण काही तरी देंणं लागतो. या भूमिकेतून साहित्य निर्मिती करत असतो. साहित्य निर्मितीतून समाजहीत सांगण्याचा प्रयत्न करत असतो. लेखक कथा, कविता, कादंबरी इत्यादी लेखन प्रकारांतून स्वत:चे जगणे व्यक्त करत असतो. तो ज्या समाजात जगतो, ज्या समाज गटात वावरतो, त्याच्या जीवन जगण्याच्या पध्दती लेखनातून सांगत असतो. कारण त्याच्या जडणघडणीत समाजगटाच्या जीवनपध्दतींचा संदर्भ असतो. तो लेखनातून व्यक्त होणे साहजिकच असते. कोणत्याही समाजातील एक व्यक्ती म्हणून नव्हे तर कलावंत म्हणूनही त्याची जडणघडण होताना सामाजिकता महत्वाची ठरते. सामाजिकतेशिवाय कोणत्याही माणसाचे जीवन अशक्य आहे. किंबहूना ते अपूर्ण असते. "साहित्याची निर्मिती हस्तीदंती मनोऱ्यात किंवा समाज व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी ह्या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही. वाङ्मय निर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेत रूजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडविण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या विशिष्ठ भाषेतील वाङ्मयीन व शैलीविषयक परंपरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत असतात. साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वत:ची वैशिष्ट्ये ती पूर्णपणे जपत असते. हे खरे आहे, पण ह्याच वेळा ज्या काळात व ज्या परिस्थितीत ती निर्माण होते त्या परिस्थितीचा प्रभाव मर्यादा ती पूर्णपणे ओलांडू शकत नाही."[१] असे मत प्रा.रा.ग. जाधव यांनी साहित्याची निर्मिती मुख्यत समाजामुळे होते. समाजाशिवाय साहित्याची निर्मिती होवू शकत नाही. समाजामध्ये v I ß ह्रो विविध विचारप्रवाह, विविध समाजगट, विविध संप्रदाय, विविध भाषा बोली बोलणारे समाजबांधवांच्या वैविध्याचे दर्शन साहित्यातून घडत असते. त्या सर्व गोष्टींतील वेगळेपण लेखक साहित्यातून रेखाटत असतो. त्या वैविध्यांला समजून घेण्यासाठी वाचक, समीक्षक आस्वादनाकडे वळतो.

लेखकाची जडणघडण समाजामध्ये होत असताना कुटुंब, समाज, आदर्श व्यक्ती, थोर माणसे, शिक्षक, अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील आदर्श व्यक्तीचे गुणांचे अवलोकन करून त्यापध्दतीने कोणतीही व्यक्ती आपल्या जीवनामध्ये बदल घडविण्याचा प्रयत्न करत असते. समाजाची जीवन जगण्याची पध्दती कलात्मक अनुभवाचे बीज लेखकाला देते. लेखक साहित्यांमध्ये मांडणी करण्याचे विषय समाजातून घेतो. माणसाच्या जीवनाविषयी, पारस्पारिक संबंधांविषयी, जीवन कल्पनाविषयीची भूमिका लेखक साहित्यातून व्यक्त करत असतो. समाजाच्या जीवन जगण्याच्या धारणा, समाजातील आदर्श मूल्य, नैतिक मूल्य इत्यादी गोष्टी त्यांच्या जीवनाशी संबंधीत असतात. म्हणून साहित्यात लेखकाच्या भोवतालीच वास्तव उभे केलेले पहायला मिळते.

मानवाला जीवनामध्ये चांगल्या, वाईटांचे अनुभव येतात. त्या अनुभवांचे चित्रण लेखक करतो समाजजीवनातील अनुभव लेखक मांडतो. साहित्यातून



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

समाजजीवन बदलावे अशी भूमिका लेखकाची असते. लेखक बांधिलकीची भूमिका ठेवून साहित्यातून जीवनविश्वाला पूर्नत्व प्राप्त करून देतो. साहित्यिक समाजातील विविध प्रकाराचे, स्वभावाचे अनुभव पाहतो त्यांचे व्यक्तिजीवन साहित्यावरील झालेले परिणामांचे संसूचनच लेखक करताना दिसतो. उदा. राम गणेश गडकरी यांचे नाटक 'एकच प्याला' दारूच्या व्यवसाचे समाजावर होणाऱ्या दुष्परिणामांची मीमांसा करते. बाबा पद्मनजी यांची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी समाजातील विधवांची स्थिती मांडताना दिसते. मामा वरेरकरांची नाटके समाजातील कामगारांच्या संपावर आधारित आहेत. केशवसुतांच्या कवितेतील सामाजिकता समाजजीवनाचा विचार मांडते. उदा. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' अशा विविध साहित्यनिर्मितींचा विचार करता साहित्य हे समाजाचे चित्र आपल्यासमोर मांडताना त्यातील प्रश्नांचे स्वरूप आपल्यासमोर ठेवते. त्या प्रश्नांना मुखर करून वाचकांना प्रश्नांची जाणीव करून देवून समाज जीवनातील समस्यांनाही वाचकांसमोर आपल्याने समस्यांची जाणीव वाचकाला होते. एकूणच मानवी जीवनातील जगण्याच्या विविध पैलूंना शब्दांकीत करून वाचकांना नवी जाणीव करून दिली जाते. "व्यक्तीचे सगळे अनुभव हे शेवटी त्याच्या व ते ज्या समाजाचा घटक आहे, त्या समाजाच्या भौतिक/आध्यामिक संपन्नतेशी किंवा विपन्नतेशी निगडीत असतात. आणि कोणत्याही समाजगटाची भौतिक व आध्यात्मिक संपन्नता किंवा विपन्नता ही अखिल मानवी समाजाच्या संपन्नतेशी किंवा विपन्नतेशी निगडित असते."[२] मानवी जीवनातील संपन्नता, विपन्नता महत्वाची असते. त्यातूनच सुख—दुःखाला वेगवेगळी रूपे प्राप्त होतात. वाचकांगणीक कलाकृतीचे महत्व प्राप्त होते. समाजामध्ये एक परिघ असतो. त्याचप्रमाणे बाह्यवर्तुळाच्या परिघालाही स्पर्श करतात. याशिवाय अंतर्वर्तळाची अशीही एक अवस्था असते की अंतर्वर्तुळ स्पर्श करतात. यातूनच व्यक्तिजीवन व समाजजीवन यांतील संबंध स्पष्ट करण्यासाठी अखिल मानव जात किंवा अखिल मानवी समाज हे मोठे वर्तुळ आणि या वर्तुळाच्या परिघा अंतर्गत अनेक मानवी गट आहेत. त्यांमध्ये देश, काळ, स्थिती, वंश धर्म यांत भेद आहे. "साहित्य हा देखील मानवी जीवनाचा उपक्रम आहे आणि म्हणूनच व्यक्ती आणि बहुजन समाज यांना अन्योन्यसापेक्ष आंतर्भाव व सहभाग त्यात होणे आवश्यक व अपरिहार्य आहे."[३] समाजातील विविध जाती—धर्मांच्या भिंती आहेत. त्यांच्या स्वतंत्र बोली आहेत. सामाजिक जीवनामध्ये त्यांचे स्थान महत्वाचे ठरते. किंबहुना त्यानुसार त्या समाजगटाची ओळख बनते. या सर्वांचे चित्रण साहित्य करते. त्यामुळे एका विशिष्ट स्वरूपाने साहित्य बनते. "साहित्य हे अनेक चौकटी मोडणारे प्रभावी हत्यार आहे. म्हणून साहित्यातून समाजाचा अंतःस्वर उमटला पाहिजे. समाजाचे वैचारिक, मानसिक सांस्कृतिक पोषण करण्याचे कार्य साहित्यातून होत असते. समाजाचे सर्वांगीण पोषण करणे, सामाजिक संवेदना टिकविण्याचे कार्य साहित्य करीत नसेल तर त्याचे मूल्य शून्यवत मानले पाहिजे. जीवनातील भग्नता, रूक्षता, भयावहता कमी करून आनंदाचा झरा निर्माण करणे हे जसे साहित्याचे प्रयोजन आहे तसेच मानवतेच्या उध्दारासाठी सामाजिक चेतना निर्माण करणे हे ही कार्य साहित्याने केले पाहिजे, एकूणच काय तर मानव मुक्तीची समग्र आंदोलन निर्माण करण्याची जबाबदारी साहित्यावर आहे."[४] साहित्याने मानवी जीवनाला व्यक्त करताना माणसांमाणसांतील कलह, भांडण—तंटे, माणसांमाणसांतील वैचारिक मतभेद, सांस्कृतिक वेगळेपणाला व्यक्त केलेले असते. म्हणून साहित्य समाजजीवनाचे वास्तवरूप रेखाटत असते. वास्तवाचा आभास साहित्यात असला तरीही साहित्यातील समाज आणि समाजजीवन ह्यावर साहित्यनिर्मिती होते. म्हणून साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब उमटणे हे साहजिक अथवा अपरिहार्यपणे येते असे म्हणता येते. सामाजिक जीवनाशिवाय साहित्य लेखनाला बीज मिळत नाही. म्हणून साहित्याची सामाजिकता अभ्यासताना समाजाला वेगळे करता येत नाही.

## संदर्भग्रंथ सूची

१. संपा. प्रा. प्रल्हाद शिंदे, मराठी साहित्य अभ्यासक्रम दिशा आणि दशा.
२. डॉ. सदा कऱ्हाडे, साहित्य विश्लेष, पृष्ठ क्र. २२.
३. डॉ. सदा कऱ्हाडे, साहित्य विश्लेष, पृष्ठ क्र. २३.
४. साहित्य समाज आणि परिवर्तन, डॉ. वासुदेव मुलाटे, पृष्ठ क्र. ३५.

❑❑❑



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समीक्षेचे स्वरूप<br>डॉ. विठ्ठल केदारी | १-४ |
| २ | दलित साहित्य समीक्षेची मूलतत्त्वे<br>प्रा. डॉ. मारोती गायकवाड | ५-९ |
| ३ | जागतिकीकरण आणि मराठी विज्ञानकथा<br>डॉ. सचिन गंगाधर गिरी | १०-१३ |
| ४ | स्त्रीवादाचे अलक्षित आयाम<br>डॉ. योगिता आशुतोष पाटील | १४-१७ |
| ५ | ग्रामीण जीवनानुभव संयतपणे साकारणार कथासंग्रह : 'कोंडी'<br>डॉ. कल्याण गोपनर | १८-२२ |
| ६ | कादंबरी समीक्षा : विशेष संदर्भ जगदीश कदम यांची 'गाडा' कादंबरी<br>प्रा. गोरोबा रोडगे | २३-२७ |
| ७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा<br>प्रा. डॉ. शिवाजी नी. नागरे | २८-३३ |
| ८ | स्त्रीवाद व स्त्रीवाद साहित्य समीक्षा<br>प्रा. डॉ. संतोष जगन्नाथ जाधव | ३४-३७ |
| ९ | स्त्रीवादी साहित्य समीक्षा<br>काळे कल्पना व्यंकटराव | ३८-४२ |
| १० | मार्क्सवादी साहित्य समीक्षा<br>प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | ४३-४७ |
| ११ | 'नीरजा' यांच्या कथासाहित्याचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून परिक्षण<br>डॉ. वर्षा शिरीष फाटक | ४८-५९ |
| १२ | गझल एक काव्यप्रकार आणि आजची गझल समीक्षा<br>प्रविण रामकृष्ण मोरे | ६०-६८ |
| १३ | विज्ञान साहित्याची मानसशास्त्रीय पध्दतीने समीक्षा<br>प्रा. सौ. प्रिया मंदार नेरलेकर | ६९-७५ |





Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. समीक्षेचे स्वरूप

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड.

मराठी साहित्यामधील समीक्षेत मोलाची कामगिरी झालेली आहे. आधुनिक मराठी वाङ्मयामध्ये समीक्षाविचाराचा स्वतंत्रपणे अभ्यास होत आहे. गेल्या शे-दिडशे वर्षातील मराठी समीक्षेत समीक्षेतील विविध प्रवाह निर्माण करून त्यांचा विकास केला आहे. साहित्य समीक्षेतील प्रवाह आणि प्रवृत्ती तपासणे हे फार जिकिरीचे काम आहे. कालखंडान्वये समीक्षा विचाराचा अभ्यास करता येवू शकतो. मात्र यावेळी समीक्षकाची धांदल उडण्याची शक्यता असते. सुरूवातीला समीक्षा व्यवहारासंबंधी आ. रा. देशपांडे, मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले इ. अभ्यासकारांच्या दृष्टी समीक्षा व्यवहाराला चालना देणारी ठरली. सादारणपणे १९४० पूर्वी व नंतर साहित्याचे ऐतिहासिक व समीक्षापूर्वक अलोकन करताना मुख्यता आशावादी व वैफल्यवादी अशा ढोबळपणा दृष्टिस येते.

आजच्या समीक्षेला भरतमुनी, ॲरिस्टॉटल, हेगेल, मार्क्स, कॉडवेल व कॉलिंगवूड यांच्या विचारांतील सिध्दांतांनाच समीक्षाविचाराने स्वीकारले आहे. तेच सिध्दांत प्रमाण माणून समीक्षेचा विचार केला जातो आहे. प्रज्ञा, प्रेरणा व संस्कृती याचे स्वरूप कलानिर्मितीवर परिणाम करते. त्याचे आकलन होवून कलानिर्मितीची भूमिका स्पष्ट होते. रवींद्रनाथ टागोर, बालकवी, टॉलस्टॉय, हार्डी, गॉर्की इ. च्या कलावृत्ती व कलाकृतीसंबंधी विचार लक्षात घ्यावे लागतात. गंगाधर गाडगीळ, श्री. के. क्षीरसागर, रा.शं. वाळिंबे, शरच्चंद्र मुक्तिबोध, गं. बा. सरदार, मुक्ताबाई दीक्षित व आ. रा. केळकर इ. अभ्यासकांनी मराठी समीक्षेतील वा.म. जोशी व मर्ढेकर यांच्या विचारांसंबंधी, समीक्षाशास्त्रासंबंधी प्रश्न विचारून स्पष्टता करून घेतली. त्यामुळे समीक्षाव्यवहारासंबंधीची स्पष्टता झाल्याचे लक्षात येते.

मराठी समीक्षाविचारात साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांच्या मुळे समीक्षा व्यवहाराची दृष्टी बदलली. मुख्यतः आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याचे वेगळेपण आणि सामर्थ्य स्पष्ट केले. साठोत्तरी काळातच स्वतंत्रपणे जनवादी साहित्यविचार य. बा. वडस्करांनी सांगितला. अशा वेळी आदिवासी साहित्याचाही विचार पुढे येवू लागला. दलित साहित्याची भूमिका स्वतंत्रपणे समोर आली. यामध्ये शरद पाटील यांनी अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र ही संकल्पना नव्याने समीक्षाव्यवहारात आली. एकूण दलित साहित्याची भूमिका समोर येतानाच दलित साहित्यासंबंधी भूमिका घेणारे लेखनही रा. ग. जाधव, बाबुराव बागुल, भालचंद्र फडके, गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, राजा ढाले इ. लेखक आघाडीवर होते.

समीक्षा विचारावर लघुनियतकालिकांची चळवळ, दलित साहित्याची चळवळ, ग्रामीण साहित्याची चळवळ, आदिवासी साहित्याची चळवळ या चळवळींतून प्रामुख्याने परंपरागत साहित्य आणि समीक्षा व्यवहारासंबंधी असंतोष व्यक्त केला होता. या साहित्य चळवळींच्या माध्यमांतून नव्या व्यवस्थापनाची आणि समीक्षेला नवा विचार देण्याची भूमिका होती.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

सादारपणे १९७५ पासून पुढे स्त्रीवादी समीक्षा उदयास आली. हळूहळू स्त्रीवादी साहित्याबरोबर स्त्रीवादी समीक्षा विकसित होवू लागली. या सर्वांच्या रूपाने कलाकृतीच्या अभ्यासाकडे समीक्षक वेगवेगळ्या भूमिकांतून पाहू लागले. "व्यक्तिनिष्ठ समीक्षेत अनेकवेळा विश्लेषण करताना समीक्षक कलाकृतीच्या आशयांत बदल करतो, पण तो केलेला बदल मान्य करत नाही. आपण फक्त साहित्यकृतीचे स्पष्टीकरण करीत आहोत आणि कलाकृतीचा अर्थ विशद करीत आहोत असे समीक्षक सांगत असतो. यामुळे समीक्षा वस्तुनिष्ठ राहात नाही. म्हणून आजच्या काळात ती अतिशय संमिश्र बनली आहे. आजची समीक्षा वाच्यार्थाला खोडून एक नवा आशय शोधण्याचा प्रयत्न करीत असते."[१] आजच्या काळात लिहिली जाणारी समीक्षा ही पुरेशा गांभिर्याने पुरेशा अभ्यासातून आणि पुरेशा आकलनातून लिहिली जाते असे म्हणता येत नाही. लेखकांनाही समीक्षक बहुधा सोयीचा हवा असतो. त्यामुळे त्या कलाकृतीवरची समीक्षाही समीक्षक त्याच्या सोयीने अथवा लेखकाच्या कलाकृतीला अनुकूल अशीच लिहितो.

साहित्यामध्ये परस्पर संबंधित अनेक गोष्टीचे आकलन आपण करून घेत असतो. आपण जेव्हा कलाकृतीची समीक्षा करताना एका विशिष्ट भूमिकेतून तिचा विचार करतो. त्या भूमिकेतून त्या रचनेचा विचार आपण करतो. त्यावेळी आपण मुख्यतः त्या कलाकृतीतील शक्तीस्थाने, बलस्थाने तसेच साहित्यपरंपरा आणि साहित्याच्या इतिहासातील तिचे स्थान काय याचा अभ्यास करत असतो. त्याविषयी त्या रचनेचे वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न आपण करतो. "एक विशिष्ट साहित्यकृती हे आपल्या अभ्यासाचे, विचाराचे केंद्र आहे. परंतु ही साहित्यकृती काही पोकळीत निर्माण होत नाही. ती एक विशिष्ट साहित्यपरंपरेत निर्माण होत असते. या विशिष्ट साहित्यकृतीची समीक्षा करताना आपल्याला काही नियम वा तत्वे वा निकष लागतात हे निकष आपल्या साहित्याविषयीच्या सैध्दांतिक भूमिकेतून मिळत असतात, किंवा आपण त्या साहित्यकृतीच्या संदर्भात अपयोजन करत असलेल्या विशिष्ट समीक्षादृष्टीने ते विकसित केलेले असतात. त्यामुळे एका विशिष्ट साहित्यकृतीच्या समीक्षेचा संबंध साहित्येतिहास व साहित्यशास्त्र यांच्याशी कसा असतो, ते स्पष्ट व्हावे."[२] या पध्दतीने साहित्य समीक्षाव्यवहारावर प्रभाव पडत असतो. एका विशिष्ट परंपरेत निर्माण झालेली कलाकृती अभ्यासताना त्या काळाचे संदर्भ आणि परिस्थिती महत्त्वाची ठरते. साठोत्तरी प्रवाहांचे समीक्षेतील वेगळेपण यासंदर्भाने महत्त्वाचे आहे. "१९६० नंतरचा काळ मराठी साहित्याच्या संदर्भात अनेक कारणांसाठी महत्वाचा आणि घडामोडींचा म्हणता येईल. या काळात अनेक चळवळी झाल्या. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी इत्यादी संज्ञा वापरून त्यात कार्यरत असलेल्या लेखककवींनी आपली निर्मिती केली. परंतु या सर्व चळवळींची, त्यामागच्या वैचारिक धारणांची, साहित्याच्या पृथगात्मकतेची सैध्दांतीक चर्चा झाली नाही. दलित साहित्याच्या सुरूवातीच्या काळात दलित सौंदर्यशास्त्राची गरज व्यक्त झाली. परंतु असे पर्यायी सौंदर्यशास्त्र उभे राहू शकले नाही. बुध्द तत्वज्ञान, म. फुले आणि डॉ. आंबेडकर आणि ह्या वैचारिक व्यूहाच्या जोडीला परंपरेत दडपल्या गेलेल्या अज्ञात वैचारिक धारणा यांच्या वर्तमानकालीन अर्थनिरूपणासकट समाजशास्त्रीय आणि राजकीय प्रणालींच्या चौकटीत एक सिध्दांतन उभे राहू शकले असते. परंतु तसे घडले नाही हे मात्र खरे. पारंपरिक वैचारिक व्यूह, प्रस्थापित साहित्य सिध्दांत यांच्याशी तीव्र आणि कडवा संघर्ष तात्त्विक स्तरावर घेवून पर्यायी व्यूह मांडण्याचे आव्हान दुर्देवाने कोणी स्वीकारले नाही."[३] यामुळे मराठी समीक्षा व्यवहारात अपेक्षित बदल घडताना दिसून येत नाही. एकूण मराठी समीक्षा व्यवहार वर्तमानासंबंधीचे आव्हान स्वीकारू शकले असे घडताना दिसत नाही.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

समीक्षा व्यवहार हा दुय्यम असतो. मुख्य कलाकृतीवर आधारलेला असल्याने साहित्यप्रकार आणि त्याच्याशी संबंधीत संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. तसेच साहित्याचे प्रयोजन, स्वरूप आणि मूल्य यांच्याशी संबंधीत संकपना महत्त्वाच्या असतात. साहित्यकृतीच्या मूल्यमापनासाठीचे निकषही संकल्पनांच्या आधारे ठरतात. लेखकाची साहित्यकृती विशिष्ट अनुभवांनी वेढलेली असते. ज्या काळात कलाकृती निर्माण झाली. त्या एकाच संस्कृतीचे संदर्भाचे चित्रण निर्माता कलाकृतीत अधोरेखित करत असतो. त्यातील प्रसंग सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीतून निर्माण झालेले असतात. समीक्षा मांडताना कलाकृतीतील वेगवेगळ्या संकल्पना स्वीकारून मूल्यमापन करावे लागते. त्या संकल्पना वगळून कलाकृतीची समीक्षा होणे अपरिहार्य आहे.

साहित्यसमीक्षेतून आपण कलाकृतीचे मूळ स्वरूप शोधण्याचा प्रयत्न करत असतो. मानवी जीवनातील अनुभव आणि व्यापार ज्ञानात्मक, सुखात्मक असे अनेकविध असूनही मनुष्याच्या उद्दिष्टयपूर्तीच्या खांबाभोवती ते गोवलेले असतात. अशा रचनेमुळे लेखककाला निर्मितीवेळी होणारा आनंद व वाचकाला कलाकृतीच्या आस्वादावेळी होणारा आनंद समीक्षा शास्त्राच्या कक्षेत येत असतो. मुख्यतः वाङ्मयीन समीक्षा रसिकच पण अधिक चोखंदळ व्यक्ती करतो. चिकित्साखोर व्यक्ती म्हणजे वाङ्मयीन वाद माहिती असणारी व वाङ्मयीन शास्त्र माहिती असणारी व्यक्ती समीक्षा करत असते. "कोणत्याही शास्त्रामध्ये एका विशिष्ट शास्त्रविषयावर सारे लक्ष केंद्रित केलेले असते व त्या विषयाच्या मूळ स्वरूपाचे ज्ञान उपलब्ध करून घेण्याचा अव्याहत प्रयत्न असतो. तसा साहित्यसमीक्षेचा विषय वाङ्मयीन कलाकृती हाच ठरतो."[४] समीक्षा करताना शास्त्राचे ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. ह्या ज्ञानावर आधारित कलाकृतीचे मूल्यमापन करणे समीक्षेत अपेक्षित आहे. "आपल्या अभ्यासविषयाच्या संदर्भात समीक्षा ही संज्ञा आपण जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील चिकित्सेला उद्देशून वापरत नाही, हे स्पष्टच आहे. ही संज्ञा आपण कलासमीक्षा किंवा साहित्य समीक्षा या मर्यादित अर्थाने वापरत असतो. प्रत्येकवेळी आपण समीक्षा या शब्दाला कला वा साहित्य या शब्दाची जोड देवूच असे नाही. परंतु समीक्षा हा शब्द वापरत असताना आपल्याला तो या विशिष्ट अर्थानेच अभिप्रेत असतो."[५] कला आणि साहित्य या दोन संकल्पनांच्या भूमिकांतून आपण साहित्य समीक्षेचा विचार करू शकतो. परंतु त्या अर्थाने आपण प्रत्येकवेळी विचार करू शकतो असे नाही. समीक्षा व्यापारात त्याचा विचार करताना तो विशिष्ट पध्दतीने समाविष्ट करणे गरजेचे असते.

एकूणच समीक्षाविचारात आपण साहित्यकृतीचे अर्थनिर्णयन करत असतो. कलाकृतीतील घटकांचे वर्णन विश्लेषण करणे होय. कलाकृतीतील अधिक समग्र व अचूक आकलन करून घेत असतो. त्या निर्मितीतील घटकांचे, महत्वपूर्ण व अर्थवाही वर्णन समोर ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. अर्थातच त्या रचनेतील आशयाचे स्वरूप, त्यातील घटना प्रसंगाचे चित्रण व व्यक्तिरेखा यांतील पारस्पारिक संबंधांचे वर्गीकरण करत असतो. त्या कलाकृतीतील मोजक्या, निवडक प्रसंगांच्याद्वारे वर्णन करतो. म्हणजेच साहित्यकृतीच्या मूल्यांशी निगडित असणाऱ्या घटकांचे वर्णन करत असतो. तसेच प्रत्येक साहित्यकृती ही अनन्य साधारण असते. तिचे मूल्य साहित्यप्रकारानुसार, साहित्यसंप्रदायान्वये, साहित्यकृतींच्या संदर्भात निर्धारित करावे लागते. येथे तुलना ही निर्माण होते व त्यातूनच साहित्यकृतीचे मूल्य ठरले जाते. त्यामुळे त्या कलाकृतीचे वेगळेपण लक्षात येते. एकूणच



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

समीक्षाव्यवहार हा वाचन, वर्णन, विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन, तुलना या अनेक घटकांनी युक्त आहे. हे सर्व घटक परस्परपूरक आहेत. त्यानुसारच समीक्षाव्यवहारात कलाकृतीचे महत्व अधोरेखित केले जाते.

**संदर्भग्रंथ सूची**

१. डॉ. पत्की यशवंत, साहित्य समीक्षेचे अंतरंग, पृष्ठ क्र. ११५.

२. पाटणकर वसंत, साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या, पृष्ठ क्र. १९३.

३. खोले विकास, विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, पृष्ठ क्र. १८५.

४. बेडेकर दि. के., साहित्य : निर्मिती व समीक्षा, पृष्ठ क्र. १.

५. ऊ. नि., पाटणकर वसंत, पृष्ठ क्र. १९२.



Scanned with CamScanner


Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | मराठवाडी बोली : स्वरुप आणि वैशिष्ट्ये<br>**प्रा. डॉ. आर. एस. बडुरे** | ७५-७८ |
| १५ | आदिवासी साहित्यातील बोलीभाषा<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ७९-८१ |
| १६ | म्हणीचा प्राण : बोलीभाषा<br>**प्रा. डॉ. माने हनुमंत तुकाराम** | ८२-८६ |
| १७ | बोलीभाषा, संत परंपरा आणि मराठी साहित्य<br>**श्रीमती. प्रिया शैलेश कदम** | ८७-९१ |
| १८ | बोलीभाषेचे वाहक प्रभावी माध्यम: भारूड<br>**प्रा. डी. के. आंधळे**<br>**डॉ. टी. ए. गित्ते** | ९२-९६ |
| १९ | जागतिक वास्तव आणि बहुभाषिक संस्कृती<br>**प्रा. ज्ञानेश्वर किसन म्हात्रे** | ९७-१०० |
| २० | मराठी साहित्यात वऱ्हाडी बोलीचे अविष्करण<br>**प्रा. डॉ. विजय राऊत** | १०१-१०९ |
| २१ | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**प्रा. डॉ. आसिया चिश्ती** | ११०-११५ |
| २२ | भास्कर चंदनशिव यांचे कथालेखन : अस्सल मराठवाडी ग्रामीण बोली भाषेची प्रभावी अविष्कार<br>**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे** | ११६-१२० |
| २३ | मराठी भाषा आणि देहबोलीचे स्वरूप<br>**प्रा. डॉ. चौधरी एन. डी.** | १२१-१२५ |
| २४ | बोलीभाषेने वाढविलेल्या कलाकृतीच्या कक्षा (संदर्भ : नवनाथ गोरे लिखित फेसाटी कादंबरी)<br>**प्रा. बालासाहेब विष्णू कटारे** | १२६-१३० |
| २५ | शेतकरी दीर्घकाव्यातील बोलीभाषा<br>**डॉ. बालाजी व्ही. डिगोळे** | १३१-१३६ |
| २६ | आदिवासी : सांस्कृतिक सामाजिक जीवन<br>**प्रा. डॉ. आहिरे भास्कर मुरलीधर** | १३७-१३९ |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १५. आदिवासी साहित्यातील बोलीभाषा

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड.

आदिवासी जमातींची बोली ही स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या आदिवासी जमाती स्वतःचे अस्तित्व सांभाळून आहेत. त्यांनी आपल्या संस्कृतीबरोबरच समूहाची बोली आविष्कृत केली. आपल्या बोलीमाषेतून संदेशन प्रक्रिया पूर्ण केली. एकूण आदिवासी वाङ्मयामध्ये आदिवासी जमातीची बोली ध्वनीत होते. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र आणि आत्मकथनांतून ती प्रकर्षाने जाणवते. अनुभव लेखनातून आदिवासी लेखक आपल्या भाषेला आविष्कृत करतात. ही भाषा इतर कोणत्याही भाषेपेक्षा वेगळी आहे. प्रत्येक आदिवासी जमातींची बोली विशिष्ट वैशिष्ट्यांनी युक्त आहे. त्यांतील संकेत ध्वनींचे अर्थ प्रकटीकरण करण्यामध्ये विविधता पहायला मिळते.

मराठी साहित्याला आदिवासी साहित्यामुळे वेगळ्या बोलीचा परिचय झाला. आदिवासी भाषा लेखनामध्ये प्रथमतः आलेली आहे असे नाही. 1960 नंतर दलित साहित्याने बोली भाषा साहित्यातून आणली. प्रमाण भाषेतून निर्माण होणाऱ्या साहित्याला नवीन साहित्यविश्वाचा परिचय करून दिला. 1980 नंतर आदिवासी साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणावर निर्मिती व्हायला सुरूवात झाली. आपले जीवनानुभव, व्यथा, वेदना आपल्या भाषेतून अभिव्यक्त केले. एकूण साहित्यविश्वाला आदिवासी साहित्याची ओळख होवून आदिवासींच्या जीवनाचा परिचय झाला. आदिवासी आत्मकथनकारांनी प्रामुख्याने 'भिल्लं', 'गोंड', 'परधान' आणि 'महादेव कोळी' या जमातींच्या बोलीचे दर्शन घडविले आहे. हे लेखक आपापली बोलीभाषा लेखनासाठी वापरतात. त्यातून जमातीतील नावे, विशिष्ट शब्दप्रयोग, वाक्यरचना आणि बोलण्याची लकबही स्पष्ट दिसून येते. 'आदोर' मध्ये भिल्ल मावची बोली येते. दाजी व अंबूच्या संवादातून बोलीचा प्रत्यय येतो. "बया आंबू, न्यारी राहू दे. देवजी कुठे गेला? त्याला बोलवं. आबास पक्का आजारी आहे. 'रात झाली तरी येऊन लागा', सांगितलं कारभारीने."[1] या पध्दतीच्या बोलीचे रूप पहायला मिळते. आत्याला शेतीच्या कामाची आवड नव्हती. म्हणून गणपतीने आणलेला नवा बैल चालू करायला सांगितल्यावर आत्या बैलाला शिव्या देतो, "चलं रं भडव्या! चालशील तर बरं, नाय त देतो तुला पादाडून! मरून गेले काय ते शिपावडेबी आलं तर माझी सुटका होवून जाईल. कोण करील हे जंजाळाचं काम बरं आहे माझं जंगलराखण जिथे जाव तिथे पायर खावं, या चिड्याला मार, त्या चिड्याला मार, करत कजेत फिराव."[2] या पध्दतीने मराठी भाषेशी नातं सांगणारी मावची भिल्लांची बोली निदर्शनास येते. भिलोरी बोलीतील शिव्याही नजुबाईंनी स्पष्टपणे लेखनात आणल्या आहेत.

बाबाराव मडावी विदर्भातील परधानी बोलीचा वापर आत्मकथन लेखनातून करतात. लेखक आईला सहलीसाठी चांगल्या जेवणाचा डबा देण्यासाठी म्हणतो, "माँ, पोरं शायेतून उद्या सहल काढणारे हायीत.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

सारे पोरं चांगले डब्बे घेवून येणार हायीत. मले बी चांगला डब्बा दे वो."[3] आई उपाशी राहून मुलांना खायला देते. यावर बाबाराव आईला म्हणतात, "पण मा तू उपाशी रा२शीन त मीनं काही कमावलं का? तूवा शिकोलं, मोठं केलं, पण शिक्षण नोकरी देवू शकत नायी."[4] या रीतीने बाबाराव मडावी परधानी बोलीतून आत्मानुभव व्यक्त करतात. ह्याा बोलीतील सहजता, साधेपणा वाचकाच्या लक्षात येतो. श्री. किसन डगळे यांनी प्रमाण मराठी भाषेतून आत्मकथन लिहिले आहे. नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी आदिवासींची स्थिती प्रस्थापितांच्या सान्निध्यांमुळे बदललेली दिसते. त्यामुळे येथील आदिवासींच्या वागण्या बोलण्यावर त्याचा परिणाम होतो. प्रमाण मराठीतून आत्मानुभवांना श्री. किसन डगळे शब्दबध्द करतात.

'उघडा दरवाजा' हे रामराजे आत्रामांनी प्रमाण भाषेत लिहिलेले आत्मकथन आहे. शिक्षण घेवून नोकरी करणारा लेखक अनुभवांना प्रमाण भाषेतून व्यक्त करतो. संदर्भान्वये काही ठिकाणी कानडी शब्दप्रयोग वापरताना दिसतात. 'सुमकूड' म्हणजे शांत बस, 'नडी' म्हणजे चल, 'कूड' म्हणजे बस, 'वेळ' म्हणजे उठ, 'उट्टामाड' म्हणजे जेवण कर, 'बक्की हाकू' म्हणजे कपडे घाल. या पध्दतीने लेखक शब्दांचा वापर करतो.

आपल्या बोलीतील गाणे गुणगुणण्याचा प्रसंग लेखक वर्णितो, "ईताल बाताल निकून छंद लागता, ईमे के ज्या बाई मिरा ई ताल बाताल निकून छंद लागता."[5] असे गाणे गुणगुण्याचे लेखक सांगतात. तर आत्मानुभवांसंबंधी प्रसंग पटवून देताना प्रमाण भाषेतील वाक्यरचना योजतात, "दुष्काळात माणूस काय बी खातंय अन् संकटात कायबी करतंय."[6] लेखनातील भाषा रामराजेना जवळची वाटते. यामुळे 'उघडा दरवाजा' आत्मकथनाची रचना वाचनीय झाली आहे.

अस्सल भिल्ल बोलीचे चित्रण 'मी एक स्वप्न पाहिलं!' या आत्मकथनातून पहायला मिळते. डॉ. राजेंद्र भारूड यांनी आपल्या बोलीत काही प्रसंग सांगितले आहेत. उदा. "तू आते घरमाच थांबत जाय. घरमाच दारू इकत जाय आन् घरनंच काम करत जाय. घर राहीसन राजुवर बी ध्यान ठेवशी आणि दारूना 20–30 रूपल्ला बी भेटतीन ह्या पैसा बी तुना जोयंच ठेव. मी बी कामले जासच, तवंय घर मना मजुरीना चालवसूत."[7] याप्रकारे आपल्या बोलीतून लेखकाने प्रसंगवर्णन केले आहे. बहुधा लेखकाने प्रमाण मराठीतून अनुभवकथन केले आहेत. बराचसा भाग प्रमाण मराठीमध्ये शब्दबध्द केला आहे.

आदिवासी चरित्र वाङ्मयामध्ये बहुतांशी लेखन प्रमाण मराठीतून झाले आहे. उदा. डॉ. गोविंद गारे, डॉ. विनायक तुमराम, डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. पुष्पा गावीत, बाबा भांड, विलास वाघ, प्रा. गौतम निकम, शुभा साठे, अ. ज. राजूरकर या सर्वांचे चरित्र लेखन प्रमाण मराठी भाषेतून झाले आहे. काही प्रसंग वर्णन करताना चरित्रकांनी नायकांचे व्यक्तिमत्व लिहिताना संबंधीत जमातींच्या बोलींचा वापर केलेला आहे. नाग्या महादू कातकरी संबंधीचे चित्रण रेखाटण्यात चरित्रकार यशस्वी झाले आहेत. नाग्याची बहीण ठकी हिची वेदना सांगताना, "आजा आकादेईला सत्याग्रह आहा न? रामीबाय मना आखरह, रान आपलं आहा अनं आपनालाच चोरी? काय न्याय आहा का अन्याय?"[8] या पध्दतीने कातकरी बोली प्रमाण भाषेच्या हाता हात घालून येताना दिसते आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

बाबा भांड यांनी 'जननायक तंट्या भिल्ल' ह्या चरित्रातून प्रमाण भाषेबरोबर समाजातील बोलीचे संदर्भ वापरले आहेत. उदा. "चला साहेब, निगू अपून."[9] किंवा "म्याच हाय तंट्या, पकडा मले."[10] अशा प्रकारे तत्कालीन बोलीचे संदर्भ चरित्रकार देतात. असे असले तरीही चरित्रलेखनासाठी प्रामुख्याने प्रमाणभाषेचाच वापर बाबा भांड यांनी केला आहे. वरील उदाहरणांवरून बोली प्रमाणभाषेच्या जवळ जाणारी असल्याचे दिसते.

डॉ. पुष्पा गावीतांनी 'आपश्री गुलाम महाराजांचे चरित्र' या चरित्र ग्रंथामध्ये भिलोरी बोलीतील शब्दांसंबंधी लेखन केलेले दिसते. लेखिका म्हणते, "आपचा येथे वापर झालेला नाही भिल्ल ;भिल्लोरी दृ "चवामद इल ठीपरासद्ध भाषेत आप, आपो हा शब्द आपला ;व्तेद्ध या अर्थाने आहे. याच्या विरूध्द म्हणजे 'बिहरे' आपल्यापेक्षा वेगळे. दुसरे परके ;छवद त्तपइंसद्ध या अर्थाने येतो."[11] असे आप या शब्दा संबंधीचे भाष्य चित्रकार डॉ. पुष्पा गावीत सांगतात. भिल्ल समाजातील व्यक्तींची नावे परिसरातील गोष्टीशी संबंधीत ठेवली जातात. "जसे सोम्या, बुध्या, मोंगल्या, रडत्या, खातु, रेसा, मायल्या, रेवा, खापऱ्या, थोबल्या, गुल्या याप्रमाणे मुला–मुलींची नावे ठेवली जात."[12] या पध्दतीने भिल्ल समाजामध्ये भिलोरी बोलीचे महत्त्व लेखिका स्पष्ट करतात. समाजातील व्यक्तीची नावे विशिष्टपध्दतीचा बोध घडविणारी असतात हे लक्षात येते.

अशा रीतीने आदिवासी चरित्र वाङ्मयातील बोलीभाषेचे स्वरूप विचारात घेता येते. आदिवासींच्या चरित्रलेखनात प्रमाण भाषेला महत्व दिलेले दिसून येते. परंतु चरित्र नायक आदिवासी असल्याने संदर्भान्वये त्यांच्या बोलीचा वापर आवश्यतेनुसार येताना दिसतो. यातूनच त्या बोलीची समृध्दता लक्षात येते. कारण बोली समाजाचा सहजस्फूर्त आविष्कार असतात. यापध्दतीने आदिवासी चरित्रांतील बोलीभाषेचे महत्व सांगता येते.

संदर्भग्रंथ सूची

1. गावीत नजुबाई, आदोर, पृष्ठ क्र. 109
2. गावीत नजुबाई, आदोर, पृष्ठ क्र. 15
3. मडावी बाबाराव, आकांत, पृष्ठ क्र. 21
4. मडावी बाबाराव, आकांत, पृष्ठ क्र. 33
5. आत्राम रामराजे, उघडा दरवाजा, पृष्ठ क्र. 41
6. आत्राम रामराजे, उघडा दरवाजा, पृष्ठ क्र. 110
7. भारूड राजेंद्र, मी एक स्वप्न पाहिल, पृष्ठ क्र. 21
8. तुमराम विनायक, धरतीआबा जनचेतने विद्रोही रूप, पृष्ठ क्र. 164
9. भांड बाबा, जननायक तंट्या भिल्ल, पृष्ठ क्र. 63
10. भांड बाबा, जननायक तंट्या भिल्ल, पृष्ठ क्र. 63
11. गावीत पुष्पा, संत आपश्री गुलाम महाराजांचे चरित्र, पृष्ठ क्र. 20
12. गावीत पुष्पा, संत आपश्री गुलाम महाराजांचे चरित्र, पृष्ठ क्र. 22



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner


Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta
Prakashan

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | आदिवासी आत्मकथनांचे स्वरूप<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ५८-६२ |
| १३ | कमला मार्कंडेचे टू व्हर्जीन : स्री अनुभव आणि संवेदनशिलतेचा कलाविष्कार<br>**श्री. पवार अभिजीत नानासो** | ६३-६६ |
| १४ | दलित साहित्य : कविता<br>**संतोष पांडुरंग सुरडकर** | ६७-७० |
| १५ | आदिवासी साहित्य : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. शंकर वाघमारे** | ७१-७२ |
| १६ | अनुराधा पाटील यांच्या स्रीवादी काव्यधारा<br>**प्रा. जगदाळे किरण आगतराव** | ७३-७९ |
| १७ | दलित नाटक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**सोनाली लक्ष्मणराव इंगळे** | ८०-८२ |
| १८ | समकालीन साहित्य :एक परिवर्तनाची नांदी<br>**प्रा. मोहन नाथा सौंदर्य** | ८३-८५ |
| १९ | स्रीवादी साहित्य<br>**सविता बालासाहेब कदम** | ८६-८९ |
| २० | दलित साहित्य : कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथा, वैचारिक लेखन<br>**सुर्यवंशी बाळासाहेब मधुकरराव** | ९०-९३ |
| २१ | आदिवासी साहित्य : कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथा व वैचारिक लेखन<br>**विना रमेश गुलदेवकर** | ९४-९९ |
| २२ | आदिवासी साहित्य आणि कथा वाङ्मय<br>**प्रा. डॉ. विजय पाटील** | १००-१०२ |
| २३ | मराठी वाङमय प्रवाह आणि ग्रामीण काव्य प्रवाहाची सद्य:स्थिती<br>**प्रा. डॉ. आनंद सारके** | १०३-१०८ |
| २४ | अरुण काळे यांची कविता (विशेष संदर्भ : 'रॉकगार्डन')<br>**डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे** | १०९-११५ |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १२. आदिवासी आत्मकथनांचे स्वरूप

**डॉ. विठ्ठल केदारी**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

1980 नंतर मराठी वाङ्मयामध्ये आदिवासी साहित्य प्रवाह सुरू झाला. आदिवासी साहित्यातून लेखकांनी स्वतःच्या अनुभवांचे चित्रण केलेले आहे. आपल्याला समाजामध्ये जे जीवन जगावे लागते. त्यासंबंधीची मांडणी या लेखकांनी निर्भिडपणे आहे. आदिवासी लेखकांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक या वाङ्मयांद्वारे प्रकारापेक्षा लेखनांची सकस परंपरा निर्माण केलेली आहे. त्यांनी आपले अनुभव साहित्यातून मांडताना कोणत्याही प्रकारचा आडपडदा ठेवलेला नाही. एकुणच प्रस्थापित व्यवस्थेत स्वतःचा चेहरा जसा आहे तसाच लेखनातून रेखाटतात.

आदिवासी साहित्यामध्ये स्वकथनपर लेखनाच्या अनुषंगाने झालेले लेखन अल्प स्वरूपाचे आहे. परंतु त्या साहित्यामध्ये समाजव्यवस्था आणि आदिवासी माणसासंबंधीची मानसिकता दर्शविणारा आहे. त्यातून प्रस्थापित व्यवस्थेत आदिवासी आणि त्यांची जीवन जगण्याची पद्धती याबद्दल प्रस्थापितांमध्ये असलेल्या न्यूनगंडासंबंधीचीही जाणीव करून देत आहे. आदिवासी म्हणजे संस्कृतीहीन, पशुवृत्तीचे किंवा सद्यःस्थितीतील साहित्य व्यवहारामध्ये आदिवासी केवळ मनोरंजनाकरीता वापरायाचे साधन ह्या स्वरूपाची भूमिका पहावयास मिळते. माणूस म्हणून प्रस्थापित साहित्य व्यवहारामध्ये आदिवासीसंबंधी चित्रण झाले असे सहसा घडलेले दिसत नाही. भारतीय समाजव्यवस्थेतील प्रत्येक समाजामध्ये आदिवासीविषयी गैरसमज पसरलेले आहेत. ते त्या विचारांतून त्यांकडे पाहतात. व्यवस्थेतील प्रत्येक घटक त्यांच्याकडे विद्रुपतेच्या दृष्टितून पाहतो. अशा या संभ्रमावस्थेतील आदिवासींविषयी जाणीव संकुचित असल्याचे दिसते. त्यामुळे आदिवासींना या घटकांनी कधीही माणूस म्हणून स्विकारले नव्हते. प्रस्थापित साहित्य व्यवहाराने आदिवासींसंबंधी केलेले चित्रण हे निर्हेतुक स्वरूपाचेही नसल्याचे दिसते. त्यामुळे या प्रकारच्या साहित्यातून आदिवासींचे चित्रण एका विशिष्ट भूमिकेतून झालेले आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आदिवासी समाजातील युवक शिक्षण घेऊ लागले. शिक्षणासंबंधी त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण होवून स्वानुभवांचे चित्रण नवोदित शिक्षित आदिवासी साहित्यातून करू लागले. सादारणपणे आदिवासी साहित्यामध्ये प्रथमतः नजुबाई गावीत यांचे आदोर हे पहिले स्वकथन निर्माण झाले. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बोढरीपाडा येथील नजुबाईंनी आदोर मधून भिल्ल मावची या आदिवासी समाजाचे जीवन चित्रण केलेले आहे. येथील पुरूषांचे चित्रण करताना त्या म्हणतात की, "त्या काळात आदिवासी पुरूष लंगोटी लावत. अंगात खादीची कोपरी वा कुडतं. असलं तर असलं."[1] अशा पध्दतीने भिल्ली पुरूषांचे चित्र नजुबाई रेखाटतात. आदिवासी माणूस जंगलाच्या आश्रयाने राहूनच जीवन जगतो. जीवनामध्ये झालेले बदलही त्याला माहित नाहीत. व्यवस्थेच्या खूप दूर असणारा आदिवासी स्वान्तंसुखाय जीवनात रमलेला दिसतो. निसर्गातील उपलब्ध औषधीवरच तो आजारही बरे करताना दिसतो. जखमेवर लावण्यासाठी सोबत तंभाकू ठेवलेली पाहिल्यावर कमरेत लात घालणारा सरकारचा प्रतिनिधी शिपाई आदिवासींचे शोषण करतो परंतु आदिवासी पुरूषाने दिलेले उत्तर त्याची व्यथा दर्शविते, "दादा



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

माझ्या पायाला त्रास होतो माशा चावतात, म्हणून मी तंभाकू ओली करून पायाला बांधतो."[2] या उत्तरावर शिपायाला खात्री पटते. अशा विविध प्रसंगी एकीकडे सरकार तर दुसरीकडे समाजव्यवस्था ह्या दोन्ही घटकांकडून आदिवासींना शोषणाला बळी पडावे लागते. आदिवासींकडे चोराला काही मिळणार नाही तरीही चोरांनी केलेल्या मारहाणीत शिपटीचा मृत्यू होतो. त्यावेळी तेथे अंत्यविधी करीता एकत्र आलेले लोक म्हणतात की, "उंगे रा र सगळे माणसं! मला एक गोष्ट सांगायची आहे. बाहेरच्या कोणाच्याही माणसाने इचारलं तर आजारी होती अस सांगा. चोरांनी झोडून मारलं असं सांगू नका. चला यायीस फत्या उचला!"[3] अशा पध्दतीने खरे कारण लपवून खोटे कारण समोर आणणारे आदिवासी येथे व्यवस्थेला शरण गेलेले पहावयास मिळतात. कारण त्यांच्या मनामध्ये समाजव्यवस्थेविषयीची प्रचंड भीती असल्याचेही लक्षात येते. 'आदोर'च्या मनोगतामध्ये लेखिका नजुबाई म्हणतात की, "ह्यातलं आशा हे पात्र माझं प्रतिनिधीत्व करते असे लेखिका म्हणतात." नजुबाई 'आदोर'मधून भिल्ल समाजाची जीवनपध्दती, त्यांना पोटासाठी करावा लागणारा संघर्ष यांचे चित्रण हुबेहुबपणे रेखाटतात. जीवन जगत असताना समाजाबद्दलची भितीही त्यांच्यामध्ये आहे. अशा भोळ्या–भावड्या समाजाच्या अधिकार व हक्कांसाठी चळवळींच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या पुरोगामी विचारसणीच्या नजुबाई गावीत कार्यकर्त्यांच्या स्वरूपात आदोरमधून वाचकांसमोर येतात. परिवर्तनवादी चळवळीत अग्रभागी राहून आदिवासींना जंगलासंबंधी व त्याच्या अधिकारासंबंधी कार्य करणाऱ्या व वैचारिक अधिष्ठान असलेल्या एका महिलेचे स्वकथन वाचकांना प्रेरणा देते.

विदर्भातील आदिवासींची जीवनशैली, पध्दती वाचकांसमोर आणण्याचे कार्य बाबाराव मडावी 'आकांत' (2008) या स्वकथनातून करतात. चंद्रपूर जिल्ह्यातील 'परधान' या आदिवासींच्या जीवनसंघर्षाची व्यथा बाबाराव मडावी व्यक्त करतात. त्यांनी आपल्या बालपणापासून ते पदवीपर्यंतच्या शिक्षणापर्यंतचा प्रवास सांगताना कार्यकर्त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचाही वृत्तांत अधोरेखित केला आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर समाजाकरीता चळवळीतून कार्य करणारा कार्यकर्ता आयुष्यभर लढताना दिसतो. परधान हा समाज ज्या पध्दतीने जगतो. त्याचे चित्रण बाबाराव मडावी करतात, "माझं हे पुस्तक केवळ माझ नसून कष्ट उपसणाऱ्या जीवनाचं पान आहे. ह्या पुस्तकाच्या निमित्तान मला खूप–खूप रडता आलं रडतानाच त्यांच्यासाठी आक्रोश करता आला. खरच मी सर्व सामान्यांतला एक आहे. हा भाकरीचा लढा आपणाकडे सोपवावयाचा आहे."[4] लहानपणीच वडिलांचे कृपाछत्र हरविलेले बाबाराव आईच्या मायेखाली वाढले. परंतु सततच्या आईच्या आजरपणामुळे लहान भाऊ माधव व आई यांची जबाबदारी लेखकावर आली. अशा अवस्थेत लेखकाचे शिक्षणही मित्रांच्या मदतीने सुरू होते. वेळप्रसंगी मित्रांकडूनच लेखकाला पुस्तकांचीही गरज भागवयाला लागत होती. पोटासाठी हवे असणारे अन्न हे स्वाभिमानाने मिळविले पाहिजे. त्याच्यासाठी कोणापुढे हात पसरता कामा नये अशी जिद्द मनाशी ठेवून वर्तन करणारा लेखक दिसतो. लेखक "खंती खोदण्याच्या" कामासाठी जात आहे. त्या कामातून आलेल्या पैशातून आईचा दवाखाना, स्वतःबरोबर भावाचे शिक्षण व घर चालवावे लागत असे. अशा घरच्या परिस्थितीत लेखकावर झालेले संस्कार त्याला आयुष्यात पुढे जाण्यासाठी महत्वाचे ठरले असेच म्हणता येते. आदिवासी महिला पोटासाठी पहाटे उठून रानात जातात. सरपण घेवून सकाळा नऊ–दहा वाजेपर्यंत घरी येत. वस्तीवरची सर्व लहान मुल घरांबाहेर आपल्या आईची वाट पहात बसतात. पोटासाठीचा संघर्ष मन हेलावून टाकतो. समाजामध्ये काही लोक, मित्र लेखकाला मदत करणारे मिळाले. काही विशिष्ट अनुभव देणारे



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ठरले. लेखक ज्यावेळी मित्रांसमवेत मळ्यांत जातो. येताना मित्राच्या आग्रहास्तव खिशात वांगी घेतो. परंतु परतत असताना मित्राचा काका समोरून येतो. हा मित्र परधानाचा हे सांगितल्यावर काका लेखकाला चोर ठरवितात. त्यांच्याकडीलची वांगी घेतात. त्याचा कान पिरगाळतात. असा अनुभव महेंद्र नावाच्या मित्राच्या काकांकडून लेखकाला येतो. व्यवस्थेत जीवन जगताना अपमानाचेही प्रसंग आले. तेही प्रसंग बाबाराव मडावी यांनी न लाजता स्पष्टपणे व्यक्त केले आहेत. प्रस्थापित व्यवस्थेकडून आदिवासींना होणारा त्रास हा नित्याचाच आहे. असेही ह्यावरून लक्षात येते.

लहानपणापासून विविध स्वरूपाच्या अनुभवातून तावून–सुलाखून तयार झालेले बाबारावांचे व्यक्तिमत्व वाचकाला कार्यकत्याचे दर्शन घडविते. अन्यायाविषयी चिड असणारे बाबाराव लक्षात येतात. समाजाच्या उन्नतीकरीता प्रामाणिकपणे कार्य करणारा लेखक शेतमजूर, कष्टकरी यांसाठी कार्य करीत राहिलेला दिसतो. वंचिताचा, शोषितांचा विकास हे ध्येय ठेवून बाबाराव मडावी पूर्ण महाराष्ट्रभर कार्य करत फिरले. त्या कार्यकालात त्यांनी आदिवासींचे जे चित्र पहिले. त्याचे चित्रण बाबारावांनी 'आकांत'मधून केले आहे.

किसन दामोदर डगळे यांनी 'ठिगळ' (2008) हे स्वकथन लिहिले आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील सोनांबे ह्या गावातील महादेव कोळी समाजाची जीवनपध्दती त्यांनी यामाध्यमातून व्यक्त केली आहे. नाशिक मधील आदिवासी माणसांचा चेहरा त्यांनी उभा केला आहे. एकत्र कुटुंब पध्दतीत लेखकाचा जन्म व त्यात घडलेले बालपण पहावयास मिळते. आदिवासी वस्तीवर लहाणपणीचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करत तालुक्यापर्यंत जावून बारावीपर्यंतचे शिक्षण लेखकाने पूर्ण केले. पदवीचे शिक्षण मित्रांच्या सहकार्याने पूर्ण केले व नोकरी लागल्यावर एम.ए. चे शिक्षण जिद्दीने पूर्ण करणारा लेखकाचा प्रवास पहावयास मिळतो. लहानपणापासूनच कुटुंबात विविधि कामे करावी लागलेला किसन श्रमाच्या कातातही पुढे होता. सुरूवातीची नोकरी रेल्वेत खलाशी रूपाने स्वीकारून नोकरी सूरू केली. ते करतच एम.पी.एस.सी. ची विक्रिकर अधिकारी गट–अ ची परीक्षा पास होवून ते पदही मिळविले व सद्या या पदावरून कार्य करणे सूरू आहे. अशा संघर्षमय युवकाचा प्रवास वाचकांना प्रेरणा देणारा ठरला आहे. हे सर्व करून लेखकाचे घराकडे लक्ष आहे लेखक म्हणतो, "मुंबईत नोकरी करीत असूनही गावाकडे, शेतीकडे त्याची असलेली ओढ, आपल्या आदिवासी बांधवासाठी तो करीत असलेले सामाजिक काम, समाजातील मुलांसाठी त्याला वाटणारी शिक्षणाची निकड या साऱ्यांचे दर्शन काही भागातून घडते. त्यातून लेखकांमध्ये असलेल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव कळते आणि सतत सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणाऱ्या आयुष्याची प्रगल्भ मनाचीही ओळख होते."[5] अशा पध्दतीने लेखक नोकरी लागल्यावर गावाला विसरत नाही गावातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी, त्यांच्या भविष्यासाठी कार्य करणारा लेखक निस्वार्थीपणे कार्य करतो आहे. कारण आपण जे भोगलो, अनुभवले ते आजच्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला येवू नये. ह्या भूमिकेने कार्य करणारा लेखक सत्कार समारंभ, बक्षीस वितरण समारंभ, वक्त्यांची भाषणे, व्याख्याने इ. कार्यक्रमाचे आयोजनही करतो. गावातील सर्वांना उपयुक्त ठरेल असे महादेव काळी मित्र मंडळाची ही स्थापना करतो. अशा पध्दतीने किसन डगळे यांनी आदिवासी समाजासाठी केलेल्या कार्याचा आढावा 'ठिगळ' स्वकथनाच्या निमित्ताने घेतलेला पहावयात मिळतो. आजच्या आधुनिकीकरणाच्या युगात समाजाची प्रगती व्हावयाची असेल तर त्याला विविध विषयाची माहिती होणे आवश्यक आहे. त्याला योग्य दिशा मिळाली तरच



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

हा विद्यार्थी विविध विषयांची माहिती घेईल. येणाऱ्या काळात टिकण्यासाठी मार्गकमण करेल अशी भूमिका ठेवून कार्य करणारा लेखक या स्वकथनातून पहावयास मिळतो.

गोंड समाजातील रामराजे आत्राम यांनी 'उघडा दरवाजा' या स्वकथनातून लातूर मधील गोंड आदिवासींचे विश्व वाचकांसमोर आणले आहे. गोंड या आदिवासी जमातीत जन्मलेल्या रामराजे आत्रामांनी अतिशय कठीण परिस्थितीतून आपले शिक्षण पूर्ण केले. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरता लातूर महानगरपालिकेत लिपिकाची नोकरी मिळविली. लेखकांच्या कैक पिढ्यांना अक्षरओळख नव्हती अशा या लेखकाच्याच पीढिने शिक्षण घेतले. अक्षर ओळख करवून घेतली. लेखक म्हणतो माझी ओळख फक्त जल, जंगल, जमीन व वनौषधी गोळा करणे ह्यातच होती. माझ्या पिढ्यांकडून मला हा प्राप्त झालेला वारसा होय. कुटुंबाचे आर्थिक दारिद्रय अशा अवस्थेत कसेबसे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर सरकारी व्यवस्थेतही आदिवासींची कशी उपेक्षा होते. या संबंधीचे चित्रणही रामराजे करतात, ते म्हणतात एकाच पातळीवर समाज हा विवेकसंपन्न व्हावा. अंधश्रध्देतून बाहेर पडावा यासाठी कायदे करायचे आणि दुसऱ्या पातळीवर सोयीसवलती देताना मात्र जुने पारंपरिक निकष लावायचे हे सर्व अन्यायकारक आहे."[6] अशा रितीने ज्यावेळी पत्नी हॉस्पिटलमध्ये मृत्यू पावते. त्यावेळी लोकांच्या संतापलेल्या अवस्थेला लेखकाने शांत करून मनात बाळगलेला संयमही महत्वपूर्ण पध्दतीने व्यक्त केला आहे. एकुणच प्रामाणिक, संयमी, शांत असे रामराजे आत्राम यांचे व्यक्तिमत्व वाचकांसमोर येते. आदिवासी माणूस फार प्रामाणिकपणे एखादे काम करतो. याचे उदाहरण त्यांनी नाईकवाडे या शेतकऱ्याकडील कामातून करून दिले आहे. आदिवासी तरूणांनी त्यांच्या शेतीतील दोन दिवसाचे काम एका दिवसात पूर्ण केल्याचे मोठ्या गौरवाने चौकात सांगितल्याचे पहावयास मिळते. पुढे 1972 ला इंदिरा सरकारने दुष्काळी कामे सूरू केली त्यात काम करणारे आदिवासी होते. तळे, रोड, पाझर तलाव अशा कामांत हळूहळू गुंड प्रवृतीची माणसे आली. अधिकारी वर्गातील लोकही खोटे कामगार दाखवून पैसे लुटायला लागले. या पध्दतीमुळे आदिवासी माणसं हळुहळु काम सोडून इतरत्र कामासाठी जावू लागला.

रामराजे आत्राम व्यक्तिगत जीवनातही सलोख्याचे संबंध जोपासताना दिसतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री. विलासराव देशमुख सत्कारासाठी लातूरला आले. त्या वेळेस साहेबांकडे पोलीस जावू देईनात त्यावेळी विलासरावांनी पोलिसांना त्यांना पाठविण्याचे सांगितले. त्यावेळेस मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख म्हणतात की, "माझा माणूस आहे. गरीब आदिवासी सच्चा कार्यकर्ता त्यांना त्रास देवू नका."[7] रामराजे आत्रामांचे व्यक्तित्व पूर्वीपासूनच धाडसी असलेले, बिनधास्त स्वरूपाचे होते. लातूरचे कलेक्टर महेंद्रकुमार शुल्का यांच्या संबंधीची आठवणही आत्राम सांगतात. त्यांची बदली मुंबईला झाली. त्यावेळी त्यांच्या सहकार्याबद्दलच्या ऋणाची पावती ही आत्राम स्पष्टपणे नमूद करतात. त्यांनी दिलेले सहकार्य, प्रेम सतत कार्य करण्यास प्रेरणा देत होते असे ते म्हणतात. त्या प्रेरणेनेच त्यांनी समाजाकरीता कार्य करण्याची सुरूवात केली असे दिसते. साहेबांनी तळागाळातल्या माणसांसाठीच कार्य करून, त्यांना सतत प्रोत्साहन देवून त्यांचे अधिकार, हक्क त्यांना प्राप्त करून देण्यासाठी निरपेक्षपणे कार्य करत राहिले. सर्व सामान्यांच्या हितासंबंधी कल्याणासंबंधी, वंचिताला विकास साधण्यासाठी ह्या गोष्टींची आवश्यकता होती असे लेखकाला मनोमन वाटत होते. समाजाच्या विकासासाठी धडपडणाऱ्या लेखकाच्या कार्याची प्रेरणा शुक्ला साहेब बनले होते. जंगलात, राना--वनांत राहणाऱ्या माणसांचे प्रतिनिधीत्व म्हणजे रामराजे आत्राम आहेत. जीवनातील प्रत्येक



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

संकटावर मात करत करत आत्रामांचा हा प्रवास आजपर्यंत सूरू असल्याचे लक्षात येते. माणसांसाठी कार्य करणारी आत्रामांची चळवळ अविरतपणे कार्य करत राहणारी आहे, असे लक्षात येते.

अशा पध्दतीने आदिवासी साहित्यामध्ये स्वकथन लेखनाची निर्मिती झालेली आहे. ही निर्मिती त्रोटक स्वरूपाची असली तरी ती माणसाच्या जगण्याची व जगण्यासाठीच्या संघर्षाची व्यथा मांडणारी आहे. आदिवासी माणसाच्या जगण्यासाठीचा संघर्ष वाचकांना वेगळ्या जीवनविश्वाची ओळख करून देतो आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील आदिवासींच्या संस्कृतीचेही दर्शन घडते. त्या त्या प्रदेशांतील आदिवासी समूहाचीही भाषा त्यातून त्यांचे स्वतःचे अस्तित्व सिध्द करते आहे. अनुभवांची मांडणी करताना मान–अपमान यासंबंधीचे केलेले चित्रण निर्लेपणाने येते आहे. त्यामुळे या स्वकथनांची वाचनियता रसिकांना प्रेरणा देते. एकूणच आदिवासी जीवनपध्दती, शैली, भाषा व जगण्याच्या कोलाहलातील संघर्ष ह्यांचे स्पष्टपणे चित्रण या स्वकथनांनी घडविले आहे. त्यामुळे ही आदिवासी साहित्यातील स्वकथने वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत.

**संदर्भग्रंथ सूची**

1. गावीत नजुबाई, 'आदोर', पृष्ठ क्र. 01.
2. तत्रैव, पृष्ठ क्र. 03.
3. तत्रैव, पृष्ठ क्र. 84.
4. मडावी बाबाराव, आकांत, पृष्ठ क्र. 04.
5. डगळे किसन, ठिगळ, प्रस्तावना.
6. आत्राम रामराजे, अघडा दरवाजा, पृष्ठ क्र. 09.
7. तत्रैव, पृष्ठ क्र. 297.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विषयार्तंगत राष्ट्रीय चर्चासत्र



# वैचारिक मराठी साहित्य :
## शोध, स्वरुप व अभिव्यक्ती

संपादक
डॉ.देविदास खोडेवाड

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

13) संत गाडगेबाबांची वैचारिकता
डॉ. विठ्ठल केदारी, अंबाजोगाई ||63

14) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शेती विषयक कार्य
प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी,जि.बीड ||66

15) मराठी वैचारिक साहित्यातील डॉ.आ.ह.साळुंखे यांचे योगदान
प्रा.डॉ.साहेबराव शिंदे ,नांदेड ||68

16) सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण
प्रा.डॉ.शंकर वाघमारे, नेकनूर ||70

17) ारिवर्तनवादी गो.ग. आगरकर
प्रा.उदार एन. एस., घाटनांदूर |72

18) प्रबोधनकार गोपाळ गणेश आगरकरांच्या साहित्यातील वैचारिकता
डॉ. बालाजी डिगोळे, नळेगाव ||74

19) संत तुकारामांच्या अभांगातील समाज प्रबोधन : एक चिंतन
प्रा.डॉ.कोतमे धिरजकुमार सत्येकाल, लातूर ||77

20) मराठी कादंबरीतील उच्च शिक्षित स्त्रीचे चित्रण
प्रा.केशव धोंडिबा टिपरसे,सांगली ||80

21) दुष्काळावरील निवंधाचा वास्तवदर्षी आणि वैचारिक दस्तऐवज
लक्ष्मण व्यंकट बिराजदार ||83

22) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार
डॉ.आर.बी.धायगुडे ||86

23) मुलगामी समाजपरिवर्तन चळवळीचे आद्य प्रवर्तक : महात्मा फुले
डॉ.अमजद हारुण अत्तार ||88

24) परीवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय
प्रा.भैरवी कावरे (मेश्राम),अमरावती. ||90

25) परिवर्तनवादी प्रबोधनकार - गोपाळ गणेश आगरकर
प्रा. डॉ. आवारे सी. एस.,बीड ||94



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com
Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

13

# संत गाडगेबाबांची वैचारिकता

**डॉ. विठ्ठल केदारी,**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

***********

संत वाङ्‌मयाची परंपरा मध्ययुगीन काळामध्ये निर्माण झाली. संत वाङ्‌मयाने स्वतंत्र विचारसरणी समाजाला दिली. तळागळातील वर्गाला सोबत घेवून वारकरी संप्रदायाने आदर्श निर्माण केला. समाजातल्या अठरा पगड जाती-धर्मांतील लोकांना एकत्र आणले. आपल्या भाव-भावना आणि दु:ख अभंगातून व्यक्त करण्याचे खुले द्वार निर्माण झाले. संत ज्ञानेश्वरांनी पाया घातलेल्या संत संप्रदायाच्या भागवत मंदिराचे कळस संत तुकाराम आणि संत गाडगेबाबा भागवत मंदिरावरील पताका ठरले. असे संत गाडेबाबांचे वारकरी संप्रदायातील योगदान आहे. हे संत गाडगेबाबांना त्यांच्या कार्यकर्तुत्वाने प्राप्त झाले आहे.

संत गाडगेबाबा हे एक महान संत होवून गेले. एका अद्‌भूत पुरूषाचे गुण संत गाडगेबाबांमध्ये होते. सदाचाराचा प्रसार आणि प्रचार करण्याचे व्रत हाती घेवून बाबांनी आयुष्यभर समाजाला सदाचरणाने जीवन जगण्याचे तत्त्व घालून दिले. साधी राहणी, बोलणं, वागणं, खाणंपिणं ह्याविषयी बाबांचे विचार आणि वर्तन अगदी साधेपणाचे होते. साधेपणातून व्यक्तीच्या वागण्यातील, बोलण्यातील तत्वनिष्ठता आणि विचारांशी बांधिलकिचे नाते जपून आयुष्यभर आपल्या तत्त्वांशी आणि विचारांना संत गाडगेबाबा प्रामाणिक राहिले. एकूणच सांधी राहणी उच्चविचारसरणीतून समाजाला नितीचे शिक्षण देणारे बाबा होते. जीवनातील वैफल्य, आत्मोवपम्यबुध्दी आणि अमोघ आचारनिष्ठेने जनतेची सेवा करून सर्वांगीण साफल्याचे पुरस्कर्ते संत गाडगेबाबा होते. समाजातील उच्च-निचता, विषमता, जातीयता, व्यसनाधीनता, हिंसाचार, दुराचार ह्यांना दूर करणे आणि समाजामध्ये बंधुता, समता व मानवी मूल्य रूजवण्याचे प्रयत्न संत गाडगे बाबांनी केले. संत गाडगेबाबा हे एक चालते-बोलते विचारपीठ, संस्कारपीठ, दीनदलितांचे कैवारी होते. बाबांच्या व्यक्तिमत्त्वात करूणा आणि कर्म या दोन प्रेरणा होत्या. त्यातूनच त्यांनी जीवन जगले. "जो घर फुंके अपना-चले हमारे साथ।।"१ संत कबीरांच्या या विचाराप्रमाणे संसारावर निखारा ठेवून लोकसेवेचे व्रत घेतले. जनतेचे उद्‌बोधन केले.

संत गाडगेबाबांनी जीवनातील कर्मकांडाचे उच्चाटन झाले पाहिजे. याविषयी कीर्तनातून प्रखरपणे टीका करीत. कर्मकांडांच्या पलीकडे जावून राग, द्वेषाचा स्पर्श होवू न देता आपले जीवन कार्य हीच परमेश्वराची सेवा होय. समाजातील बहुतांशी समाज व्यसनाधीनता, पशूबळी, कर्ज यात अडकला आहे. यापासून दूर राहिला पाहिजे. याकरीता बाबांनी जनतेला कीर्तनातून उपदेश केला. लोकांना निवारा मिळावा याकरीता बाबांनी धर्मशाळा बांधल्या बाबा म्हणत असत, "देऊळीचा देव मेला। अंतरीचा जागवा रे।।"२ संत गाडेबाबांच्या मनातील देव संकल्पनेविषयीचा असा प्रत्यय येतो. बाबा नेहमी सांगायचे, "बाप हो! देव तीर्थात नाही किंवा मूर्तीत नाही, तो तुमच्यासमोर दरिद्रीनारायणाच्या रूपाने प्रत्यक्ष उभा आहे. त्याचीच प्रेमाने सेवा करा भुकेलेल्यांना जेवण, तहानलेल्यांना पाणी, उघड्या नागरिकांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत करा बेकारांना आसरा, अंध, पंगू, रोगी यांना औषध द्या पशुपक्षी मुकेप्राणी यांची हिंसा करू नका. गरीब तरूण-तरूणींचे लग्न पैशाची मदत करून लावून द्या. जे दु:खी असतील, निराधार असतील त्यांना प्रेमाने जवळ करा. हाच आजचा रोकडा धर्म, हीच खरी भक्ती व देवपूजा आहे."३ कर्मकांडाविषयी संत गाडगेबाबांचे विचार परखड आणि स्पष्टपणाचे असत. कीर्तनातून समाजातील व्यंगावर, वैचित्र्यावर ते प्रहार करीत. समाजाला भूतदया, मानवी मूल्यांचे महत्त्व समजावून देतानाचा ह्या सर्व गोष्टी आहेत. त्या आपण कोणत्याही लालसेतून करू नयेत अशी शिकवण नेहमी देत.

संत गाडगेबाबांनी कर्मकांडाचा विरोध केला. देवाचा बाजार, वसुदेव पेला, मरी आई, जोखमारीचा गाडा, कडकलक्ष्मी, नंदी याविषयी बाबांनी स्पष्टपणे वास्तव समोर आणले आहे. ह्या सर्वांतून लोक पोट भरण्याचे व्यवसाय सुरू करत आहेत. या संप्रदायांतून निर्माण झालेली तत्त्वे बाजूला पडली. नियम बाजूला सोडून फसवणूक, लुबाडणूक करू लागले. याविषयी काही दंत कथाही निर्माण झाल्या. "हिंदू संस्कृतीत पूर्वीपासून प्रेषित, प्रेषके, प्रतिमा, तीर्थ यांना स्थान असल्यामुळे निर्गुण उपासनेपेक्षा सगुण उपासनेकडे माणसाचा कल आणि ओढा अधिक त्यातूनच मूर्तिपुजा निर्माण झाली. भारतीयांचा देवावरील गाढ विश्वास, श्रध्दा, भक्तिभाव, समत्व, बंधुभाव, आत्मभाव, आत्मसमर्पण करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती. दुसऱ्याच्या कथा कल्पना, विचार मनामध्ये सामावून घेण्याची मनोवृत्ती आणि त्याला रूजायला, जोपासण्याला लागणारी मनाची ओल आणि अंतर्गत



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

मशागत अनुकूल असल्याने श्रध्देबरोबर, अंधश्रध्दा, अंधविश्वास यांना फावले आहे."४ समाजातील श्रध्दा, अंधश्रध्दा, रूढी, प्रथा, परंपरा यांना समाजजीवनातून नष्ठ करणे सहज शक्य नव्हते. मात्र या कर्मकांडांना समजातून नष्ठ करणे गरजेचे होते. आपल्या कीर्तनातून समाजातल्या ढोंगी प्रवृत्ती, कर्मकांडांना संत गाडगेबाबा स्पष्टपणे खुलासा करत असत. कोणत्याही प्रकारच्या मानसन्मानाची अपेक्षा न ठेवणारा अवलीया म्हणजे संत गाडगेबाबा होते.

संत गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजसेवेचे व्रत हाती घेतले. समाजोपयोगी गोष्टी करताना गाडगे महाराज स्वतःच्या कुटुंबात त्याचा वैयक्तिक फायदा होवू नये यावर त्यांचा कटाक्ष असायचा. संत गाडगेबाबांनी बांधलेल्या धर्मशाळेमध्ये स्वतःची मुलगी राहते. याबेळी बाबातील पुढीलप्रमाणे खडे बोल सुनावतात, "अनंत कोटी नमस्कार. पत्रास कारण की तुम्ही धर्मशाळेत राहता व तेथेच जेवता असे कळले, हे बरोबर नाही. हा ट्रस्ट, हा पैसा जनता जनार्दनाचा. माझ्या कमाईचा नाही. तरी आपण तेथून लवकर बाहेर पडावे, म्हणजे बरे होईल."५ याबाबतीत संत गाडगेबाबांचे विचार कृतीशील होते. तत्वनिष्ठ बापाचे रूप कठोर व तेवढेच सालस असल्याचेही लक्षात येते. बाबांनी आयुष्यभर गोरगरीबांची, दीनदलितांची सेवा केली, भुकेलेल्याला अन्न द्या, तहानलेल्याला पाणी द्या, रोग्याला मदत करा याबाबत गाडगेबाबांना विशेष हेवा वाटे. त्याव्यक्तीमधील माणूस पहा, त्याचे माणूसपणा हे रून माणसातील माणूसकी जागविण्याचे कार्य करावे ही शिकवण गाडगेबाबांनी जनतेला दिली. "बापहो! हा महारोगी आहे, पन मानूसच आहे तुमच्या आमच्या सारखा याले बी जीव आहे. पन सर्वच पाहयतात आन पुढे निघून जात्यात. याले काही द्यायले तुम्हाले बुध्दी होत नाही काय? ही काय माणसातली माणूसकी व्हय काय? कोनाजवळ फाटकातुटका सदरा असींन् त् द्या थंडीत पडला आहे कुडकुडत!"६ आजारी, रोगी माणसाला माणुसपणाच्या भूमिकेतून वागविले पाहिजे. त्याला काहिसे बरे वाटेल, प्रेमाने, आपुलकीने कोणीतरी बोलते. माणुसपणाची जाणीव माणसाने कायम ठेवली पाहिजे. यासाठी संत गाडगेबाबा जनतेला आदर्श शिकवित असत. समाज शिक्षकाच्या भूमिकेतून संत गाडगेबाबा जनकल्याणासाठी कृतिशीलतेतून प्रयत्न करत. माणसाने माणसासारखे वागावे, राहावे यासाठी त्यांची धडपड होती. आपला आहार-विहार यासबंधीचे गाडगेबाबांचे स्पष्ट आणि परखड मत आहे. प्राणी मात्रांवर दया करावी, मांसाहार वर्ज्य करू नये. कोणत्याही जिवाला कधीही इजा पोहोचवू नये. ते नेहमी म्हणज, "मानसानं मानसासारख वागावं मानसासारखच अन्न खाव तुम्ही काय गिधाडं व्हा काय मासाचे तुकडे खाता!"७ माणसं ज्या बकऱ्याला सांभाळतात त्याच बकऱ्याला कापून खाता याविषयी बाबांचे मन उद्वेग होत असे. त्याविषयी कीर्तनातून बाबा लोकांच्या वृत्तीवर खरमरीट टीका करीत. मांसाहार न करणारा समाज आज प्रगतीत खूप पुढे गेला आहे. केवळ आचरण आणि आहार चांगला म्हणून मारवाडी, गुजराती, भाटे आणि ब्राह्मण ह्या वर्गातील लोक श्रीमंत आहेत. बहुजनांच्या घरात कोंबड्या आहेत. त्याविषयी बाबा समाजातील श्रीमंताबरोबर बहुजनांची तुलना करताना सांगायचे की, "मारवाड्याच्या घरात घरी कोंबड्या आहेत का? नाऽऽही! गुजराथीच्या घरात कोंबड्या आहेत का? नाऽऽही! भाटाच्या घरी कोंबड्या आहेत का? नाऽऽही! अरे मग तुमच्या घरात या कशा घुसल्या? साऱ्या घरात साल कोंबड्यांचा सुळसुळाट, को को कू कू कू, पाप आहे तुमच्या पोटात सकाळी डॉबरात पाणी ठेवता. दाणे टाकता आणि संध्याकाळी कापून खाता. कोण शास्त्र आहे दाखवा."८ यामुळे बहुजन समाजाची वाताहत का होत आहे. याविषयी बाबांचे विचार स्पष्ट होते. यासर्वातून बहुजन माणूस मुक्त झाल्याशिवाय त्याचा विकास होणार नाही हे वास्तव स्वीकारल्याशिवाय बहुजनांच्या जीवनात बदल होणार नाही ही भूमिका बाबांची कायम राहिली.

संत गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. समाजाचे निरीक्षण, अवलोकन करून शिक्षणापासून बहुजन समाज दूर आहे. याकरीता शिक्षणाचे फायदे आणि जीवनात होणारे बदल यांचे महत्त्व बाबा कीर्तनातून देत राहिले. माणसाच्या अधोगतीच्या मागे माणसामाणसांतील अज्ञान आहे. अज्ञान असल्याने जीवनात असत्य, भ्रम, अंधार, अधर्म आणि अधोगती आल्याचे लक्षण आहे. यागोष्टींसंबंधी संत गाडगेबाबांनी शिक्षणाशिवाय ज्ञान नाही ह्याविषयी माणसांमध्ये कीर्तनाच्या रूपाने जागृती करत राहिले. "विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी।। शिक्षण हे समाजप्रबोधनाचा महामेरू असून त्या दृष्टीतून शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. त्या विचारप्रवाहातून प्रचार आणि प्रसार आवश्यक आहे. म्हणून गाडगेबाबांनी आपल्या पारमार्थिक कार्यात शिक्षणाला अधिक महत्त्व दिले. शिक्षण हे समाजप्रबोधनाचा महामेरू आहे."९ एकूणच समाजाला योग्य दिशेने घेवून जाण्यासाठी शिक्षणासारखा मार्ग महत्त्वाचा ठरणार हे बाबांनी अभ्यासले व मुलांना शिक्षणापासून दूर ठेवू नका. शिक्षण घेण्यासाठी कमी किमतीचे कपडे वापर, जेवणाचे ताट मोडा. गरजा कमी करा परंतु मुलाबाळांना शिक्षण द्या हे संत गाडगेबाबा लोकांना सांगत होते.

सावकारांकडून लोकांचे शोषण होते. निरक्षरता, अविद्या, मतिहीन शूद्र अविद्येच्या अंधारात चाचपडत होते. दारिद्र्य, दुःख, नैराश्य आणि लाचारीने सावकारांकडे दयेचा हात पसरणारे अनेक होते. यांत अडकलेल्या, शोषणाला बळी ठरलेल्या सामान्य माणसाची



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

मुक्तता होणे गरजेचे आहे. याकरीता बाबांनी दिलेले विचार महत्त्वाचे आहे. आजच्या पिढीलाही संत गाडगेबाबांचा वैचारिक दृष्टिकोण तेवढाचा महत्त्वाचा आहे. समाजात आजही शिक्षणापासून दूर असणारा समाज आहे, सावकारी पाशाचा बळी ठरणारा समाज आहे. अविद्या आणि नैराश्याने ग्रासलेला माणूसही अवती-भोवती आहे. एकूणच गाडगेबाबांचे समाजविकासाबाबतची भूमिका वैचारिक अधिष्ठानातून निर्माण झालेली आहे. त्यामध्ये कर्मकांडे, धर्मभोळेपणा, रूढी, प्रथा, परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली होणाऱ्या व्रत, वैकल्य. विधी या सर्वांना बाबांनी नकार दर्शविला. समाजाला त्यामागील वास्तवता दाखवून दिली. समाजातील प्रत्येकाने सत्याने आचरण केले पाहिजे. दुसऱ्यावर परोपकार करून मानवी मूल्यांची जपणूक करून, कर्तव्य समजून जीवन जगावे. त्यांतून गरीबाला मदत होईल, भुकेलेल्याला अन्न मिळेल, तहानलेल्याला पाणी, वस्त्राहिनांना वस्त्र, बेघरांना घर, अंध-पंगू रोग्यांना औषध द्या, भूतदया करा, दुःखी नैराश्यग्रस्तांना आधार द्या. ह्या धर्म आचरणातून सर्वांना जीवन जगण्याचे बळ द्यावे ही शिकवण संत गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून आयुष्यभर देत राहिले.

गाडगेबाबांनी जीवनभर हातामध्ये झाडू ठेवून, गावे स्वच्छ करून स्वच्छतेचे मूल्य तळागाळापर्यंत पोहोचविले. ज्या गावात जायचे त्या गावातील स्वच्छता हातातल्या झाडूने करायची 'गोपाला गोपाला देवकिनंदन गोपाला' ह्या भजनाने कीर्तन आणि आपले विचार सामान्य माणसापर्यंत पोहोचविले ह्या प्रसिध्द भजनातून बाबा जनसमान्याच्या मनापर्यंत पोहोचले. संत गाडगेबाबांच्या स्वच्छता मूल्यातून महाराष्ट्र शासनाने स्वच्छतेचे अभियान राबविण्यास सुरूवात केलेली आहे आणि आज हाच विचार घेवून देशपातळीवर स्वच्छ भार अभियान सुरू झाले आहे.

संत गाडगेबाबांची लोकांकडून परोपकार, दानधर्म, परमार्थ करवून घेण्याची पध्दती वैशिष्ट्येपूर्ण होती. लक्ष्मीची अशाश्वता पटवून देवून ते जनतेला दानधर्म करण्यास सांगत. असा एक त्यागी, तपस्वी महापुरूष संत गाडगे महाराज म्हणजे 'अंगावरी चिंध्या हातात काठी वेग जसा काय वाऱ्याचा। की प्रकटला देव पृथ्वीवरी, घेऊनि वेश भिकाऱ्याचा।।'[१०] असे अद्वितीय व्यक्तिमत्व होते. त्यांचे कार्य आजही शाश्वत असून त्यांचे विचार आजच्या पीढीला मार्गदर्शक ठरणारे आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

१.सुमनबन्धु, 'श्री. संत गाडगेबाबा', अभिजित प्रकाशन, नागपूर, प्र.आ., ऑक्टोबर १९९२, दोन शब्द.

२.तत्रैव, 'श्री. संत गाडगेबाबा', दोन शब्द.

३.तत्रैव, 'श्री. संत गाडगेबाबा', दोन शब्द.

४.रसाळे, डॉ. उध्दव, 'श्री. संत गाडगेबाबा (चरित्र आणि विचारधन)', विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृष्ठ क्र. १२७.

५.ऊ.नि., 'श्री. संत गाडगेबाबा', दोन शब्द.

६.तत्रैव, 'श्री. संत गाडगेबाबा', पृष्ठ क्र. ०५.

७.तत्रैव, 'श्री. संत गाडगेबाबा', पृष्ठ क्र. ०२.

८.ऊ.नि., रसाळे, डॉ. उध्दव, 'श्री. संत गाडगेबाबा', पृष्ठ क्र. १६८.

९.ऊ.नि., रसाळे, डॉ. उध्दव, 'श्री. संत गाडगेबाबा', पृष्ठ क्र. १९५.

१०.ऊ.नि., सुमनबन्धु, 'संत गाडगेबाबा : जीवन अध्याय', पृष्ठ क्र. ३३.

❑❑❑



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal




PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 234

## समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणिवा

अतिथी संपादक
डॉ. अशोक पंडित
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद

कार्यकारी संपादक
डॉ. नरेंद्र मून
डॉ. ज्ञानेश्वर गवळीकार
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATIO

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 36 | समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्रीवादी भूमिका | मोनिका बागुल | 160 |
| 37 | समकालीन स्त्री जाणिवांचे साहित्यातील बदलते अंतरंग | प्रा. अनुप नांदगावकर | 163 |
| 38 | स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त झालेल्या स्त्री जाणिवा | डॉ. आर. आर. मेंढे | 166 |
| 39 | भारतीय स्त्रीमूल्य व्यवस्था: पारंपरिक आणि आधुनिक | डॉ. एकनाथ खरात | 170 |
| 40 | शांतता.. कोर्ट चालू आहे ! नाटकामधून अभिव्यक्त झालेला स्त्री-प्रश्न | डॉ. गणेश शिंदे | 177 |
| 41 | रा.रं. बोराडे यांच्या राजकीय कादंबरीतून चित्रित झालेली स्त्री जीवनजाणीव | डॉ. यशवंत हाके | 181 |
| 42 | रत्नाकर मतकरींच्या नाटकातील स्त्री-पुरुष नातेसंबंध | डॉ. ललित अधाने | 186 |
| 43 | समकालीन मराठी कादंबरी आणि स्त्रीजाणिवा | नेहा बनसोडे | 190 |
| 44 | भास्कर चंदनशिव यांच्या समकालीन कथेतील स्त्रीप्रतिमा | प्रा. सौ. एस. एस. कांबळे | 193 |
| 45 | स्त्रियांच्या ओवीगीतातील स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पना | डॉ. भा. ना. गाडेकर | 197 |
| 46 | संजीवनी तडेगांवकर यांच्या कथेतील स्त्रीजाणिवा | डॉ. राम रौनेकर | 205 |
| 47 | मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीव | डॉ. विठ्ठल केदारी | 208 |
| 48 | कदाचित अजुनहीमधील स्त्रीजाणिवा | डॉ. कैलास इंगळे | 212 |
| 49 | भास्कर चंदनशिव यांच्या समकालीन कथेतील स्त्रीप्रतिमा | डॉ. दिलीप जाधव | 216 |
| 50 | आठवणींच्या घरट्यातील वीण मांगल्य | प्रा. के. आर. बनसोडे | 220 |
| 51 | स्त्रीलिखित नाटकातील स्त्रीजाणिव | डॉ. शिवराज काचे | 222 |
| 52 | समकालीन समाज, स्त्री आणि मराठी साहित्य | राजाराम झोडगे | 226 |
| 53 | अनुराधा पाटील यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या स्त्री जाणिवा | डॉ. राखी सलगर | 229 |
| 54 | स्त्रीवादी साहित्य समीक्षा | डॉ. साहेबराव शिंदे | 233 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणीवा
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीव

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

मराठी साहित्यामध्ये स्त्रीयांची लेखनाची परंपरा फार पूर्वीपासून दिसून येते. जीवनामध्ये जे अनुभव घेतले त्यांचा आविष्कार कवितेतून करताना लेखकाला तृप्तता झाल्याचे वाटते. स्त्रीया आपले सुख दुःखे, आशा–आकांक्षा कविता या साहित्यप्रकारातून व्यक्त करतात. कविता या लेखन प्रकारातून स्त्रीया आपला आत्मा ओतून लेखन करतात. कारण कविता लेखन प्रकार स्त्रीला खूप जवळचा, आपुलकीचा, सखा, जिवलग असा आहे. प्रारंभी अगदी सहजपणे स्त्रीने दळताना जात्यावरील ओव्या स्वाभाविकपणे रचल्या. इतकेच नाही दैनंदिन जीवनातील अगदी कांडताना, झोपल्यावर झोके घेताना कविता हीच तिची सहचारिणी झालेली पहायला मिळते. परंपरागत पध्दतीने समाज व्यवस्थेत स्त्रीयांचे स्थान केवळ चूल व मूल यापुरते मर्यादित राहिले आहेत. पूर्णपरंपरा स्त्रीला स्वातंत्र्य नाकारताना दिसते. तिला कधीही मोकळेपणाने जीवन जगता येत नव्हते. तिला मोकळा श्वास घेता येत नव्हता. अशा वेळी स्त्रीयांनी शिक्षण घेणे, विचार करणे आणि मनातील भावभावना मोकळेपणाने लिहून शब्द बध्द करणे हे फार अवघड काम होते. सासर आणि माहेर या रेट्यात तिला राहावे लागत होते. तिला पदोपदी व्यथा, वेदना सहन कराव्या लागल्या. तिच्या वाट्याला जे आनंदाचे क्षण आले त्यावेळी तिने ते शब्दांकीत करून ठेवले आहेत. स्त्रियांची कविता लक्षवेधक, चित्रवेधक असून तिच्या भावस्थितीचे अचूकपणे दर्शन घडविते. रोजच्या दैनंदिन व्यवहारात अगदी मुंज, लग्न, बारसे, डोहाळे, नागपंचमी, गौरी–गणपती, नवरात्र या विविध प्रकारच्या सण उत्सवावेळी स्त्रीच्या स्त्रीसुलभ मनाचे दर्शन कवितांतून व्यक्त होताना दिसते. "प्राचीन मराठी कवितेची वाटचाल महानुभाव पंथ, नाथ पंथ, वारकरी पंथ इत्यादींचे तत्वज्ञान मांडण्याच्या हेतूने प्रामुख्याने झालेली आहे. या कवितेला दोन स्वर आहेत. एक स्वर स्वतःशी संवाद साधण्याचा व दुसरा स्वेतरांशी हितगुज करण्याचा, स्वेत्तरांशी संवाद करताना मराठी कवितेने अध्यात्म विवरून सांगितले, नीतिविचार मांडला आणि समाजातील दंभ, ढोंग, अन्याय, खुळ्या समजुती यांवर प्रहार केला. कविता जेंव्हा 'आपुला' आपुल्याशी संवाद करीत जन्माला येत होती तेंव्हा त्या कवितेला आगळे ऐश्वर्य लाभत होते. जीव जगत व ईश्वर यांच्यात परस्पर संबंध आहे काय हा जसा तिला प्रश्न पडला होता तसा 'मी कोण' या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची ही या कवितेला ओढ होती. प्राचीन मराठी कविता इहवादी नव्हती. तिने 'ईश्वर' हाच सर्व मानवी व्यवहाराचा केंद्रबिंदू आहे असे मानले होते."[1] अशी प्राचीन कविता निर्माण होवून तिचा विकास होताना स्त्रीयांच्या रचनाही विशेषत्वाने महत्वाची भूमिका बजावतात. ईश्वरी कृपेनेच सर्व चालते. ईश्वर या जगाचा नियता आहे. परमेश्वराच्या रूपाचा शोध घेण्यात मराठी कविता धन्यता मानत होती. एकूणच प्राचीन मराठी कविता ही विरक्तीची आहे. प्राचीन मराठी स्त्री कवयित्रीमध्ये महदंबा, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, प्रेमाबाई, बहिणाबाई, वेणाबाई या सर्वच कवयित्रींची कविता विरक्ती घेवूनच जन्मास आलेली आहे. या सर्व स्त्रीकवयित्रींनी आपला पंथीय विचारच कवितेतून व्यक्त केला. ह्या प्राचीन काळात कवितालेखन करणाऱ्या कवयित्रींची संख्या कमी आहे. मात्र ती वेगळी ठरणारी आहे. या सर्व कवयित्री परमार्थाच्या वाटेने प्रवास करून स्वतःच्या अनुभवविश्वाविषयी प्रामाणिक आहेत.

भारत स्वातंत्र्य झाल्यावर माणसांच्या मनात राजकीय आकांक्षा वाढल्या भारतीय लोकशाहीचा विचार अनेक घटकांपर्यंत पोहोचला. स्त्रीयांचाही जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. एक



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणीवा
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

माणूस एक मूल्य हा विचार सर्वदूर पोहोचला. स्वातंत्र्यानंतर स्त्रीयांची कविता आमूलाग्र बदलाकडे गेली. परंतु त्या प्रकारच्या लेखनाची सुरूवात इंग्रजांच्या आगमनाने झाली. इंग्रजी राजवटीबरोबर भारतात विज्ञाननिष्ठता, नवा धर्मविषयक दृष्टिकोन रूजू लागला. हळूहळू माणूस आणि निसर्ग, समाज, यांच्याशी संबंधीत विचार कवितेत येवू लागला. याकाळी पार्वतीबाई गोखले यांनी संकलित केलेला 'स्त्री गीतरत्नाकर' (1903), मनुबाई भोरकर 'फेराची गाणी' (1908), कृष्णाबाई गाडगीळ 'मानसंगीत सरोवर' (1913), गंगाबाई विजापूरकर 'सावित्रीचे गाणे' (1913), लक्ष्मीबाई वेहेरे 'सुमनमाळ' इ. कवितासंग्रह याकाळात प्रकाशित झाले. यासर्व स्त्रीयांच्या कवितेते व्रत–वैकल्यांनी, नवस सायासांनी, उपासतापासांनी, जुन्या जळमटांनी भरलेले चित्रण होते. महिलांच्या मनातील दुःखाची किनार अपवादात्मक परिस्थितीत शारदाबाई परांजपे 'व्यर्थ जन्म माझा बाई। मायबाप चिंता वाही। निशिदिनी।।' या पध्दतीने व्यक्त करताना दिसतात. मात्र यांच्या लेखनातून नवसंस्कृतीचे चित्रण हळूवारपणे उमटताना दिसायला लागले होते. "या कालखंडात लक्ष वेधून घेणारी कविता लक्ष्मीबाई टिळकांची, कुणी म्हणतात की जो दुःख भोगतो तो एकतर मूक होतो किंवा त्यांचे दुःख कवितेतून तरी पासरू लागते. लक्ष्मीबाईचा वयाच्या आठव्या वर्षी त्या काळच्या वहिवाटीप्रमाणे विवाह झाला. नारायण वामन टिकांसारख्या जातिवंत कवीची सहचरी म्हणून लक्ष्मीबाईच्या वाट्याला आले ते दारिद्र्य दुःख आणि आस्थिरता! चौदा पंधरा वर्षांच्या संसारानंतर इ.स. 1994 त टिळक खिस्ती होणार असे राजनंदगावी ज्याच्या त्याच्या तोंडी झाले, या बातमीने त्यांचे मन अस्वस्थ झाले. आपली अस्वस्थता गोचर करताना त्या लिहू लागल्या,

'म्हणे जातो सोडून नाथ माझा
अता कवणाला बाहू देवराजा
सांग कवणाचे धरू आता पाये'

कविता लिहिल्याबद्दल टिळक रागावतील असे वाटून त्यांनी कागद चोळामोळा करून टाकून दिला. या कालातील कवयित्रींचे कवितालेखन कुटुंब व पतीपासून दूर कसे राहिल अशा भूमिकेतून उघड होते. मात्र ना. वा. टिळकांच्या व्यक्तिमत्वाने पत्नीचे कविता लेखन पाहिले, त्यांना आवडले व त्यांनी पत्नीला कविता लेखन करण्यासाठी प्रेरणा दिली या रीतीने मराठी कविता वाट शोधत होती. आधुनिक काळात कवयित्री इंदिरा संताची कविता वेगळ्या विश्वातून प्रवास करताना दिसते. "इंदिराबाईंच्या कवितेत याला अपवाद आढळतो भाषा आणि अलंकार यांच्यात फक्त प्रमाणाचा (degree चा) फरक आहे, दोहोंचे कार्य एकच, हें बाईंच्या प्रतिमा विकेंद्रित कधीचं नसतात. एकात्म प्रत्ययाच्या सूत्राने त्यांना ग्रंथीत केलेले असते. त्यांना प्रतिमा वापरणे आवश्यक ठरते, कारण भाषेचे सामान्य रूप अपुरे पडल्यावर शब्द या Unit पेक्षा प्रतिमा हे अधिक विस्तृत आशय अभिप्रेत असणारे Unit अधिक समर्थपणे काव्यात्मतेच्या दिशेने मजल मारू शकते."[2] इंदिराबाईंची कविता वेगळ्या वळणाने पुढे जाताना नवा आशय आणि अभिव्यक्ती घडविते.

उदा. 'अर्ध्या रात्रीवरून उतरते
जाग उगीचच पापणीवरती
काळोखांतच, नजर ओढते
काळ्या रेषा
आडवी तिजला
कौलावरतीं। झिमझिमणाऱ्या
चांदण्यातला एकच तुकडा....'


Website – www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

इंदिरा संतांची कविता प्रतिमा–संबंध प्रस्थापनावर आधारलेली आहे. यामुळे इंदिरा संताची कविता वैविध्य राखताना दिसून येते. कवयित्री अनुराधा पाटील यांचे कविताविश्व विचारात घेण्यासारखे आहे. त्यांची कविता रसिकाने आस्वादताना प्रौंढ, समंजस आणि सुजाण नागरिकाचा प्रत्यय आल्याचा भास करून देते. मराठी कवितेतून स्त्री मनाची स्फंदने येतानाच घर, नवरा, मुले, आप्तसंबंधाचे चित्रण घडविते. अनुराधा पाटील यांची कविता वेगळी, चिंतनगर्भ, जिवनातल्या दुःखाला सामावून घेते. त्यांच कवितेत स्त्रीसुलभतेचे दर्शन घडते. स्त्रीला त्यांनी आदिशक्ती रूपाने साधलेला संवाद कवितेतून व्यक्त करतात. त्यांची कविता आदिशक्तीचा शोध घेते. ही आदिशक्ती पुढीलप्रमाणे कवितेतून व्यक्त होताना दिसते.

"पुन्हा पाहावी कशाला आदिशक्तीची प्रतीती, जर निघालो प्रवासा,

नको कुणीही सांगाती."[3] अशा प्रकारे कवीचे मन कवितेतून व्यक्त होताना दिसते. स्त्रीयांच्या कवितेतील आदिशक्ती प्रतिमा या पध्दतीने कवितेतून आविष्कृत होताना दिसते. साठोत्तरी कालखंडामध्ये विविध साहित्यप्रवाहांतील स्त्रीयांच्या कविता लेखनातून विविध प्रकारे प्रतिमा येताना दिसतात. त्यांना सांस्कृतिक संदर्भ आहे. त्या समाजजीवनाच्या संदर्भाने कवितेतून येताना मूल्यात्मकतेचे दर्शन घडवितात. अनुराधा पाटील यांची कविता आतड्याचे दोर वळन बांधलेल्या कनाती, प्राणातच अंकुरणारे जिवंत हिरवे रान, अरण्य अंधारालाच बहाल केलेले माहेर, सनातन इंद्रजाळ, यांसारख्या प्रतिमांतून अनुराधा पाटील यांची कविता वाचकांसमोर येते. "आर्त, मनस्वी भावविश्व प्रकट करताना येणारी प्रतिमासृष्टीही वेगळी आहे. 'शोधावा आपणच आपल्यासाठी एक स्वतंत्र रस्ता' अशी या कवितेची धारणा असल्यामुळे प्रतिमासृष्टीही वेगळी येते. 'तान्ह्या बाळाच्या श्वासासारखा ताजेपणाही या प्रतिमासृष्टीला आहे. विशेष म्हणजे युध्द क्षेत्रातल्या प्रतिमांनी एक वेगळेच भावविश्व साकारून जाते. उदा. कायम तहाची पांढरी निशान यासारखी प्रतिमा आपल्या वेगळेपणामुळे लक्षात भरतेच, पण कवितेलाही अर्थपूर्ण करताना दिसते."[4] शब्दकळेचे वेगळेपण घेवून वाचकांना नवा आशय देणारी कविता निश्चितच कविता वाङ्मयाला वेगळे परिमाण देणारी ठरते. जीवनानुभवांचे वेगळेपण घेवून प्रतिमा अधिक प्रत्ययकारी होतात.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीयांना मानसिक गुलामीच्या बंदिवासात टाकले. मुख्यता स्त्री जर परिवर्तनवादी असली तर समाज परिवर्तनवादी होवू शकतो. आधुनिक काळात समाजव्यवस्थेत, कुटुंब व्यवस्थेत स्त्री ही संस्कारशाळा आहे. आजच्या काळात जो स्त्रीवाद साकार झाला आहे. त्याची बीजे मुख्यता म. फुले, सावित्रीबाई फुले, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात स्त्रीवाद साकार झाला आहे. प्रतिभा अहिरे यांची कविता आंबेडकरी स्त्रीवाद व्यक्त करते. कवयित्री प्रतिभा अहिरे म्हणतात–

"आपल्या भोंड्या हाता–हातात अशोकाची रोपं
रोमारोमात बाबासाहेब रूजलेला अन पायापायात सावित्रीचं बळ.."[5]

कवयित्री आपल्या उजोडाची माहेर घराची नोंद इथे केलेली आहे. या काव्यपंक्तीतून कवयित्रीच्या मनात उफळणाऱ्या स्त्रीवादी भूमिकेचा प्रत्यय विद्रोहीपणाने व्यक्त होताना लक्षात येतो. यांची कविता प्रखर स्त्रीवादाचा पुरस्कार करताना दिसते.

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेतील स्त्रीयांची कविता कवितेच्या मूळ प्रवाहापासून दूर राहताना दिसते. शांता शेळके यांची कविता आत्मलीनतेबरोबरच चिंतन शीलतेचेही दर्शन घडविते. उदा. 'देहाचीच त्वचा जुनी गाळुनिया येते नवी पालवी....' अशी वेगळे रूप घेवून येते. याबरोबरच पद्मा



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणीवा
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

गोळे, अंजली ठकार, प्रभा गणोरकर, निरजा, उषाकिरण आत्राम इ. कवयित्रींचे लेखन स्त्रीवादी म्हणून विचारात घेता येते.

मुख्यतः परंपरागत पध्दतीने स्त्रीचे जगने प्रमाण मानून तिच्याकडे बाईपणाच्या भूमिकेविषयी नकार देवून स्त्रीला व्यक्ती म्हणून स्वीकारण्याची भूमिका स्त्रीवादी लेखन घेते. स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रीलेखिका स्वत्वाची जाणीव व्यक्त करतात. आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ कळणे, तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे तसेच तिच्या माणूसपणाविषयी आत्मियता वाटणे. स्त्रीला तिचे हक्क व अधिकार मिळावेत. तिला तिच्या अवनतेची, अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होवून त्याविषयी स्त्रीया लेखन करू लागल्या आहेत. थोडक्यात स्त्रीच्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे म्हणजे स्त्रीवाद होय. एकूणच स्त्रीने बाईपाची कात टाकून माणूसपणाचे नवे रूप स्वीकारणे म्हणजे स्त्रीवाद आहे. यामुळे यालेखनातून स्त्रीयांच्या इतिहासात एक नवा आशय, विचार, दृष्टी, स्वप्न, दिशा या भूमिकेतून स्त्रीया व्यक्त झाल्याने संपूर्ण विश्वाचा चेहरा मोहरा बदलू लागला आहे. याची जाणीव प्रकर्षाने कवितेतून व्यक्त होताना दिसते आहे.

संदर्भग्रंथ सूची :–

1. फडके भालचंद्र, मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, पृष्ठ क्र. 99.
2. चित्रे दि.पु., साहित्य आणि अस्तित्वभान, पृष्ठ क्र. 43.
3. नागनाथ कोत्तापल्ले, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, पृष्ठ क्र. 187.
4. नागनाथ कोत्तापल्ले, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, पृष्ठ क्र. 192.
5. सोनकांबळे के.जी., मराठी दलित कविता – आशये आणि अभिव्यक्ती, पृष्ठ क्र. 290

RESEARCHJOURNEY





Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal


**शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

यांच्या संयुक्त विद्यमाने

## ‘‘राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान’’ या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

36) शाहु, फुले, आंबेडकर यांचे समाजिक विचार
प्रा. डॉ. कांबळे बी. व्ही., लातूर ||117

37) म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : साम्यभेद
डॉ. विठ्ठल केदारी, अंबाजोगाई ||120

38) राजर्षी शाहू एक दूरदृष्टी शिक्षण तज्ञ
डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, जालना ||123

39) राजर्षी शाहु महाराज आणि स्त्री मुक्ती कायदे
प्रा. राजगुरु गौतम धनाजी, अहमदनगर ||127

40) शाहु, फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
बर्डे भागवत, अरविंद मिसाळ, औरंगाबाद ||130

41) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
प्रा डॉ. कार्तिक पोळ, तुळजापूर ||133

42) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
सदाफुले डी. एल., बीड ||135

43) राजर्षी शाहू छत्रपती यांचे सामाजिक विचार
प्रा.डॉ. अनिल हजारे, बीड ||138

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिअंतासंबंधी विचार
श्री. समाधान विठ्ठल लोंढे, बार्शी ||140

45) शाहु, फुले, आंबेडकर यांचे राजकीय विचार
डॉ. एच. भूमकर, बीड, औताडे लक्ष्मण, औरंगाबाद ||142

46) भारत के बुनियादी क्रांति के महापुरुष – महात्मा जोतीराव फुले
प्रा.डॉ. पुंजाराम भगोरे, औरंगाबाद ||145

47) राजर्षि शाहू महाराज और नारी सुरक्षा कानून
अमोल ज्ञानोबा लांडगे, लातूर ||148

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

37

# म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : साम्यभेद

डॉ. विठ्ठल केदारी
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

**********

कोणत्याही दोन महनीय व्यक्तींच्या जीवनाचा तुलनात्मक दृष्टीने विचार करणे अशक्यप्राय असते. किंबहुना तसा विचार करणे हेही धाडसाचे होवू शकते. कोणत्याही काळात जन्मास आलेल्या कर्तुत्ववान व्यक्तित्वांची घडण स्वतंत्रपणे होत असते. काल कोणताही असो. त्या व्यक्ती असामान्य ठरतात त्या केवळ त्यांच्या कार्यामुळे ह्या कार्याच्या रूपानेच त्यांतील साम्याची, कार्याची, विचारांची तुलना आपणास करता येवू शकते. म. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही व्यक्ती शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक कार्याच्या रूपाने भारतीय जनमानसात विशेष लोकप्रिय ठरल्या आहेत. या दोन्हीही व्यक्तींनी उभ्या केलेल्या संस्था, संघटना यांतून सुरू केलेले कार्य विविध कठीण परिस्थितीतून उभे राहिले. ते सुरू असताना कोणकोणत्या मर्यादा आल्या. त्यांतून कोणत्या रीतीने मार्ग काढला. या सर्व प्रवासात समाजातील घटकांची, मित्रांचे सहकार्य कसे लाभले. त्यांच्या विचारांना मानणारा, स्वीकारणारा वर्ग, मित्र परिवार, अनुयायी यांचे कार्य महत्वपूर्ण ठरले. अशा या हजारो शिष्यांना सोबत घेवून जाताना सर्व समान धारणेचे विचारांचे असतात असेही बहुधा घडत नसते. अशा परिस्थितीत या दोन्हीही व्यक्ती त्यांच्या काळातील कार्यकर्तुत्वामुळे महात्मततेला पोहोचतात. त्यातूनच त्यांचे त्या कालातील कालातीतत्व निर्माण होत असते.

महाराष्ट्राला समाजसुधारकांची थोर परंपरा लाभलेली आहे. या परंपरामध्ये म. फुले आणि डॉ. बााबसाहेब आंबेडकर यांचे विचार क्रांतिदर्शी आहेत. "म. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तिंचेही कार्य भिन्न–भिन्न काळात साकारले आहे. पण त्यांच्यामध्ये आढळणारी वैचारिक सुसूत्रता व प्रतिकूल अनुकूल एकात्मता विलक्षण आहे. त्यामुळे त्यांचा तुलनात्मक अभ्यास सर्व सामाजिक कार्याच्या गतिप्रगतीचा आढावा असतो. भारतीय समाजजीवनातील धार्मिक चढउतारांचा तो आलेख असतो. त्यांच्या राजकीय आशा आकांक्षांचा तो मानदंड असतो. त्यांच्या कृतिशील पुरूषत्वाचा तो पुरावा असतो आणि संबंध समाजाच्याच सांस्कृतिक शोधांची ती नांदी ठरू शकते."[१] म. फुले हे अव्वल इंग्रजी कालातील कार्यशील कर्तुत्ववान सुधारकी विचारांचे होते. इंग्रजी सत्ता भारतावर असताना भारतावरील एका विशिष्ट वर्गाची, वर्णियांची सत्ता नष्ठ होवू शकते. असा विचार म. फुले यांचा होता. तसे त्यांना नितांततेने वाटत होते. एकूणच इंग्रजी राजवट ही हिन्दुस्थानातील जनतेकरीता दैवी राजवट आहे. इंग्रजी सत्तेमुळे हिन्दुस्थानातील हजारो वर्षाची गुलामीची, शोषणाची व्यवस्था नष्ट होणार इंग्रजी माणसांमुळे हिन्दुस्थानात नवी परिवर्तनाची नांदी सुरू होवून नवी समाजव्यवस्था, समाजरचना अस्तित्वात येईल आणि ही समाजव्यवस्था माणसाला माणसासारखे जीवन जगण्यासाठी आदर्श विचारांची व्यवस्था असेल. यातूनच एका आदर्श समाजव्यवस्थेचा शुभारंभ होईल अशी आशा म. फुलेंना होती. भारतीय समाज अज्ञानात आहे. भारतीय समाजाला शिक्षण दिले पाहिजे. हिन्दुस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. प्राथमिक शिक्षण देण्यासाठी मुख्यत: कनिष्ठ वर्गातील शिक्षक नेमले पाहिजेत ही त्यांची आग्रही भूमिका होती. इंग्रजी सरकारला हंटर कमिशनला म. फुलेंनी शिक्षण व्यवस्थेविषयी, प्रक्रियेविषयी आपली भूमिका स्पष्टपणे सांगितली होती. म. फुलेंना शिक्षणाचा विचार तळापर्यंत पोहोचवायचा होता. मात्र शिक्षण हिन्दुस्थानातील वरिष्ठ वर्गातच राहाणे ही भूमिका ब्रिटिशांची होती. मुख्यत पाश्चात्य संस्कृती आणि शिक्षण पध्दती हिन्दुस्थानातील वरिष्ठ वर्गीयापर्यंत पोहोचली की त्याचे काम होणार होते. हिन्दुस्थानामध्ये जातीय उतरंड मोठ्या प्रमाणात आहे. ही रचना गुंतागुंतीची असून अस्पृश्य वर्गीयांना



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

शिक्षण दिले. तर अस्पृश्यांना सरकारी कार्यालयातून नोकर म्हणून नेमावे लागेल. परिणामी सरकारी कामात त्यांना स्थान मिळाल्याने हिंदू लोक चिडतील. सरकारला कारभार व्यवस्थितपणे करू द्यायचे नाहीत. ही भिती ब्रिटिशांना वाटत होती. त्यामुळे म. फुले यांनी सूचविलेल्या शिफारशींचा विचार हंटर कमिशनने कधीच केला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजातील हिंदूस्थानातील दलितांची शोषित वर्गाची अस्मिता होती. भारतातील अस्पृश्यांना राजकीय व मानवी हक्क मिळावेत म्हणून त्यांनी प्रयत्न केले. बाबासाहेबांच्या प्रत्येक कृतिमागे हा विचार दडलेला दिसतो. "ज्ञान हा मानवी जीवनाचा पाया आहे. अशी त्यांची धारणा आहे. दारिद्र्याच्या उदासीकरणाला त्यांचा विरोध होता. संत—महंतांना खाऊन त्यांचे खत करणारी ही माती मजेशीर आहे याचे त्यांना भान होते. म्हणून दलितोध्दार हे त्यांनी आपले जीवित कार्य ठरवले. बहुसंख्य दलितेतर सवर्ण व दलित यांच्या बाबतीतला त्यांचा उच्चवर्णियांचा अनुभव चांगला नव्हता. मूळ प्रश्न पाणी घालून पातळ करणे व घोळत चिधळत ठेवणे त्यांना मान्य नव्हते."[२] डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजातील तरूणांना 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा मूलमंत्र दिला. केवळ शिक्षणाने आपला विकास होवू शकतो. याकरीता बाबासाहेबांनी रात्रशाळा, शिक्षण वर्ग, शाळा व महाविद्यालये सुरू केलेली होती. सिध्दार्थ महाविद्यालय व मिलिंद महाविद्यालये डॉ. बाबासाहेबांनी सुरू केली आहेत. यातून हजारो दलित समाजातील मुले शिक्षण घेवून पुढे समाजाला दिशा देणारे, कार्यशील नेतृत्व उभे राहिले.

म. फुले यांनी समाजातील शोषीत, वंचित, दलित व महिलांसाठी शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी समाजाचा रोष पत्करून शाळा सुरू केल्या. अखंड हिन्दुस्थानातील शुद्रातीशूद्रांच्या मुलींसाठी शाळा सुरू करणारा पहिला भारतीय असे म. फुले यांचे वर्णन करावे लागते. भारताच्या अवनतीला स्त्रीशिक्षण वाचवू शकते. याकरीता स्त्रीयांसाठी शाळा सुरू करण्याचे धाडस पत्नी सावित्रीबाईना शिक्षण देवून मुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी म. फुलेंनी सावित्रीबाईवर सोपविली. सावित्रीबाईनी समाजाला न डगमगता, परिस्थितीवर मात करून मुलींना शिक्षण देण्याचे कार्य जिद्दीने केले. यातूनच स्त्रियांना त्यांच्या हक्कांविषयी, स्त्री स्वातंत्र्याविषयी आवेशपूर्ण कृती करणारा महापुरूष म्हणून म. फुलेंकडे पाहता येते. शेतकरी, कामगार, दलित ब्राहमणेत्तर यांच्या दु:खावर, दारिद्र्यावर व त्याला कारण होणाऱ्या स्थितीवर आणि बांडगुळांवर आघात करणारा पहिला कृतिशील सर्जक कुशल म्हणून म. जोतीराव फुले यांचे कार्य विचारात घेता येते. म्हणूनच दलित शिक्षण, स्त्रीशिक्षण म. फुले महत्वाचे मानतात. कुटुंबात मुलांना शिकविण्याचे कार्य महिला करतात. शिक्षणाविषयी अज्ञानाविषयी म. फुले म्हणत, "विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।। नीतिविना गती गेली। गतीविना वित गेले।। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।"[३] अविद्येने समाजव्यवस्थेला पंगू केले आहे. समाजातील कोणतीही कृती, हालचाल न समजण्यापाठीमागे दलित, अस्पृश्य माणसांमधील अज्ञान, अविद्या आहे. हे मुख्य कारण स्त्रीयांच्या, दलितांच्या, अस्पृश्यांच्या अधोगतीला कारण आहे. हे म. फुलेंनी लक्षात आणून दिले. समाजातील तळागळातील माणसांचा विकास होणे आवश्यक आहे. अविद्या हे त्याच्या परिस्थितीला, अवनितीला जबाबदार आहे. यातून बाहेर पडण्यासाठी विद्या मिळावी असे त्यांना वाटत होते. समाज फार दारिद्र्यावस्थेत जीवन जगत होता. "ड्युल साहेब याठिकाणी उत्तमोत्तम पोशाख करून उपस्थित असलेले हे लोक हिन्दुस्थानच्या जनतेचे प्रतिनिधी नाहीत. या देशातील बहुसंख्य जनता ही शेतकरी आहे आणि ते जे पोशाख वापरतात, त्याच पेहरावात मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीला आलो आहे. हिन्दुस्थानच्या बहुसंख्य जनतेचे हीत तुम्हाला करावयाचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा. त्यांचे प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची सोय करा, असा त्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप महाराणींना कळवा."[४] हिन्दुस्थानातील खरा समाज कसा आहे. याची जाणीव म. फुले यांनी ब्रिटिश अधिकारी ड्युल साहेबांना पेहरावातून करवून दिली. प्रत्यक्ष पाहणे आणि सांगणे यामध्ये खूप फरक आहे. म्हणून प्रत्यक्ष पेहराव रूपाने भारतीय माणसाचे खरे

चित्र दाखवितात. मूळ भारतीयाचे रूप, त्याची स्थिती आणि त्याची अवस्था या सर्वांचे दर्शन म. फुले ड्युल साहेबांना सांगतात. समाजाचे जे चित्र म. फुलेंना विषण्ण करते. त्या सामाजिक स्थितीचा प्रत्यक्षानुभव दाखवून देतात. याबरोबरच समाजातील स्त्री व तिची स्थिती हा विषय म. फुले यांच्या चिंतनाचा चळवळींचा व कृतीचा राहिला. समाजातील स्त्रियांना फार विघातक बंधनात अडकवून ठेवले होते. स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह, विधवाश्रम, बालकाश्रम, जरठबालाविवाह, बहुपत्निकत्व, पुत्रजन्माची अभिलाषा यांतून स्त्रियांची मुक्तता व्हावी. यासाठी ते जन्मभर कार्य करत राहिले.

समाजातील इतर जाती–जमातीतील लोकही अज्ञानाच्या गर्तेत अडकले आहेत. त्यांनाही शिक्षण मिळावे. शिक्षण हे त्यांच्या दु:खावर दारिद्र्यावर इलाज आहे. हिंदुस्थान हा देश जनसामान्यांचा आहे. त्यामुळे सामान्य माणसाला मूल्य प्राप्त झाल्याशिवाय देशाला मूल्य प्राप्त होणार आहे. "महार–मांग–चांभार हे या देशात फार असून ते अगदी नीचावस्थेत आहेत, हे पाहून ईश्वराच्या प्रेरणेने माझ्या मनात अशी प्रेरणा उत्पन्न झाली की अशांना सुशिक्षित करण्याविषयी काहितरी उपाय योजावा."[५] समाजातील अगदी रसातळातला समाज जीवन कोणत्या अवस्थेत जगतोय याची जाणीव ड्युल साहेबांना म. फुले सांगतात. माणसाला केंद्रस्थानी माणून त्यांच्या व्यवसायात मानवधर्म आहे. असा म. फुले कर्मवादाचा अन्वयार्थ यापध्दतीने जोडतात. म्हणून समाजातील तळागळातील घटकांचाही विकास होणे म. फुलेंना महत्वाचे वाटते.

भारतीय दलित समाजासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ठरले. समाजातील स्त्रीया, दलित याविषयी आंबेडकरांचे विचार उदात्त आहेत. त्यांनी यांना 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश दिला. हिंदुस्थानातील वर्ण व्यवस्था ही विकासाला मारक ठरते. येथील जाती धर्मांवर अधिष्ठित आहेत. त्यांची साखळी तोडल्याशिवाय ह्या देशाला राष्ट्र संज्ञा प्राप्त होणे नाही. असे डॉ. बाबासाहेबांना नेहमी वाटे. हिंदुस्थानातील दलित स्त्री कारूण्याची व मूळ शोषणाची कमाल मर्यादा आहे. ज्या दलित समाजाच्या विकासासाठी बाबासाहेबांनी आयुष्य खर्चिले त्यांच्या मानसिक मशागतीचे कार्य बाबासाहेबांनी केले. भारतातील जातीव्यवस्थेने दलित वर्गाचे हजारो वर्ष शोषण केले. समाजात न्याय–समता निर्माण होण्यासाठी वर्गयुध्द होणे आवश्यक आहे. "येथल्या दलित वर्गाच्या हक्कांसाठी आंबेडकरांनी अनेक लढे दिले. मंदिरप्रवेश, न्याय मागण्या, समान हक्क, राखीव जागा, उन्नतीचे बहुविध मार्ग, त्यांनी हाताळले. पण हा येथल्या बरड भूमित शक्तीत नाशच ठरल्याचा त्यांना अनुभव आला. रानडेयुग हे ज्ञान संपन्न आणि तमोनाशक होते; तर गांधीयुग अर्धनग्नतेचे, दिखाव्याचे आणि तात्विक हेराफेरीचे आहे, असे त्यांनी सूचित केले ते यामुळेच."[६] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाही समाजरचनेवर फार विश्वास होता. त्यांनी कधीही अभिजन वर्गाचा द्वेष केला नाही. या वर्गाच्या ब्राह्मण्यांचा द्वेष मात्र केला. सर्वांच्या सहकार्याने इथल्या अस्पृश्यतेला त्यांनी हादरे दिले. धर्मांतर करतानाही बाबासाहेबांनी भारतीयत्वाच्या जडणघडणीचा विचार केला. त्यांकडील दूरदृष्टीच्या विचाराने सामंजस्य व सामाजिक समतोल कायम ठेवला.

समाजातील अस्पृश्यता याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. फुले अस्पृश्यतेविरोधात निर्भिडपणे उभे राहिले. हे या दोनही महामानवांमधील विचारांतील समानत्वाचा धागा कायम दिसतो. केव्हांही त्यांनी सोयीच्या भूमिकेतून अथवा शासकीय हस्तक्षेपामुळे विचाराला बगल दिली नाही. समाजातील अस्पृश्यतेविषयी समाजातील अस्पृश्यता बाळगणाऱ्या प्रवृत्तींचा नेहमी विचारांनी व कृतीतून विरोध करणारे हे दोनही विचारवंत आहेत. त्यामुळे त्यांना शेवटपर्यंत प्रस्थापित व्यवस्थेविरोधी समाजासाठी झगडत राहावे लागले.

**संदर्भग्रंथ सूची**

१. प्रश्नशोध, केशव मेश्राम, पृष्ठ क्र. २७.
२. प्रश्नशोध, केशव मेश्राम, पृष्ठ क्र. २६.
३. समाजसुधारकांचे मराठी साहित्याला योगदान, डॉ. शैलेश त्रिभुवन (संपा.), पृष्ठ क्र. १२५.
४. समाजसुधारकांचे मराठी साहित्याला योगदान, डॉ. शैलेश त्रिभुवन (संपा.), पृष्ठ क्र. १२५.
५. ऊ.नि., प्रश्नशोध, पृष्ठ क्र. २९.
६. ऊ.नि., प्रश्नशोध, पृष्ठ क्र. ३९.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
English Part - II /
Marathi Part - II /
Hindi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य आणि शाश्वत विकास: एक सर्वेक्षण<br>**Dr. Shwetambari Kanakdande** | १-६ |
| २ | 'उघडा दरवाजा' आत्मकथेतील पर्यावरण<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ७-१० |
| ३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा<br>**प्रा. कैलास कळकटे** | ११-१५ |
| ४ | पर्यावरण आणि सामाजिक समस्या<br>**प्रा. कांबळे रावसाहेब हरिबा** | १६-२० |
| ५ | इतिहास आणि पर्यटनातील पर्यावरण<br>**प्रा. लक्ष्मण नारायण भोईर** | २१-२४ |
| ६ | मुंबई शहरातील मिठी नदीच्या पुराची कारणे, त्याचे परिणाम आणि पुरव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. विशाल संपत भोसले** | २५-३३ |
| ७ | १९८० नंतरच्या कवितेतून चित्रित झालेले नैसर्गिक, सांस्कृतिक पर्यावरण - एक शोध<br>**सहा. प्रा. राजश्री प्रदीप कदम** | ३४-३९ |
| ८ | बदलत्या पर्यावरणाचे आदिवासी कथा साहित्यातून झालेले चित्रण<br>**प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस** | ४०-४६ |
| ९ | भारतातील पर्यावरण चळवळ एक अभ्यास<br>**डॉ. ज्योती अरविंद पोटे** | ४७-६० |
| १० | आधुनिक युद्धतंत्र नागरी संरक्षण<br>**प्रा. गणेश धर्मा थोरात** | ६१-६७ |
| ११ | पर्यावरणाविषयी अपुरी सामाजिक जागृती'<br>**प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे** | ६८-७१ |
| १२ | भौगोलिक पर्यावरणातील संदर्भ आणि कविता : अर्थ आणि अन्वयार्थ (यशवंत मनोहरांच्या 'केशवसुत' कवितेसंदर्भात)<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ७२-७६ |
| १३ | पर्यावरनाच्या जनजागृती मधील प्रसार माध्यमाची भूमिका<br>**प्रफुल इंगोले** | ७७-७९ |
| १४ | बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी : पाचोळा<br>**प्रा. भारती घोलप** | ८०-८४ |
| १५ | जलसंवर्धनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. सरोज आगवाले** | ८५-८७ |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २. 'उघडा दरवाजा' आत्मकथेतील पर्यावरण

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

लातूर जिल्ह्यातील रामराजे आत्राम या गोंड जमातीतील तरूणाने 'उघडा दरवाजा' हे आत्मकथन लिहिले आहे. गोंड जमातील जन्मलेल्या रामराजे आत्रामांनी कठीन परिस्थितीत शिक्षण घेवून उदरनिर्वाहाकरीता लातूर जिल्हा परिषदेमध्ये क्लार्कची नोकरी मिळविली. त्यांना सादारणपणे १९८४ ते २००६ पर्यंतचा कालावधी आत्मकथा वाचकांसमोर आणण्यासाठी लागला. लेखक म्हणतो हे पुस्तक मी लिहिण्याआधी माझ्या ५६ पिढ्यांना अक्षर ओळख नव्हती. माझी ओळख फक्त जंगल, नद्या, जल, पशू, पक्षी आणि वनांतील अमोल ठेवा असलेली वनौषधी, जटीबुटी ह्यांतीलच होय. माझ्या पिढ्यांकडून मला मिळालेला वारसा म्हणजे पानांवरून वनस्पती ओळखणे एवढाच होय.

लेखकाने या आत्मकथेतून आदिवासी समाजाची जीवन कथाच मांडली आहे. आपल्या कुटुंबाचे जगणे आणि माझ्या शिक्षणाकरीता कुटुंबाचा चाललेला संघर्ष यांतील चित्रण वाचकाला अस्वस्थ करणारे आहे. आदिवासी समाजाचे आर्थिकदृष्ट्या मागासलेपण, दारिद्र्य आणि व्यसनाधिनतेबरोबरच समाजातील अंधश्रध्दाही पहावयास मिळतात. आदिवासींसंबंधी शासन यंत्रणाही कशी उदासिन आहे. ह्याचेही चित्रण रामराजे आत्राम स्पष्टपणे घडवितात. आदिवासीसंबंधीचे कायदेही जाचक बनले आहेत. ह्यासंबंधीचे अनुभव लेखकाला जातपडताळणी कार्यालयाकडून येतात. त्या त्या जमातीची कर्मकांडे हा आदिवासी जपतो की नाही ह्यातून त्याला प्रमाणपत्र मिळते. लेखक म्हणतो की हे सर्व अज्ञान आणि अंधश्रध्देशी संबंधित आहे. लेखक म्हणतो की, "एकाच पातळीवर समाज हा विवेकसंपन्न व्हावा, अंधश्रध्देतून बाहेर पडावा यासाठी कायदे करायचे आणि दुसऱ्या पातळीवर सोयीसवलती देताना मात्र जुने पारंपरिक निकष लावायचे हे सर्व अन्यायकारक आहे."[१] असे लेखकाने व्यक्त केलेले मत निश्चितच महत्वपूर्ण ठरते. जातवैधतेबाबत शासनाने ठरविलेले धोरण योग्यही आहे. परंतु खरा आदिवासी हा ह्या जाचक अडथळ्यांतून पुढे येण्यास सहजासहजी तयार होणार नाही. त्यामुळे तो आहे तसाच राहणे पसंत करताना दिसतो. प्रसंगी शिक्षण आहे आणि जात वैधतेकरीता त्याला सतत हेलपाटे मारावे लागतात. ते त्यास आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे शासनाने जातपडताळणी करीताचे कायदे काही प्रमाणात शिथिल करणे आवश्यक वाटते.

लेखकाची पत्नी ज्यावेळी हॉस्पिटलमध्ये मृत्यु पावते. त्यावेळी संतापलेली आदिवासी माणसांची संतप्त झालेली मनेही पहावयास मिळतात. अशा परिस्थितीत लेखकाने बाळगलेला संताप महत्वपूर्ण असाच आहे. रामराजे आत्रांमांचे संयमी व शांत व्यक्तिमत्वही आत्मकथेतून वाचकांना प्रामाणिक, शांत, संयमी व्यक्तित्वाचे दर्शन घडविते. लेखक गावातील कामाचे उदाहरण देतात त्यांतून त्यांनी आदिवासी माणसांच्या कष्टाळू वृत्तीचे



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

दर्शन घडते. गावातील नाईकवाड्याने लेखक आणि त्याच्या मित्रांना 'झिंगरी कापायच काम' करण्यासाठी नेले त्यावेळी या आदिवासी तरूणांनी दोन दिवसाचे काम एका दिवसात पूर्ण केल्यावर पोरांची स्तुती म्हणून बाबुराव नाईकवाडे जमलेल्या माणसांना सांगतो की, "या पोरांनी पाच माणसांचे तीन दिवसाचे काम अर्ध्या दिवसात केलंय. गरीब पोर हाईत आणि इनामदार दिसतात. किती दिवसापासून मी मजूर शोधतोय, माझ्या भितीनं कोणी मजूर भेटत नव्हते. हे स्वत:हून चालून आलेत?"[२] अशा प्रकारे सामाजिक जीवनातही आदिवासी माणसांचे प्रामाणिकपणाचे दर्शन अत्यंत प्रांजळपणे घडते. आदिवासी माणसांच्या श्रमाचे मूल्य हे आजही अमूल्य स्वरूपाचे आहे. कोणत्याही क़ामाला प्रामाणिकपणे न्याय देण्याचा प्रयत्न आदिवासींचा प्रत्येक ठिकाणी असतो. ते काम शासनाचे असो, व्यक्तिचे असो, अथवा समाजाचे असो सर्व आदिवासी तरूण ते स्वत:चे समजून काम पूर्ण करतात. असे आदिवासी माणसाचे निरपेक्षपणे काम करण्याची प्रवृत्ती पहावयास मिळते.

लेखक जसे आपल्या समाजाचे प्रामाणिकपणाचे चित्रण घडवितो. तसेच तो शासकीय कामांतील भ्रष्टाचारांचें दर्शन घडवितो. लेखक म्हणते १९७२—७३ चा हा काळ होता. त्यावेळी शासनाने विविध कामे सुरू केली. ह्या दुष्काळाचा फटका मराठवाड्याला अधिक बसला. लातूर, उस्मानाबाद ह्या भागात दुष्काळ तीव्र होता. माणसांना खायला अन्न भेटत नव्हतं. अशा परिस्थितीत इंदीरा गांधी यांनी दुष्काळ कामे सुरू झाली. याकामावर अल्पभू—धारक, आदिवासी, सर्व जाती—पातीची लोक कामाला येवू लागले. लहान—मोठे, स्त्रीया, मुले अबालवृध्द सगळेच या कामावर येवू लागले. कामगारांचा पगार आठवड्यातून एकदा व्हायचा. लेखक म्हणतो की यावेळी सरकारी अधिकाऱ्यांचा लाल फितीचा कारभार सुरू झाला. "अशा परिस्थितीचा लाभ 'लाल फितीतील' बेभान झालेले काही अधिकारी गैरफायदा उठवत होते. तळ्याच्या कामावर एक हजार पाचशे लोकांची उपस्थिती दाखवावयाची. पाचशे लोकांच मस्टर वेगळं. त्यांच्या पध्दतीन तो पैसा जिपमध्येच पोत्यातनं यायचा. वाटप झालं की, तो पैसा या लाल फितीच्या अधिकाऱ्यांच्या घरी जाची. तिथं बोगस पध्दतीने बोगस माणसांची नावे लिहून हातापायांचे अंगठे उमटवले जायचे. या पध्दतीने मोठ्या कामावर मोठी संख्या, छोट्या कामावर छोटी संख्या. ज्याला जसं ज़मेल तसं त्याच्या त्याच्या परीनं बोगस नावांचा उपयोग करून या मस्तवाल लाल फितीतील अधिकाऱ्यांनी कोट्यावधी रूपये आपल्या घशात घातले. काबाड कष्ट करून या गरीब माणसांना तेवढा पैसा मिळत नव्हता. त्याच्या दहा पटीनं जास्त बोगस पैसा अधिकारी या पध्दतीने हडप करायचे."[३] अशा रीतीने शासनाची लूट अधिकारी वर्गाने सुरू केली. लेखक म्हणतो की अधिकारी वर्ग भरपूर पैसा कमवून बसला नंतर नंतर तर गुंड प्रवृत्तीची माणसं कामावर आली. ती लोक काम न करता दाम घ्यायची. हळूहळू ह्या प्रवृत्तीच्या माणसांमुळे काम करणारी माणसं हळूहळू कामावरून निघून जावू लागली. हळूहळू उदरनिर्वाहाकरीता लेखक म्हणतो की माझ्या कुटुंबाने जंगलाचा आश्रय घेतला. कधी मोलमजुरी करून कुटुंबाची जगण्याची धडपड सुरू होती. अशा परिस्थतीत लोक गाव सोडून शहरांकडे धाव घेवू लागले. परंतु लेखकाचे कुटुंब मात्र शहराकडीलचा विचार मनात येवूनही शहराकडे धाव घेत नाही. यातून लेखकाची आपल्या भूमिशी गावाशी जुळलेल नातंही येते.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

रामराजे आत्राम व्यक्तिगत जीवनातही महत्वपूर्ण संबंध जोपासताना दिसतात. त्यांनी मा.श्री. विलासरावजी देशमुख, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यावेळेस त्यांचा सत्कार समारंभ लातूरच्या शासकीय निवास्थानी आयोजित केला होता. त्यावेळी जमलेल्या प्रचंड गर्दीतून मार्ग काढत रामराजे आत्राम साहेबांकडे येवू लागल्यावर पोलिसांनी त्यांना अडविले. त्यावेळची विलासरावांची स्वतंत्र ओळखही ते सांगतात. त्यांना पोलीस सत्कार करण्यासाठी येवू देईनात म्हणून मा. मुख्यमंत्री महोदय, पोलिसांना म्हणतात की, "माझा माणूस आहे, गरीब आदिवासी. सच्चा कार्यकर्ता त्यांना त्रास देवू नका."[४] ह्या मा. मुख्यमंत्री साहेबांच्या मनाच्या मोठेपणाचे दर्शन लेखकाला झाले. लेखकाकडे ह्यानंतर पोलीस पाहतच राहिले. दुसऱ्या रीतिने रामराजे आत्राम यांना लातूरचे कलेक्टर महेशकुमार शुक्ला यांची बदली झाल्यावर लेखक त्यांच्या बदलीच्या निरोप समारंभासाठी लेखकाने त्यांच्या कार्याबद्दल, सहकार्याविषयी सांगितले की, "साहेब, आपली बदली झाली. खऱ्या अर्थाने आपण गोर गरीबांच्या बाजूने दीन दलित आदिवासी—भटके विमुक्त यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून काम करणारे अधिकारी यामुळे या सर्व गरीब माणसांचा आशीर्वाद सदोदित आपल्या पाठीशी राहिल. एक मात्र खरं की आपण गेल्यामुळे माझा फार मोठा चळवळीसाठीचा आधार गेला. माझ्या चळवळीला थोडीसी खीळ बसणार."[५] वंचितांसाठी, शोषित वर्गासाठी कार्य करणाऱ्या माणसासंबंधी आत्राम निरपेक्षपणे त्यांच्या कार्याचे कौतुक करताना दिसतात. आत्रामांना आपल्या समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा त्यांच्याकडून मिळाली होती. साहेबांकडीलची माणुसकी येथे पहावयास मिळते. रामराजे आत्राम यांना महेंद्रकुमार शुक्ल हे परमेश्वरासारखे वाटतात. त्यांची भावना त्यांनी वरीलप्रमाणे व्यक्त केली. साहेबांकडीलचाही मोठेपणा पुढीलप्रमाणे व्यक्त होतो, "इथं मी जेवढी वर्ष राहिलो, तेवढे दिवस मी नियमाच्या चौकटीतच काम करून गरीब आणि तळागळातल्या माणसांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. गरीब माणसाला न्याय हीच सेवा मी कधीही राजकीय पुढाऱ्यांच्या हातचं खेळणं बनलो नाही, बनणार नाही. ते राजकीय पुढारी म्हणून जास्तीत जास्त आमच्या सारख्या अधिकाऱ्यांची प्रशासकीय बदलीच करू शकतात, याच्या पलीकडे काहीच नाही मी आय.ए.एस. सेवेत पदार्पण करून आज चौदा वर्ष झालेली आहेत. सोळा वर्ष झाल्यावर आयुक्तांचा माझा दर्जा होणार ते कोणीही थांबवू शकत नाही. उलट पुरातत्व खात्यात माझी बदली करून मला एक चांगल्या प्रकारे शोध लावण्याची संधी प्राप्त झालेली आहे. मी कोठेही गेलो तरी माझ्या दर्जात काही बदल होणार नाही. माझा दर्जा उलट वाढणारच आहे."[६] अधिकारी म्हणून काम करणाऱ्या माणसामध्ये सर्वसामान्याच्या हितासंबंधी, सर्वसामान्याच्या कल्याणासंबंधीची, शोषिताला न्याय मिळवून देण्याची, त्यांचे हक्क, अधिकार त्यांना मिळाले पाहिजेत याकरीता निरपेक्षपणे काम करणारा अधिकारी पहावयास मिळतो. त्यातून लेखकाला आपल्याविषयी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या माणसांचे दर्शन होते. समाजासाठी अधिकाराचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्याला होणाऱ्या परिणामांची तमा नसते. असे आदिवासीसाठी, वंचितांसाठी कार्य करणाऱ्या शुक्लांचे व्यक्तित्व लक्षात येते. त्यातूनच लेखकाला समाजाचा विकास करण्याची प्रेरणा मिळते. तिच रामराजे आत्रामांची ऊर्जा बनली आहे. असे यातून स्पष्टपणे दिसून येते. अशा पध्दतीने आत्राम यांनी जंगलात, झाडांत, निसर्गात ज़ीवन जगणाऱ्या आदिवासी माणसाच्या आत्मकथनाचा केंद्रबिंदू स्वत: लेखक आहेत. जीवनात



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

येणाऱ्या प्रत्येक संकटांवर मात करत रामराजे आत्राम समाजाकरीता कार्य करताना दिसतात. एकूणच आदिवासींचा विकास झाला पाहिजे. त्यांना माणसांसारखे जीवन जगता यावे याकरीता रामराजेंची चळवळ अविरतपणे कार्य करताना दिसून येते. किंबहुना त्यासाठीच त्यांचे जीवन आहे असे लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. ·आत्राम, रामराजे, 'उघडा दरवाजा', भूमी प्रकाशन, लातूर, प्र.आ. २००९, पृष्ठ क्र. ०९.
२. तत्रैव, आत्राम, रामराजे, पृष्ठ क्र. १४६.
३. तत्रैव, आत्राम, रामराजे, पृष्ठ क्र. १६५.
४. तत्रैव, आत्राम, रामराजे, पृष्ठ क्र. २९७.
५. तत्रैव, आत्राम, रामराजे, पृष्ठ क्र. २९७.
६. तत्रैव, आत्राम, रामराजे, पृष्ठ क्र. २९८.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

**Peer Reviewed**

# Akshar Wangmay

International Research Journal

**UGC-CARE LISTED**

## Folk Literature & Folk Media

**FEBRUARY 2020**







**Executive Editor : Dr. Subash Nikam**

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)



**Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar**



**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors | |
|---|---|---|
| 1 | लोकसाहित्य में लोकगीत<br>डॉ. योगिता हिरे | 9 - 12 |
| 2 | आदिवासी लोक सांस्कृति के संदर्भ में आदिवासी जनजीवन<br>डॉ.पंडित बन्ने | 13 - 16 |
| 3 | आदिवासी लोकसाहित्य और समाज जीवन<br>डॉ. योगिता दत्तात्रय घुमरे (उशिर) | 17 - 19 |
| 4 | गुजरात की लोकधारा भवाई एक संक्षिप्त अध्ययन :<br>डॉ. गीता परमार | 20- 23 |
| 5 | संत रामदासांच्या प्रार्थनांमधील 'विश्वात्मक कल्याण तत्व'<br>डॉ. सुरेश विनायक जाधव | 21-26 |
| 6 | लोकनृत्य<br>सौ. पूर्णिमा उमेश झेंडे | 27-30 |
| 7 | लेककथा: स्वरूप व वर्गीकरण<br>प्रा. रवींद्र मुरलीधर पगार | 31-34 |
| 8 | लोकसाहित्य आणि समाज जीवन<br>डॉ. विठ्ठल केदारी | 35-38 |
| 9 | महाराष्ट्रातील लोककला – गोंधळ<br>कु. हिरे सारिका जिभाऊ | 39-42 |
| 10 | 'तमाशा लोककलांचे आर्थिक अध्ययन'<br>डॉ.डी.एन.सोनवणे | 43-47 |
| 11 | लोकसाहित्य और संस्कृति<br>प्रा.रविंद्र पुंजाराम ठाकरे | 48-50 |




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

# लोकसाहित्य आणि समाज जीवन

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

मराठी साहित्यविश्वामध्ये साठोत्तरी वाङ्मय प्रवाहाबरोबरच लोकसाहित्य हा साहित्यप्रवाह अभ्यासकांना वेगवेगळ्या प्रकारे दिशादर्शक ठरला आहे. मुळात लोकसाहित्य हे मानवाच्या उत्पत्तीबरोबरच निर्माण झाले आहे. लोकसाहित्याची निर्मिती आदिम कालापासून होत आहे. लोकसाहित्याला दीर्घ परंपरा आहे. आवाज आणि शब्दांच्या निर्मितीतून लोकसाहित्य निर्माण होते. मानवाने निर्मिलेले लोकसाहित्य ही मानवाची स्वाभाविक निर्मिती असते. मानव आपले जीवन आनंदी व उत्साहाने जगण्यासाठी लोकसाहित्याची रचना करतो. ही रचना गद्य व पद्य याप्रकारे असते. या निर्मितीतून समाजातील माणसांच्या रूढी, परंपरा, प्रथा, लोकविश्वास, समजुती, लोककला यापध्दतीने नृत्य, नाट्य यांचा समावेश होतो. मानवी समूहाच्या आविष्काराचे शास्त्र म्हणजे लोकसाहित्य असते असे म्हणता येते. मानवाच्या समूहाचा उत्स्फुर्त आविष्कार लोकसाहित्यातून व्यक्त होतो. थोडक्यात मानवी जीवनाचे शास्त्र लोकसाहित्यातून अभिव्यक्त होते.

समाजाचा सहजस्फूर्त अविष्कार लोकसाहित्यातून दिसून येतो. मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अलिखित संस्कृतीचे दर्शन घडविते. एका पिढीपासून दुसऱ्या पीढीपर्यंत आलेल्या विशेषाचे रूप उलगडून दाखविते. यामाध्यमातून संस्कृती संक्रमण घडते. त्यामुळे संस्कृती प्रवाही राहते. लोकरीतीने चालत आलेल्या कथा, गीते, रूढी इ.चा समावेश लोकसाहित्यात असतो. लोकसाहित्याचा रसिक केवळ शिक्षित अशिक्षित आहेत असे नाही. तर लोकसाहित्य रसिकाला वयाचेही बंधन नसते. मानवी जीवनाच्या भ्रमातून आणि आभासी सृष्टीतून लोकसाहित्य निर्माण होते. कोणत्याही एका व्यक्तीची ही निर्मिती नसते. ही निर्मिती समूहाची निर्मिती असते. समूहाची भावना, समूह मनाचा आविष्काराची प्रचीती घडताना दिसते. परंपराप्रियताही लोकसाहित्य जपताना दिसते. लोकांच्या स्मृती आणि जीवनातील व्यवहार यातून लोकसाहित्याची निर्मिती होते.

समूहाचा इतिहासच लोकसाहित्यातून अधोरेखीत होतो असे आपल्याला वाटत राहते. मानवी जीवनाच्या लोकमानसाचा आविष्कार एकूण समाजमानसच या साहित्यातून प्रतीत होते. आपल्या जीवनातील भूतकालीन घटनांची मूल्यगर्भ व गतिशील चैतन्यावस्था यांचा समावेश परंपरेत होतो. "परंपरा दीर्घकाळ चालत असतात. त्यांना आधुनिकतेकडून विरोध होवून नव्या परंपरा निर्माण केल्या जातात. परंपरेतूनच जीवनसत्वे घेत आधुनिकता



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

प्रबळ होत असते. परंपरेच्या पायावर आधुनिकता उभारली जाते. आधुनिक व परंपरा यांच्यात सातत्याने देवाणघेवाण होवून त्या प्रभावित करतात. आधुनिक व परंपरा सतत चैतन्यपूर्ण कालसुगंत राहत असतात."[१] मानवी जीवनातील परंपरा लोकसाहित्य निर्मितीला पोषक ठरतात. जीवनातील घटना संवादपूर्णतेने लोकसाहित्यातून अभिव्यक्त होताना मानवी जीवनाला मुखर करत असतात. मानवी जीवनातील थकवा नाहिसा करून नवीन ऊर्जा प्राप्त करून देणारे साहित्य म्हणजे लोकसाहित्य असते. समाजातील विविध जाती–धर्मांचे लोक आपापले लोकसाहित्य निर्माण करतात. हे साहित्य त्या–त्या समूहांचे जीवन जगण्याची पध्दती, रीती–रिवाज, प्रथा, परंपरांचे दर्शन घडवित असते. "आदिवासी, भटके, ग्रामीण असे समाज आणि नागरी वस्तीतील अभिजन समाज असे दोन गट निर्माण केले की लोककलांचे मूळ सहज दिसते. जगण्याच्या प्रेरणेशी ते जोडलेले असते. तर अभिजन कलांचे नाते विकासाशी असते. लोककला आपल्या संस्कृतीतच जन्मतात. जगण्यातून आणि प्रत्यक्ष श्रमातून त्या निर्माण होतात. आदिम धर्मांशीही त्यांचे नाते असते. धर्माच्याही आधी या लोककला निर्माण झालेल्या आहेत. क्रीडेशीही त्यांचा संबंध घनिष्ठ असा आहे. मानववंशशास्त्राचा अभ्यास त्यातून होतो. चित्र, संगीत, नृत्य, गीत, वेशभूषा याआधारे त्यांचे स्वरूप उलगडते. रंजन आणि प्रबोधन हे दोन्हीही हेतू त्यात असतात. लोककला या निम्न अशा आर्थिक घटकातून आलेल्या आहेत. या घटकांनीच त्याची जोपासनाही केलेली आढळते."[२] समाज व्यवस्थेत प्रस्थापित वर्गापेक्षा खालच्या स्तरात जीवन जगणारे समाज घटक आहेत त्यांचेही लोकसाहित्यातील स्थान महत्वाचे ठरणारे आहे. पोटासाठी शरीर कसरती करून लोकांचे मनोरंजन करून पोट भरणारे लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करणारे भटके, मागते, भविष्य सांगणारे, जातमागते, अपंग, कैकाडी, वडुर यांचे स्थान महत्वाचे आहे. "उपरिनिर्दिष्ट निरनिराळ्या गावगाड्याबाहेरील भटक्या जातींच्या परंपरेने चालत आलेल्या जीवनक्रमाकडे पाहिले तर असे दिसते की, ते समाजाची गरज कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पूर्ण करतात कुणी लौकिक जीवनातल्या गरजा भागवितो, तर काही रंजन करून सुख देतात. निरनिराळे सोंगे आणणे, कसरतीचे खेळ करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे इत्यादी कला जागत्या ठेवतात. धर्मश्रध्दा तेवत ठेवण्याचे कार्य काही जाती (ज्यांना लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हणतात) करतात. असे असले तरी शेतीच्या उत्पन्नाचा कोणताही भाग हक्करूपाने त्यांना मिळत नसल्यामुळे तसेच ते करीत असलेल्या कामाचा मोबदला देण्याची प्रथा रूढ नसल्यामुळे त्यांना प्रामुख्याने भिक्षा वृत्तीवरच जगावे लागते. मागून खाणे याशिवाय त्यांना पर्याय नसतो. काही जाती–जसे शिकलगर, कैकाडी, वडुर, बेलदार, या मागत नाहीत. परंतु भिक्षुकवृत्ती हीच बाकीच्यांचा जगण्याचा आधार असते."[३] समाजातील हे सर्व घटक कोणत्या ना कोणत्या रूपाने समाजाचे मनोरंजन करतात. लोकसाहित्यामध्ये या समाजघटकांचे स्थान विचारात घेताना त्यांचे कला गुण विचारात घेवून दैनंदिन संघर्ष कठीण आहे. "त्यांची दिनचर्या वरवर पाहिली तर असा भास होतो की, त्यापैकी कित्येकांचा काहितरी कलाकुसरीचा किंवा मनोरंजनाचा दर्शनी धंदा असतो व काही



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

निव्वळ भिक्षार्थी असतात. परंतु बाहेरचा बुरखा जरासा ओढला असता अशी खात्री होईल की बहुतेकांची मदार भिक्षेवर आणि भिक्षेच्या आडून फसवेगिरी, दलालबाजी, चोरीचपाटी यांवर व काहींची व्यभिचारावर देखील असते."[४] समाजातील भटक्या विमुक्तांचे जीवन याप्रमाणे आहे. गावोगाव भटकंती करणारे आणि भिक्षुकी करून जगणाऱ्या भिकाऱ्यांचे ह्या प्रकारे आचार्य अत्रे वास्तवपूर्ण चित्रण करतात. भिक्षुकांमध्ये चोर भिक्षुकांचा वर्ग कसे जगतो याचेही चित्रण बोलके आहे. याबरोबरच समाजव्यवस्थेत भिक्षुकी वृत्तीने जगणाऱ्या भिकाऱ्यांचेही विश्व आगळे वेगळे आहे. चित्रकथा, मांग गारूडी, पारधी, माकडवाले, कैकाडी इत्यादी जातींचा समावेश चोरभिक्षुकांमध्ये केला जातो. आजपर्यंत या सर्व जाती–जमातींच्या लोकसाहित्याने मराठी साहित्याच्या विकासाला हातभार लावला आहे.

समाजामध्ये आज लोककला टिकविण्यासाठी नवे आव्हान उभे राहिले आहे. जुन्या लोककला लोपपावताना दिसतात. आजच्या आधुनिक काळात नवी पीढी लोककलेपासून दूर जाताना दिसतेय. स्वातंत्र्यापासूनच नागरीकरणाचा वेग गतिमान झाला. त्यामुळे त्यांचे रक्षण करण्याबाबतचे संकट निर्माण झाले. आधुनिक तंत्रज्ञानामुळे दृक–श्राव्य माध्यमातून लोककलांना नव्या रूपात प्रेक्षकांसमोर साकार केले गेले. यामुळे मूळ कला असणारे समाज गटाची कला कोणताही व्यक्ती पाहण्याकडे सहसा वळताना दिसत नाही. जुने खंडोबाचे लगीन, जांभूळाख्यान, दशावतारी, लळीत यांचे प्रयोग फारसे पाहायला मिळत नाही. पश्चिम महाराष्ट्रात विकसित झालेला तमाशा खान्देशात व मराठवाड्यात सादर होत होता. त्याचे रूप आज बदलले आहे. त्याचे सादरीकरण आज कमी होते आहे. "जेंव्हा नव्या कला उदयास येतात तेंव्हा त्या आधीच्या कलांना जशा पूरक ठरतात तशाच त्या आधीच्या कलांना मारकही ठरतात. यात दुसरी शक्यताच अधिक असते. आधीच्या कलांना खाऊन टाकत त्यांचे पचन करीत या नव्या कला आपले अस्तित्व संपन्न करीत असतात."[५] जागतिकीकरणाच्या प्रभावाने लोककला लोप पावू लागल्या. जातीसमूह, पोटसमूह यांचे स्वातंत्र्य अबाधीत ठेवणाऱ्या लोककलांवर आक्रमण होवू लागले. मूळ रूप नष्ट होवू लागले. कलेच्या अंतरंगापेक्षा बाह्यरंगात आमूलाग्र बदल घडू लागले. आधुनिकीकरण व जागतिकीकरणाच्या नावाखाली कलांवर विपरित परिणाम होवू लागला. या दृक–श्राव्य कलांच्या बीजातून नाटक, चित्रपट यांचा विकास झाला. परिणामी या कला आज यशोशिखरावर पोहोचविण्यासाठी पूर्वीच्या लोककलांचे बीज महत्वाचे ठरते. "लोककलावंत हा समाजासमोर आपली कला सादर करीत असतो. घरोघरी जावून त्यांच्या अंगणात आपली कला सादर करून त्या घरातील लोक जे देतील ते घ्यावे त्यावर आपला उदरनिर्वाह करावा. असे गेल्या दशकापर्यंत चालले लोकांची मने मोठी होती. देण्याची वृत्ती होती दानत होती. लोककलावंताविषयी विलक्षण आस्था होती. प्रेमादर होता काळ बदलत गेला तसतशी या कलावंतांना सामाजिक उदासिनता अनुभवायला मिळाली. त्यांची कला ऐकली तरी त्यांना काही द्यायचे नाही असा प्रकार अनेक ठिकाणी



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

घडतो, तर हे कलावंत दारात दिसतात. त्यांना हातानेच पुढे जा असे खुणावून निरूत्साही केले जाते. दहा घरी फिरल्यास एखाद दुसरा त्यांना काहीतरी देतो. सामाजिक उदासिनतेमुळे आहे, लोककलावंतापैकी काही कलावंत आपली लोककला बंद करण्याच्या विचारात आहेत. तर काहीजन वडिलोपार्जित ही कला जोपासलीच पाहिजे, त्या जाणीवेतून गावोगाव हिंडत आपली कला सादर करताना दिसत आहेत."[६] आजच्या काळात लोकसाहित्याच्या कलावंताची उपेक्षा होत आहे. त्यांच्या वृध्दापकाळी कोणतीही मदत होत नाही. लोकसाहित्याची निर्मिती समाज घटकांकडून होते. तेच तिचा विकास करतात. मात्र या कलावंताची जीवनात उपेक्षाच होताना दिसून येते.

**संदर्भग्रंथ :–**

१. लोकसाहित्य साहित्य व समाज : संपादक धोंडगे मुंजा : पृ. १३

२. ऊ.नि., पृ. ४१

३. गावगाड्याबाहेर : डॉ. प्रभाकर मांडे, पृ. दिलेला नाही.

४. ऊ.नि., पृ. दिलेला नाही.

५. ऊ.नि., पृ. ४१, धोंडगे मुंजा.

६. ऊ.नि., पृ. १०९, धोंडगे मुंजा.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - II,
April - June – 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com






Ajanta
Prakashan

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आणि कार्य<br>**प्रा. डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव** | १४०-१४२ |
| २८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार<br>**डॉ. ज्योती ज. व्हटकर** | १४३-१४८ |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाताधिष्ठित दृष्टिकोण<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | १४९-१५१ |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार<br>**प्रा. गंगाधर वैजनाथ लांडगे** | १५२-१५४ |
| ३१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारीता - एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. पी. एन. वाघ** | १५५-१५८ |
| ३२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार<br>**डॉ. संगीता संपत पाटील** | १५९-१६२ |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाताधिष्ठित दृष्टिकोण

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग, सहाय्यक प्राध्यापक, यशवंत चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

डॉ. बाबासाहेबांचे जीवन खडतरतेने घडले असल्याने त्यांनी समाजातील सर्व सामान्याला न्याय मिळवून देण्यासाठी कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या त्रयींना विचारामध्ये अग्रस्थान दिले. तळागळातील दिनदुबळ्यांच्या विकास करणे त्यांना त्यांचे हक्क व अधिकार प्राप्त करून देण्यासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग केला. हिंदू समाज व्यवस्थेतील तत्वज्ञान हे नास्तिपक्षी, सांख्य तत्वज्ञानातील त्रिगुणावर आधारित आहे तत्वज्ञान डॉ. बाबासाहेबांना नापसंत होते. हिंदूच्या जीवनाचा महत्वाचा भाग जातिव्यवस्था आणि क्रमवार विषमता हा आहे. बाबासाहेबांचे तत्वज्ञान स्वातंत्र्य, समता आणि सहभाव यात सामावलेले आहे. एकूणच बाबासाहेबांचे तत्वज्ञानाचे मूळ धर्मात सामावलेले आहे. "माझ्या जीवनाविषयक तत्वज्ञानात स्वातंत्र्याला स्थान आहे हे मला आग्रहपूर्वक सांगावयाचे आहे. पण त्याचबरोबर अनिर्बंध स्वातंत्र्य समतेला मारक ठरते. माझ्या तत्वज्ञानात समतेचे स्थान स्वातंत्र्यापेक्षा वरचे आहे. तरीसुध्दा त्यांत संपूर्ण समतेला मात्र मुळीच थारा नाही. कारण अमर्याद समता ही स्वातंत्र्याच्या अस्तित्वाआड येते आणि स्वातंत्र्याला वाव असणे तर आवश्यक आहे."[1] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानामध्ये समता महत्वाची आहे. समाजात समता निर्माण झाल्याशिवाय तळागळातील माणसांचा विकास होईल.

समाजामध्ये समता प्रस्थापित झाल्याशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होवू शकणार नाही. हिंदू संस्कृतीमध्ये माणसाचे दोन शत्रू आहेत. ह्या शत्रूंपासून भारतीय माणसांचे संरक्षण करणे डॉ. बाबासाहेबांना वाटत होते. "लोकशाहीचे प्रामुख्याने दोन शत्रू आहेत. एक म्हणजे हुकूमशाही आणि दुसरी म्हणजे माणसा–माणसात भेद मानणारी नीती किंवा संस्कृती. अमेरिकन स्वातंत्र्यासंबंधी उद्‌गार काढताना बकल प्रतिपादितो की, हुकुमशाहीमुळे निर्माण झालेली शक्ती किंवा सामाजिक संघटना कायम टिकू शकत नाही. कारण हुकुमशाही प्रेरणा ही मुळातच अबाधित स्वरूपाची नाही. ती प्रेरणा काढून घेतली की, ती संघटना गडगडते आणि म्हणूनच कम्युनिझमची राजवट ही अबाधित नाही. त्याचप्रमाणेच माणसामाणसात भेद करणारी नीती सामाजिक, आर्थिक भेद बुध्दिपुरस्पर करणारी संस्कृती ह्या लोकशाही स्वरूपाला मोठे धोके आहेत."[2]

हिंदू धर्मव्यवस्था जातीव्यवस्थेत अडकलेली आहे. या धर्मातील वर्गव्यवस्था समाज विकासाला घातक आहे. या व्यवस्थेतील पददलित वर्गाची सामाजिक व आर्थिक गळचेपी ही धर्माने घालून दिलेली आहे. नंतरचा मागासलेल्यांचा वर्ग आहे. हा वर्ग स्थितीप्रज्ञ असा आहे. या वर्गात बदल व्हायला शिक्षणाच्या अभावामुळे थोडा जास्त वेळ लागेल. या वर्गातील लोकांमध्ये नवी जाणीव निर्माण व्हायला काहीसा वेळ लागणार आहे. त्यामुळे एक वर्ग बराच काळ मुख्य प्रवाहात येण्यापासून दूर राहणार आहे. ब्राह्मण वर्ग हा तत्सम जातीचा आहे. या धर्माला विशिष्ट हक्क आणि अधिकार मिळालेले आहेत. हा स्वयंपूर्ण वर्ग आहे. त्याच्या हक्कांवर आणि अधिकारावर अतिक्रमण झाल्यास तो सातत्याने बदलत राहील. याबरोबरच तो लगेच प्रतिकार करावयास धजावेल. त्यांना धर्मांने दिलेले उच्च स्थान कायम



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ठेवायचे आहे. असा हिंदू धर्म व्यवस्थेतील विषमता बाबसाहेबांना नाकारून बौध्द धर्माकडे आकर्षित झाले. बौध्द धर्मात जातीयता नाही. माणसाला माणसासारखा वागवणारा आणि त्याला त्याचे हक्क व अधिकार प्राप्त करून देणारा बौध्द धर्म हा आहे. म्हणून बाबासाहेबांनी मानवाला श्रेष्ठ समजणारा बौध्द धर्म स्वीकारला. समताधिष्टित मूल्यावर उभा राहिलेला बौध्द धर्म आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते समतेशिवाय समाजाचा विकास होणार नाही. आपापसातील वाद मिटणार नाही. ह्यासाठी अधिक मतभिन्नता निर्माण करणारा हिंदू धर्म आहे. त्यामुळे बाबासाहेबांनी बौध्दांचे तत्वज्ञान स्वीकारलेला बुध्द धर्म अनुसरला. ''सद्यःस्थितीत माणसाला धर्माची काय जरूरी आहे. अशा अर्थाची टीका काही लोक करतात पण मला वाटतं हे लोक मानवी समाजाच्या धारणेसाठी धर्माची किती आवश्यकता आहे. हीच गोष्ट विसरतात. मानवी समाजाला धर्माने दोन देणग्या दिल्या आहेत आणि त्या म्हणजे मानवी जीवनात ऐक्य अबाधित करणारी मानसिक प्रेरणा निर्माण करणे. धर्मामुळेच मानवी ऐक्याला पोषक असे विशिष्ट तऱ्हेचे मानसिक वातावरण निर्माण होवू शकते व दुसरे म्हणजे मानवी समूहात धर्मच समता निर्माण करू शकतो. या दोन महत्वाच्या कसोटींमुळे सद्यस्थितीत समता निर्माण करून चांगल्या तऱ्हेने लोकशाही नांदवयाची असेल तर धर्माची अत्यंत आवश्यकता आहे.''[3] कोणत्याही राष्ट्रासाठी धर्म महत्वाचा घटक आहे. धर्मातील मूल्यांमुळे समाजाचा विकास होवून ऐक्य निर्माण होण्यास मदत होत असते. ऐक्याची भावना अधिक प्रमाणात मानवी समूहात रूजली की विषमता राहत नाही. विषमता संपुष्टात आल्याशिवाय मानवी जीवनातील श्रेष्ठ–कनिष्ठतेची भावना नष्ट होत नाही. यासाठी मानवी जीवनाच्या विकासाच्या मूल्यांवर आधारित धर्मव्यवस्था असली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला धर्म लोक कल्याणाचा विचार देणारा धर्म आहे. एकूणच या धर्मात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सदाचार या धर्मात कोणत्याही प्रकारचे शोषण मान्य नाही. श्रेष्ठ–कनिष्ठता नाही. या धर्माने मोक्षप्राप्तीला स्थान नाकारले आहे. बाबासाहेबांनी बौध्द धर्म मानवी कल्याणाकडे जाणार आहे. याविषयीची त्यांना खात्री होती. या धर्मात अहिंसा, शांती, प्रज्ञा, करूणा ही मूल्य आहेत. 15 ऑक्टोंबर 1956 ला काठमांडू येथील भाषणातून बाबासाहेबांनी आपली बौध्द धम्माविषयी भूमिका व्यक्त केली होती. ''बौध्द धर्मात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव आहे. मनुष्यमात्राच्या उन्नतीला आवश्यक ही तीन कारणे आहेत. त्यांचा अंतर्भाव इतर कोणत्याही धर्मात प्रत्ययास येत नाही. इतर धर्मात ईश्वर व आत्मा याशिवाय दुसरे काही महत्वाचे नाही. बुध्द धर्माचे अधिष्ठान, जगात दुःख आहे. या तत्वावर आधारित आहे. इतकेच नव्हे तर त्या दुःखाचे निवारण करणे व ते निवारण्याचा मार्ग दाखविणे हे ह्या धर्माचे अंतिम ध्यैय आहे. असे तथागत गौतम बुध्दाने आपल्या पहिल्या सुत्रामध्ये धम्मचक्र प्रवर्तनामध्ये सांगितले आहे. अशा प्रकारचा मार्ग इतर धर्मातील कोणत्याही धर्म संस्थापकाने सांगितला नाही, या कारणामुळे मी बौध्द धर्म स्वीकारला आहे.''[4] बुध्द धम्मात असलेल्या मूल्यांचीच जगाला आवश्यकता होती. म्हणूनच अतिभौतिकवादी फेऱ्यातून बुध्दविचार मानवाला दिशा देवू शकतो. हा एकमेव धर्म मानसाला गरजांवर नियंत्रण ठेवायला सांगतो आहे.

डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोडबील भारतीय स्त्रीयांसाठी मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी आणले. परंतू तत्कालीन मंत्री मंडळाने सदर बील बारगळत ठेवले. एकूणच समताधिष्ठित वाटचाल हिन्दूस्थानात होवू दिली नाही. समान नागरी कायद्यासाठी हे बील महत्वाचे ठरणारे होते. आज स्वातंत्र्यानंतरही व पूर्वीही समान नागरी कायद्याची आवश्यकता महत्वाची वाटते. संपूर्ण भारताला लागू होणारा समान नागरी कायदा आपल्याला करावयाचा आहे. विवाह,



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

घटकस्फोट, मालमत्ता, संरक्षण, जनतेच्या भावनिक हक्कांशी संबंधीत धर्माचा संबंध असू नये. हिंदू लॉ, मुस्लीम लॉ, ख्रिश्चन लॉ, या सर्वांमध्ये समान नागरी कायदा करण्याची एकच पध्दत असावी. या सर्व कायद्यातील समान तत्व एकत्र करून त्याची व्याप्ती वाढवावी. म्हणून याची सुरूवात योग्य दिशेने व्हावी हे महत्वाचे आहे. भविष्यामध्ये यासंबंधीचे कायदे होतील. परंतु सर्वव्यापक समान नागरी कायदा होणे महत्वाचे आहे. त्यामुळे सर्व माणसांमध्ये एकात्मतेची भावना वाढीस लागेल. एकूणच समताधिष्ठित समाज निर्माण होईल.

थोडक्यात समता या मूल्यांवर आधारित असलेला समाज बुध्द धम्म आहे. समतेशिवाय मानवी विकास होणार नाही. मानवी विकास झाल्याशिवाय राष्ट्र प्रगती होणार नाही. म्हणून समता मूल्यांमुळे मानवी जीवन व समाज जीवनाची वेगळी ओळख निर्माण होवून जगामध्ये या धर्माची समाजाची प्रतिष्ठा वाढेल.

### संदर्भग्रंथ सूची

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, प्रकाशक गजेंद्र रघूवंशी, पृष्ठ क्र. 1
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, मिलिंद प्रकाशन, वर्धा, 2006, पृष्ठ क्र. 76
3. ऊ.नि., पृष्ठ क्र. 77
4. भारतीय जनता, प्रसेनजीत कांबळे, पृष्ठ क्र. 15

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Volume : II Special Issue Oct.2020**




ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor: **Dr. Sadashiv H. Sarkate**
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. प्रियदर्शनी वसंतराव देशमुख | 103-107 |
| 24 | चरित्रात्मक लेखनाच्या प्रेरणा | डॉ. व्ही.एस. केदारी | 108-111 |
| 25 | भटक्या मसणजोगी समाजाची लोकपरंपरा व संस्कृती : एक अवलोकन | प्रा.डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे | 112-117 |
| 26 | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा | प्रा. डॉ. विजय रैवतकर | 118-123 |
| 27 | "वडार समाज": देवता, यात्रा, देव्हारा | डॉ. मनिषा नेसरकर<br>सौ.विजयालक्ष्मी विजय देवगोजी | 124-129 |
| 28 | त्र्यं.वि.सरदेशमुख यांची नाटके | प्रा.डॉ.विनोद दे. राठोड | 130-135 |
| 29 | स्त्रीवादी साहित्य | प्रा.रंगेश बलभीम जाधवर | 136-142 |
| 30 | डॉ.विनायक तुमराम यांच्या काव्यातील आदिवासी जिवनचित्रण | डॉ.सुधीर भगत<br>कु.रुपा घोन्मोडे | 143-148 |
| 31 | महिलांचे अधिकार आणि समाजाची बंधणे | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर, | 149-153 |
| 32 | "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक चळवळी विषयाचा दृष्टीकोन" | प्रा.डॉ.तानाजी लोखंडे | 154-157 |
| 33 | माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये गाभाभूत घटक विकसित करण्यासाठीच्या कृतीकार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास | भाग्यश्री विलास उबाळे | 158-162 |
| 34 | मानव विकास संकल्पनेचे अध्ययन | डॉ.संतोश तु. कुटे | 163-168 |
| 35 | भारतातील दलित चळवळीत दलित महिलांचे योगदान | प्रा.डॉ.जाधवर बी.डी. | 169-173 |
| 36 | रयतेचा राजा : छत्रपती शिवबा | डॉ. किरण आगतराव जगदाळे | 174-178 |
| 37 | भारतातील शैक्षणिक पद्धतीचा विकास आणि आजची शैक्षणिक स्थिती : समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. कालिदास मारुती भांगे | 179-186 |
| 38 | कोविड - १९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ.धेडे डी.आर. | 187-194 |
| 39 | आदिवासी कविता की पड़ताल | डॉ.अरविंदकुमार | 195-199 |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# चरित्रात्मक लेखनाच्या प्रेरणा

**डॉ. व्ही.एस. केदारी**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
अंबाजोगाई

लेखन करताना लेखकाच्या मनामध्ये कोणत्या प्रकारचा उद्देश असतो. ज्या अनुभवांची मांडणी लेखक साहित्यातून करतो. त्या अनुभवांपासून वाचकाला कोणत्या ना कोणत्या प्रकारचा दृष्टिकोन मिळेलच असेही नसते. परंतु लेखकाने साहित्यकृतीतून जे विश्व निर्माण केलेले असते. त्यामध्ये तो स्वतःच्या सभोवतालचा परिसर वाचकांसमोर ठेवत असतो. त्या परिसराचे अवलोकन, निरीक्षण करुन नवविश्वाची निर्मिती करत असतो.

मराठीतील चरित्र ह्या वाङ्मयाचे स्वरुप अगदी मध्ययुगीन काळापासून लक्षात घेता येते. चरित्र वाङ्मयाचे स्वरुप मध्ययुगात निर्माण झालेल्या महानुभावीयांच्या वाङ्मयामध्ये पहावयास मिळते. त्यानंतर मराठी वाङ्मयात चरित्र वाङ्मय खऱ्या अर्थाने इंग्रजी कालखंडात लिहिले गेले आहे. या कालखंडात मराठी लेखकांनी इंग्रजी चरित्रकारांचे अनुकरण करुन चरित्र लिहिली. केवळ अंधानुकरण असे नाही. पाश्चात्यांच्या आगमनामुळे भारतीयांची जीवनमूल्ये बदलायला सुरुवात झाली. तसेच हिंदूस्थानीयांच्या सामाजिक कल्पनांतही बदल होवू लागला. यातूनच स्वभावतः मराठी चरित्र वाङ्मय बदलत गेल्याचे दिसून येते. मराठीतील चरित्र वाङ्मयावर ह्या सर्व परिस्थतीचा परिणाम झालेला दिसून येतो.

सातशे वर्षापूर्वीच्या महानुभावियांच्या साहित्यात्यात मराठीतील पहिला चरित्रग्रंथ घ्लीळाचरित्रङ निर्माण झाला. महानुभाव पंथातील अनुयायी श्रीचक्रधर स्वामींना श्रीकृष्णांचा अवतार मानत असत त्यामुळे त्यांची वचने, आठवणी ह्या अनुयायांनी लिखित स्वरुपात आणल्या गेल्या. घ्लीळाचरित्रङ या म्हाइंभटाने लिहिलेल्या ग्रंथामध्ये या सर्व आठवणी संकलित केल्या आहेत. त्यामुळे घ्लीळाचरित्रासङ मराठीतील पहिला चरित्रग्रंथ म्हणून ओळखले जाते. इ.स. १२७६ च्या सुमारास म्हाइंभटाने हा ग्रंथ लिहिला. पुढे या म्हाइंभटाने श्रीचक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ ऊर्फ श्रीगोविंदप्रभु यांच्या आठवणी लिहिल्या. श्री. नागदेवाचार्य यांच्याही आठवणी घ्स्मृतिस्थळङ या ग्रंथात संकलित केल्या आहेत. हे काम नरेंद्र व परशराम या दोन लेखकांनी केले आहे. अशा प्रकारे ह्या सुरुवातीच्या कालखंडात जे चरित्रलेखन झाले. त्या चरित्रलेखनापाठीमागील हेतू विचारात घेणे महत्त्वाचे आहे. या लेखनापाठीमागील हेतू स्पष्टपणे सांगता येतो की, या चरित्रलेखनातून चरित्रनायकांच्या व्यक्तित्त्वाचे चित्रण करणे हा शुद्ध हेतू दिसतो. मध्ययुगीन कालखंडात चरित्रवाङ्मय लेखनामागे प्रेरणा होती. घ्लीळाचरित्रङ या चरित्र ग्रंथ लेखनामध्ये भाविकपणाचा मोठा अंश दिसतो. असे असले तरीही या लेखनामध्ये चरित्रनायकाच्या जीवनातील विविधांगी पैलू वाचकांसमोर आणण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते. विविधांगी प्रसंगांचे चित्रण केल्यामुळे हा ग्रंथ आकर्षक ठरला आहे. प्रसंग चित्रण करताना त्यांतील



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ऱ्हदयता विशेष करुन वाचकाला भावणारी आहे. मध्ययुगातील लेखन शैलीचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून आपणास या चरित्रग्रंथांकडे पाहता येते. चरित्र वाङ्मयातील सुरुवातीचे रुप रसिकांसमोर मांडणारा हा ग्रंथ आहे. असे या चरित्रग्रंथाबद्दल म्हणता येते.

मध्ययुगीन कालखंडात महानुभाव संप्रदायाच्या वाङ्मयामध्ये चरित्राची निर्मिती झाल्यानंतर पुढीलच्या कालखंडामध्ये मराठीतील चरित्रांचे रुप वारकरी साहित्यामध्ये निर्माण झालेले आहे. संत साहित्यामध्ये अनेक संतानी पद्यामध्ये विविध संताची चरित्रे लिहिलेली आहेत. त्यामध्ये घ्भक्तलीलामृतङ व घ्संतलीलामृतङ ह्या दोन चरित्रग्रंथाची निर्मिती महिपतिबोवा ताहराबादकर यांनी केलेली आहे. समर्थ संप्रयामध्ये गिरधर स्वामींनी समर्थांची घ्समर्थप्रतापङ, उद्धवसुतांनी घ्रामदासचरित्रङ आत्माराम महाराज येक्केहाळी यांनी घ्दासविश्रामधानङ ही समर्थांची चरित्रे लिहिली आहेत. ह्या सर्व चरित्राचे स्वरुप विचारात घेतले असता असे लक्षात येते की या चरित्र निर्मितीमागे भाविकतेचा जिव्हाळा अधिक प्रमाणात राहिलेला आहे. तसेच या लेखनामध्ये चरित्रनायकासंबंधी तपशीलवार माहिती लिहिलेली असल्याचेही लक्षात येते. परंतु या लेखनामध्ये आलेली माहिती विश्वसनियता पूर्ण करु शकेलच असेही नाही. ह्यावेळी झालेल्या लेखनाचा काळ ईश्वर विषयक श्रद्धेचा होता. तसेच गुरुबद्दल अपार श्रद्धाभाव बाळगणारांचा होता.

या काळातील चरित्रलेनासंबंधी डॉ. अ. म. जोशी यांनी म्हटले आहे की, घ्प्राचीन काळात लिहिली गेलेली ही गद्य व पद्य चरित्रे माहितीपूर्ण असून पुढील चरित्रकारांस उपयुक्त ठरली आहेत. अर्थात त्यांची बैठक श्रद्धायुक्त भक्तिभावनेची आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. ती दैवी चमत्कारांच्या वर्णनांनी भरलेली आहेत. तो काळच दैवी सामर्थ्यावरील श्रद्धेचा व साधुसंताविषयीच्या आत्यंतिक आदरभावनेचा होता. देवादिकांची व देवासमान मानल्या गेलेल्या साधुसंतांची चरित्रे मोरोपंत म्हणतात त्याप्रमाणे घ्वाटे चरित्र त्यांचे आपण काही तरावया गावेङ या पारमार्थिक भूमिकेवरुन गायिली गेली आहेत. त्यांत चरित्रविषयास मानवी कोटीतून देवकोटीत नेऊन बसविण्याची प्रवृत्ती आढळते. गद्यमय बखर ग्रंथात इतिहासप्रसिद्ध पुरुषांवर साधुसंताप्रमाणे दैवी चमत्कार केल्याचा आरोप केलेला नसला तरी त्याच्या जीवनाशी काही कल्पनारम्य व अद्भूत घटनांचा संबंध जोडून त्या पुरुषांच्या भोवती एक प्रकारचे दैवी वलय निर्माण करण्याचा निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून येतो. हा सर्व अतिरेकी श्रद्धायुक्ततेचा व भाविकपणाचा परिणाम होय. त्या योगाने पद्यकार कवींची रचना सुश्लिष्ट व बखरकरांची वर्णनशैली आकर्षक असूनही या गद्य-पद्य चरित्रग्रंथात अनावश्यक गोष्टींचा फापटपसारा, विस्कळितपणा, कालविपर्यास व विसंगती असे दोष आढळतात.छ१ माहिती सांगणे अशा स्वरुपाची सुरुवातीस चरित्र लिहिली गेली आहेत. परंतु ह्या चरित्रांची निर्मिती ही पुढीलच्या काळातील चरित्रलेखनास उद्बोधक ठरली गेली. त्यांमध्ये बज्याचशा प्रमाणात चमत्कारिकता असल्याचेही आढळते. यामध्ये चरित्रनायकासंबंधींचा आदरभावही पहावयास मिळतो. साधुसंताची व्यक्तिमत्त्वे याकालखंडात वाचकांसमोर आणण्यासाठी चरित्रलेखन चरित्रलेखकांनी केलेले आहे.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

इंग्रजी आमदनीच्या काळात मराठीमध्ये भाषांतरित वाङ्मय लिहिले जावू लागले. यामुळे मराठीतील नवशिक्षितांना इंग्रजी भाषेतील चरित्रांची ओळख होवू लागली. इ.स. १८५२ मध्ये घ्सॉक्रेटिसचे चरित्रङ हे कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजीतून मराठीमध्ये भाषांतरित केले. घ्कोलंबसाचा वृत्तांतङ हे महादेवशास्त्री कोल्हटकरांनी भाषांतरित केले. तर घ्खुसरु राजाचा इतिहासङ हे वि.मो. भिडे यांनी १८५२ मध्ये भाषांतरित केले. ह्या ग्रंथाचे स्वरुप इतिहास सांगण्यासारखेच आहे. यांसारखी या कालखंडात अनेक छोटी मोठी चरित्रे या कालखंडात मराठीत लिहिली गेली गेली. ही सर्वच भाषांतरित झालेली चरित्रे परकीयांची आहेत. कारण चरित्रासारखा नवखा वाङ्मयप्रकार या कालखंडात हळूहळू विकसित होत होता. कारण चरित्र हे संशोधकाने लिहावयाचे असते असा दृष्टिकोन प्रचलित होता. ज्या व्यक्तीचे चरित्र लिहावयाचे त्यासंबंधीची सर्व माहिती एकत्र संकलित करावी लागते. चरित्र या वाङ्मयाचे रुप या पद्धतीने घडत गेलेले दिसते. अशा प्रकारे आंग्ल कालात मराठी चरित्र वाङ्मयाचा प्रवास सुरु झाले. तो काळ हा मराठीतील चरित्र वाङ्मयाकडे लेखकांचे लक्ष वेधून घेण्याचा होता. या चरित्रांच्या निर्मितीतून मराठी चरित्रांना योग्य लेखनाची दिशा मिळाली असे म्हणता येते. एखादा चरित्रकार चरित्र लिहितो. त्यावेळी चरित्रलेखन करण्याचे लेखकाचे प्रयोजन काय आहे. याचाही विचार करणे महत्त्वाचे वाटते. कोणत्या विशिष्ट हेतूने चरित्रकार चरित्र लेखनाकडे वळला. त्याविषयीची त्याची भूमिका महत्त्वाची आहे. चरित्रनायकाचे उदात्त व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर आणणे असा दृष्टिकोन बहुतांशी दिसतो. आपण एखादा ग्रंथ का लिहितो यासंबंधीचा विचार बहुतांशी प्रस्तावनेत येतो. गोखले द. न. यांनी बाबाराव सावरकर चरित्रग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात त्याप्रमाणे च्बाबांच्या जीवनातील अत्युदात्त उद्योगाचा शतांश जरी माझ्या प्रयत्नांमुळे वाचकांना समजला तरी माझ्या लेखणीची झीज सार्थकी लागेल.छर या रीतीने चरित्र लिहिण्याची भूमिका यावेळच्या चरित्रकारांची होती. ज्यावेळी आपण राजकारणी, समाजकारणी, जीवनतत्त्व ज्ञानविषयक, धार्मिक विचारांविषयी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन चरित्रांच्या माध्यमातून वाचकांसमोर येतात. कोणताही चरित्रकार स्वतःच्या व्यक्तिमत्त्वास साजेसे, आपल्या अभ्यासाला पूरक असलेल्या आवडीच्या व्यक्तित्त्वाचे चरित्र लिहिण्यासाठी विषय निवडतो. त्यारुपाने त्या लेखकांना त्यांचा पहिला चरित्र लेखक मिळतो. तेथूनच त्याचे चरित्रलेखनाचे कार्य सुरु होते.

चरित्र लेखन ऐतिहासिक पद्धतीचे असेल तर चरित्रलेखन करताना त्यामध्ये ऐतिहासिक सत्य बाजूला राहता कामा नये. अत्यंत सूक्ष्म रीतीने त्याचे लेखन झाले पाहिजे. त्यामुळे चरित्रलेखनामध्ये सजीवता येते. त्या लेखनाला स्वयंपूर्णता प्राप्त होते. असे आपणास म्हणता येईल. चरित्राच्या माध्यमातून व्यक्तीच्या जीवनाची माहिती ही उपलब्ध माहितीवरुन लिहावी लागते. त्या माहितीवरच चरित्रकारास संतुष्ट राहावे लागते. शंभर टक्के सत्य चरित्रामध्ये येणे अशक्य आहे. अशा पद्धतीने लिहिलेले चरित्र किती प्रमाणात चरित्रनायकासंबंधीची वास्तवता लेखनातून वाचकांसमोर येईल. वास्तव घटनांची मांडणी करताना लेखकाने प्राप्त माहितीच्या आधारे, समोरील उपलब्ध साधनांच्या आधारे, त्यांनी रेखाटलेले मनुष्याचे चित्र वाचकांसमोर स्पष्टपणे उभे


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

केलेले असते. त्या त्या प्रसंगी चरित्रकारांनी असे चित्रण का केले असावे. याविषयी बोध होणे अवघड बनते. चरित्र लिहिताना केवळ त्या व्यक्तित्त्वाची माहिती सांगणे हा हेतू असू शकत नाही. त्या व्यक्तित्त्वाचे कलात्मक चित्र रंगविणे हा स्पष्ट हेतू असू शकतो. चरित्र लिहिताना लेखक या गोष्टी जमेस धरुन लेखन करत असतो. अशा पद्धतीच्या लेखनामूळे चरित्र कलात्मक होते.

चरित्राच्या जवळ जाणारा आणखी एक प्रकार आहे. तो म्हणजे घ्स्वभावचित्रेङ हा होय. ही घ्स्वभावचित्रेङ म्हणजे चरित्राचीच ती एक बाजू असते. बहुतांशी एकसारखा वाटणारा हा प्रकार आहे. परंतु ह्या दोन्ही वाङ्मयामध्ये महत्त्वाचा फरक म्हणजे त्याच्या आकारमानासंबंधीचा दिसून येतो. घ्स्वभावचित्रेङ आकाराने लहान असतात. तर चरित्र आकराने मोठी असतात. हा फरक या वाङ्मय प्रकारात दिसत असला तरीही त्यामध्ये तंत्रदृष्ट्या फरक असलेला पहावयास मिळतो. चरित्र लिहिताना चरित्रामध्ये चरित्रकार अनेक लहान-सहान गोष्टीचे चित्रण करु शकतो. घ्स्वभावचित्रेङ लिहिताना तो लहान-सहान गोष्टींचा विचार करण्यावर त्यास मर्यादा पडतात. स्वभावचित्रनांतून लेखकास स्वभावचित्रण रेखाटावयाचे असते. परंतु पहिल्याच्या रंगपटापेक्षा म्हणजे चरित्राच्या पेक्षा स्वभावचित्रणाचा रंगपट खूप लहान असतो. जसे एखादा लेखक त्यावेळी कथा आणि कादंबरी ह्या वाङ्मयप्रकारामध्ये लेखन करतो. कथेत कादंबरी या दोन्ही वाङ्मयामध्ये जो लाक्षणिक बदल दिसून येतो. त्या स्वरुपाचा बदल हा चरित्रामध्ये आणि स्वभावचित्रामध्ये पहावयास मिळतो. असे आपणास या दोन प्रकारासंबंधी म्हणता येईल. तसेच चरित्रकार संपूर्ण जीवनाचे चित्रण चरित्रातून करतो. परंतु स्वभावचित्रे यामध्ये व्यक्तीच्या स्वभावावर त्यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकता येतो. व्यक्तीचे स्वभावरेखाटन यामध्ये करता येते. अशा पद्धतीने मराठीतील घ्चरित्रङ आणि स्वभावचित्रे या दोन स्वतंत्र वाङ्मय प्रकारासंबंधी म्हणता येईल.

एकूणच मराठी चरित्र वाङ्मयामध्ये चरित्रलेखनाची आबाळ झालेली पहावयास मिळते. असे असले तरीही आज मराठीतील चरित्रलेखनामध्ये चरित्रांची संख्या सातत्याने विस्तारताना दिसते आहे. ज्या व्यक्तींच्या जीवनात काही सांगण्यासारखे असेल ती व्यक्ती कोणत्याही क्षेत्रातील असेल अशा व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते. त्या जीवनानुभवांच्या माध्यमातून तयार झालेले चरित्र एक उत्तम कलाकृती म्हणून वाचकांच्यासमोर येते. साहजिकच एक चांगली निर्मिती म्हणून लोक स्वीकरतात. ह्या चरित्राच्या वाचनातून स्वतःला जगण्यासाठी प्रेरणा घेतात.

**संदर्भग्रंथ सूची**


१. कुलकर्णी, (प्रकाशक) अनिरुद्ध अनंत, घ्प्रदक्षिणा खंड पहिलाङ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९९७, पृष्ठ क्र. २९१

२. वष्ठ जयंत, घ्चरित्र : रुप आणि इतिहासङ, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ०३ ऑक्टोबर २००९, पृष्ठ क्र. ३५


◆◆◆



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal



VOLUME - I ISSUE - III
OCT. TO DEC. 2020

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मानवतावाद | डॉ.मनोहर आंबटकर<br>डॉ. मिलिंद कांबळे | 1-5 |
| 2 | विमुक्त भटक्यांच्या चळवळीला दिशा देणारे आत्मकथन: 'कत्ती' | डॉ.मारोती कसाब | 6-9 |
| 3 | कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता: एक आस्वाद | प्रा.डॉ.विनोद उत्तमराव भालेराव | 10-15 |
| 4 | संत साहित्यातील संतकवियित्री | प्रा. डॉ. सुनंदा चरडे | 16-21 |
| 5 | राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता'निर्मिती मागील भूमिका | डॉ. अविनाश श. धोबे | 22-25 |
| 6 | एकोणिसावे शतक : स्त्री व समाज | जागृती अरुण बधान | 26-29 |
| 7 | 'होळी' बंजारा समाजाचा सांस्कृतिक उत्सव | प्रा.डॉ.विनोद दे. राठोड | 30-33 |
| 8 | दलित आत्मकथनातील प्र.ई.सोनकांबळे यांचे समाजव्यवस्थेतील स्थान | प्रा.नामदेव शिनगारे | 34-37 |
| 9 | महारा  द्रातील दत्त संप्रदायकालीन सामाजिक स्थिती.गती : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.राजेंद्र सुखदेव चौधरी | 38-41 |
| 10 | आदिवासी नायकांचे स्वातंत्र्यासाठीचे योगदान | डॉ. विठ्ठल केदारी | 42-48 |
| 11 | भाषा आणि साहित्य : आंतरसंहितात्मक अभ्यास | डॉ.बालाजी घारुळे | 49-52 |
| 12 | गुलाममंडी उपन्यास में चित्रित पात्रों की समीक्षा | डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | 53-55 |
| 13 | इक्कीसवी सदी का मीडिया | प्रा. डॉ. बायजा कोदुळे | 56-60 |
| 14 | निराला के काव्य में राष्ट्रीय चेतना | डॉ. संतोष रामचंद्र आडे | 61-64 |
| 15 | "अल्मा कबूतरी" उपन्यास में अभिव्यक्त भाषाशैली एवं उद्देश्य | प्रीती अहिर<br>डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | 65-67 |
| 16 | कोरोना संकट में वैश्विक अर्थव्यवस्था और खेल उद्योग पर असर | डॉ.हेमंत वर्मा | 68-74 |
| 17 | आधुनिक हिंदी कहानियों में चित्रित वैवाहिक परिदृश्य | डॉ.ज्ञानेश्वर महाजन | 75-77 |
| 18 | सिनेमा और साहित्य | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 78-80 |
| 19 | ओमप्रकाश वाल्मीकि की कविताओ मे अभिव्यक्त आंबेडकरवादी चितन | प्रा.डॉ.रविंद्र आर. खरे | 81-86 |
| 20 | समकालीन दौर में साहित्य और सिनेमा की भूमिका | प्रोफेसर डॉ.आबासाहेब राठोड | 87-91 |
| 21 | महाराष्ट्रातील जलसिंचनातील असमोल : एक दृष्टिक्षेप | प्रा.रासकर भीष्मा रंगनाथ | 92-98 |
| 22 | भारताच्या नियोजन कालखंडातील शेतीचा विकास | डॉ. मुळे पी.एम. | 99-102 |
| 23 | धुळे जिल्ह्यातील धरणप्रभावित क्षेत्रांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास | संजय नामदेवराव तोरवणे<br>प्राचार्य. डॉ. डी. एस. पाटील | 103-106 |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# आदिवासी नायकांचे स्वातंत्र्यासाठीचे योगदान

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आदिवासी मराठी आत्मकथनांतून लेखकांनी जीवनानुभव व्यक्त केले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वातावरणाचा परिचय वाचकांना त्यांतून होतो आहे. स्वातंत्र्यांची भावना अथवा स्वातंत्र्यांपूर्वीच्या परिस्थितीचे चित्रण त्यांतून वाचकांसमोर येत नाही. साहजिकच स्वातंत्र्य प्राप्तीचा लढा या साहित्यिकांनी पाहिलेला अनुभवलेला नाही. स्वातंत्र्य प्राप्तीची प्रेरणा चरित्र वाङ्मयांतील नायकांच्या मनातील स्वातंत्र्यांची भावना प्रखरपणे पहायला मिळते. आदिवासी मराठी साहित्यामध्ये चरित्र वाङ्मयाचे वेगळेपण सांस्कृतिक लढ्याच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरते. स्वातंत्र्याची भावना प्रत्येक आदिवासी माणसाच्या मनामध्ये भरली होती. परंतु गावकुसाबाहेर, जंगलामध्ये राहणारा आदिवासी इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरोधी लढे देत होता. त्यांच्या जुलमी, शोषण व पिळवणुकीच्या वागणुकीला कंटाळलेला होता. त्यामुळे त्या त्या भागांतील आदिवासी इंग्रजांविरोधी लढे देत होते. सरंजामशाहीला विरोध करुन तत्कालीन राज्यव्यवस्थेला धक्के देण्याचे कार्य केले. स्वातंत्र्याच्या प्रेरणेने आदिवासी समाजातील क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य लढ्यांमध्ये सुरुवातीपासून योगदान दिले. परंतु या आदिवासींच्या योगदानाची स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये कोठेही उल्लेख आलेला नाही. तत्कालीन इतिहास लेखकांनी त्यांची नोंद घेतली नाही. त्यांची संकुचित मानसिकता आदिवासींच्या कार्याची दखल घेण्यासाठी इच्छुक नव्हती. किंबहुना त्यांना ती जाणीवपूर्वक घ्यावीशी वाटली नाही असेच चित्र पहावयास मिळते.

आदिवासी जमातींचा इतिहास फार जुना आहे. आदिवासी समाजातील विरांचा इतिहास स्वातंत्र्यापूर्वीपासूनचा आहे. त्यासंबंधी डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात की, चआदिवासी जमातींना चळवळींचा फार जुना इतिहास आहे. इ.स. १३४० मध्ये महंमद तुघलकाने पूर्वीचा कोंडाणा आताचा सिंहगड व अहमदनगरचा डोंगरी किल्ला महादेव कोळी जमातीच्या नायकाचा पराभव करुन ताब्यात घेतल्याचा उल्लेख सापडतो. कोंडाणा हा किल्ला नागनाथ नावाच्या आदिवासी नायकाच्या ताब्यात होता. त्याने शत्रुविरुद्ध आठ महिने किल्ला लढविला. पुढे रसद तुटल्यामुळे त्याला किल्ला सोडून पळून जाणे भाग पडले. त्यानंतर नागनाथने आपल्या निवडक साथीदारांच्या मदतीने दोन वेळा हल्ला करुन आपली संघटीत शक्ती पणाला लावल्याचा इतिहास साक्षीला आहे.छ१ अशा प्रकारे डॉ. रोंगटे यांनी आदिवासी माणसांचा पराक्रती इतिहास वाचकांसमोर आणला आहे. अगदी इ.स. १३४० पासूनचा हा आदिवासी माणसांचा ज्वाज्वल्य इतिहास सांगता येतो.

तसेच अगदी देवगिरीच्या यादवांच्या कारकिर्दीतही बिदरच्या राजाने पौपेरा नावाच्या महादेव कोळ्याला जव्हारच्या राजाचे अधिपत्य दिलेले दिसून येते.. यावेळी म्हणजे इ.स. १३४० ते १४९० या कालखंडात बहामनी राजांनी इ.स. १५४० ते १६३७ मध्ये निजामशाहीने आदिवासी नायकांचे स्वतंत्र अस्तित्त्व मान्य केले होते. अशा पद्धतीने आदिवासी विरांचा परिचय वाचकांसमोर येताना आदिवासींकडील स्वातंत्र्याची भावना



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

महत्त्वपूर्ण ठरली. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाली. त्यावेळी या चळवळीमध्ये संपूर्ण भारतातील आदिवासींच्या चळवळी सहभागी झाल्या. स्वातंत्र्य प्राप्तीच्या प्रेरणेने त्या इंग्रजाविरोधी लढे देत राहिल्या. प्रथमतः बंगालमध्ये आदिवासींची चळवळ सुरु झाली आणि यावेळी भारतीय स्वातंत्र्यालढ्यामध्ये विविध प्रांतातून आदिवासींचे लढे सुरु झाले. च्भारतीय स्वातंत्र्याचा पहिला उठाव २९ मार्च १८५७ रोजी बैरकपूर (बंगाल) येथे झाला. त्याच्या ज्वाला भारतभर पसरल्या ह्या रोमांचकारी समराची सुवर्णाक्षरांनी भारतीय इतिहासात नोंद घेण्यात आली असली, तरी त्याआधी कितीतरी आदिवासी क्रांतिकारांनी इंग्रजांना देशातून कायमचे हाकलण्यासाठी जिवाची बाजी लावत अभूतपूर्व लढाया केलेल्या आहेत. त्यातीलच सिद्धू, कान्हू, चाँद आणि भैरो या संथाळ बंधूनी कान्हुच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची पहिली उद्घोषणा केली. या संथाळ बंधूच्या नेतृत्वाखाली इतके व्यापक आणि सशक्त बंड या देशात घडून यावे की ज्याने भविष्यसूचक ठरावे, भारतवासीयांची आणि इंग्रजांची झोप मोडवी, भल्याभल्यांनी धसका घ्यावा आणि दुसरीकडे बऱ्याच विद्वानांना (?) ह्या बंडाच्या मागमूसही असू नये. काय म्हणावे इथल्या वांझोट्या संवेदनेला!छ२ अशा रीतीने भारतातील आदिवासींचे लढे विविध भागांतून सुरु होते. आदिवासींचा हा संथाळ बंधूनी दिलेला लढा दैदिप्यमान असाच आहे. संथाळांनी केलेला हा लढा इतिहासामध्ये कोठेही नोंदला गेला नाही. जागतिक पातळीवर या लढ्याची नोंद घेतली गेली. परंतु भारतीय अभ्यासकांना त्या लढ्याचे महत्व लक्षात आले नाही. यासंबंधी जगद्विख्यात साम्यवादाचे जनक घ्कार्लमार्क्सङ आपल्या 'Notes on Indian History' या ग्रंथात आदिवासींच्या लढ्यासंबंधी मत नोंदवताना म्हणतात, च्संथाळांनी सात महिन्यापर्यंत गणिमी काव्याने लढा दिल्यानंतर १८५६ च्या फेब्रुवारी महिन्यात ते बंड मोडून काढणे शक्य झाले.छ३ या आदिवासींनी इंग्रजांविरोधी सुरु केलेला हा क्रांतीचा लढा प्रखर स्वरुपाचा बनला. संथाळांनी चालू केलेल्या या संघर्षाबद्दल थॉमसन आणि गॅरट या तत्त्ववेत्यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे की, च१८५५ चे भारतातील संथाळांनी केलेले क्रांतिकारी बंड म्हणजे इंग्रजांच्या भविष्याला गदगदा हलवणारे होते.छ४ या व्यक्त केलेल्या तत्त्ववेत्यांच्या मताचा परामर्श घेतला की, आदिमांच्या संघर्षाची प्रचीती येते. आदिमांच्या मनामध्येही ब्रिटिशांविषयी भूमिका दूषित होती हेच लक्षात येते. ब्रिटिशांच्या धूर्त धोरणांविषयी आदिवासींनी सुरु केलेला संघर्ष स्वतःच्या अस्तित्त्वासाठीचा होता असे निदर्शनास येते. आदिवासी जमातीचे १७७५ ते १८९९ या कालावधीत इंग्रजांविरोधी अनेक लढे सुरु होते. कारण ईस्ट इंडीया कंपनीने बंगालमध्ये आपले बस्तान बसविण्यासाठी सुरुवात केल्यावर आदिवासींचा इतर समाजांशी व इंग्रजांशीही संपर्क वाढत होता. एकीकडे परस्परांशी संबंध वृद्धिगत होतानाच दुसरीकडे संघर्षही वाढत गेला. अशा परिस्थितीत आदिवासींच्या जनजीवनात, समाजजीवनात या दोनही घटकांकडून ढवळाढवळीचे प्रयत्न सुरु झाले होते. म्हणूनच बंगालमधील आदिवासींनी आपल्या समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य सुरु केले. ह्या घटकांकडून इंग्रजांकडून आपले स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे याकरीता आदिवासी समाजातील नेतृत्त्वांनी समाजहिताचे रक्षण करण्यासाठी चळवळी निर्माण करण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने बिहारमधून आदिवासी समाजाने प्रथमता या स्वरुपातून एकत्र येवून इंग्रजांविरोधी चळवळ निर्माण केली. इ.स. १८२० ते १८३२ या कालावधीमध्ये भारताच्या ईशान्येकडील आदिवासी समाजाकडे इंग्रजांचे लक्ष वेधले गेले. या भागांत विविध आदिवासी समाज आपापले जीवन जगत होते. इंग्रजांनी त्यांच्या



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

प्रदेशात प्रवेश केला आणि आदिवासींच्या जीवनामध्ये हळूहळू त्यांच्या हस्तक्षेप व्हावयास लागला. हा हस्तक्षेप आदिवासींना आवडला नाही. साहजिकच या भागात आदिवासी सुख-संपन्नतेचे जीवनाला या विघ्नाला सामोरे जावे लागले. साहजिकच या प्रदेशातील "सिंगपो, मिशिपी, लुशाई, डफळा, खम्पा, खाशी, नागा, मिझो, इत्यादी जमातींना पसंत नव्हती त्यांनी इंग्रजांना कडाडून विरोध केला. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष वाढले." अशा प्रकारे ह्या आदिवासी समाजाची नाराजी इंग्रजांविरोधी सातत्याने वाढत गेली. साहजिकच हळूहळू प्रत्येक आदिवासींनी आपले लढे इंग्रजांविरुद्ध द्यावयास सुरुवात केली.

भारतीय पातळीवरुन आदिवासींचे स्वातंत्र्यलढे सुरु होते. ह्यामध्ये विविध आदिवासी समाजांचे प्रतिनिधित्त्व दिसून येते. याच वेळेस महाराष्ट्रामध्ये आदिवासी समाजाचे स्वातंत्र्यलढे सुरु होते. महाराष्ट्रातील विविध कानाकोपऱ्यातील आदिवासी स्वातंत्र्याच्या प्रेरणेने इंग्रजांविरोधी लढत होते. ह्यामध्ये प्रामुख्याने भिल्ल, गोंड, महादेवकोळी ह्या जमाती स्वातंत्र्याकरीता इंग्रजांविरोधी लढे देत. त्या आदिवासींच्या बहुतांशी जमातींची छोटी छोटी राज्ये होती. त्यांची काही भागांत स्वतंत्र संस्थाने होती. कित्येक आदिवासींना स्वत:च्या जमीनदाऱ्या होत्या. अशा संपन्नावस्थेत असणारा समाज इंग्रजांच्या आगमनानंतर शोषणाला बळी पडायला लागला. इंग्रजांच्या प्रभावाखाली आल्यानंतर त्यांच्यावर बिटीश शासनकर्त्यांनी आदिवासींचे हक्क काढून घेतले. त्यांच्यावर जाचक अटी व बंधने लादण्यात आली. अशा प्रकारच्या इंग्रजांच्या धोरणांमुळे संपन्नावस्थेत जीवन जगणारा आदिवासी विपन्यावस्थेकडे वाटचाल करु लागला. इंग्रजांच्या धोरणांमुळे आदिवासींच्या मनामध्ये असंतोषाची बंडांची भूमिका निर्माण झाली. ह्याविषयी डॉ. गोविंद गारे म्हणतात की, "राज्यकर्त्यांविरुद्ध जो बंड करतो तो दडपशाहीस तोंड देण्यास तयार असतो."[६] अशा प्रकारे ह्या आदिवासींच्या लढ्यासंबंधी डॉ.गोविंद गारे यांनी म्हटले आहे. आदिवासी समाजाने इंग्रजांविरुद्ध संघर्ष सुरु केला. परंतु ब्रिटिशांनी आदिवासींच्या लढ्याला प्रतिकार करायला सुरुवात केली. इंग्रजांनी आदिवासींवर जुलूम, जबरदस्ती, कैद, फाशी अशा प्रकारे लगाम घालायला सुरुवात केली. ह्या प्रकारे इंग्रजांनी आवर घालण्याचा प्रयत्न केला. परंतु आदिवासींनी इंग्रजांविरोधीची चळवळ थंड पडू दिली नाही. आदिवासींची चळवळ इंग्रजांविरोधी प्रखरपणे कार्य करु लागली. त्याचीच प्रतिक्रिया म्हणून नाशिक जिल्ह्यामध्ये १८१८ मध्ये नांदगावाजवळ मांदूवद येथे भिल्ल आणि महादेवकोळी समाजाने लढा दिला. ब्रिटीश सरकारविरोधीचा महाराष्ट्रातील हा पहिला स्वातंत्र्यासाठीचा लढा पहायला मिळतो. या चळवळीचे नेतृत्व नगरमधील 'रामजी भांगरा' आणि 'रामा किरवा' या नेत्यांनी केले. ह्यांच्या या कार्याचे लोण हळूहळू नाशिक, नगर आणि पुणे जिल्ह्यापर्यंत पोहोचले. या सर्वांचा परिणाम आदिवासी एकत्र येण्यासाठी झाला. पुढे याचा परिणाम १८३० मध्ये जुन्नर प्रांतामध्ये आदिवासींनी दुसरा उठाव केला. त्याचे यशस्वी नेतृत्त्व भाऊ खरेल, चिमणाजी दरबारे आणि जाधव यांनी केले. या संघर्षामध्ये ब्रिटिशांविरोधी झालेल्या लढ्यात ५४ महादेव कोळी आणि त्यांच्या दोन नेत्यांना प्राणास मुकावे लागले. यावेळी अकोलनेर येथे रामजी भांगरे ह्यांनी इंग्रजांविरुद्ध असंतोष धुमसत ठेवला. पुढे १८३८ च्या सुमारात आदिवासी पुन्हा संघटित झाले व त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. यावेळी याचे नेतृत्त्व राघोजी भांगरे व गोविंदराव खाडे या दोघांनी नेतृत्त्व केले. या चळवळीने हळूहळू व्यापक रुप धारण केले. चळवळ व्यापक होत आहे हे ब्रिटिशांच्या लक्षात येताच यांना पकडण्यासाठी कॅ. मॅकिन्टोश यांच्या नेतृत्त्वाखाली फौजफाटा



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

पाठविला. त्यांनी १८४८ मध्ये राघोजी भांगरे साधूच्या वेषात असताना पकडले गेले. त्यांना फासावर दिले गेले. अशा पद्धतीने आदिवासींचे इंग्रजांविरुद्ध लढे सुरु होते. हे लढे इंग्रजांकडून दडपण्यासाठी विविध प्रयत्न झाले. लढे दडपले गेले तरीही आदिवासी समाजातील तरुण विविध भागांतून आपले लढे देत राहिजे.

राघोजी भांगरे यांच्या मृत्युनंतर आदिवासींची चळवळ थंडावली गेली नाही. इ.स. १८५० ते १८५९ या कालावधीत भागोजी नाईक यांनी इंग्रजांविरोधी लढे दिले. हे लढे नाशिक, नगर जिल्ह्यामध्ये भागोजी नाईकांनी दिले. आदिवासी समाजासाठी त्यांनी ह्या सर्व लढ्यांच्या रुपाने कार्य केले. त्यांनी प्रामुख्याने, 'इंग्रजांचे खजिने लुटणे, फौजफाट्याचे नुकसान करणे, जमिनी आणि वतनदाज्यावरील हक्क प्रस्थापित करणे.'[७] प्रामुख्याने या स्वरुपाचे धक्के भागोजी नाईकांनी इंग्रजांना दिले. भागोजी नायकांच्या कर्तुत्त्वाचा पराक्रम सर्वत्र पसरला. साहजिकच निझामाने भागोजीच्या मदतीला आपले सैन्य पाठविले होते. परंतु ही मदत भागोजी पर्यंत वेळेत येवू शकली नाही. इंग्रजांसोबत मेजर फ्रॅकसाचर यांसोबत झालेल्या लढाईत भागोजी धारातीर्थी पडला. भागोजी नाइकांच्या मृत्युनंतर इंग्रजांविरोधी आदिवासींचे लढे हे ब्रिटिशांविरोधी होते. ते आदिवासींच्या स्वःहक्कांच्या जोपासनेकरीता होते. किंबहुना आदिवासी माणसांच्या अस्मितेकरीता होते असेच म्हणता येते. याच कालखंडात महाराष्ट्रात "इ.स. १८५७ च्या आसपास तात्या टोपे यांनीही अनेक भिल्ल जमावांना मदत केली होती. १८५८ साली मालीवडीच्या भिल्लांचे बंड प्रसिद्धिला आले, तर १८३८ साली भिल्ल बंडखोर गोविंदगुरु यांनी भिल्लांना इंग्रजांच्याविरुद्ध उघडपणे संघटित केले. इंग्रजांविरुद्ध समर्थपणे तोंड देण्यास १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात अनेक आदिवासींनी नेतृत्व केले आणि हौतात्म्य पत्करले. चंद्रपूर जिल्ह्यातील मोलमपल्लीचा जमीनदार बापूराव पुल्लीसूर शेडनाके, बापू पेंदिर राजगोंड आणि नागपूर गोंड घराण्यातील सरदार शंकरशहा आणि रघुनाथशहा यांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध उठाव केल्यामुळे १८५८ साली त्यांना प्राणास मुकावे लागले. त्याच काळात विष्णू गोंड, कंगला माझी (पहिला) यांनीही चळवळीत सक्रिय योगदान दिले.'[८] या प्रकारे आदिवासी समाजातील विविध जमातींचे जनतेचे इंग्रजांविरुद्ध लढे सुरु होते. या लढ्यांतून महाराष्ट्रीय प्रत्येक माणसांच्या मनामध्ये इंग्रजांविरुद्धची चिड व खदखद यातून पहायला मिळते. आदिवासींचे हे लढे इंग्रजांच्या जुलमी व अन्यायी राजवटीविरुद्ध होते. तसेच ते समाजाची अस्मिता जपण्यासाठी होते असे दिसून येते.

आदिवासी समाज हा मुळातच क्रांतिकारी शूर, वीर आणि धाडसी आहे. महाराष्ट्र ही शूरविरांची भूमी म्हणूनही ओळखली जाते. अनेक प्रकारच्या चळवळी महाराष्ट्रात निर्माण झाल्या. अशा महाराष्ट्रातील या आदिमांच्या चळवळी व कार्यकर्तुत्त्वाविषयी डॉ. तुकाराम रोंगटे आपले मत नोंदविताना म्हणतात की, "महाराष्ट्राला विविध चळवळींची मोठी पार्श्वभूमी लाभली असून शोषीत, दलित, बहुजन समुहांच्या आणि मराठी माणसांच्या लढ्याचा एक दीर्घ वारसा महाराष्ट्राच्या पुरोगामित्वामागे उभा असला तरी आदिवासींची चळवळ या साऱ्याच पार्श्वभूमीवर वेगळी राहिल्याचे कटू सत्य समजून घ्यावे लागते. याकाळी मुंबई प्रांतातही आदिवासी भिल्ल, गोंड, महादेवकोळी या जमाती मुळातच लढवय्या आणि राज्यकर्त्या होत्या. त्यांची स्वतंत्र छोटी छोटी राज्य होती संस्थाने, जमीनदाज्या होत्या. मात्र इंग्रजांनी इथल्या सत्तेवर कब्जा मिळविल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी आदिवासींच्या ताब्यात असलेले सह्याद्रीतील किल्ले, घाटमाथे, राखण करण्याचे अधिकार



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

काढून घेतले. त्यामुळे संतापलेल्या आदिवासींनी बंड करायला सुरुवात केली."[१] येथीलचे मुळचे निवासी असलेल्या आदिवासींवर इंग्रजांकडून होणारी पिळवणूक व शोषणास विरोध म्हणून आदिवासींनी प्रखर लढे उभे केले. आदिवासींच्या हक्कांवर गदा आल्याने त्यांनी अन्याय करणाऱ्याविरोधी चळवळी सुरु केल्या. या चळवळी स्वतःच्या मनातला रोष व्यक्त करु लागल्या. महाराष्ट्रभर असलेल्या असंख्य आदिवासींनी स्वतःच्या अस्मितेकरीता लढे दिले. आपले हक्क व अधिकार आदिवासींनी अबाधित राहण्याकरीता संघर्ष करायला सुरुवात केल्याचे दिसून येते. मुळात पराक्रमी असणाऱ्या आदिवासींची पूर्वी स्वतंत्र राज्ये, संस्थाने होती. इंग्रजी राजवटीत ती क्षीण झाली. इंग्रजांनी ती काबीज करवून घेतली. परिणामी या आदिवासींवर दीन-दीनपणे जीवन जगण्याच्या उपेक्षेची वेळ आली. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये, डोंगरांतून आदिवासींचे स्वतःचे गड, किल्ले, होते. ह्या गड किल्ल्यांवरील आदिवासींचे वर्चस्व संपुष्टात आले. आदिवासींनी शूर, पराक्रमाने निर्माण केलेले राजवैभव इंग्रजांच्या आधुनिक शस्त्रांस्त्रांपुढे टिकाव धरु शकले नाहीत. साहजिकच इंग्रजांनी आदिवासींचे राजवैभव, गड, किल्ले काबीज करुन स्वतःची सत्ता निर्माण केली. येथीलच्या आदिवासींना परागंदा केले.

आदिवासींच्या स्वातंत्र्य लढ्याची चळवळ ही प्रखर राष्ट्रभक्तीची, स्वतःचे अस्तित्व जोपण्यासाठी होती. ह्या लढ्यातून त्यांनी आपल्या भूमीचे रक्षण करणे, आपल्या समाजाचे हक्क व अधिकार संवर्धित करणे व जपण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न होता. त्याकरीता त्यांचे लढे सुरु होते असे लक्षात येते. आदिवासींनी स्वकष्टाने, काबाडकष्टाने कमविलेल्या संपत्तीवर, वस्तूंवर येथील दुसरेच घटक मालकी सांगत होते. राबणारा आदिवासी आणि त्यांनी केलेल्या कष्टांतून निर्माण झालेल्या वस्तूंवरील मालकी इंग्रजांची किंवा येथीलच्या इंग्रजांच्या पदरी असणाऱ्या चाकरांची होती. ह्या गोष्टीसंबंधी आदिवासी संतुष्ट नव्हते. यांविषयी आदिवासींच्या मनामध्ये इंग्रज व राज्यकर्त्यांविषयी सातत्याने रोष वाढत गेला. परिणामी आदिवासींनी लढे दिले, विविध प्रकारच्या चळवळी निर्माण केल्या व त्यांतून स्वतःची खदखद व्यक्त केली. इंग्रजांना प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली. आदिवासी समाजामधील धुरंदर, पराक्रमींना इंग्रजांनी आमिष दाखवून लालूच दाखवून सैन्यांमध्ये भरती करवून घ्यायला सुरुवात केली होती. जेनेकरुन आदिवासी कर्तुत्त्वसंपन्न पुरुषांमध्ये संघर्षाची दरी निर्माण होईल. त्यांतून ह्या समाजात आपापसांमध्ये दुही निर्माण होईल. साहजिकच या तरुणांमध्ये एकात्मता राहणार नाही. परिणामी याचा फायदा इंग्रजांना स्वतःची सत्ता प्रस्थापित करण्याकरीता होईल असा धूर्त हेतू इंग्रजांचा होता. त्यांमध्ये ते काही प्रमाणात यशस्वीही झाल्याचे लक्षात येते. यासंबंधी डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात, "त्याकाळी महाराष्ट्रातील आदिवासी इलाख्यात आदिवासींनी काबाडकष्टाने कमविलेल्या वस्तूंवर दुसरेच मालकी सांगायचे. सर्व काही ओरबडून घेवून जायचे. इंग्रजांनी सर्व मोक्याच्या जमिनी काढून घ्यायला सुरुवात केली होती. सगळीकडे अंदाधुंदी माजली होती. गरीबाला कोणीच वाली नव्हते. आदिवासींमधल्या कर्तुत्त्ववान माणसांना लालूच दाखवून इंग्रजांनी शासकीय सेवेत घेतले होते. अशातच रामजी भांगरे आणि रामा किरवा यांनी इंग्रजांविरुद्ध दंड थोपटले तर राघोजी भांगरे, खाज्या नाईक, तंट्या भिल्ल, होनाजी केंगले, नारायणसिंह उईके, सत्तू मराडी, बाळू पिचड, कोंडाजी नवले, हुतात्मा नाग्या कातकरी, खाज्या नाईक, सखाराम सातपुते आणि हैबती खाडे अशा कितीतरी क्रांतिकारकांनी इंग्रजांची झोप उडविली. या वीरांनी

इंग्रजांना त्यांच्या घेतलेल्या जमिनी परत करणे भाग पाडले."[१०] अशा पद्धतीने आदिवासींचे विविध भागांतून स्वातंत्र्यासाठीचे लढे पहायला मिळतात. हे लढे आदिवासी वीरांनी समाजाच्या शोषणाला, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी स्वयंप्रेरणेतून दिलेले आहेत. इंग्रजांच्या 'फोडा आणि झोडा' या नितीचे प्रदर्शनही पहायला मिळते. परंतु त्यातुनही आदिवासी वीर स्वातंत्र्याच्या भावनेने लढे देत राहिले असे दिसून येते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये आदिवासी विरांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. तसेच आदिवासी क्रांतिकारकांबरोबरच स्त्रियांनीही लढे या कालखंडात दिलेले आहेत. पुरुषांबरोबर स्त्रीयांच्या कार्याचे स्वरुप विचारात घेता येते. आदिवासी स्त्रीयांमध्ये गढामंडळाची महान सम्राज्ञी राणी दुर्गावती, झाशीची वीरांगना झलकारी, जिजाबाई जानकू भांगरे, वीर हल्दीबाई भिल्ल, नागांची राणी गायडिनलू, क्रांतिवीर दशरीबेन चौधरी, रोहतास गडाची सम्राज्ञी वीर शिंगदायी, शूर तिलका मांझीची पत्नी सुदेशा अशा विविध आदिवासी समाजातील महिलांनी स्वातंत्र्यसंग्रामात योगदान दिलेले आहे. या सर्वच प्रकारच्या लढ्यांतून आदिवासींची आत्मसन्मानाची लढाई लक्षात येते.

आदिवासींचे हे सर्व लढे वैशिष्ट्येपूर्ण ठरले आहेत. इंग्रजी सत्ता आदिमांचे शोषण करत होती. हे आदिवासींना सहन होत नव्हते. म्हणून आदिवासींनी इंग्रजांविरुद्ध लढे देवून आणि स्वाभिमानाची, आत्मसन्मानाची चळवळ उभी केली. यातूनच भारतीय स्वातंत्र्यांसाठी आदिवासींची स्वतंत्र चळवळ निर्माण झाली असे दिसून येते. याविषयी प्रा.रा.के.मुटाटकर म्हणतात, "ब्रिटीश प्रशासनाच्या विकासाबरोबर रस्ते झाले, जंगलाकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहण्यात आले व तेव्हापासून बिगर आदिवासींनी आदिवासींना नागवले. सगळीकडे लेखन व रोकड पैसा यांच्या जोरावर निरक्षर गरीब नागवले गेले. ब्रिटिशांच्या काळात सगळ्या देशाची अस्मिताच गमावली होती. ती स्वातंत्र्यालढ्यात परत मिळाली. पण स्वातंत्र्यानंतरही आदिवासींनी मुख्य प्रवाहात सामील व्हावे असा धोशा चालू आहे. आदिवासींनी प्रगती विकास करावयाचा म्हणजे नेमके काय करायचे? संस्कृती भाषा यांत शास्त्रीय दृष्टिकोनातून बघितल्या उच्च-नीच, सरस-निष्कृष्ट नसते."[११] भारतावर इंग्रजांची सत्ता आल्यावर आदिवासींची अवस्था वाईट झाली. वर्षानुवर्षे दज्याखोज्यांतून राहत असणारा आदिवासी कधी जंगलातून बाहेर पडलाच नव्हता. पशुपालन, मासेमारी, शिकार, कंदमुळे गोळा करुन परंपरागत पद्धतीने जीवन जगणारा आदिवासी माणूस प्रस्थापित साहित्याचा आणि इतिहासाचा कधीही विषय होवू शकला नव्हता. तो माणूस स्वातंत्र्याच्या लढ्यात स्वयंप्रेरणेने आला. इंग्रजांविरोधी लढे द्यावयास लागला. परंतु त्याने स्वातंत्र्यलढ्यामध्ये केलेल्या कार्याची दखल येथीलच्या इतिहासकारांनी कधीच घेतली नाही. म्हणून याच वर्गातील लेखकांनी आदिवासी समाजात झालेल्या वीर-पुरुषांच्या कार्याचे चित्रण केलेले पहावयास मिळते. काही बिगर आदिवासी लेखकांनीही हा इतिहास लिहिला आहे. असे असले तरीही आदिवासी लेखकांनीच ह्या इतिहासाचे जतन करायला हवे अशी भूमिका प्रा.रा.के.मुटाटकर व्यक्त करतात. ते म्हणतात, "ब्रिटिशांच्या विरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात पडलेल्या आदिवासी स्वातंत्र्यवीरांचा नामनिर्देश इतिहासात नाही ही वस्तुस्थिती आहे. स्थानिक इतिहासाचे साहित्य निर्माण होण्याची गरज यावरुन उघड होते."[१२] आदिवासींच्या या कार्यकर्तुत्त्वाची ओळख वाचकांपर्यंत, अभ्यासकांपर्यंत जाण्यासाठी पोहोचण्याची गरज आहे. आदिवासी समाज हा पूर्वापार अडाणी, अशिक्षित आहे. त्यामुळे प्रस्थापित साहित्यव्यवहारामध्ये आदिवासींच्या



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

कार्यकर्तुत्वाचा परिचय साहित्याने वाचकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक होते. ते साहित्याकडून झाले नाही. म्हणून इतिहास घडविणारांनीच इतिहास लेखनाचे कार्य हाती घेणे आवश्यक आहे. अशी भूमिका घेवून आज आदिवासी व्यक्तीनींच माहिती उपलब्ध करुन, प्राप्त करुन इतिहास घडविणाऱ्या विरांची चरित्रे लिहिणे आवश्यक आहेत. त्यामुळे ते वाचकांपर्यंत सहजासहजी पोहोचतील व सर्वांना परिचित होतील. अशी अपेक्षा मुटाटकरांनी व्यक्त केली आहे. ते योग्यच आहे असे निर्विवादपणे म्हणता येते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास कोणी लिहिला, कोणी गायकांनी गायला, स्वातंत्र्यांचा जयजयकार झाला. स्वातंत्र्य दिनाची आरतीही गायली गेली. स्वातंत्र्य देवीला वंदन करणारे आणि शोषणाचा पुरस्कार करणारे स्वातंत्र्याच्या अनेक अनाथ विरांना विसरले. काहींना जाणीवपूर्वक दूर ठेवले. काहींना स्वातंत्र्यविरांची लेबले लावली. पण खरे त्यागी वीर राना-वनातच राहिले. काहींना रानातून बाहेर येऊच दिले नाही. शिवाय आदिवासी गीतांतून क्रांतिनायकाच्या इतिहासाला भटमंडळींनी दंतकथा म्हणून हिनवण्यास पुढे मागे पाहिले नाही. डॉ. गोविंद गारे, रामदयाल मुंडा अशा नामवंत लेखकांनाच आमच्या क्रांती नायकांचा इतिहास लिहावा लागला. दुर्लक्षित क्रांतिवीर लोकांसमोर आणण्याचे काम या धुरीणांनी केले आहे. अशा रीतीने आदिवासी लेखकांनी आपल्या साहित्यातून आदिवासींच्या जीवनकार्याची माहिती वाचकांसमोर आणताना दिसतात.

**संदर्भग्रंथ सूची**


१. रोंगटे, (संपा.) डॉ. तुकाराम, 'फडकी', १५ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१५, पृष्ठ क्र. ७४

२. तत्रैव, रोंगटे, (संपा.) डॉ. तुकाराम, पृष्ठ क्र. ७५

३. तत्रैव, रोंगटे, (संपा.) डॉ. तुकाराम, पृष्ठ क्र. ७५

४. तत्रैव, रोंगटे, (संपा.) डॉ. तुकाराम, पृष्ठ क्र. ७५

५. गारे, डॉ. गोविंद, 'स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतिकारक', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रकाशनकाल २००४, पृष्ठ क्र. ०२

६. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. ०४

७. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. ०५

८. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. ०६

९. ऊ.नि., रोंगटे, (संपा.) डॉ. तुकाराम, 'फडकी', पृष्ठ क्र. ७६

१०. तत्रैव, रोंगटे, (संपा.) डॉ. तुकाराम, 'फडकी', पृष्ठ क्र. ७७


११. मुटाटकर, (संपा.) रामचंद्र, 'हाकारा', विशेषांक २००६, मुद्रक व प्रकाशक रा.के. मुटाटकर, पृष्ठ क्र. ३९

१२. तत्रैव, मुटाटकर (संपा.) रामचंद्र, 'हाकारा', पृष्ठ क्र. ४१




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयीन मुलींच्या शारिरीक क्षमतेवर सुर्यनमस्काराचा परिणाम<br>**डॉ. आशा संजय देशमुख**<br>**प्रा. देवीसिंग फकीरा राठोड**<br>**प्रा. शहाजी उत्तमराव चव्हाण** | १-५ |
| २ | दलित कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान: जग बदलण्याचे हत्यार<br>**डॉ. शिवाजी विश्वनाथ डोळसे** | ६-१३ |
| ३ | दलित कवितेतील विद्रोह<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | १४-१६ |
| ४ | 'बौद्ध आणि मूल्य शिक्षण' (बोद्ध च अग्घ सिक्खनं)<br>**प्रा. डॉ. भिक्खू एम. सत्यपाल** | १७-२० |
| ५ | कोविड-१९: पारंपरिक शिक्षणपद्धतीवर परिणाम<br>**डॉ. नीता र. तोरणे** | २१-२६ |
| ६ | समाजव्यवस्थेवर झालेले दूरगामी परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर** | २७-२९ |
| ७ | मराठी दलित कवितेचा इतिहास<br>**प्रा. डॉ. संगीता दोंदे** | ३०-३५ |
| ८ | जागतिक शांतता आणि बुद्ध धम्म<br>**शिवानंद सुखदेव साळवे** | ३६-३८ |
| ९ | बीड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. घुगे एस. पी.** | ३९-४४ |
| १० | मराठी दलित कवितेचा इतिहास<br>**डॉ. सरला वासुदेव गोरे** | ४५-४८ |
| ११ | आंबेडकरी विचारांना तेवत ठेवणारा तुफानातला दिवा :वामनदादा कर्डक<br>**डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे** | ४९-५३ |





Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ३. दलित कवितेतील विद्रोह

**डॉ. विठ्ठल केदारी**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

साठोत्तरी वाङ्मयप्रकारामध्ये दलित साहित्याची स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण झालेली आहे. कथा, कविता, आत्मकथन, कादंबरी, नाटक या प्रकारामध्ये दलित लेखकांनी अनुभव व्यक्त केले आहेत. साहित्याची निर्मिती होताना कोणताही लेखक प्रथम कविता या लेखन प्रकारातून अनुभव कथन करतो. किंबहुना त्याचा पहिला आविष्कार कवितेतून व्यक्त होतो. कविता हे माध्यम लेखकाला अभिव्यक्तीसाठी सोपी वाटत असते. दलित वाङ्मयामध्ये प्रथमतः कविता व दलित कविंच्या कविता या प्रकारे दलित कविता अभ्यासता येते. कवितेतून मनाची उत्कटता व्यक्त होताना सहजपणे, उत्सर्तपणे व्यक्त होते. भारतीय समाज व्यवस्था वर्णाधिष्ठित आहे. चातुवर्ण्यव्यवस्थेत अगदी शेवटच्या स्थानी असलेल्या माणसाला आलेले अनुभव कवितेतून व्यक्त होतात. याबरोबरच अस्पृश्य माणसाला वाचा फोडणारे भगवान गौतम बुध्द, म. फुले, राजर्षी शाहू महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली अस्मिता ह्या कविंच्या कवितेतून प्रामुख्याने व्यक्त होते. समाजाच्या पुनर्ररचनेचा प्रश्न ह्या विचारवंतानी मांडला होता. वंचित, अस्पृश्य समाजाला न्यायाची, समतेची आणि स्वातंत्र्याची गरज जाणवू लागली. आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली, आपल्या सन्मानाविषयी वागणूक झाली. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय दलित मुक्ती लढा सुरू केला. दलित तरूण वर्ग शिक्षित होवू लागला होता. त्या वर्गाने आपल्या अस्तित्वाचा शोध घेतल्यावर त्यांना समाजव्यवस्थेचा विद्रूप चेहरा दिसायला लागला. दलितांच्या अवनतीला अज्ञान आणि वर्णव्यवस्था आहे. व्यवस्थेने दलितांना गावपांढरीची सेवा करायला सांगितली आहे. त्यातच दलित माणूस मश्गूल आहे. ह्या व्यवस्थेने दलितांपर्यंत शिक्षण जाणार नाही अशीही व्यवस्था करून ठेवली आहे. ह्या गोष्टीची जाणीव नवशिक्षित तरूण–तरूणींना झाली. यातूनच दलित कविता विद्रोह व्यक्त करू लागली.

दलित कवितेतून बाबुराव बागूल, दया पवार, वामन दादा कर्डक, नारायण सुर्वे, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, शरणकुमर लिंबाळे, हिरा बनसोडे, यशवंत मनोहर, नामदेव ढसाळ, प्रज्ञा पवार, राम दोतोंडे यासारख्या कविंनी कवितेतून विद्रोहाची भूमिका व्यक्त केल्या आहेत. बाबुराव बागुलांनी 'वेदाआधी तू होतास.....' या कवितेतून माणसाच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी सर्वप्रथम माणूस जन्मला आणि माणसाने भूतलावरील विविध घटकांना नावे दिली. भेदाभेद आहेत ते मानवनिर्मित आहेत. असे बाबुराव बागूल या कवितेतून नमूद करतात.

शब्दांना सामर्थ्य कसे प्राप्त होते याविषयीचे मत वामन निबांळकरांची कविता व्यक्त करते. कवितेतून संतापाची धार, ज्वाला पहावयास मिळते.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

**"शब्दांनीच पेटतात घरे, दारे देष**
**आणि माणसे सुद्धा**
**शब्द विझवतात आगही**
**शब्दांनी पेटलेल्या माणसांची"**

ही कविता दलित कविच्या शब्दांविषयी भाव प्रकट करणारी आहे. संवाद साधण्याचे माध्यम शब्दांविषयी भाव प्रकट करणारी आहे. संवाद साधण्याचे माध्यम शब्द आहे. परंतु या शब्दांमुळेच संप्रेषण ही होत आहे. शब्द हे शस्त्र आहे. ते जपून वापरावे विचार पोहोचवण्यासाठी शब्द महत्वाचे ठरतात. परंतु ते आशयानुसार कधी हलके तर कधी व्यवस्थेला प्रश्न विचारणारे असणारे हवेत.

कवी शरणकुमार लिंबाळे आपल्या कवितेतून म्हणतात,

**"मी एक सार्वजनिक आंबेडकर, वी.सी. कांबळ्यांना पाव**
**खोब्रागड्याचा पाव... गवई गटाचा पाव, अर्धा पाव पँथरच"**

दलित समाजाच्या फाटाफुटीचे वास्तव चित्रण शरणकुमार लिंबाळे आपल्या कवितेतून व्यक्त करतात. समाजाच्या अवस्थेविषयीची खंत कवितेतून व्यक्त होते आहे. वास्तवाचे अचूकपणे चित्रण कवितेतून होत आहे.

राम दोतोंडे म्हणतात,

**"वेषीतून गावात आलास,**
**गावातून शहरात आलास,**
**पंख फुटल्या पाखरा, वेदनेचा गाव विसरलास"**

शिक्षणानंतर दलित विद्यार्थ्यांचे जीवन हळूहळू बदलू लागले. या बदलणाऱ्या नवविचारी तरूणाची स्थिती कवितेतून राम दोतोंडे सांगतात. शिक्षणाने माणूस बदलतो. परंतु आपली माती माणसांना त्याने विसरून जावू नये. शिक्षणाशिवाय दलित माणसाला पर्याय नाही. एकूणच बाबासाहेबांनी दिलेला मंत्र 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा'. या प्रत्यय येथे येताना दिसतो.

दलित कवितेतून विद्रोहाचे स्वरूप नामदेव ढसाळांचया कवितेतून ज्वलंतपणे पहावयास मिळतो. 'गोलपीठा' हा कविता संग्रह याचे उत्तम उदाहरण आहे. ढसाळांना त्यांच्या कवितेतून जे सांगायचे असते तेवढ्या ताकदीने ते शब्द वापरून व्यक्त करतात. उदा. 'त्यांची सनातन दया फॉकलंड, रोडच्या भडव्याहून उंच नाही' येथे भादरणे व भडवा हे शब्द ढसाळ ज्या पद्धतीने वापरतात त्यातून कोध पहावयास मिळते. या शब्दांतून असे व्यक्त होवू शकत नाही. दलित कवितेत आकोश पहावयास मिळतो. तो पांढरपेशा वर्गाला उद्देशून येतो. जे व्यक्त करावयाचे आहे ते अगदी संयतपणे व्यक्त होते आहे. त्र्यंबक सपकाळे शोषण करणाऱ्या घटकांना खडबडून जागे करतात. त्यांची कविता 'उघडशील का तुझ्या बंद मनाचे दरवाजे' ही कविता त्याचा प्रत्यय देते आहे. पांढरपेशा वर्गाला उद्देशून लिहिलेल्या या कविता आहेत. कवितेमध्ये यशवंत मनोहर यांची कविता व्यवस्थेला शाप देवून जाते आहे. पांढरपेशा वर्गाला उद्देशून लिहिलेल्या या कविता आहेत.

कवितेमध्ये यशवंत मनोहर यांची कविता व्यवस्थेला शाप देवून जाते आहे. या व्यवस्थेविषयी प्रखरपणे भाष्य करते,



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

**'जाताना मुक्याने जाणार नाही**
**या पसाऱ्याला शाप देवून जाईन**
**येताना उत्तरे घेवून आलो होतो**
**जताना प्रष्न घेवून निघून जाईन.'**

दलित कवितेतून विद्रोह व्यक्त होताना तो समूहाचा आविष्कार असल्याचे स्पष्ट होते. समूह भावना कवितेत कवी व्यक्त करतात. कवी लोकनाथ यशवंतसारखा कवी 'आता होवून जाऊ द्या!' असे म्हणतो, येथे कवी आपल्याला आलेले अनुभव व्यक्त करताना तो काव्यात्मक पद्धतीने, वैचारिक पद्धतीने व्यक्त करतात. कारण विचारांचा लढा हा विचारांनी लढायचा असतो. म्हणून ज्योती लांजेवार, ज.वि. पवार, प्रज्ञा पवार यासारखे सर्व कवी शब्दांच्या माध्यमातून कवितेच्या माध्यमातून व्यवस्थेविरोधी लढताना दिसतात. त्यातून ते आपल्याला आलेले बरे–वाईट अनुभव निर्भिडपणे मांडतात. या व्यवस्थेला प्रश्न विचारून भंडावून सोडताना दिसतात. दलित कविता परिवर्तना आड येणाऱ्या गोष्टीविषयी बोलते आहे. त्या गोष्टींचा मुकाबला करण्यासाठी दलित कविता निर्माण झाली आहे. हे सर्व कवी आपला भूतकाळ आढवतात. तो कवीला आपल्या बोलीभाषेत आढवतो. आढवणींना उजागर केल्यावर, आपली बोलीभाषेतून व्यक्त होताना पांढरपेशीयांना ही भाषा सहजासहज लक्षात येत नाही.

कविला हा वाङ्मयप्रकार दलित लेखकांना नेहमीच जवळचा वाटला आहे. दलित कविता नव्या प्रश्नांना घेवून येते. यावेळीच ती नवे स्थित्यंतर घडवू पाहते. जागतिकी– करणामुळे निर्माण झालेला चंगळवाद, सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांचा होत चाललेला ऱ्हास, सामाजिक बांधिलकीचे नातेसंबंधावरचे भीषण परिणाम या विषयीचे चित्रण अरूण काळे यांनी वास्तवपणे उभे केले आहे. 'युज ॲन्ड थ्रो' ही कविता याचे उदाहरण देता येते. याबरोबरच येथील आर्थ–अनार्थ याविषयीचा संघर्षही या कविने कवितेत व्यक्त करतात. याबरोबरच दया पवार, केशव मेश्राम, प्रकाश जाधव, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रतिभा राजानंद, त्र्यंबक सपकाळे, भाऊ पंचभाई, महेंद्र भवरे, प्रल्हाद चेंदवणकर, लहू कानडे या सर्व कविची कविता विद्रोहाची भूमिका मांडताना दिसते. तो विद्रोह सकारात्मकपणे आणि संयमीपणाने मांडला आहे. एकूणच बहिष्कृत माणसांच्या भावनांना आणि संवेदना कवितेतून साकारताना दिसतात. समाजव्यवस्थेतील अस्पृश्य म्हणून हिणवलेल्या, माणूसपण नाकारलेल्या माणसांचे जीवनानुभव स्वतःच दबलेली, चिरडलेली वेदना कथन करतात मानवी जाणीवेला नवे परिमाण देण्यासाठी, अर्थजाणीव स्पष्ट करताना पहायला मिळते. एका वेगळ्या जीवनविश्वाचे दर्शन दलित कविता उभे करते. एका वेगळ्या विश्वाची संस्कृती दलित कविता व्यक्त करते. एका वेगळ्या विश्वाची संस्कृती दलित कविता व्यक्त करते. या कवितेने सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शोषणाचा बुलंद आवाज शब्दांकीत केला. दलित कविता माणुसकीच हुंकार दिला. कांतीचा आणि परिवर्तनाची वाट दलित कवितेने दिली. माणसाला समतेची मूल्ये सांगण्याचा प्रयत्न दलित कविता करते.

**संदर्भ**

1. दलित साहित्य वेदना आणि विद्रोह – प्रा. भालचंद्र फडके.
2. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह – शरणकुमार लिंबाळे.
3. गोलपीठा – नामदेव ढसाळ.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January 2021

Special Issue 259 (B)

## वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषाएं, संस्कृति और साहित्य की पारस्पारिकता



**Guest Editor -**
Dr. Babasaheb M. Gore,
Principal,
Janvikas Mahavidyalaya Bansarola,
Tq.- Kaij, Dist.- Beed

**Executive Editors :**
Prof. Dr. Murlidhar A. Lahade
Dr. Gopal S. Bhosale
Dr. Ramesh M. Shinde
Dr. Arvind A. Ghodke

**Chief Editor :** Dr. Dhanraj T. Dhangar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue -259 (B) 'वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषाएं, संस्कृति और साहित्य की पारस्पारिकता'
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 35 | वैश्वीकरण में हिन्दी भाषा व साहित्य की नई प्रवृत्तियाँ | डॉ. बी. एल्. गुंडूर | 126 |
| 36 | दलित विमर्श : आंबेडकरवादी विचारधारा | डॉ. राजकुमार जाधव | 130 |
| 37 | लोकसंस्कृति में त्योहारों का महत्त्व | डॉ. अशोक कुमार मीना | 132 |
| 38 | डॉ. सुशीला टाकभौरे कृत हिंदी दलित उपन्यास 'नीला आकाश' में व्यक्त दलित संवेदना | डॉ. सुखदेव पाटील | 138 |
| 39 | आदिवासी आत्मकथांतील समाजवास्तव | डॉ. विठ्ठल केदारी | 140 |
| 40 | २१ व्या शतकातील नवा शैक्षणिक दृष्टीकोन | डॉ. अमोल गंगणे | 143 |
| 41 | पं. जवाहरलाल नेहरू आणि स्त्री प्रश्न | डॉ. सतीश कदम | 147 |
| 42 | Gender Discrimination in Arundhati Roy's 'The God of Small Things'. | Dr. Ahilya Barure | 150 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue -259 (B) 'वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषाएं, संस्कृति और साहित्य की पारस्पारिकता'
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. 2021

# आदिवासी आत्मकथांतील समाजवास्तव : (उघडा दरवाजा व मी एक स्वप्न पाहिलं!)

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग, सहाय्यक प्राध्यापक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई
E-mail ID : kedari.vitthal@rediffmail.com

आदिवासी मराठी वाङ्मयामध्ये जी आत्मकथने निर्माण झाली आहेत. त्यांनी आदिवासी समाजजीवनाचा चेहरा वाचकांसमोर आणला आहे. प्रस्थापित मराठी साहित्यामध्ये आदिवासी संबंधीचे चित्रण तुरळकपणे पहावयला मिळते. परंतु स्वातंत्र्यानंतर मराठी वाङ्मयात फुले, शाहू, आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य निर्माण झाले. यामध्ये समाजातील सर्वच वंचित घटकांचे साहित्य आले. समाजव्यवस्थेचा खरा चेहरा या साहित्याने विस्कटून दाखविला. आत्मकथनाच्या रुपात आदिवासी साहित्यिकांनी आपले अनुभव वाचकांसमोर ठेवून आपल्या जीवनाचा पट सांगितला आहे. आयुष्याच्या ऐन उमेंदित, शेवटी शेवटी त्यांना आलेले अनुभव साहित्यातून शब्दबद्ध केले. हे अनुभव लेखकांना जीवनाच्या प्रगतीकडे वाटचाल करावयास, समाजाच्या विकासाकरीता कार्य करावयास महत्त्वपूर्ण ठरले याचा प्रत्यय साहित्याने करुन दिला.

लातूर जिल्ह्यातील रामराजे आत्राम या गोंड जमातीतील तरुणाचे ‛उघडा दरवाजा’ हे आत्मकथन होय. गोंड जमातील जन्मलेल्या रामराजे आत्रामांनी कठीण परिस्थितीत शिक्षण घेवून उदरनिर्वाहाकरीता लातूर जिल्हा परिषदेमध्ये लिपिकाची नोकरी मिळविली. त्यांना सादारणपणे १९८४ ते २००६ पर्यंतचा वीस वर्षांचा कालावधी आत्मकथन लेखनासाठी लागला. लेखक म्हणतो हे पुस्तक लिहिण्याआधी माझ्या पिढ्यांना अक्षर ओळख नव्हती. माझी ओळख फक्त जंगल, नद्या, जल, पशू, पक्षी आणि वनांतील अमोल ठेवा असलेली वनोंषधी, जटीबुटी ह्यातच होती. माझ्या पिढ्यांकडून मला मिळालेला वारसा म्हणजे पानांवरुन वनस्पती ओळखणे एवढाच होय. आत्मकथेतून आदिवासी समाजाची जीवन व्यथा सांगतात. आपल्या कुटुंबाचे जगणे आणि माझ्या शिक्षणासाठी कुटुंबाचा चाललेला संघर्ष यांतील चित्रण वाचकाला अस्वस्थ करते. समाजाचे आर्थिकदृष्ट्या मागासलेपण, दारिद्र्य आणि व्यसनाधिनतेबरोबरच समाजात अंधश्रद्धाही खूप प्रमाणात आहेत. आदिवासीसंबंधी शासन यंत्रणाही उदासिन असून त्यासंबंधीचे चित्रण रामराजे आत्राम निर्भिडपणे करतात. आदिवासीसंबंधीचे कायदेही जाचक बनले आहेत. ह्यासंबंधीचे अनुभव लेखकाला जातपडताळणी कार्यालयाकडून येतात. ‛त्या त्या जमातीचीं कर्मकांडे आदिवासी जपतो की नाही ह्यातून त्याला प्रमाणपत्र मिळते. लेखकाच्या मते सर्व अज्ञान आणि अंधश्रद्धेशी संबंधीत आहे. एकाच पातळीवर समाज हा विवेकसंपन्न व्हावा, अंधश्रद्धेतून बाहेर पडावा यासाठी कायदे करायचे आणि दुसऱ्या पातळीवर सोयीसवलती देताना मात्र जुने पारंपरिक निकष लावायचे हे सर्व अन्यायकारक आहे.’ असे लेखकाने व्यक्त केलेले मत निश्चितच महत्त्वपूर्ण ठरते. जातवैधतेबाबत शासनाने ठरविलेले धोरण योग्यही आहे. परंतु खरा आदिवासी हा ह्या जाचक अडथळ्यांतून पुढे येण्यास सहजासहजी तयार होणार नाही. त्यामुळे तो आहे तसाच राहणे पसंत करतो. प्रसंगी शिक्षण आहे आणि जात वैधतेकरीता त्याला सतत हेलपाटे मारावे लागतात. ते त्यास आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे शासनाने जात पडताळणीचे कायदे काही प्रमाणात शिथिल करणे आवश्यक वाटते.

लेखकाची पत्नी ज्यावेळी हॉस्पिटलमध्ये मृत्यु पावते. त्यावेळी संतापलेली आदिवासी माणसाच्या संतप्त मनांची उद्विग्नता दिसून येते. अशा परिस्थितीत लेखकाने बाळगलेला संयम महत्त्वपूर्ण आहे. अन्यथा अनर्थ घडण्यास विलंब लागला नसता. असे रामराजे आत्रांमाचे संयमी व शांत व्यक्तिमत्त्वही ‛उघडा दरवाजा’मधून वाचकांसमोर येते. एकूणच आत्मकथेतून वाचकांना प्रामाणिक, शांत, संयमी व्यक्तित्त्वाचे दर्शन घडते. लेखक गावातील कामाचे उदाहरण देतात. त्यांतून आदिवासी माणसांच्या कष्टाळू वृत्तीचे दर्शन घडते. गावातील नाईकवाड्याने लेखक आणि त्याच्या मित्रांना ‛घंझिंगरी कापायच काम’ करण्यासाठी नेले त्यावेळी या आदिवासी तरुणांनी दोन दिवसाचे काम एका दिवसात पूर्ण केल्यावर पोरांची



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

स्तुती म्हणून बाबुराव नाईकवाडे जमलेल्या माणसांना सांगतो की, च्या पोरांनी पाच माणसांचे तीन दिवसाचे काम अर्ध्या दिवसात केलंय. गरीब पोर हाईत आणि इनामदार दिसतात. किती दिवसापासून मी मजूर शोधतोय, माझ्या भितीनं कोणी मजूर भेटत नव्हते. हे स्वतःहून चालून आलेत?छ[2] अशा प्रकारे सामाजिक जीवनातही आदिवासी माणसांच्या प्रामाणिकपणाचे दर्शन अत्यंत प्रांजळपणे घडते. आदिवासी माणसांच्या श्रमाचे मूल्य हे आजही अमूल्य स्वरुपाचे आहे. कोणत्याही कामाला प्रामाणिकपणे न्याय देण्याचा प्रयत्न आदिवासी माणसांचा असतो. सर्व आदिवासी तरुण हे काम स्वतःचे समजून पूर्ण करतात. अशी आदिवासी माणसाची निरपेक्षपणे काम करण्याची प्रवृत्ती परंपरागत आहे.

अशा पद्धतीने आत्राम जंगलात, वनांत, निसर्गात जीवन जगणाऱ्या आदिवासी माणसाचा केंद्रबिंदू स्वतः लेखक आहेत. जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटांवर मात करत रामराजे आत्राम समाजाकरीता कार्य करताना दिसतात. एकूणच आदिवासींचा विकास झाला पाहिजे. त्यांना माणसांसारखे जीवन जगता यावे याकरीता रामराजेंची चळवळ अविरतपणे कार्य करताना दिसून येते. किंबहुना त्यासाठीच त्यांचे जीवन आहे असे लक्षात येते.

घमी एक स्वप्न पाहिलं!ङ (२०१३) या आत्मकथनाच्या माध्यमातून डॉ. राजेंद्र भारुड यांनी धुळे जिल्ह्यातील भिल्ल समाजात जन्मलेल्या मुलाचा जिल्हाधिकारी आय.ए.एस. पर्यंतचा प्रवास कथन केला आहे. आदिवासी जमातीतील घभिल्लङ समाजामध्ये जन्मलेल्या राजेंद्रचे पितृछत्र लहानपणीच हरपले. त्यानंतर त्याची सर्व जबाबदारी आईनेच पेलली. परंपरागत पद्धतीने जीवन जगत, कुटुंबातील इतर नातेवाईकांच्या सहकार्यांनें आईनेच राजेंद्रचे शिक्षण पूर्ण केले. लेखक म्हणतो की, च्माझी आई पाटलाच्या घरी धुणीभांडी करत असे. पाटलांना सर्वजण मालक म्हणायचे. आजोबा एका शेतात जागल्याच काम करत. त्यांची पोरं म्हणजे आई, मामा व मावशी चार-पाच रुपये मजुरीने कामाला जायचे. संध्याकाळी परत येताना गवताची पेंढी किंवा लाकडाची मोळी आणायची व ती पाटलाकडे विकून त्यातून आलेले सर्व पैसे आजोबांकडे द्यायचे हा नियमचं होता. मिळालेल्या काही पैशातून आजोबांची दारुची आग विझत असे. तर उरलेल्या पैशातून घरात चूल पेटत असे.छ[3] अशा प्रकारे लेखकाच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह पार पडत होता. लेखक म्हणतो की आमच्या शेजारी राहणाऱ्या गवलाबाई ह्या माझ्या आईला फार आपुलकीने वागवत असत. आईला त्या कांदे, लसूण, राहू, वालाच्या शेंगा असे कधीकधी द्यायच्या आई त्याबदल्यात काहीना काही देवून त्याची परतफेड करत असे गावातील माणसाचे सहकार्य लेखक निरपेक्षपणे मांडतो आहे.

लेखकाची शाळा सुरु झाली त्यावेळी लेखकाला शाळेची भीती वाटत होती. लेखक शाळेत रडायचा. त्यावर गुरुजी खडसवायचेही, चआता पुन्हा रडलास तर बघ.छ[4] हळूहळू लेखकाला शाळेची आवड निर्माण झाली आणि लेखकाच्या शिक्षणाची सुरुवात झाली. लेखकाची कौलारु जिल्हापरिषदेची शाळा त्याला आवडू लागली. लेखकाला जसजसी शिक्षणाची आवड वाटू लागली. तसतशी गुरुजींचे आईकडे कौतुकही होवू लागले. गुरुजी आईला म्हणायचे, च्बाई, तुमना पोऱ्याकडं चांगल ध्यान द्या. हाऊ पोऱ्या तुमनं नशीब बदली टाकी.छ[5] अशा पद्धतीने लेखकाच्या शैक्षणिक प्रगतीविषयीची माहिती आईकडे येवू लागली. त्यातून जणू काही गुरुजींना उद्याचे भवितव्य दिसत होते असे लक्षात येते. लेखक ज्या परिस्थितीत शिक्षण घेतो. ज्या ठिकाणी राहतो. तेथील वातावरण काही फारसे सुसंस्कृत नव्हते. लेखकाच्या अवती भोवती मुल गुटखा, तंभाखू, दारु, अशा व्यसनांच्या आहारी गेलेला समाज होता. बरेच लोक भिलाटी म्हणजे घ्सामोड्याची घाणङ असेही म्हणत. अशी ओळख असणारा हा भिल्ल समाज प्रतिकूल अवस्थेत जीवन जगत होता. ह्या वस्तीतील रिकामी पोर पोहणे, मासे व खेकडं पकडणे, वाळूमध्ये क्रिकेट खेळणे, अशा प्रकारे इतरत्र भटकत वेळ घालवितात. काही भिल्ल लोक हातभट्टीची दारु पाडत होते. व त्यातून दैनंदिन जीवनाच्या गरजा पूर्ण करतात. लेखक ज्यावेळी अक्कलकुवा येथे घ्नवोदयङ मध्ये शिक्षण घेण्यासाठी जातो. त्यावेळी त्याची आई त्याला शहाणपणाच्या गोष्टी सांगते. ती म्हणजे, च्भाऊ, कोणासंगे कज्या भानगड करानं नही. संगळास संगे प्रेमतीन वागाणं, चांगलं. शिकीसन मोठ्ठं व्हावानं, आत्ते आठला मास्तर म्हणजेच तुनी माय.छ[6] अशा रीतीने आईचा प्रेमाचा सल्लाही लेखकाला त्यांची आई



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

मातृ-हृदयातून देताना दिसते. बाहेरगावी शिक्षण घेण्यासाठी जाताना स्वत:ची काळजी घेण्यासाठी लेखकाला बजावणारी आई पहावयास मिळते. लेखक एम.बी.बी.एस. प्रवेशाचा प्रवेश अर्ज भरावयास जातो त्यावेळी तेथे त्याला उपहासात्मकतेचा अनुभवही येतो. लेखक म्हणतो की त्या कर्मचाऱ्यांच्या मनांमध्ये प्रचंड गैरसमजांचे स्तोम आहे. तो कर्मचारी लेखकाला म्हणतो, "आरक्षणाच्या जोरावर तुमच्यासारखे लोक डॉक्टर बनायला येतात. आणि मग नापास होवून घरी बसतात. फॉर्म कसा भरायचा तेही कळत नाही, वर तोंड करुन मला प्रत्युत्तर देतोस."[७] अशा प्रकारची वागणूक लेखकाला मिळते. एकूण सामाजिक जीवनात जगतानाही आदिवासी म्हणून प्रस्थापितांकडून सहन कराव्या लागणाऱ्या उपेक्षात्मक जगण्याचेही प्रतिबिंब लेखक स्पष्टपणे वाचकांसमोर ठेवतो. त्या निवेदनामध्ये कोठेही आडपडदा ठेवत नाही. अशा पद्धतीने लेखकाने व्यवस्थेतील पूर्वग्रहदूषित अधिकारी वर्गाच्या मानसिकतेचा वेध अचूक घेतला आहे. त्यामुळे अशा प्रकारचे अनुभव जे लेखकाला येतात. तशाच स्वरुपाचे अनुभव आजच्या परिस्थितीत अनेक आदिवासी तरुणांना येतात. विविध ठिकाणी आदिवासी तरुणांना अशाच रीतीने वागविले जाते. एकूणच व्यवस्थेतील विकृत मनोवृत्तीच्या पात्राचे स्पष्टपणाने केलेले आधोरेखन व्यवस्थेचा खरा चेहरा समोर ठेवते. त्यामुळे लेखकाला आलेले अनुभव हे केवळ लेखकाचे न राहता ते संपूर्ण आदिवासी समाजाचे ठरतात.

लेखक ज्यावेळी यु.पी.एस.सी. ची मुलाखत देण्यासाठी गेला त्यावेळी त्याला मुलाखतीमध्ये तुला भविष्यात काय करायचयं? या प्रश्नावर लेखकाने दिलेले उत्तर मुलाखत घेणाऱ्यांना अचंबित करते. लेखक म्हणाला की, च्मला गरीब आणि तळागाळातल्या लोकांसाठी जी काही चांगली कामं करता येतील तेवढी कामं करायची आहेत, त्यासाठी मी युपीएससी परीक्षा देवून आएएस अधिकारी होऊ इच्छितो.र्छ लेखकाने या पद्धतीने आपली भविष्याची वाटचाल मुलाखत पॅनलसमोर ठामपणे सांगितली ती त्यांना आवडली. एकूणच आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजासाठी कसा होईल यादृष्टीने डॉ. राजेंद्र भारुड यांनी आपले हे क्षेत्र निवडले असे लक्षात येते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या माध्यमातून समाजसेवा चांगल्याप्रकारे करता येवू शकेल. समाजाचे ऋण आपल्याला परत करता येईल. अशा हेतूनेच लेखकाने आयएएसची परीक्षा दिली. स्वतः सामाजिक सेवा करण्याचा संकल्प सुरु केला.

घ्अशा पद्धतीने मी एक स्वप्न पाहिल!ङ या आत्मकथनाच्या माध्यमातून डॉ. राजेंद्र भारुड समाजहिताबरोबर समाजाची दशा आणि दिशा बदलण्याचा प्रयत्न पदाच्या माध्यमातून करु इच्छितात. त्यासाठी ते प्रशासकीय अधिकारी झ ाले आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. आत्राम रामराजे, घ्उघडा दरवाजाङ भूमी प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती २००९, पृष्ठ क्र. ०९
२. तत्रैव, आत्राम रामराजे, पृष्ठ क्र. १४६
३. भारुड, डॉ. राजेंद्र, घ्मी एक स्वप्न पाहिलं!ङ दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३, पृष्ठ क्र. १०
४. तत्रैव, भारुड, डॉ. राजेंद्र, पृष्ठ क्र. ३४
५. तत्रैव, भारुड, डॉ. राजेंद्र, पृष्ठ क्र. ३६
६. तत्रैव, भारुड, डॉ. राजेंद्र, पृष्ठ क्र. ७१
७. तत्रैव, भारुड, डॉ. राजेंद्र, पृष्ठ क्र. १०६
८. तत्रैव, भारुड, डॉ. राजेंद्र, पृष्ठ क्र. १३७




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE
## IV JAN. 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Indian Sensibility in Nissim Ezekiel's Poetry | Dr. S.L.Wankhede | 1-4 |
| 2 | Science : The Source To Achieve Utopian Reality | Pawar Sharad Subhashrao<br>Dr. Swapna C. Vyawahare | 5-9 |
| 3 | Foresight of Maharaja Sayajirao Gaekwad Regarding Education and Social Reforms Reflected in his Speeches and Addresses | Dr. Sunanda S. Shelake | 10-13 |
| 4 | Problems And Prospects Of Scheduled Tribes In Maharashtra | Mr. Tukaram Bhivsen Jadhav | 14-17 |
| 5 | The Status Of Issue Rights To Education During Covid-19 Pandemic | Prof. Dr. Dattatraya S. Tambe | 18-24 |
| 6 | Impact of Goods and Services Tax on Indian Economy | Bhurke Gajanan Amruta | 25-27 |
| 7 | Maharashtrian Folk Music | Mr.Prashant V. Nandanvare | 28-30 |
| 8 | Importance of Cycling | Sathe Sanjay Sadashiv | 31-32 |
| 9 | Peasants Movement in India an Economical Approach | Prof. Dr. Sawargaonkar Shankar Laxmanrao | 33-37 |
| 10 | Spots and Economy | Thorat Sainath Dattatray | 38-40 |
| 11 | Benefits of Yoga for College Going Youth | Lt.Dr.Nirajkumar N. Uplanchwar | 41-43 |
| 12 | महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री विषयक विचार व कार्य | श्री.अय्युबखान समशेरखान पठाण | 44-46 |
| 13 | महात्मा गांधी यांच्या विषयी प्रासंगिकता | डॉ.डिगोळे बालाजी विठ्ठलराव | 47-54 |
| 14 | आदिवासी साहित्यातील स्त्री दर्शन | डॉ.के.एन.सोनवणे | 55-61 |
| 15 | जात्यावरील आईवडील विषयक ओवीगीतातील दर्शन | डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे | 62-66 |
| 16 | 'आठवणीचे पक्षी' मधील प्र.ई. चे व्यक्तिचित्र | डॉ. अविनाश श. धोबे | 67-71 |
| 17 | आदिवासी आयकॉन्स : स्वरूप व आकलन | डॉ. व्ही.एस. केदारी | 72-74 |
| 18 | सत्यशोधक जलशाचे प्रयोजन आणि आशय | प्रा.डॉ.बाळासाहेब गावडे | 75-77 |
| 19 | आई विषयक कवितेतून नीतिमूल्यांची उधळण | प्रा.डॉ. संजय बाबुराव खाडप | 78-81 |
| 20 | वामन कर्डक यांच्या लोकगीतांतील परीवर्तनवादी अविष्कार रूपे | प्रा.डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 82-89 |
| 21 | बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील स्त्रीजीवन | श्री. मधुकर बालासाहेब जाधव | 90-91 |
| 22 | "अशोक कौतिक कोळी आणि त्यांचे काव्य लेखन" | प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते<br>पालचेवार पोतन्ना गंगन्ना | 92-95 |
| 23 | नवदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्री शोषणाचे आकलन | डॉ. राजेंद्र ठाकरे<br>श्री. अनिल मोतीलाल वळवी | 96-101 |
| 24 | महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत शाहीर विठ्ठल उपम व इतर काही लोककलावंतांची योगदाने | संजय साहेबराव जाधव | 102-107 |
| 25 | मराठी साहित्यातील 'भारुड' वाङ्मय संकल्पना | डॉ. सुभाष भगवान देशमुख | 108-112 |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# आदिवासी आयकॉन्स : स्वरूप व आकलन

डॉ. व्ही.एस. केदारी,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

आदिवासी समाजातील असामान्य व्यक्तींच्या कार्याचा परिचय डॉ. तुकाराम रोंगटे यांनी या ग्रंथातून केला आहे. व्यक्तिचित्रणात्मक स्वरुपात डॉ. तुकाराम रोंगटे आदिवासी विरांच्या शौर्याचा पराक्रम वाचकांना घडवितात. आपण ज्या समाजात जन्मलो, त्या समाजासाठी स्वातंत्र्योत्तर कालापासून कार्य करणाऱ्या कर्तुत्त्वान व्यक्तीत्त्व समाजासमोर डॉ. रोंगटे आणतात. रेवजीभाई चौधरींचे जव्हारमधील कार्य विशेषतः उल्लेखनीय आहे. जव्हारमधील जमीनदारांकडून कुळांचे होणारे शोषण याविरोधी भूमिका घेवून समाजाला शोषणातून मुक्त करण्यासाठी प्रयत्न केला. समाजातील व्यसनाधिनतेविषयीचे चित्र रेवजीभाईंना अस्वस्थ करत होते. व्यसनांतून त्यांची मुक्तता व्हावी याकरीता प्रयत्न करणारे रेवजीभाई समाज विकासाचा ध्यास घेतलेले सुधारकी होते. समाजाकरीता 'सहकारी राईस मिल' ची निर्मिती करुन सहकारी चळवळी आदिवासीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करतात. १९३२ च्या स्वातंत्र्ययुद्धात त्यांना जव्हार संस्थान विलिनिकरण संदर्भात सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. एकूण समाजासाठी केलेल्या कार्याबद्दल रेवजीभाईंना 'आदिवासी सेवक' म्हणून गौरविण्यात आले आहे.

याबरोबरच गंगाराम जानू आवारी यांनी वनोषधींचा वापर करुन आयुर्वेदिक ज्ञान विकसित करुन अनेक लोकांना आपल्या घरापर्यंत यावयास लावले. नाशिक मधील बोरवट पेठ तालुक्यातील गावात जन्मलेल्या गुरुजींचे कार्य ठक्करबाप्पांच्या नजरेत भरले. पुढे ठक्करबाप्पांशी संबंध आल्यावर 'डांग सेवा मंडळीचे' कार्यकर्ते म्हणून त्यांनी कार्य करायला सुरुवात केली. जंगलातील कीटक, कृमी, पक्षी, पशू यांच्याशी कुटुंबातील नात्यांप्रमाणे नाते जोडणारे गुरुजी त्यांची भाषाही समजत होते. जंगलाला आपला मार्गदर्शक मानणारे गुरुजी होते. माणसाला होणाऱ्या असंख्य आजाराविषयी वनौषधी माहिती असणारे गुरुजी संग्रहक/संग्राहालयच बनले होते. ह्यासंबंधीची माहिती 'औषधे रानावनातली' या पुस्तकातून लोकांसमोर आणली आहेत. याबरोबरच आदिवासींविषयी गाणी, कोकणा जमातीचा शब्दकोश, ह्याविषयी लेखन केले आहे. या रानावनातल्या वैद्याचा गौरव महाराष्ट्र शासनाने १९८७ मध्ये 'दलित मित्र' हा पुरस्कार देवून केलाआहे.

पी. डी. साबळे या आदिवासी महादेव कोळी समाजातील युवकाचा एम. ए. पर्यंतचा स्वातंत्र्योत्तर काळातला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याविषयी म्हटले जाते की, "पांडुरंग साबळे ह्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात एम.ए. अर्थशास्त्रासाठी प्रवेश घेतला आणि व्यवस्थेला नकळतपणे त्यांनी हादरे द्यायला सुरुवात केली. त्यांचे अस्संलखित इंग्रजी संभाषण ऐकूण प्रस्थापितांची अक्षरशः बोबडी वळायची बाकी राहायची."[१] अशा या बौद्धिक संपन्नता लाभलेल्या पी. डी. साबळेंचे व्यक्तिमत्त्व वाचकांमध्ये प्रेरणा निर्माण करते. गुणपत्रिकेत मिळालेल्या कमी गुणांविषयी आवाज उठविणारे साबळे उत्तरपत्रिका पाहण्याची विनंती करतात परंतु त्यास यश आले नाही. बी. जी. खेर यांकडे आदिवासी मोर्चातून मागण्या घेवून जाणारे साबळेंचे व्यक्तीत्त्व समाजासाठी संघर्ष करताना दिसते.

आदिवासी समाजाकरीता निस्वार्थीपणे कार्य करणारे मारुती बांडे ह्यांचे कार्य आदिवासींच्या



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

विकासाकरीता मोलाचे ठरले. जीवनाच्या शेवटच्या क्षणी मुलबाळं नसल्याने झालेली हीन-दीन अवस्था वाचकांना अस्वस्थ करते. तसेच समाजासाठी जीवनत्याग करणारे व्यक्तिमत्त्व भाऊसाहेब वाडिवे झुंजार प्रवृत्तीचे आहेत. यवतमाळ येथे 'आदिवासी शिकवण प्रसारक मंडळ' स्थापन करुन नऊ छात्रालये व सहा पूर्व माध्यमिक विद्यालये सुरु केली. नारायणसिंह उईके आमदार असताना त्यांच्या मदतीने नागपूर येथे नाग विदर्भ आदिवासीय संस्थेचे उपाध्यक्षपद देवून गौरव केला. अशा या आदिवासी समाजाकरीता कार्य करणाऱ्या वाडिवे यांना महाराष्ट्र शासनाने 'आदिवासी सेवक' हा मानाचा पुरस्कार देवून गौरविले आहे. अशा व्यक्तित्त्वाची ओळख डॉ. तुकाराम रोंगटे आपल्या ग्रंथातून वाचकांसमोर ठेवतात. चंद्रपूरमधील अहेरी येथील श्रीमंत राजे विश्वेश्वरराव धर्मराव महाराज यांनी आदिमांची फसवणूक होवू नये. यासाठी आदिवासी सेवा मंडळ, जंगल कामगार संघटना, शांतीसेना ह्या संघटना निर्माण करुन कार्य केलेल्या व्यक्तिमत्त्वांचा परिचय वास्तवाची ओळख पटवते. बाबूराव मडावी ह्यांचे आदिवासीसाठीचे कार्य सामाजिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. बाबाराव मडावी यांनी आपल्या भाषणातून सतत, "राजकीय क्षेत्रात आदिवासींना प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय ते प्रगती करु शकणार नाहीत."[२] ही भूमिका वारंवार समाजासमोर व शासनासमोर ठेवली. एवढेच नाही तर मडावींनी नागपूरला साहित्यिकांची संमेलने भरविली. त्याविषयी त्यांचे मत हे होते की, आदिवासी लेखकांचे साहित्य हे आदिवासींच्या समस्या व सुखदुःखाची चर्चा करणारे असावे अशी अपेक्षा व्यक्त केली. निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला 'दलित मित्र' व 'आदिवासी सेवक' ह्या शासनाच्या पुरस्कारांनी गौरविले आहे.

डॉ. तुकाराम रोंगटे ह्यांनी सावकारांविरुद्ध लढणाऱ्या सक्रु बुधा मेंगाळ ह्यांची ओळख करुन दिली. चौथीपर्यंत शिकलेल्या सक्रुभाईंनी संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरु केले. गरीब आदिवासींचे शोषण करणाऱ्यांना झोडपून काढण्याचे कार्य केले, गावगुंडांना वढणीवर आणले. गुंड आणि दृष्टप्रवृत्ती असणाऱ्यांना सक्रुभाईंची भीती वाटत असे. कालांतराने त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा सुरु झाला. त्याबद्दल लेखक म्हणतात की, "बळवंत कोकतरे आणि सक्रु बुधा मेंगाळ ह्या दोघांच्या मागे अनेकदा पोलिसांचा ससेमिरा असायचा. मात्र अनेकदा पोलिसांना समोरासमोर फसवून ते पसार झालेले असायचे. पुढे तर पोलिसच ह्या दोघांना घाबरत असायचे."[३] अशा पद्धतीने सक्रु मेंगाळांचे व्यक्तीत्त्व होते. सामान्यांच्या हितासाठी सावकार व गुंडांशी केलेली लढाई महत्त्वाची आहे. असे एक धुरंदर व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर येते. नंदूरबार येथील चामूलाल राठवा ह्या आदिवासी काव्य लेखकाची ओळख एका शांत, संयमी व विचारगर्भ व्यक्तित्त्वाची ओळख करुन देते. आदिमांच्या व्यथा, वेदना शब्दांतून मांडून दुःखाला वाट करुन देताना दिसतात. डहाणू येथील महादेव गोपाळा कडू शेती करणाऱ्या आदिवासींना न्याय मिळविण्यासाठी कार्य करत होते. तसेच तलासरी येथील जगविख्यात चित्रकार जीवा सोमा म्हसे यांचे चित्रकलेतील कार्य उल्लेखनीय ठरले आहे. सुखदेव बाबू उईके यांचे पर्यावरणविषयक कार्यामुळे निसर्ग प्रेमी बनले. सामाजिक कार्यामध्ये त्यांनी समाज जागृतीचे कार्य हाती घेतले. तरुण वर्गासाठी प्रबोधनपर गीते बनविली. त्यांचे विषय मुख्यतः ग्रामसभा, सक्षमीकरण, पंचायतराज, रोहयो, जंगल, जमीन ह्यासंबंधीचे होते. अहमदनगर येथील (भंडारदरा) यशवंतराव भांगरे ह्यांनी समाजाचे निरीक्षण केले. समाजाच्या विकासासाठी अहोरात्र प्रयत्न करत राहीले. खाजगी सावकारी मोडीत काढली. 'आदिवासी विकास महामंडळाची स्थापना', 'स्वतंत्र आदिवासी उपाययोजना' इत्यादी माध्यमातून



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

भांगरे यांनी समाजाची सेवा केली. समाजसेवेची ओढ लागलेल्या काळूरामजी यांनी देशाच्या कानाकोपऱ्यातील आदिवासी व श्रमजीवी चळवळींना भेटी देवून भूमिसेनेचा लढा दिला. ह्यांच्या कार्याविषयी बाबा आमटे म्हणतात की, "आणिबाणीमध्ये काळूरामने मेलेले मुदडे उभे केले होते. जित्या जागत्या माणसांना मातीत गाडले जात असतांना त्यांना उभारी दिली होती. काळूरामचे हे काम निश्चित गोरगरिबांना दिशा देणारे असेच होते."[४] अशा ह्या आदिवासींच्या प्रश्नाविषयी कार्यकरणाऱ्या व्यक्तित्त्वाची ओळख करुन दिली आहे. साहित्यिक डॉ. गोविंद गारे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनांचा परिचय आणि आदिवासी समाजाकरीता केलेल्या कार्याचे योगदान सांगितले आहे. गोंडी संस्कृतीचे संशोधक व्यंकटेश आत्रामांचे योगदान डॉ. तुकाराम रोंगटे वाचकांसमोर ठेवतात. आदिवासी मंत्री मधुकररावजी पिचड यांचे समाजासाठीचे योगदान, वाहरु सोनवणे यांचे साहित्यिक योगदान व आदिवासी चळवळीतून आदिवासींकरीता केलेल्या कार्याचा परिचय वाचकांना होतो आहे. आत्मकथनकार नजुबाई गावीत यांचे कार्य रेखाटले आहे. आत्मकथनातून आदिवासी स्त्रीच्या व्यथा, वेदना प्रथमतः वाचकांसमोर शब्दबद्ध झाल्याचे स्वरुप तसेच रामचंद्र जंगले यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केलेल्या कार्यकत्याचे व्यक्तीत्त्व उभे केले आहे. आदिवासी माणसाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करणारे पांडुरंग गांगड वाचकांसमोर येतात. तळागाळातील माणसांसाठी कार्य करणारे गांगड बाबा सामान्यांपासून प्रशासकीय माणसापर्यंत माहिती होते.

"आदिवासी समाज कृती समिती" (१९५३) ह्या समितीच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करणारे श्री. सीताराम जोशींचे कृतिशील व्यक्तिमत्व श्रीमती ठमाताई पवार यांनी रायगड येथे सावकारांविरुद्ध सुरु केलेला लढा सुरु केला. रांची सरकाने २००६ मध्ये ठमाताईंना 'सबल महिला-सबलराष्ट्र' हा पुरस्कार देवून गौरविले आहे. त्यानंतर डॉ. विनायक सांबा तुमराम साहित्यिक, राजकीय व सामाजिक चळवळीतून आदिवासींच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तित्त्वाचा परिचय होतो. त्याचप्रमाणे भुजंग मेश्राम या ऊलगुलानव्रतीच्या कार्याची महती सांगतात. एका विद्रोही कवीची ओळख करुन देतात. श्री. मधुकर तळपाडे या आदिवासी पोलीस अधिकाऱ्याची गाथा चित्रित करतात. त्यांच्या कार्याचा बोध करुन देतात. शेवटी कविवर्य तुकाराम धांडे या निसर्ग कविच्या व्यक्तित्त्वाचा व काव्याचा परिचय वाचकाला होतो. अशा पद्धतीने डॉ. तुकाराम रोंगटे यांनी आदिवासी आयकॉन्सच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या आदिवासी व्यक्तित्वाचा परिचय करुन दिला आहे. महाराष्ट्रातील विविध प्रदेशांत कार्य करणारे हे आदिवासी तरुण प्रामुख्याने समाजासाठी प्रामाणिकपणे कार्य करताना दिसून येतात.

**संदर्भग्रंथ सूची**

१. रोंगटे, डॉ. तुकाराम, 'आदिवासी आयकॉन्स', संस्कृती प्रकशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. ३९
२. तत्रैव, रोंगटे, डॉ. तुकाराम, पृष्ठ क्र. ८०
३. तत्रैव, रोंगटे, डॉ. तुकाराम, पृष्ठ क्र. ८९
४. तत्रैव, रोंगटे, डॉ. तुकाराम, पृष्ठ क्र. १५०

◆◆◆



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN-0971-2156

IMPACT FACTOR (2020) 5.24

SPECIAL ISSUE ON
INTERNATIONAL E-CONFERENCE.
JANUARY-2021

# RESEARCH CARE ASSOCIATION

*International E-Conference on Social Science, Science & Technology, Management and Humanities (ICSSMH) 2021*

Editors
Dr. A. Nageshwarrao
Mr.Shubham Ambhore

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

# INDEX


| Sr. No. | Title of the Papers | Name of Authors | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Analysis of National Food Security Act | Prof.Arun M.Rakh | 01 |
| 02 | The effect of mobile retailing on consumers' purchasing experiences: A dynamic perspective | Dr.A.M. Chandre<br>Mr. A.N. Dhiver | 04 |
| 03 | Geographical Study of Farmer Suicide in Maharashtra: Special Reference to Marathwada | Dr.A.I.Khan | 09 |
| 04 | Art and Science of Voice Culture | Dr.Surekha Murlidharrao Joshi | 14 |
| 05 | Kitchen gardens:-Their Social, Economic and Environmental Contributions to Community | Dr. Jogdand S. K. | 18 |
| 06 | Causes and Impact of Labour Migration: A Case Study of Marathwada Region | Dr.Sidharth S. Jadhav<br>Mr.Sandeep G. Vale | 20 |
| 07 | Indian Modern Agricultural Systems | Dr.Baban M Mohite<br>Kendre Rameshwar Dhondiba | 24 |
| 08 | A Study of Human Resources Management Practices and its Impact on Employees job Satisfaction in Private Sector Banks: A Case Study of Yes Bank | Muntaser A. Almaamari | 26 |
| 09 | Human Rights and Issue of Global Health | Dr. R. K. Kale | 32 |
| 10 | Mobile Marketing in the Retailing Environment | Dr.A.M. Chandre<br>Mr. A.N. Dhiver | 35 |
| 11 | Emerging Issues in E-Commerce in India | Dr. Anurath M. Chandre | 39 |
| 12 | Cyanobacterial Diversity of Dokewada Reservoir in Beed District of Maharashtra | M. L. Thumram<br>S. M. Talekar | 43 |
| 13 | Kiran Desai's Hullabaloo in the Guava orchard:The Study of Multicultural Identity | Dr. Sudhir P. Mathpati<br>Subhash Vitthalrao Pandit | 45 |
| 14 | संविधानिक राष्ट्रवादाचा प्रशासनावरिल प्रभाव | प्रा. डॉ. जाधव विठ्ठल सखाराम | 52 |
| 15 | भारतीय संस्कृति के सोपानो का अध्ययन | प्रा.डॉ. विलास तुकाराम राठोड | 56 |
| 16 | महिला सबलिकरण वास्तव आणि व्यथा | डॉ.अशोक डोळस | 59 |
| 17 | दहशतवाद, नक्षलवाद, राजकोय हिंसा | बडे भागवत रामप्रसाद | 61 |
| 18 | स्त्री स्वातंत्र्याच्या भारतीय संकल्पना आणि कला | प्रा. डॉ. बालासाहेब कोंडिबा जाधव<br>कैलास मच्छिंद्रनाथ होके | 63 |
| 19 | आदिवासी स्त्री : शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक स्थिती | डॉ.बनायत जी .एच.<br>अभिनिता लक्ष्मण बनकर | 65 |
| 20 | बौद्ध धम्मामध्ये दान पारमिता | प्रा. डॉ. मनोहर सिरसाट<br>पाडमुख भाग्यशाली रामदास | 67 |
| 21 | आदिवासी आत्मकथन व चरित्र वाङ्मयातील धर्मांतरविषयी कार्य | डॉ. विठ्ठल केदारी | 69 |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Research Care Association Aurangabad Organized International E-Conference on Social Science, Law, Management, Humanities and Science & Technology (ICSSMH-2021) on 17th Jan. 2021

ISSN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

# आदिवासी आत्मकथन व चरित्र वाङ्मयातील धर्मांतरविषयी कार्य

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड
मो.नं. 9604670208

कोणताही समाज निर्माण होताना स्वत:चा धर्म तयार करत असते. धर्मातील मूल्यांच्या आधारे त्यांचे जीवन सुरु असते. प्रत्येक घटक हा समाजामध्ये जीवन जगताना स्वत:चे अबाधित्व जपत असते. महाराष्ट्रामध्ये जे आदिवासी समूह राहतात, त्यांची स्वत:ची जीवन जगण्याची स्वतंत्र नियमावली आहे. ती नियमावली सर्वांना मान्य असते. त्यानुसार त्यांचे नीति-अनितीचे संकेत ठरलेले असतात. येथे इंग्रज येण्यापूर्वी आदिवासींची स्वतंत्र राज्ये होती, संस्थाने होती. हे आदिवासी येथीलचे मालक होते. परंतु या मूळनिवासींवर कालान्वये विविध समाज घटकांनी सत्ता विस्तारासाठी आक्रमणे करुन एकमेकांची राज्ये, संस्थाने काबीज करुन स्वत:ची सत्ता निर्माण केली. अठराव्या शतकांमध्ये इंग्रजांनी ईस्ट इंडीया कंपनीच्या रुपाने भारतामध्ये व्यापार व साम्राज्यविस्तारासाठी प्रयत्न सुरु केले. इंग्रज भारतात आल्यावर त्यांनी समाजव्यवस्था समजून घेतली. धर्मप्रसाराकरीता येथीलचा प्रदेश त्यांना महत्त्वाचा वाटला. इंग्रजांनी भारतामध्ये ज्या ज्या ठिकाणी वसाहती स्थापन केल्या, त्या त्या ठिकाणी इंग्रजांनी आदिवासींना जबरदस्तीने, आमिषे दाखवून धर्मांतर करवून घेण्यास सुरुवात केली. ही धर्मांतराची चळवळ भारतीय समाजव्यवस्थेतील शेवटच्या स्तरातील घटकांनी स्वीकारली. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये शोषण, अन्याय, अत्याचार, पिळवणूक व दमणाला बळी पडणारा वर्ग इंग्रजांकडून मिळणाऱ्या माणूसपणाच्या वागणुकीसंबंधी समाधानी होता. कारण परंपरागत पद्धतीने आपली समाजव्यवस्था उच्च-नीचतेच्या, श्रेष्ठ-कनिष्टतेच्या दुष्टचक्रात अडकलेली होती. ह्या समाजव्यवस्थेतील माणसांकडून त्यांना आपलेपणाची, सहानुभूतीची प्रेमाची वर्तणूक मिळाली नव्हती. इंग्रजांकडे श्रेष्ठ-कनिष्ठतता नाही, उच्च-निचता नाही. सर्वांना समानतेने वागविले जाते. ही भूमिका येथीलच्या पिचलेल्या, दडपलेल्या, अन्यायी -अत्याचारीत जीवन जगणाऱ्या वर्गाला चांगली वाटली. त्यामुळे ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याकडे काही घटकांचा कल या कालखंडात होता. एका बाजूने प्रेम, आपुलकीने व स्वखुशीने शोषीत ख्रिश्चन धर्म कसा स्वीकारतील यासाठी इंग्रजांचा प्रयत्न होता. तर दुसरीकडे त्यांच्या सत्तेची पाळेमुळे घट्ट झाल्यावर येथील लोकांवर सक्तीने धर्मांतर करावयास भाग पाडले. त्यांना धर्मप्रसाराच्या माध्यमातून धर्म वाढवावयाचा होता. हेच ध्येय या कालखंडातील ख्रिस्ती मिशनरी व ईस्ट इंडीया कंपनीसमोर होते.

आदिवासी मराठी साहित्यामध्ये चरित्र व आत्मकथने लिहिली आहेत. त्यांतून इंग्रजांनी आदिवासींचे सक्तीने धर्मांतर करावयास सुरुवात केली होती. याचे चित्रण चरित्रांतून पहायला मिळते. इंग्रजांच्या या वृत्तीमुळे आदिवासी विरांनी, पुरुषांनी इंग्रजांच्या या धोरणाविरोधी चळवळी उभ्या केल्या. इंग्रजांच्या या भूमिकेला विविध प्रकारे विरोध करणारे आदिवासी तरुणांनी विविध चळवळी निर्माण केल्या आहेत. या चळवळीच्या माध्यमांतून आदिवासींनी इंग्रजांच्या या सक्तीच्या धर्मांतराला कडाडून विरोध केला. परिणामी इंग्रजांसोबत लढता लढता त्यांनी प्राणाचे बलिदान दिले आहे. पुढिलच्या काळात आदिवासींचे धर्मांतराविरोधी चळवळ प्रखर झाली. बिरसा मुंडाच्या चरित्रांचा विचार करताना ख्रिस्ती धर्माकडे वळण्याची वृत्ती का झाली याची माहिती मिळते. बिरसा साल्गा या गावी जयपाल नाग या शिक्षकाकडे शिक्षण घेण्यासाठी जावू लागला. त्यावेळी तेथील ख्रिस्ती धर्मप्रसारकाशी त्याचा संबंध आला. हा माणूस आदिवासींना शिकविण्याचे मिशन जमवून त्यांच्यापुढे आपल्या धर्माचा प्रसार करत असे. ह्या गावामध्ये जयपालाने सुरु केलेली शाळा ही शासनमान्य नव्हती. बिरसांच्या वडिलांकडे पंरपरागत दारिद्र्य होते. यामुळे त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. नंतर त्यांना मसीहदास नाव मिळाले. चर्चमध्येच बिरसाचाही बाप्तिस्मा करण्यात आला. त्याला दाऊद हे नवे नाव मिळाले. पुढच्या शिक्षणासाठी बिरसाला चाईबासा येथील लूथरन मिशनमध्ये पाठविण्यात आले. बिरसाला ख्रिस्तींच्या दुष्टचक्राची पहिली जाणीव झाली ती इथेच. तेव्हाच त्याच्या मनात ख्रिस्ती मिशनरी व इंग्रजांविरुद्ध घृणेची आग भडकली. मिशनचे प्रसिद्ध पादरी डॉ. नट्रोट ह्यांची त्याने सगळ्यांदेखत अत्यंत कडवट शब्दांत निंदा केली. तो असे म्हणाला, ‟सगळे साहेब टोपीभाऊ ह्याचा अर्थ इंग्रज आणि मिशनरी हे दोघेही सारखेच आहेत.”[1] अशा पद्धतीने बिरसाला ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळेतील अनुभव आल्यावर त्याला याविषयी चिड आली. इंग्रज राज्यकर्त्यांसोबत आलेले ख्रिस्ती मिशनरी हे जणू काही येथीलच्या रानटी असंस्कृत लोकांना प्रभू येसूची सुवचने ऐकविण्यासाठी भारतात आले होते. हळूहळू ह्या मिशनऱ्यांच्या आगमनानंतर आदिवासी समाजासमोर एक नवीन समस्यांच उभी राहिली. ख्रिस्ती मिशनरी आदिमांना केविलवाण्या भूमिकेतून पाहू लागले. जणू मिशनरी आदिवासींचे हितचिंतक आहेत, असेच ते स्वत:ला समजू लागले. आदिवासींना ते थोडीसी सहानुभूती मिळावी म्हणून मिशनरी आदिवासींना म्हणत, ‟तुम्ही जर क्रुसाची जवळीक केलीत तर इंग्रज शासन तुम्हांला साथ देईल. तुमची जमीन बळकावणार नाही. ही लालूच देऊन ते भाबड्या आदिवासींना धडाधड ख्रिस्ती करुन घेऊ लागले. त्यांनी जमिनदारांकडून होत असलेल्या शोषणासंदर्भातही मदतीचे आश्वासन दिले. वस्तुत: हे सगळे इंग्रज अधिकारी आणि पादऱ्यांनी मिळून रचलेले कुटील कारस्थान होते. त्यामुळे ज्या सुविधांवर पूर्वी सर्वांचा समान हक्क होता, त्या आता ख्रिस्ती होणाऱ्यांनाच फक्त मिळू लागल्या.”[2] अशा रीतीने मिशनऱ्यांनी आदिवासींचे ख्रिस्ती करण करण्यासाठी प्रयत्न केले. वाहरु सोनवणे यासंबंधी म्हणतात, ‟आदिवासींना शिक्षण द्यायचे. हुशार



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

करायचे असा हेतू सांगून ख्रिश्चनांचे आदिवासीत काम चालू आहे. आदिवासी भागात, दूर जंगलात, अवघड ठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणात शाळा काढल्या आणि आदिवासी मुलांना शिकवले, हुशार केलेत ही चांगली गोष्ट! पण त्यांच्या या चांगल्या गोष्टीच्या पडद्याआड त्यांनी आदिवासींना ख्रिश्चन धर्म शिकवण्याचेही काम केले. आदिवासींना त्यांचे जीवन, त्यांच्या संस्कृतीकडे पाठ फिरवून ख्रिश्चन धर्म आणि संस्कृती आत्मसात करण्यास भाग पाडली जाते आणि बहुसंख्य आदिवासींना ख्रिश्चन धर्मात ओढून घेतले जाते."[1] प्रत्येकाला प्रत्येकाच्या धर्मांचा, पंथाचा प्रचार आणि प्रसार करता येतो. परंतु हा प्रसार फसवून करणे हे लोकशाहीच्या दृष्टीने मारक आहे. आम्ही तुमचा विकास करतो असे कल्याणकारी विकास साधण्याचे आमिष दाखवून धर्मात घेण्याचा दृष्टिकोन पहायला मिळतो आहे. आजच्या काळातही आदिवासींच्या हिताचा हिस्सा आपणास मिळावा म्हणून आदिवासींना आपल्याकडे ओढू पाहणारे धटकही दिसून येतात. असे चित्र आदिवासीसंबंधीचे लक्षात येते.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी 1958 च्या आसपास आदिवासींना खोटी आश्वासने दिली. त्यात आदिवासींची शुद्ध फसवणूक करण्यात आली. परिणामी आदिवासी समाज व बिरसा या सर्वांनाच धक्का बसला. ह्यानंतर बिरसाच्या कुटुंबाने व ह्या आदिवासीबांधवांनी ख्रिस्ती धर्माकडे पाठ फिरविली असे दिसते. विश्वासघात करण्याची ही वृत्ती बिरसा मुंडा व आदिवासींना कदापि आवडली नाही. स्वातंत्र्यापूर्वीच्या कालखंडामध्ये आदिमांचो फसवणूक इंग्रजांनी याप्रकारे केली. त्यावेळीची इंग्रज नीती व आजच्या काळातील प्रस्थापितांची वृत्ती ही एकसारखीच असल्याचे दिसते.

बिरसाने सामाजिक धार्मिक चळवळ सुरु केली. सर्व आदिवासींचे पाडे हिंडून-फिरुन त्यांनी आदिवासी समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. आदिवासींना न्याय, हक्कांची जाणीव करुन दिली. सर्व आदिवासी समाजामध्ये जनजागरण करुन बिरसाने आदिवासी करीता स्वतंत्र धर्म उभा करण्याचा प्रयत्न केला. घ्बीरसा धरमङ ह्या नावाने हा धर्म पुढे आणला. त्यांने लोकांसमोर आणलेला हा नवा धर्म म्हणजे बिरसाचे आंदोलन होते. बिरसाला मुळत: ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म या दोनही धर्माचा कडवा विरोध होता. बिरसाला धर्म निसर्गावर आधारित धर्म हवा होता. आदिवासींना माणूस म्हणून जीवन जगता यावे. यासाठी त्याचे पारदर्शक चिंतन म्हणजे घ्बिरसा धरमङ होय. बिरसाच्या मृत्युनंतर धर्म पुढे घेवून जाण्यासाठी अनुयायी लाभले नाहीत. त्यामुळे हा धर्म विस्तारला नाही. बीरसा धरमाची अकरा व्रते होती ती पुढीलप्रमाणे.

1. "सिंगबोंगा म्हणजे ईश्वर एकच आहे. दिव्य प्रकाशाचा स्रोत तेथूनच होतो. तो विश्वाचा निर्माताही आहे आणि संहारकर्ताही आहे. सर्व प्राणिमात्रांचा व जड पदार्थांचा तो स्वामी आहे. संरक्षक †ÕÆêü."[4]
2. घ्लाखो बोंगांची (देवांची) पूजा करण्याऐवजी केवळ एकाच सिंगबोंगाची पूजा करायला हवी. भूत प्रेतांवर अजिबात विश्वास ठेवू -ाज।."[5]
3. "सिंगबोंगा किंवा इतरही कोणत्याही देवतांपुढे पशूंना बळी देऊ नका. फक्त भात आणि पैसेच पूजेत ठेवा.छ[6]
4. "• ागीची सेवा करा. तिला अजिबात त्रास देऊ नका. प्रत्येक पशु-पक्ष्याबाबत दयाबुद्धी बाळगा. सर्व प्राणीमात्रांवर प्रेम ज रा.छ[7]
5. घ्मांस व मासे खाऊ नका. शुद्ध जीवनासाठी शाकाहार ज रा."[8]
6. घ्दारु पिऊ [illegible]."[9]
7. "साधी राहाणी असू द्या. घर स्वच्छ ठेवा. स्वच्छ कपडे घाला. घरात तुळशीचे रोप लावून त्याची पूजा करा. घरावर शुद्धतेचे प्रतीक म्हणून पांढरा ध्वज लावा. काही चोरु नका. कधीही खोटं बोलू -ाज।."[10]
8. घ्एकजूटी ठेवा. गोठ्यात मोठी संकटेही एकजूटीमुळे नाहीशी करता येतात. कधीही आपापसात भांडू -ाज।."[11]
9. घ्आठवड्यातून एकदा गुरुवारी सुट्टी घ्या. तो वेळ ध्यान व जप करण्यात ालावा."[12]
10. "•ावित्र जानवे धारण करा आणि स्नान केल्याशिवाय जेवू -ाका.छ[13]
11. घ्अशुद्ध काही जेवू नका. कुसंग करु नका. ख्रिस्ती मुला-मुलीशी लग्न लावू -ाज।."[14]

अशा पद्धतीने बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजासाठी नवीन धर्म •बीरसा धरमङ निर्माण केला. या धर्मासाठी त्यांना वरील व्रते बंधनकारक असतील असे ठरविले. परंतु बिरसाच्या या धर्माला पुढे घेवून जाण्यासाठी सक्षम अनुयायी लाभले नाहीत. परिणामी •बीरसा धरम' बिरसा मुंडाच्या मृत्युनंतर विकसित झाला नाही. ह्या •बीरसा धरमङ संकल्पनेत सिंगबोंगा ही देवता नाही. ती मंदीर, मस्जिद किंवा चर्चशी संबंधीत नाही. त्यांचा सिंगबोंगा म्हणजे निसर्गशक्ती होय. त्यांच्या मते सिंगबोंगा ही निसर्गदेवता जीव, जगत यात व्याप्त असलेली स्वयंचलित चैतन्यऊर्जा होय.

मणिपूरमध्ये आदिवासी नागा जमातीमध्ये गायडिनलू या आदिवासी स्वातंत्र्यसेनानी स्वधर्माचे अस्तित्त्व अबाधित ठेवण्यासाठी लढत होती. येथे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसार सुरु केला होता. काही नागांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. इंग्रज विरोधी लढताना ती पकडली गेली. चौदा वर्षांची शिक्षा झाली. पुढे 1947 ला तिची मुक्तता झाली. परंतु तिला नागालँडलाच राहावे लागले. येथे झेमे, लियांगमई, व राँगमई या तीन नागा जमातींचे ऐक्य घडवून आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. राणी गायडिनलूचे कार्य म्हणजे आदिवासी समाजासाठी कार्य करताना, घ्पारंपरिक नागा संस्कृती जतन करण्यासाठी व अन्य कोणत्याही धर्माकडे नागांनी वळू नये म्हणून •हरकाङ (शुद्ध) असा स्वत:चा धर्मही तिने प्रस्थापित केला होता."[15] राणी गायडिनलू यांनी आदिवासी जमातीच्या संवर्धनासाठी प्रयत्न केल्याचे दिसतात. आदिवासी समाजातील धर्मव्यवस्था टिकावी ह्या व्यवस्थेतून समाज दुसऱ्या धर्मव्यवस्थेत जावू नये. यासाठी स्वत:ची समूह श्रेष्ठ आहे. तो जपण्यासाठी बिरसा मुंडा, राणी गायडिनलू यांचे कार्य पहायला मिळते.

डॉ. विनायक तुमराम ह्यांनी घ्आदिवासी धर्म व संज त्पाी या पुस्तकांतून आदिवासी धर्मांतराचा विचार स्पष्ट करताना दिसतात. त्यांच्या मते "• ोणाच्या/Eüß धार्मिक भावना न दुखवता किंवा धर्मांतरासारखा अवघड



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

मार्ग न अवलंबिता आदिवासींचे धर्म परिवर्तन ह्या देशात घडून येवू शकते, असा माझा विश्वास आहे. हे जर घडून आले तर ह्या घटनेची नोंद सुवर्णाक्षरांनी इतिहासात होईल. कारण धर्मांविना आदिवासी समाज एकसंघ, एकात्म व मजबूत होऊच शकत नाही हे काळानेच ठरवून दिले आहे. ह्या धर्माची पुढे रीतसर बांधणी करण्यासाठी त्यादृष्टीने सर्वांनीच सज्ज असले पाहिजे. हे सर्व करताना मात्र राष्ट्रभावनेला व एकात्मतेला तडा जाणार नाही. ह्याची खबरदारी देखील सर्वांनी घेतली पाहिजे. ही भूमी जर आमची आहे, तर ती आमची मायभूमी आहे. हे सर्वांनी लक्षात घ्यावे, ह्याच मायभूमीच्या रक्षणार्थ शेकडो आदिवासी नरवीरांनी आपली जिंदगी बरबार केली आहे. हे सर्वच हुतात्मे ह्याच मायभूमीचे सुपुत्र व आपल्या स्वाभिमानाची गौरवशिखरे आहेत. ह्याचा कुणीही विसर पडू देऊ नये. एक मात्र खरे धर्म जागरणाचे व अस्मिता संवर्धनाचे कार्य मुळात कठीण असले तरी ते अशक्य [illegible]."[16] अशी भूमिका घेवून डॉ. विनायक तुमराम आदिवासी समाजाच्या धर्मासाठी स्वतःचे विचार मांडून आदिवासी समूहांना एकत्रित आणण्यासाठीचा घ्आदिवारी धर्मङ उभा करु पाहतात. डॉ. विनायक तुमराम यांच्या चिंतनातून सातत्याने विचार ते आदिवासी समाजासमोर ठेवताहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर हिंडून-फिरुन डॉ. तुमराम यांनी आदिवासींसमोर आपली भूमिका ठेवली आहे. गावोगावी, खेडोपाडी जावून सभा, संमेलने घेवून तसेच भाषणांतून तुमरामांनी आपले विचार सातत्याने समाजासमोर मांडले. डॉ. विनायक तुमराम यांचे आदिवासी भाषा, साहित्य संस्कृती यांवरील खूप वाचन, चिंतन आहे. आदिवासी समाज भविष्यामध्ये क्रांती करेल. त्या क्रांतीची ही पायाभरणी आहे. अशा पद्धतीने डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासींकरीता आवश्यक असलेला एक स्वतःचा धर्म घ्आदिवासी धर्मङ निर्माण करुन सर्व आदिवासींना एकसंघ ठेवण्याचा प्रयत्न करु पाहत आहेत. हा तुमरामांचा विचार निश्चितच आदिवासींसाठी स्वतंत्र धर्म निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे डॉ. तुमराम यांचा धर्म विषयक दृष्टिकोन आदिमांच्या विकासासाठी आवश्यक वाटतो.

आदिवासी मराठी साहित्यातील चरित्रात्मक वाङ्मयातून आदिवासींनी धर्माच्या रक्षणासाठी आपणाला माणसांसारखे जीवन जगायला लावणाऱ्या व्यवस्था महत्त्वाची मानलेली दिसते. परंपरेने येथील हिंदू धर्म व्यवस्थेत आदिवासी नागवला गेला. काही ख्रिस्ती धर्मांकडे वळला गेला परंतु तेथीलही फसवणूक त्यांच्या लक्षात आल्यावर पुन्हा आपला धर्म निर्माण करु पाहणारा गीरसा धरमङ निर्माण करुन आदिवासींना स्वतंत्र धर्मव्यवस्थेत आणू पाहत होता. नागा जमातीतील राणी गायडिनलूने नागा आदिवासींना आपल्याच जमातीत एकत्र ठेवले. जमातीचे अस्तित्त्व जपण्याचा प्रयत्न केला. डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासींसाठी स्वतंत्र धर्म घ्आदिवारी धर्मङ आणण्याचा प्रयत्न केला. यातून आदिवासींनी आपल्या धर्माचे संरक्षण अथवा ज्या धर्मात माणूसपणाची वागणूक मिळत नाही, त्यातून बाहेर पडून माणसाला माणसांचे जीवन जगता यावे, याकरीता स्वतंत्र निसर्गावर आधारित, नैसर्गिक मूल्यव्यवस्था महत्त्वाचा मानणारा असा घ्आदिवासी धर्मङ निर्माण करुन धार्मिक वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. आदिवासी साहित्य चळवळीचे कार्यकर्ते कॉम्रेड वाहरु सोनवणे म्हणतात, "मी स्वतः धर्म मानत नाही, देवही मानत नाही. (दोघांनी मला न्याय दिलेला नाही, देऊ शकत नाही) भुतेखेतेही मानत नाही. पण कुणी धर्म मानायचाच झाला तर तो आदिवासींच्या धर्मासारखा असावा असे मला वाटते. सर्वप्रथम म्हणजे आदिवासी धर्म इतर धर्मांबद्दल तेवढा द्वेष कधीच बाळगत [illegible]."[17] वाहरु सोनवणे यांनी आदिवासींच्या स्वतंत्र धर्मविषयी व्यक्त केलेले मत विशेषतः महत्वाचे आहे. आदिवासी समाजाने इतर धर्माचे श्रेष्ठत्त्व कमी लेखले नाही. अथवा त्याविषयी त्यांच्या मनामध्ये द्वेषाची भावनाही नाही. परंतु आदिवासी संस्कृती आणि आदिवासींची अस्मिता ह्यांची वैविध्यता अबाधित ठेवून, आदिवासी जीवनातील वेगळेपणाला सामावून घेवून निसर्ग, जल आणि जमीन यांस महत्त्व देणारा आदिवासींचा स्वतंत्र धर्म असणे त्यांना आवश्यक वाटते. हा स्वतंत्र धर्म आदिवासी समाजाला सर्वंकष पातळीवर न्यायापर्यंत घेवून जाणारा आहे.

आदिवासी साहित्यामध्ये आत्मकथन व चरित्र वाङ्मयाचा विचार करता. चरित्र नायकांनी मोठ्या प्रमाणावर धर्मासंबंधीची स्वतंत्र भूमिका मांडलेली दिसून येते. राज्यकर्त्यांच्या मिशनऱ्यांच्या दडपशाही आणि हुकूमशाही व्यवस्थेने आदिवासींवर धार्मिक वर्चस्व लादण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु काही अंशी आदिवासींनी त्याकडे जाण्याचाही प्रयत्न केला. परंतु तेथील दडपशाही आणि सक्ती त्यांना आवडली नाही परिणामी आदिवासी समूहांनी स्वतंत्र आदिवासी समूहांनी स्वतंत्र आदिवासी धर्मासंबंधी विचार केला व स्वधर्माचा पुरस्कार करण्याचा निर्णय घेतला. चरित्रकारांनी व आत्मकथन लेखकांनी आदिवासी धर्मासंबंधी वैचारिक मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून त्यांनी आदिवासींची धर्माच्या नावाखाली होणारी पिळवणूक थांबवावी. आदिवासींना फसवून काही धर्माचे लोक त्यांकडे आकर्षित करत आहेत. यास आदिवासी बळी पडू नयेत. म्हणून आदिवासींची स्वतंत्र संस्कृती आणि जीवनशैलीशी संबंधीत निसर्गपूजक धर्म म्हणजे घ्आदिवारी धर्म' ही संकल्पना आदिवासी विचारवंत पुढे आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात. साहजिकच यामुळे आदिवासींना स्वतःचा धर्म मिळणार ही इंग्रजांच्या आगमणापासूनच सुरु झालेली आहे. त्याकाळापासून आजपर्यंत आदिवासी धर्माचे अस्तित्त्व अबाधितपणे टिकून राहिले आहे. असे दिसून येते. आज आधुनिक युगामध्ये जे आदिवासी तरुण शिक्षण घेताहेत त्यांच्या मनामध्ये आदिवासींच्या उज्ज्वल संस्कृतीचा अभिमान आहे. ते आदिवासींचा स्वतंत्र धर्म असावा यासंबंधी विचार करताना दिसताहेत.

**संदर्भग्रंथ सूची**

1. गारे, डॉ. गोविंद, 'स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी क्रांतिकारकड, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रकाशनकाल 2004, पृष्ठ क्र. 119
2. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 122
3. मुटाटकर, (संपा.) रामचंद्र, 'हाकाराड, वर्ष बारावे : अंक-पहिला-दुसरा, जानेवारी-जून 1991, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, पृष्ठ क्र. 10



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24


4. ऊ.नि., गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 134
5. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
6. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
7. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
8. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
9. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
10. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
11. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
12. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
13. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
14. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 135
15. तत्रैव, गारे, डॉ. गोविंद, पृष्ठ क्र. 190
16. रोंगटे, डॉ. तुकाराम, ‘आदिवासी आयकॉन्सऽ, संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2011; पृष्ठ क्र. 229
17. गारे, (संकलन) डॉ. गोविंद, ‘आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणेऽ, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2005, पृष्ठ क्र. 44



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume - X, Issue - I,
January - March - 2021
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

# AJANTA



Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | ज्ञानेश्वरांची विशुद्ध भक्ती संकल्पना<br>**प्रा. सुहास व्यंकटेश कुलकर्णी** | ११५-११९ |
| २६ | संत दासोपंत<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | १२०-१२२ |
| २७ | संत तुकारामांच्या अभंगातील जीवनमूल्याविचार<br>**प्रा. लक्ष्मी नरहरी पवार** | १२३-१२५ |
| २८ | संत साहित्यातील भक्ती विचार<br>**प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्यकाल** | १२६-१२९ |
| २९ | संत साहित्यातील मधुराभक्ती<br>**प्रा. डॉ. जगताप यु. एस.** | १३०-१३४ |
| ३० | संत साहित्यातील भक्ती विचार<br>**प्रा. कांबळे एस. एस.** | १३५-१३७ |
| ३१ | संत साहित्यातील स्त्री विचार<br>**डॉ. माधवी बादाडे** | १३८-१४२ |
| ३२ | तुका झालासे कळस<br>**प्रा. डॉ. नवीन के. गिलबीले** | १४३-१४६ |
| ३३ | वारकरी संप्रदायाचे आराध्यदैवत आणि संत साहित्यातील विठ्ठलमूर्ती वर्णन : अभ्यासकांची मते<br>**प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे** | १४७-१५१ |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021 AP-4
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २६. संत दासोपंत

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.

महाराष्ट्र ही थोर संताची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रामध्ये विविध संप्रदाय निर्माण झाले. या संप्रदायांनी आपले तत्त्वज्ञान सांगून जीवन उपासनेचा स्वतंत्र मार्ग दाखविला. या सर्वच संप्रदायांनी मानवी कल्याणाचा विचार दिला आहे. प्रत्येक विचारसरणीतून स्वतःच्या जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतानाच संतांनी समाजाला जीवन उपासनेचा विचार दिला. मराठी साहित्यामध्ये महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय वीर–शैव संप्रदाय, नाथ संप्रदाय असे विविध संप्रदाय निर्माण झाले. यामध्ये केवळ वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणावर विकसित झाला.

मराठी संतामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत तुकाराम या संताचे योगदान विशेष महत्वाचे ठरले. या महत्वाच्या संताच्या बरोबरीने अनेक लहान मोठे विविध जाती धर्मातील संताचे कार्यही विशेषत्वाने महत्वाचे ठरते. समाजातील अठरा पगड जातीतील संतांनी आपले अनुभव व परमेश्वरासंबंधी आर्तता अभंग–रचनांतून व्यक्त केलेली पाहयला मिळते.

एकनाथ पंचकातील संतकवी म्हणून संत दासोपंत यांचे योगदान महत्वाचे आहे. संत दासोपंत हे विविध विषयांचे अभ्यासक होते. त्यांना संगीत आणि चित्रकला यांचे उत्तम ज्ञान होते. त्यांनी पासोडी सारखी विशेष ठरलेली रचना लिहिली आहे. याबरोबरच गीतार्णव, पदाण्वी हा ग्रंथ लिहिला आहे. मराठी भाषेत रचना करतानाच त्यांनी संस्कृत, कानडी, तेलगू या भाषांमध्ये त्यांनी लेखन केले. थोडक्यात संत दासोपंत यांना अभिजात संगीत व लोकसंगीताच्या विविध गायकीचे नमुने पदांमधून अभिव्यक्त केले.

संत दासोपंत यांची 'पाडसदेवा' ही एक वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली रचना आहे. परमेश्वर भेटीची तळमळ, आर्तता व्यक्त करण्यासाठी ही रचना लिहिली आहे. परमेश्वरामध्ये आईचे रूप शोधणारे दासोपंत या रचनेतून वत्सभाव रेखाटताना दिसतात. परमेश्वर भक्तीत तल्लीन झालेले संत दासोपंत परमेश्वराला आर्त साद देतात

"मजलागी देवा उचलुनी चारी भुजा हो
पसरोनी साही भुजा।।
अवधूता माझी माय तू तशी
आता न धरिजे भाव दुजा
ऐसा कई येसी।।[1]

परमेश्वराकडे या भूमिकेतून संत दासोपंत भेटीची याचना करतात. ते परमेश्वराच्या भेटीसाठी आतूर झालेले आहेत. परमेश्वराशी त्यांची एकनिष्ठ भक्ती आहे. त्यामुळेच ते अवधूताला परमेश्वराला मला धावत येवून दर्शन द्यावे, भेटावे अशी याचना करतात. या त्यांच्या भावस्थेचे चित्रण व्यक्त करताना ते म्हणतात की,



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

"पाडसदेवा चुकली ये देवा,
फुरंगिणी वन पादे वो।
हरिणी वन भ्रमता हे ।।
वत्सलागी वन सांडूनिया
धेनू धावतासे लवलाही।।"[2]

परमेश्वर भेटीची भावावस्था व्यक्त करताना संत दासोपंत स्वतःची तुलना चुकलेल्या पाडसाबरोबर करतात. वनामध्ये चुकलेले हरणाचे पाडस आईच्या शोधासाठी संपूर्ण वनभर सैरावैरा धावते. त्या चुकलेल्या जशी भाववस्था होते तशी अवस्था दासोपंताची परमेश्वर भेटीसाठी झालेली आहे. वाट चुकलेले पाडस ज्याप्रमाणे आपल्या अवतीभोवती सर्व काही असताना चुकल्यासारखे वाट मिळेल तिकडे पळते, खाद्य–असतानाही त्याकडे त्याचे लक्ष जात नाही. त्यास केवळ त्याची माय हवी असते. मातेलाही आपल्या वासराला शोधल्याशिवाय राहवत नाही. ती मायही इतर कोणत्याही गोष्टीकडे लक्ष न देता. आपल्या बाळाकडे येते. त्याप्रमाणे दासोपंत अवधूताला म्हणतात की, तु मला दर्शन दे मला बाळाप्रमाणे उचलून घेवून दर्शन द्यावे असे म्हणतात. संत दासोपंत अवधूतास म्हणतात की, तु माझी आई आहे तुझ्या या चारही हातांनी मला उचलून घ्यावे. ते पुढे परमेश्वराला विनवतात की माझी आता अंत पाहू नकोस तू धावत येवून मला कवेत घ्यावे. आपल्या दर्शनाने मला तृप्त करावे असे परमेश्वराला विनवतात.

संत दासोपंत हे दिगंबरपंत देशपांडे यांचे सुपुत्र आहेत. दिगंबरपंत 1562 मध्ये बेदरच्या राज्याकडे चाकरीस होते अशी माहिती मिळते. तेथे सारा वसुलीचे कार्य ते करत होते. दुष्काळामध्ये सारा न भरू शकल्याने तत्कालीन राजाकडून त्यांना साऱ्याविषयी विचारणा होवू लागली तसेच राजाने त्यांना जाणीवपूर्वक क्लेष द्यायला सुरूवात केली राजाने दिगंबरपंताना धमकावले. तुमच्या मुलास मुस्लीम धर्माची दीक्षा द्यायला लावू. त्यात दासोपंताचे रूप देखणे होते. मुस्लीम राजा निपुत्रिक असल्याने त्याला उत्तराधिकारी म्हणून दासोपंतांना नेमता येईल असेही मत राजाचे झाले. ही स्थिती जवळ येत आहे असे दासोपंतांच्या लक्षात येताच त्यांनी दत्तात्रेयाचा धावा केला.

दत्तात्रय प्रकट होवून त्या राजाला हुंड्या व द्रव्यराशी देतो असे सांगितले तेव्हा दासोपंत यातून सुटले. दस संप्रदायामध्ये संत दासोपंताचे वाङ्मयीन कार्य महत्वपूर्ण ठरणारे आहे. तत्कालीन अस्मानी–सुलतानीच्या संकटाला प्रत्यक्ष सामोरे जाताना दासोपंत दिसतात. दत्त संप्रदाय हा सर्व धर्मांना सोबत घेवून जाणारा संप्रदाय आहे. मुस्लीमांच्या आक्रमणांमुळे सांस्कृतिक संघर्ष निर्माण झाला. त्यावेळी आपल्या स्वधर्माला उजाळा देत धर्मास बरोबर घेणारा हा संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या प्रवासामध्ये दासोपंतांनंतर मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, माणिकप्रभु, अक्कलकोटकर स्वामी, वासुदेवानंद सरस्वती या दत्तापासक भक्तांनी पुढे दत्तसंप्रदाय चालविलेला आजही महाराष्ट्रात दत्ताची उपासना करणारे अनेक भक्त आढळून येतात.

संत परंपरेतील नाथपंथकातील कवी, दत्तसंप्रदायातील महत्वाचे कवी दासोपंत आहेत. वडील दिगंबरपंत व आई पार्वतीबाई यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. श्रीदत्तप्रभु यांची उपासना ते लहानपणापासून करत होते. बाल वयात विवाह झाला. परंतु ऐन तारूण्यात त्यांना ईश्वरभक्ती व परमार्थ सेवेची आवड निर्माण झाली. त्यांना साहित्य लेखनाचा छंद असल्याने जवळपास शंभरावर रचना त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांनी त्या वेगवेगळ्या रचना लिहिल्या त्यामध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म, दत्तात्रय महात्म्य, प्रबंधस्त्रोत्र, षोडसस्त्रोत्र इ. लेखन त्यांनी केले. याबरोबरच दासोपंतांनी



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

वाचक पूजा, महापूजा, मानसिकपूजा अशा त्यांच्या काही रचना आहेत. संत दासोपंत हे या संप्रदायातील महत्वाचे घटक ठरतात. या संप्रदायाचे दैवत दत्तात्रय असून ते सर्वांकडे समदृष्टीने पाहतात.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयामध्ये अनेक भक्ती संप्रदाय निर्माण झालेले होते. हे भक्ती संप्रदाय महाराष्ट्रात स्थिर झाले. महाराष्ट्रत निर्माण झालेल्या विविध संप्रदायामध्ये दत्तसंप्रदाय 'अवधूत संप्रदाय' हा स्वतःचे वेगळेपण निर्माण करून ठसा उमटविला आहे. आजही या संप्रदायाचे सवतःचे स्थान पाहयला मिळते. स्वधर्म शिकविण्यासाठी प्रयत्न निश्चित केला असे म्हणता येते.

**संदर्भ सूची**

1. अक्षरदीप – मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
2. दत्त संप्रदायाचा इतिहास – रा.चि. ढेरे.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2021

Special Issue 263 (A)

# अनुवादित मराठी साहित्य

## स्वरुप आणि समीक्षा




अतिथी संपादक -
डॉ. वनमाला गुंडरे (रेड्डी)
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.

विशेषांक कार्यकारी संपादक
डॉ. दिलिप भिसे व डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर (येवला)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

SWATIDHAN PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 263 (A) : अनुवादित मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2021

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | अनुवाद आणि मराठी भाषा व साहित्य : काही संदर्भ | डॉ . गणेश मोहिते | 07 |
| 2 | अनुवाद लेखनाचे तंत्र आणि स्वरूप | डॉ. किरण वाघमारे | 14 |
| 3 | अनुवाद आणि मराठी अनुवादीत साहित्य | डॉ. साहेबराव शिंदे | 19 |
| 4 | अनुवाद : संकल्पना, स्वरूप व प्रक्रिया | डॉ. रामकिशन दहिफळे | 23 |
| 5 | अनुवाद संकल्पना : प्रकार व प्रक्रिया | डॉ. लक्ष्मण गित्ते | 26 |
| 6 | अनुवादित साहित्य : समस्या आणि उपयोजन | डॉ.मोहन कांबळे, डॉ.बाबासाहेब गोरे | 29 |
| 7 | अनुवादाचे स्वरूप | प्रा.रा.ज.चाटे | 32 |
| 8 | अनुवादित साहित्य आणि तौलनिक साहित्याभ्यास | डॉ. भरत जाधव | 35 |
| 9 | भाषांतर युग : एक चिंतन | डॉ. राजाभाऊ धायगुडे | 41 |
| 10 | अनुवाद : संकल्पना प्रकार | डॉ. संजय खाडप | 45 |
| 11 | अनुवादीत मराठी लघुकथा | डॉ. छत्रभुज सोळंके | 47 |
| 12 | अनुवादित साहित्य लेखन | डॉ. विठ्ठल केदारी | 49 |
| 13 | भाषांतर युग | डॉ. जगदीश शेवते | 52 |
| 14 | अनुवादित साहित्य : स्वरूप आणि समीक्षा | डॉ. बालाजी रुद्देवाड | 56 |
| 15 | अनुवादाचे प्रकार आणि उपयोगिता | डॉ. म. ई. तंगावार | 59 |
| 16 | अनुवाद प्रक्रिया : भाषा आणि संस्कृती विकासाचा मार्ग | प्रा. दीपक सूर्यवंशी | 61 |
| 17 | अनुवाद : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. गजानन जाधव | 65 |
| 18 | अनुवादाचे स्वरूप व रोजगाराच्या संधी | डॉ. संतोष देशमुख | 69 |
| 19 | अनुवाद : लेखन प्रक्रिया, स्वरुप आणि चिकीत्सा | डॉ. वर्षा गायकवाड | 73 |
| 20 | अनुवादित साहित्य लेखनासमोरील आव्हाने | डॉ. संदीप वाकडे | 77 |
| 21 | दहशतवादी जगताचे वास्तववादी चित्रण करणारी कादंवरी- 'द ब्रेडविनर' | डॉ. ताहेर पठाण | 81 |
| 22 | भाषांतर संकल्पना : प्रकार व प्रक्रिया | डॉ. अनिल बांगर | 86 |
| 23 | भारतीय भाषेतील अनुवादित कादंबऱ्यांचे समीक्षात्मक लेखन | प्रा. वंदना सोनवले | 89 |
| 24 | अनुराधा पाटील यांच्या कवितांचा हिंदी अनुवाद | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर | 94 |
| 25 | अनुवादित साहित्यांची समृद्ध परंपरा आणि 'द अल्केमिस्ट' | प्रा. बाळू मोहन तिखे | 99 |
| 26 | अनुवाद प्रक्रियेतील प्रमुख प्रश्न व समस्या | डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. सचिन रुपनर | 103 |
| 27 | महात्मा बसवेश्वरांच्या 'वचन' साहित्याचा मराठी अनुवाद : एक अभ्यास | उमाकांत चलवदे | 109 |
| 28 | स्टीव्ह जॉब्झ : अधिकृत चरित्र | प्रा. महारूद्र जगताप | 112 |
| 29 | 'पिंजर' -एक अस्वस्थ मनाची संवेदना | डॉ. सोपान सुरवसे | 116 |
| 30 | 'विकारविलसित अथवा शेक्सपिअरकृत हॅम्लेट' नाटकाचे भाषांतर | प्रा. डॉ. सुभाष आहेर, योगेश शेळके | 119 |



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 263 (A) : अनुवादित मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
March-2021

# अनुवादित साहित्य लेखन

डॉ. विठ्ठल केदारी .
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

आजचे युग हे विज्ञान–तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञानाने खूप प्रगती साधली आहे. नवनवे ज्ञान आपल्याला ज्ञात होत आहे. आज विज्ञान तंत्रज्ञानाने माणसांमाणसांमधील अंतर जवळ आणले आहे. दळणवळणाच्या साधनांमुळे मानवी जीवनामध्ये प्रचंड बदल झाला आहे. जगातील भाषिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक परिस्थितीचा परंस्परांना अगदी जवळून परिचय झाला आहे. परस्परांतील भाषिक वैविध्यता लक्षात यायला लागली आहे. आज जगामध्ये इंग्रजी भाषा महत्त्वाची ठरली आहे. ज्ञान भाषा म्हणून तिचा विकास झाला आहे.

भारतीय संस्कृती ही विविध जाती–धर्माची, पंथाची आणि संस्कृतीची असल्याने बहुतांशी घटकांमध्ये वेगळेपण आहे. हे वेगळेपण जरी जीवनासंबंधी असले तरीही त्यापाठीमागील संदेश हा एकसारखाच आहे. धार्मिक तत्त्वज्ञानाबाबतची भूमिका ही प्रत्येक धर्मान्वये वेगळी असली तरीही ते एका अंतिम सत्याकडे वाटचाल करताना दिसतात. भारतामध्ये खूप भाषा बोलल्या जातात या भाषा प्रदेशान्वये, समुहानुसार वेगवेगळ्या आहेत. भारतातील बहुभाषिकतेमुळे अनुवाद प्रक्रियेसाठी खूप मोठा अवकाश आहे. मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, तमिळ, मल्याळम, सिंधी, बंगाली अशा वेगवेगळ्या भाषेतून साहित्य निर्मिती खूप मोठ्या प्रमाणात होत आहे. मराठीतील उत्तम कलाकृती या इंग्रजी, हिंदी, बंगाली किंवा परकीय भाषांमध्ये मोठ्या प्रमाणात भाषांतरीत होवू लागल्या आहेत. आज अनुवाद करण्याकडे अनुवादकांचा कल वाढलेला दिसून येतो. भिन्न भाषा, देश, संस्कृती, पंथ यांना एकत्र आणण्यासाठी अनुवाद महत्वाची भूमिका बजावतो आहे. आज दैनंदिन व्यवहारामध्ये सर्वच क्षेत्रात जिथे जिथे भाषा समजण्याची अडचण येते. अशा वेळेस अनुवाद करून समस्या निवारण करता येते. अन्य भाषेतून आपल्या भाषेत एखादा विषय आणणे म्हणजे भाषांतर होय. आजच्या देवाण–घेवाणीच्या युगात भाषाभाषंमधील देवाण घेवाण अपरिहार्य झाली आहे. भाषेला यामुळेच महत्व प्राप्त झाले आहे असे म्हणता येते. प्रादेशिक भाषा, राष्ट्रभाषा आंतरराष्ट्रीय व्यवहार भाषा म्हणून इंग्रजीचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठी–इंग्रजी या दोन्हाही प्रकारच्या भाषा आकलनामध्ये निपुणता असणे महत्त्वाचे आहे. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुवाद करताना ह्या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

आज अनुवादाला महत्त्व आलेले पहायला मिळते. टि.व्ही. (दूरदर्शन), रेडीओ (आकाशवाणी), वर्तमानपत्रे, नियतकालिके इ. क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना भाषांतराचे अनुवादाचे कौशल्य असणे आवश्यक आहे. किंबहुना या व्यक्तींना त्यामध्ये कौशल्य असणे आवश्यक आहे. अनुवाद ही ज्ञानाशी संबंधीत कला आहे. ही प्रक्रिया साक्षेपी आहे. अनुवाद कशाचा करायचा अनुवाद कोण करतो यालाही या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असते.

दलित साहित्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, आत्मकथा, नाटक, ललित निबंध यांसारखेलेखन विपुल प्रमाणात निर्माण झाले आहे. या साहित्य प्रकाराचा अनुवाद करताना अनुवादकाचे कसब कामाला लावावे लागते. दलित साहित्यिक प्रतिभेला फारसे महत्त्व देत नाहीत. प्रतिमेमुळे नव्या मौलिक कल्पना साकार होत असतात. त्यातून नवनवीन संवेदना निर्माण होत असतात. या प्रकारच्या लेखनाच्या वेगळेपणामुळे नव्या साहित्य प्रवाहाची निर्मिती होत असते. ज्या लेखकाच्या अनुवादातून मौलिकत्व अधिकतेने जाणवते ती निर्मिती उत्कृष्ठ निर्मिती



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ठरते. म्हणून अनुवाद ही प्रक्रिया नव्या कलाकृतीला आकाशदिव्याप्रमाणे ठरतात. या रचना नवलेखकास ऊर्जा देत असतात मौलिक सृजन अनुवादकाला महत्त्व प्राप्त होते. अनुवाद प्रक्रिया दलित साहित्याच्या निर्मितीला पोषक ठरली नाही. मात्र मराठीतील दलित साहित्याच्या अनुवादाने भारतीय समाजजीवन, संस्कृती, धार्मिकता, रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृश्य–अस्पृश्य भेदभावांची जाणीव मराठी दलित साहित्याच्या अनुवादाने साहित्य विश्वाला करून देतानाच जागतिक पातळीवर त्याचे स्वरूप दाखवून दिले.

दलित साहित्याच्या संदर्भात अनुवादाच्या संदर्भात विचार करताना विविध प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. दलित साहित्याची निर्मिती प्रेरणा आणि दलित साहित्याच्या अस्मितेसंबंधी विचार अनुवादक कोणत्या प्रकारे व्यक्त करणार हा लक्षवेधी विचार महत्त्वाचा आहे. तसेच दलित ही संकल्पना भारतीय समाजात आहे. इतर परकीय संस्कृतीमध्ये दलित ही संकल्पना अथवा जाणीव आहे असे आपणास निग्रो जीवनाचे चित्रण वगळता म्हणता येत नाही. मग अशा वेळी दलित जीवन समजून घेणे आणि ते साहित्यातून व्यक्त करणे ही एक तारेवरची कसरतच आहे. ''अनुवादकाच्या भूमिकेसंबंधीच्या या संक्षिप्त अशा सैध्दांतिक चर्चेनंतर आतापर्यंतच्या हिंदी–मराठी साहित्यात अनुवादाने जी भूमिका पार पाडलेली आहे, त्यासंबंधीची माहिती घेण्याचा प्रयत्न आपण करू. मराठीत आधुनिक लघुकथेची सुरूवात इंग्रजी आणि बंगाली भाषेतील लघुकथांच्या मराठी अनुवादानंतरच सुरू होते. वा.सी. गुर्जर नावाचे एक लोकप्रिय कथाकार मराठीत होते. (१९२०–१९२६) यांच्या बहुतेक लघुकथांच्या मुळात बंगाली लघुकथा असायची. हिंदीत द्विवेदी कालखंडात (१९०३–१९२०) अनुवादकाला म्हटले जाते, ते याच अर्थाने की संस्कृत, इंग्रजी, बंगाली आणि इतर देशी–परदेशी भाषांतून प्रकाशित झालेल्या अनेक कलाकृतींचे (लघुकथा, कादंबरी, नाटक, कविता) हिंदी अनुवाद या काळी प्रकाशित झाले. या अनुवादांना वाचूनच नंतरच्या काळात हिंदीत या वेगवेगळ्या आकृतिबंधातून मौलिक असे लेखन प्रकाशित होवू लागले. वेगवेगळ्या आकृतीबंधांचा जन्मच मुळी अनुवादामुळे झालेला आहे.''[१] कोणत्याही कलाकृतीचा अनुवाद करतेवेळी प्रथमतः अनुवादकाला त्या कलाकृतीचे स्वरूप विचारात घ्यावे लागते. याद्वारे अनुवादित कलाकृतीची भूमिका निश्चित करावी लागते. या कलाकृतीचे नाविण्य आणि मौलिकता काय आहे यासंबंधी विचार करावा लागतो. प्रत्येक भाषेत दरवर्षी शेकडो अनुवाद होतात. वाचक अनुवादित साहित्य रचना अभ्यासत असतात. ही अनुवादित पुस्तके वाचकांना सृजनासाठी उद्युक्त करतात. लेखकांनाही हे अनुवाद अंतर्मुख करतात काय? या संबंधीच्या विचार महत्त्वाचा ठरतो. कलाकृतीच्या अनुवादाने लेखकाला विश्वास दिला पाहिजे. त्यास लेखन करण्यास विवश करणारी असली पाहिजे. कलाकृतीच्या अनुवादातून जेव्हं संवेदनशील लेखकाच्या मनात विविध प्रश्न निर्माण करते त्यावेळी अनुवादाची भूमिका महत्त्वाची ठरते.

मराठी साहित्यामध्ये प्रथमतः अनुवादित साहित्याच्या रूपाने इंग्रजी साहित्य अनुवादित झालेले आहे. इंग्रजी वाङ्मयातून आपल्याला विविध प्रकारच्या साहित्याचा परिचय मराठी लेखकांना झालेला आहे. ''शेक्सपीअरच्या नाटकांच्या अनुवादानंतरच आधुनिक नाट्यलेखनाची सुरूवात भारतीय भाषात होवू लागलेली आहे. यामुळेच नव्या साहित्यप्रवाहाच्या मुळात अनुवाद असू शकतात. असा निष्कर्ष काढणे बालिशपणाचे आणि अतिवादी दृष्टिकोणाचे होईल, असा निष्कर्ष काढणे म्हणजे प्रतिभेच्या ताकदीस नाकारणे असेही होईल.''[२] आधुनिक साहित्यामध्ये नाटकांच्या माध्यमातून अनुवाद लेखनाची परंपरा सुरू झालेली आहे. दलित साहित्याच्या अनुषंगाने विचार करताना प्रथमतः दलित साहित्य हिंदी भाषेतून अनुवादित झाल्याचे दिसून येते. दलित लेखकांच्या वेदना भारतीय समाजातील ९० टक्के वाचकांना स्पर्शून जाणारी आहे. म्हणूनच या साहित्याच्या अनुवादाचा विचार हा साहित्यिक घेत असतो. इतर भारतीय भाषांच्या तुलनेत हिंदी जाणणाऱ्यांची संख्याही या



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

देशात सर्वात जास्त होती. यामुळेच मराठीतील दलित साहित्याचा अनुवाद सर्वप्रथम हिंदीतून झाला आहे. एकूणच भारतीय दलित साहित्याचा इतिहास अभ्यासताना अभ्यासकाला या साहित्यप्रवाहाची निर्मिती केव्हा व कशी झाली आणि ती कोणत्या भाषेत झाली तसेच ती निर्मिती इतर भारतीय भाषेत झाली का याचाही विचार करावा लागेल. हिंदीमध्ये अनुवादित झालेल्या कलाकृतीमध्ये १९७०–१९७२ च्या जवळपास नामदेव ढसाळांची कविता व दया पवारांची आत्मकथा 'बलुत' (हिंदी अनुवाद अछूत – डॉ. दामोदर खडसे) ने होते. पूढे प्र.ई. सोनकांबळे यांचे आठवणींचे पक्षी 'यादो के पंछी' (१९८४) अशा मराठीतील दलित साहित्याच्या अनुवादाची सुरूवात होताना दिसून येते.

अनुवादातून आपण आपली संस्कृती आणि भाषा यांचे आदान–प्रदान करत असतो. किंबहुना हा आदान–प्रदानाचा एक मार्ग आहे. अनुवादकाच्या उद्देशापैकी हा एक उद्देश आहे असे आपण म्हणतो. बऱ्याचदा अनुवाद प्रक्रियेमध्ये आपण याला महत्त्व देत असतो. आज खूप ग्रंथ दररोज प्रकाशित होतात. यापैकी श्रेष्ठ कलाकृतीचा अनुवाद अनुवादक करत असतात. ह्या प्रकारचे अनुवाद काल, आज व उद्या होत राहणार आहेत. यामध्ये आज विज्ञान–तंत्रज्ञानाने विशेष भर टाकलेली आहे. ही प्रक्रिया काही अंशाने सोपी होत असली तरीही तेवढीच कठीण आहे. कारण दलित साहित्यातील शब्द, ग्रामीण साहित्यातील शब्द यांचा अनुवाद करताना खूप अडचणी येतात. ''मुळात भाषांतर करण्याच्या कृती कोणत्या, त्यांचे मूळ संस्कृतीतले स्थान कोणते, त्यांचे प्रस्थापित आचार–विचार व्यवहारपरंपरांशी काय नाते आहे, या प्रश्नांचा विचार मुळी राजकीयच ठरतो, कारण त्यातून प्रस्थापित व्यवस्थेचा, तिच्यातील प्रभुत्वगटांचा आणि सत्तासंबंधीचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. स्त्रोतभाषा आणि लक्ष्यभाषा कोणत्या, त्यांच्यातील सत्तासंबंध कोणते अशाही अनेक प्रश्नांचा भाषांतरात आपल्याला विचार करावा लागतो. कारण प्रस्थापितांचे म्हणून जे एक सत्ताकारण असते ते भाषांतराच्या एक क्षेत्रातही कार्यरत असते.''[४] मुख्यत: भारतासारख्या बहुविध भाषा असणाऱ्या देशामध्ये भारतीय संस्कृती आणि भाषा यांच्या स्वतंत्र अभ्यासाची उच्च शिक्षणामध्ये व्यवस्था असायला पाहिजे. एखाद्या महत्त्वाच्या विषयावरील वैशिष्यपूर्ण ग्रंथ आपणाला आपल्याला हव्या त्या भाषेत आणता आला पाहिजे. त्याचे दुसऱ्या भाषेत भाषांतर करून ते ज्ञान आपल्याला इतरांपर्यंत देण्याची व्यवस्था आपल्या भाषेतून व्हायला हवी. यामुळे भाषांतराद्वारे एका भाषेतील ज्ञान दुसऱ्या भाषेत सहजतेने उपलब्ध होईल. परंतु याविषयी भाषांतरकारांमध्ये उदासिनता पाहयला मिळते.

संदर्भ सूची :

१ भारतीय दलित साहित्य (संपादक), डॉ. शरणगुमार लिंबाळे, पृष्ठ क्र. १८७
२ भारतीय दलित साहित्य, डॉ. शरणगुमार लिंबाळे, पृष्ठ क्र. १८७
३ भारतीय दलित साहित्य, डॉ. शरणगुमार लिंबाळे, पृष्ठ क्र. १९५



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME - I ISSUE - IV
JAN. TO MAR. 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ower of Knowledge Peer Review Journal, Volume I, Issue:IV Jan to March 2021 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Microscopic Picture of Modern Woman's Loneliness in Halfway House | Asst. Prof. Atish Chandrakant Akade, | 1-4 |
| 2 | Water Conseruation: Initiatiues and Future Strategies | Dr.Ghodke J.V. | 5-10 |
| 3 | Amino Functionalized Carbon Nanotubes and their characterization | V. S. Patil, S. H. Pisal, M. G. Bagal, V. A. Lohar | 11-16 |
| 4 | ATM Security | Miss. Pooja Dhananjay Deshmukh | 17-22 |
| 5 | A Geographical Study Of Spatial Organization And Hierarchical Ordering Of Rural Market Centre In Satara Thasil | Dr.Rathod S. B. | 23-29 |
| 6 | James Joyce and Dublin; Regional Literature | Dr. S.S.Sasane | 30-32 |
| 7 | Industrial Disputes | Prof. Sainath Dattatray Thorat | 33-36 |
| 8 | Importance Of Ice-Skating | Prof. Sanjay Sathe | 37-41 |
| 9 | The quintessence of Dalit Feminism in Babytai Kamble's ' The Prison We Broke' | Dr. Sudhir Chavan | 42-45. |
| 10 | Utopian Vision for Realistic Republic | Pawar Sharad Subhashrao Dr.Swapna C. Vyawahare | 46-49 |
| 11 | Role of libraries in plagiarism control | Gaikwad vaishali baburao Prof. Dr. Vaishali Khaparde | 50-56 |
| 12 | Role of Library Professionals in a Pandemic Situation COVID-19 | Abhilasha Vijay Chautmol Prof. Dr. Vaishali Khaparde | 57-59 |
| 13 | "Poetry, A Purifying Force : A Study Of Sidney's Concept" | Prof: Randive B.A. | 60-62 |
| 14 | भटक्यांच्या निवडक आत्मकथनांचा वाङ्‌मयीन अभ्यास | कु. अनिषा दादाजी डोहे मार्गदर्शक–डॉ. इसादास भडके | 63-68 |
| 15 | मराठवाडी बोली : संरचनात्मक अभ्यास | डॉ. अंजली दत्तात्रय टापरे | 69-73 |
| 16 | आगंतुकाची स्वगते : उद्‌ध्वस्त गावशिवार जगणा–या अंर्तमनातील वेदना | प्रा. बाजीराव कृष्णाजी पाटील | 74-78 |
| 17 | संत कवियित्री सोयराबाई | डॉ.भैरगुंडे एस.एस. | 79-83 |
| 18 | सुन्हद्‌गाथा': नवीन स्त्री मिथकांचा शोध | डॉ.एम.ए.कव्हळे | 84-88 |
| 19 | हुतात्म्यांना अर्पण केलेली 'सातबारा'याकवितेचे वेगळेपण | प्रा.डॉ.गजानन जाधव | 89-92 |
| 20 | संत नामदेवांचा शिष्य–परिसा भागवत याचे गर्व परिहरण | सौ. हिरा वाघ | 93-96 |
| 21 | सूची रचनेची तत्वे व स्वरुप | प्रा.डॉ.हांडे मंगल नामदेव | 97-103 |
| 22 | ''नवोदत्तरी श्रमिक आत्मकथनांचे वेगळेपण'' | श्री. राजेंद्र शरद जोरवर डॉ. राहुल राजाराम हांडे | 104-107 |
| 23 | महिला सबलीकरण आणि स्त्रीलेखिका | डॉ. विठ्ठल केदारी | 108-110 |
| 24 | प्रा. दिलीप परदेशी यांच्या 'निष्पाप' नाटकातील. शोकांतिका | प्रा.डॉ.सौ.मंगल एकनाथ डोंगरे | 111-116 |
| 25 | श्री.तोताराम महाराज यांचे काव्य | प्रा.मंगला सखाराम चौधरी | 117-121 |
| 26 | शंकर पाटील यांच्या कथेतील ग्रामीण कष्टकरी स्त्री | डॉ.मानसी दशरथ जगदाळे | 122-125 |
| 27 | 'फेसाटी' कादंबरीतून चित्रित झालेले बेरोजगारीचे | मिनाक्षी मोतीराम इंगळे | 126-130 |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# महिला सबलीकरण आणि स्त्रीलेखिका

डॉ. विठ्ठल केदारी

मराठी विभाग, सहायक प्राध्यापक,

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

स्त्रीयांच्या विकासासाठी आधुनिक कालखंडामध्ये प्रयत्न व्हायला सुरूवात झाली. प्रारंभी स्त्रीयांच्याविषयी लेखन करणाऱ्या संत कवयित्रींचे योगदान विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. अगदी अकराव्या शतकामध्ये महानुभाव संप्रदायामधील कवयित्री महदंबा यांचे वाङ्मय महत्त्वाचे आहे. त्यांनी वरविषयक लग्न समारंभामध्ये म्हणावयाची गाणी लिहिलेली आहेत. त्यानंतर पुढील कालौघामध्ये संत जनाबाई यांचे अभंगलेखन स्त्रीच्या अबलात्त्वाला वाचा फोडताना दिसते. 'डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी...' या रीतीने संत वाङ्मयामध्ये एका स्त्रीचा हुंकार पहायला मिळतो. पुढीलच्या वाटचालीमध्ये संत वेणाबाईचे कार्य कर्तुत्त्व आपणास विचारात घेता येते. समर्थ संप्रदायामध्ये संत वेणाबाईचे कार्य विशेष महत्त्वाचे ठरते. महिलांच्या सबलीकरणासंदर्भात या सर्व स्त्री कवयित्रींचे कार्य स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही समाजातील विविध घटक महत्त्वाचे आहे. आपल्या अस्तित्त्वासाठी, हक्कांसाठी झगडताना दिसतात. महिला आणि सामान्य माणसांच्या संदर्भात विचार केला असता हे दोनही समाजातील घटक अतृप्त आणि अस्वस्थ आहेत. किंबहुना त्यांना मुक्तपणाने, स्वच्छंदीपणाने जीवन जगता येते असे नाही. या दोनही समाजातील घटकांचा आक्रोश पाहयला मिळतो.

आज स्वातं;य प्राप्तीनंतरच्या कालखंडात महिलांचे जीवन पाहिले तर महिला वेदना सोबत घेवून जगताना दिसतात. स्त्रीला माणूस म्हणून तिचे हक्क मिळाले आहेत का? याचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. आजच्या दृष्टीने स्त्रीयांचा विचार करता असे लक्षात येते. स्त्रीयांना माणूस म्हणून समाजव्यवस्थेने स्वीकारलेले आहे हे स्पष्टपणाने आपण म्हणू शकत नाही. कारण आज स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार खूप मोठ्या प्रमाणात होता आहेत. स्त्रीयांना समूह व्यवस्थेने ठरविलेल्या अग्नीपरीक्षांना सामोरे जावे लागते. उदा. भटक्या विमुक्त समाजातील जात पंचायती ज्या शिक्षा महिलांना देतात याचा सद्य:स्थिती आपण दररोज दूरदर्शन आणि वर्तमानपत्रांतून पाहत आहोत. यासंबंधी ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या स्तबकात प्रत्येकजन या ना त्या कारणाने शापित अश्वत्थाम्यासारखा वेदना उरी घेवून जगत आहे. तिच्या वाट्याला दु:ख, दास्य, छळ, अवहेलना आपलीकडे काहीच आले नाही त्या 'स्त्री'ला भारतीय राज्यघटनेने स्वातंश्य दिले, समानता दिली. भारतीय घटनेचे पंधरावे कलम सांगते की, स्त्री व पुरूष असा कोणताही भेद भारत राष्ट्र करणार नाही. स्त्रीला विकासासाठी दाही दिशा मोकळ्या झाल्या पण तरीही लक्ष्मण–रेशा आहेतच. कारण सामाजिक व आर्थिक विषमतेने ग्रासलेल्या या समाजाचे स्वरूप एकसंध नाही, एकात्म नाही. जात–पात, वर्ण, वर्ग इ. चे अधिष्ठान असलेल्या या समाजव्यवस्थेत कुठल्याही स्तरातील स्त्री अद्याप गुलामीचे जिणेच जगत आहे. चूल, मूल, घर यांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे घेवून जगत असलेली स्त्री अजून एका कोंडलेल्या जगातच आहे. तिचा गतकाळ अनंत अनंत यातनांनी भरलेला तर तिचा वर्तमानकाळ अशांतीचा, अपेक्षाभंगाचा, असमाधानाचा आणि असुरक्षिततेचा



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

आहे. मात्र याच वर्तमानात समाजपरिवर्तनाच्या, मानवमुक्तीच्या लढ्याला गती येत चालली आहे. याचे भान तिला आहे. अगदी खालच्या थरापासून ते वरच्या थरापर्यंत शिक्षण, अर्थाजन, संतति–नियमन इ. अनेक कारणांमुळे स्त्रीजीवनाचे रूप बदलत चालले आहे.''[१] महिला वर्ग सतत कोंडलेल्या पध्दतीने जीवन जगतना दिसतात. स्त्री वर्गाला आपल्या बुध्दीची आणि मनाची शक्ती किती मोठी आहे. यासंबंधी तिला जाणीव नाही. स्त्री आज बंदिस्त जीवन जगणारी राहिली नाही. ती बहुतांशी बंधने झुगारून मुक्तपणे बाहेर येवू पाहते आहे. ती पत्नी, माता आणि दूहिता अशा भूमिका पार पाडताना दिसते आहे. समाजव्यवस्थेतील पुरूशाच्या बरोबरीचा घटक स्त्री आहे. स्त्रीला देहाबरोबरच मनही आहे याची जाणीव तिला झालेली आहे. समाजसुधारक आगरकर ज्या भूमिकेतून स्त्रीचा विकास होवू पाहत होते. त्या पध्दतीने ती परिस्थिती निर्माण होईल.

या परिस्थितीत महिलासंबंधी स्पष्टपणे भूमिका घेणाऱ्या लेखिका ताराबाई शिंदे या आहेत. ताराबाई शिंदे यांनी या दीर्घ निबंधातून स्त्रीयांच्या विकासासंबंधीचा, मानवी हक्कांच्या दृष्टिकोणातून विचार व्यक्त केलेले आहे. त्यातून आपल्याला मानवीय दृष्टिकोनातून स्त्री–जीवनाचा विचार अगदी परखडपणे ताराबाई शिंदे स्पष्टपणे मांडतात. ताराबाई शिंदे आपल्या विचारातून स्त्री–पुरूष अशी तुलना करतात. या निबंधातून त्यांनी स्त्री–पुरूष तुलना यांतून स्त्रीयांवरील अन्याय–अत्याचाराला वाचा फोडू पाहतात. व्यवस्थेने स्त्रीयांना कोणकोणत्या भूमिकेतन पाहतात हे सांगताना म्हणतात, ''स्त्रीया कपटी, असतात असे तुम्हाला वाटते, मग तुम्ही कपटयुक्त लीला पात्रे नाहीत नाहीत का? तुमच्या सारखे कपटी तर या पृथ्वीवर कोणी सापडणार नाही. स्त्री तुमच्यावर प्राणाहून जास्त प्रेम करते यात काही शंकाच नाही. स्त्रीचे मन फक्त एकावरच बसते. तुम्ही मात्र भ्रमरासारखे या फुलावरून त्या फुलावर उडत राहता, परंतु स्त्री जाती तशी नसते.''[२] स्त्री जीवनाविषयी ताराबाई शिंदे स्त्री–मनातील विचार सांगतात. ह्या विचारातून त्या स्त्रीमनातील एकनिश्ठत्त्व व्यक्त करतात. परंतु पुरूश मात्र या स्त्रीयांना फसवतात. प्रामाणिक पणे स्त्रीयांचे प्रेम असले तरी पुरूष केवळ त्या प्रेमाचा उपयोग मन–मानेल त्या रीतीने करवून घेतात. स्त्रीयांचे चारिश्य व पुरूषाचे भाग्य ब्रह्मदेवासही कळाले नाही. स्त्री ही पुरूषासारखी एकाला हाय व दुसऱ्याला बाय ह्या पध्दतीने कधीही जीवन जगत नाही अथवा तिच्या मनात हा विचार कधीही येत नाही. परंतु पुरूषी वृत्ती'' अरे जो मित्र तुमच्याशी उघडपणे निष्कपटाने वागतो त्याच्या तोंडावर गोड–गोड बोलून त्याच्या घरची प्रत्यक्ष लक्ष्मी, त्याच्या अब्रुची रक्षण करणारी जणू तलवार, त्याच्या सर्व सुख दु:खाची वाटेकरीण, त्याच्या सर्व ऐश्वर्याची स्वामिनी असलेल्या स्त्रीला देखील तुम्ही मित्राकडन हिसकावून घ्यायला कमी करत नाहीत.''[३] पुरूषाच्या मनाच्या सुप्त हेतू त्या स्पष्टपणे सांगतात. स्त्रीयांच्या संबंधी पुरूशाच्या मनातील हा विचार दूर व्हावा असा विचार त्या सांगतात. पुरूशी मानसिकता राजगादी, राज्यपद हस्तगत करण्याविशयी एकमेकांच्या जीववार उठतात. केवळ सत्तेकरीता एकमेकांचे जीव घेतात. वतन, पाटीलकी, देशमुखी साठीही एकमेकांचे प्राण घेता असे पुरूशांसंबंधी त्या विचार व्यक्त करतात. सादारपणे १८८२ मध्ये समाजमन व सद्य:स्थिती या प्रसंगी महिलांकडे पाहण्याची दृष्टी कशी होती याचा बोध आपणास होतो. त्यावेळी ताराबाई शिंदे ह्या निबंधाच्या माध्यमातून स्त्रीयांच्या हक्कांविशयी, अधिकाराविशयी, तिच्या समाज जीवनातील स्थानासंबंधी विचार व्यक्त करतात. त्या विचार



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

नांहीत. स्त्रीयांना त्यांचे हक्क व अधिकार मिळविण्यासाठी देव आणि पुरूष वर्ग याबरोबरच धर्मव्यवस्थेने स्त्रियांना गुलामीत कसे बंदिस्त केले आहे यासंबंधी त्या स्पष्टपणे विचार व्यक्त करताना भूमिका घेताना दिसतात. पुरूषी मानसिकता, भावना आणि सांस्कृतीक साम्य भेदांमधून त्या परिस्थितीचे अचूक वेध घेताना दिसतात. पुरूषप्रधान संस्कृतित स्त्रीयांच्या उपेक्षेला न्याय मिळावा. स्त्रीयांना पुरूशांसारखी सामाजिक समानता मिळावी ह्या करीता ताराबाई शिंदे यांची धडपड या माध्यमातून व्यक्त करताना कुणाचीही भीड—भाड ठेवत निर्भिडपणे पहायला मिळते.

सामाजिक परिवर्तनाचा वेग मंद असतो. मूल्यात्मक बदलाची गती संथ असते. घटनेने अस्पृश्यता नष्ठ केली आहे. तसे स्त्रीयांना त्यांच्या विकासासाठी स्त्री—पुरूष समानता, हक्क व अधिकार दिलेले आहेत. १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहिरनामा पाहता, ''संयुक्त राष्ट्रसंघातील जनतेने जाहिरनाम्याच्याद्वारे मानवाच्या मूलभूत हक्कांवरील आपल्या श्रध्देस मानव म्हणून त्यांचे हक्क व योग्यता यांना व स्त्री—पुरूशांच्या समान हक्कांना मान्यता व्यक्त केली आहे आणि सामाजिक प्रगती व व्यापक स्वातंश्याचे जीवनमान अधिकाधिक प्राप्त करण्यास चालना दिली आहे.''[४] स्वातंश्यानंतर स्त्रीयांना सर्व क्षेत्रे खुली झाली. स्त्री—दास्य विमोचन यांचे एक पर्व संपले. राजकीय, शैक्षणिक व सामाजिक हक्क तिला मिळाले आणि आज ती अर्थाजनासाठी बाहेर पडू लागली आहे. ''ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशात लोकांची स्थिती फार वाईट असते. हिंदू लोकांत फारच मूर्खपणा आहे यास्तव स्त्रियांची दूर्दशा फार आहे.''[५] स्त्रीयांच्या स्थानाविशयी भूमिका घटनेने स्पष्ट केलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी हक्क जाहिरनामा यांतून मिळालेले हक्क आणि अधिकारांच्या साहाय्याने जगभरातील महिला स्वतंत्रपणे जीवन जगण्याच्या विचार करताना माणून म्हणून जीवन जगण्याचा विचार त्यांना प्रेरणा देतानाच माणूस म्हणून जगण्यास प्रवृत्त करत आहे. मराठी साहित्य व्यवहारामध्ये वेगवेगळ्या स्त्रीवादी जाणीवा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून मार्ग बदलले आहेत. लेखिका आत्मशोध घेता घेता इतर अनेक विषयांच्या अभ्यासाकडे वळताना दिसतात. मानवी हक्कांच्या उपयोगामुळे स्त्रीया अधिकाधिक स्वतःचा विकास करवून समाजव्यवस्थे पुरूशांच्या बरोबरीने कर्तुत्व सिध्द करताहेत. आज स्त्री—पुरूषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात नावलौकिक मिळविते आहे. कर्तुत्व सिध्द करून दाखविते आहे. ह्या सर्व बदलांची सुरूवात आधुनिक काळात झाली असे म्हणता येते.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. फडके भालचंद्र, मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, पृष्ठ. क्र. ०९
२. स्त्री—पुरूष तुलना, (संपा.) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, पृष्ठ. क्र. ३१
३. स्त्री—पुरूष तुलना, (संपा.) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, पृष्ठ. क्र. ३२
४. ऊ.नि., फडके भालचंद्र, पृश्ठ. क्र. ११


◆◆◆



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME - I ISSUE - I
April to june 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | 85 व्या अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाध्यक्ष मा.श्री.सुरेश खरे यांच्या अध्यक्षीय भाषण | प्रा. श्री. वाव्हळ नरेंद्र पांडुरंग | 108-111 |
| 29 | इतिहासाची शेकात्मिक कथा:जुबा | प्रा.मुतवल्ली मैजोद्दीन | 112-117 |
| 30 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 118-123 |
| 31 | उत्तम कांबळे यांच्या पारध्याची गाय या साहित्यकृतीचा संक्षिप्त मागोवा | प्रा. डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे<br>श्री रामदास धोंडिबा टेकाळे | 124-126 |
| 32 | शेतकरी संघटनेची चळवळ : सामर्थ्य आणि मर्यादा | प्रा.डॉ. गजानन जाधव | 127-129 |
| 33 | मराठी साहित्यात असलेलेकादंबरी वाङ्यमयाचे स्वरुप व महत्व | सारिका संदिपान फरांडे | 130-134 |
| 34 | दलित आत्मकथेत आलेली शाळेतील अस्पृश्यता | प्रा. डॉ.नामदेव शिनगारे | 135-139 |
| 35 | सांस्कृतिक मूल्यांची जोपासणा करणारी दीर्घ किवाता :शेणाला गेलेल्या पोरी | प्रा.बाजीराव कृष्णाजी पाटील | 140-148 |
| 36 | युद्ध नको बुद्ध हवा | डॉ. पुरोषत्तम गुणवंतराव पखाले | 149-151 |
| 37 | अनुवादित साहित्य तंत्र आणि स्वरुप | डॉ. विठ्ठल केदारी | 152-155 |
| 38 | टोपी शुक्ला में चित्रित आधुनिक समस्याएँ | प्रा. कलशेट्टी महादेव काशिनाथ | 156-159 |
| 39 | आपका बंटी उपन्यास में चित्रित बाल मनोविज्ञान | डॉ. सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | 160-163 |
| 40 | बुद्ध वाणी में पाली | प्रशांत हाबु शिंदे | 164-167 |
| 41 | भारतीय समाज और दलित जीवन | गायकवाड रंजना शिवाजीराव | 168-173 |
| 42 | तुलसीदार के काव्य की प्रासंगिकता | डॉ. बोईनवाड एन.एन | 174-177 |
| 43 | भारतातील सर्वाजनिक सहभागाचे मॉडेल Rural Developent | डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड | 178-182 |
| 44 | 19 व्या शतकाचा प्रारंभ आणि महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मीक घडामोडी | प्रा.डॉ.जाधवर बी.डी. | 183-185 |
| 45 | रांजणी गावातील नागशिल्प | डॉ.सावंत के.डी. | 186-188 |
| 46 | राजर्षी शाहूमहाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य | प्रा.राजाभाऊ चव्हाण | 189-192 |
| 47 | नविन कृषी कायदे आणि कृषी उत्पन्न बाजार समिती | प्रा. डॉ. मुजमुले बी. एस. | 193-197 |
| 48 | महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितिचा कार्यात्म आढावा : सातारा जिल्हा | सुनिता बनकर | 198-201 |
| 49 | बी.एड द्वितीय वर्ष आंतरवासिता ऑनलाईन माध्यमातुन उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ. वैशाली शा. कंकाळे | 202-203 |
| 50 | कोकण आदिवासी जमातीची निसर्ग संस्कृती आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास | प्रकाश महादू गावित | 204-207 |
| 51 | जयपूर -अत्रोली घराण्याची परंपरा व वास्तवता यांचा अभ्यास | डॉ. विनोद ठाकूर देमाई | 208-213 |


Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# अनुवादित साहित्य तंत्र आणि स्वरुप

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग सहाय्यक प्राध्यापक ,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,अंबाजोगाई जि. बीड

मराठी साहित्य लेखनामध्ये अनुवादित साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण होते आहे. अनुवादित साहित्य लेखन ही एक कला आहे. ह्यासाठी अनुवादाकडे कमीत–कमी दोन भाषांचे ज्ञान असणे आवश्यक असते. अनुवाद करताना किमान ही अट महत्वाची आहे. अनुवाद सकस आणि परिणामकारक होण्यासाठी अनुवादकाने ह्या बाबीकडे लक्ष देतानाच संस्कृती आणि वर्गीय रचनेसंबंधी जाण असणे गरजेचे असते. ज्यावेळी लेखक साहित्य लेखन करतो त्यावेळी त्यास अनुवाद प्रक्रियेतून सांस्कृतिक अथवा सामाजिक संदर्भाचा अभ्यास असणे गरजेचे असते.

भाषांतर अथवा अनुवाद यास इंग्रजी ट्रान्सलेशन हा इंग्रजी शब्द आहे. भाषांतर करताना सामाजिक गरजा विचारात घेवून होते. आपल्याला वाचन करताना तर कोणाला लेखन करताना भाषिक विकासासाठी भाषांतराची गरज वाटते. भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये अनुवादाला विशेष महत्व आहे. भारतामध्ये विविध भाषा बोलल्या जात असल्याने अनुवादास विशेष चालना मिळते. तसेच भारतामधील विविध प्रदेशातील लोक आपला दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी आपली मातृभाषांतून व्यवहार साधते असतो. भारतामध्ये मराठी, कन्नड, गुजराथी, मल्याळम, उर्दू, पंजाबी आणि संस्कृत भाषेतून तो व्यवहार पूर्ण करत असतो. म्हणजे व्यक्तींच्या व्यवहारामध्ये त्याची भाषा महत्वाची ठरते. परंतु ज्यावेळी त्याला एखाद्या भाषेत अनुवाद करण्याची वेळ येते त्यावेळी त्याची फार अडचण होते. ज्ञान घेण्यावेळी दुसऱ्या भाषेचे महत्व लक्षात येते. अशावेळी दुसऱ्या भाषेचे महत्व विचारात घ्यावे लागते.

एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत संक्रमित करणे म्हणजे भाषांतर होय. साहित्यासंदर्भात भाषांतराचा विचार करणे अवघड प्रक्रिया आहे. कोणत्याही भाषेतून दुसऱ्या



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

भाषेत साहित्याचे भाषांतर करणे हे जिकिरीचे आहे. त्या भाषेचा मूळ आशय, अर्थ यामध्ये कोणताही बदल न होता तो अर्थ अनुवादित करणे हे फार सोपे काम नाही. तो अर्थ अनुवादकाला भाषेत आणणे शक्य होणे महत्वाचे आहे. प्रयत्न केल्याने ह्या गोष्टी शक्य होतात. मात्र नित्याच्या संभाषणात स्थूलमानाने आशय समजणे पुरेशे असते. परंतु अचूक आणि जशास तसा अर्थ येणे अवघड असते.

अलीकडच्या काळात भारतीय भाषांमधील साहित्याची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. प्रामुख्याने कानडी, बंगाली आणि हिंदी भाषेतील उत्तम साहित्य मराठी भाषेत अनुवाद स्वरूपाने येताना दिसते आहे. भारतीय भाषांमधील चांगले, दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित होते आहे. ''आधुनिक मराठी साहित्यात अनुवादाची परंपरा फार जुनी आहे. प्रथम संस्कृत, इंग्रजी व बंगाली भाषेतून मराठीत आले. उदाहरणार्थ 1909 साली सरस्वतीबाई यांनी दामोदर मुखोपाध्याय यांच्या 'मा ओ मेये' या बंगाली कादंबरीची 'सरोजिनी' या नावाने मराठीत अनुवाद प्रसिद्ध झाला. 1992 साली किशोरीलाल गोस्वामी यांच्या 'राजकुमारी' या हिंदी कादंबरीचा कमलाबाई किबे यांनी मराठीत अनुवाद केला. नंतरच्या काळात निरनिराळ्या भाषांतून पुस्तके मराठीत येवू लागली. त्यामध्ये मामा वरेकरांनी केलेले शरच्चंद्र चॅटर्जी यांच्या जवळजवळ सर्व पुस्तकांचे अनुवाद प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारची इतर अनेक उदाहरणे आढळतात.''[1] लेखक अनुवादकांनी लेखक म्हणून ओळख निर्माण केलेली असते. वाचकवर्गामध्ये त्यास मान्यता मिळते. दुसऱ्या भाषेमध्ये आपल्या पेक्षा श्रेष्ठ लेखक आढळला तर त्याची कलाकृती इतर भाषांतमाध्ये अनुवादित करण्यासाठी धडपडतात. अनुवादासाठी लेखक नेहमी अभिजात साहित्यातील श्रेष्ठ कलाकृती निवडतात. बऱ्याचवेळा हे लेखक काव्यवाङ्मयाचा गद्य अनुवाद करताना दिसतात. संवेदनाक्षम मन आणि लेखकाचा अनुभव व वैशिष्ट्येपूर्ण शैली यामुळे लेखकाचे अनुवाद सरस व अजरामर आहे. बऱ्याचदा रसिकांना वाचकांना आवडलेली पुस्तके अनुवादित होतात. ही अनुवादित होणारी पुस्तके मूळ भाषेत श्रेष्ठ असतात असेही असेल हेही सांगता येत नाही. ही पुस्तके वाचकांच्या मनाला भिडलेली असतात. याला आपण वाचकाची नवनिर्मिती असे म्हणू शकतो. येथे एखाद्या कलाकृतीचा अनुवाद करणे ही प्रकिया नवनिर्मितीसारखीच असते. बहुधा अनुवादक आवडत्या लेखकाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करतात. ''कोणत्याही लेखकाला जे सांगायचे असते ते काही फक्त त्याच्या अभिव्यक्तीच्या भाषेपुरते मर्यादित



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

नसते. त्याची भाषा हे त्याचे व्यक्त व्हायचे माध्यम असते. ती भाषा आणि तिने निर्माण केलेल्या भाषिक आणि सांस्कृतिक अवकाशात त्याची साहित्यकृती जरी एकरूप रूजलेली असली तरी तिचे पुनर्रोपन दुसऱ्या भाषेत करणे काही अंशी का होईना शक्य असते. भाषांतराच्या मर्यादा लक्षात घेताही एक गोष्ट जाणवते ती ही, लेखकाला आपल्या साहित्यकृतीतून जो संदेश पोहोचवायचा आहे तो त्याच्या भाषेशी घट्ट बांधलेला असला तरीसुद्धा तो दुसऱ्या भाषेतूनही तितक्याच किंवा थोड्या कमी प्रभावीपणे व्यक्त होवू शकतो आणि म्हणूनच भाषांतराचा खटाटोप करायला भाषांतकार धजावतात.''[2] अनुवादामध्ये मूळ कलाकृती रसिकाच्या मनात सतत जागती राहणे, हे अनुवादकाचे कौशल्य असते विविध भाषांतील कलाकृती मराठीत आणताना दोन्ही भाषांतील अर्थाची सूक्ष्मता, सांस्कृतिक पर्यावरणाची जाणीव आणि म्हणी–वाक्प्रचार यातील नेमके सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ अनुवादकाला परिचित असायला हव्यात. अनुवादकाने हा तोल व्यवस्थितरित्या साधायला हवा. अशा या मराठी भाषेच्या वैविध्यपूर्ण स्थानामुळे मराठीतील अनुवादाचे क्षेत्र दिवसेंदिवस समृध्द होतना दिसत आहे.

आज जी परकीय भाषेतील भारतीय भाषांत भाषांतरे होतात. फ्रेंच भाषा (वा.द. दिवेकर) यांनी जॉ–पॉल सार्त्र या अस्तित्ववादी तत्ववेत्त्याचे 'ले मो' हे आत्मचरित्र पर पुस्तक 'शब्द' या नावाने मराठीत आणले. यामध्ये सार्त्रचे बालपण व त्याकाळात महत्व रेखाटले आहे. ''भाषांतर करताना एका भाषेतील आशय आणि त्या साहित्यकृतीचा आकृतिबंध समजावून घेणे, तिच्यामधील संदेशवहन आणि अर्थवहनाचा बाज लक्षात घेणे आणि तिचे झालेले आकलन दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे हे घडत असते म्हणजे आपण अवगत केलेल्या साधनांनी एखादे कुलूप उघडावे, आतले सगळे गोळा करावे आणि ते दुसऱ्या पेटीत कुलूपबंद करून त्याची किल्ली आपल्या माहितीच्या माणसाच्या हाती सुपूर्त करावी असे हे झाले. या सगळ्याचे साधन असलेली भाषा तिच्या सगळ्या खुंब्यासकट, बारकाव्यसकट समजली पाहिजे आणि मग लक्ष्य भाषा आपल्याला हवी तशी, मूळ साहित्यकृतीच्या आकलनाच्या जवळात जवळ जात वापरता आली पाहिजे. भाषांतरात भाषेच्या वापराला अतोनात महत्व येते ते यामुळेच. शांता शेळके यांनी भाषांतरित केलेल्या 'चौघीजणी'च्या जगात आपण इतके सममाण होतो ते त्यांच्या भाषेवरच्या पकडीमुळे तर राम पटवर्धनाचे 'पाडस' आपल्याला म्हणूनच पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटते.''[3] भाषांतर वाचत



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

असताना खूपदा मूळ भाषेतल्या वाक्यरचनांचा प्रभाव जाणवतो. काही वेळा वाक्यांच्या बारकाव्यावर लक्ष दिल्याने भाषांतरातील सहजतेला खिळ बसताना दिसते. पूर्वीची आणि नंतरची वाक्ये संदर्भासाठी पुन्हा–पुन्हा वाचावी लागतात. त्याशिवाय मराठी संहितेला एकसंधता येवू शकत नाही. भाषा कृत्रिम व तूटकटपणा अशा ढोबळ दोषामुळे अर्थ परिचित होण्यासाठी समस्या उद्‌भवतात. यामुळे अनुवाद फसतो तर काही आशय आणि रंजक विषयाच्या साहचर्याने अनुवाद वाचनीय ठरतात. यावेळी भाषांतरकार नीट समजावून घेवून भाषांतर करत असतो.

वाङ्‌मयाचा अनुवाद करतेवेळी अनुवादक फक्त कलाकृतीचे भाषांतर करत नसतो. यावेळी भाषांतरकाराला त्या समाजाचे सांस्कृतिक वैभव, संदर्भ ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भातून ह्या वाङ्‌मयरचनेला भाषांतरातून निर्माण करावी लागते. यासर्व बाबतीतल्या संदर्भांना अनुवाद करताना अनुवादकाला वरील सर्व गोष्टी विचारात घेवून अनुवाद करावा लागतो. त्यामुळेच कलाकृतीचा अनुवाद श्रेष्ठ होत असतो.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. पुण्यभूषण : आजचा काळ आजचं साहित्य, स्मरणिका, 83 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे, पृष्ठ क्र. 115
2. पुण्यभूषण : आजचा काळ आजचं साहित्य, स्मरणिका, 83 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे, पृष्ठ क्र. 119
3. पुण्यभूषण : आजचा काळ आजचं साहित्य, स्मरणिका, 83 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे, पृष्ठ क्र. 120



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor: 6.91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 6, Vol.I, Special Issue-XXXI, 5 June 2021



# पर्यावरण आणि मानव विकास

**Editor : Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao**

**Address for Correspondence**

***Mrs. Pallavi Laxman Shete***

Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com

***Dr. Rajesh G. Umbarkar***

House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

**(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 34. | संत साहित्यातील पर्यावरण | डॉ. विठ्ठल केदारी | 183 |
| 35. | संत साहित्यातील पर्यावरण | शारदा किशन धामणगावकर | 187 |
| 36. | पर्यावरणाचा समतोल आणि आदिवासी समुदाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संजय सुरेवाड | 190 |
| 37. | संत वाङ्मयातील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध आणि बोध | डॉ. राजीव यशवंते | 194 |
| 38. | आधुनिक शेती व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम | कविता किसन भोये | 202 |
| 39. | माध्यमे आणि पर्यावरण | प्रा.डॉ. कांचन मुळे | 205 |
| 40. | पर्यावरण आणि राजकारण | प्रा. भोये सुरेश मुरलीधर | 211 |
| 41. | पर्यावरणीय समस्या वास्तव आणि राजकारण | डॉ. मारोती तुकाराम घंटेवाड | 215 |
| 42. | पर्यावरण व आर्थिक विकास | डॉ. महेंद्र पांडुरंग पवार | 220 |
| 43. | पर्यावरण संरक्षण, संवर्धनाबाबत जनजागृतीची आवश्यकता | डॉ. सविता शिवनाथ झुंजारे | 222 |
| 44. | भाषा अध्यापनातून पर्यावरण शिक्षण | प्रा.डॉ.लक्ष्मीविष्णू भंडारे | 226 |
| 45. | लोकसंख्या आणि पर्यावरण | डॉ.अशोक भाऊराव माळशिखरे | 233 |
| 46. | "शाश्वतआर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता" | डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे | 239 |
| 47. | कृषि, शाश्वत विकास आणि पर्यावरण | श्री. राहुल सुखदेव पोखरकर | 247 |
| 48. | मानव विकास निर्देशांकातील आरोग्य संवर्धनासाठी यज्ञातून पर्यावरणाकडे वाटचाल | डॉ. राजेश गं. उंबरकर | 252 |
| 49. | लोकसंख्या आणि पर्यावरण | प्रा. डॉ. लक्ष्मण शिराळे | 263 |
| 50. | जैवविविधतेची संकल्पना आणि महत्त्व | श्री.विनायक दशरथ नाकतोडे | 271 |
| 51. | पर्यावरणवाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारण | डॉ. किशोर बी. वासनिक | 274 |




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

# संत साहित्यातील पर्यावरण

डॉ. विठ्ठल केदारी
मराठी विभाग, सहायक प्राध्यापक,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड–431517

मराठी साहित्यामध्ये संत वाङ्‌मयाची परंपरा फार जुनी आहे. मध्ययुगीन मराठी वाङ्‌मयामध्ये संत साहित्याने मोलाची भर घातली आहे. संत ज्ञानेश्वरांनी संत संप्रदायाचा पाया घातला. संत ज्ञानेश्वरांपासून निर्माण झालेल्या वारकरी संप्रदाय आपले अस्तित्व स्वतंत्रपणे टिकवले आहे. वाङ्‌मयप्रकारातील विषय वैविध्यामुळे संताचे अभंग आणि गद्यमय रचना विशेष लक्षणीय ठरल्या आहे. संताच्या स्वतंत्र विचारगर्भतेतून निर्माण झालेले वाङ्‌मय वाचकाला प्रत्येक वाचनावेळी वेगळा अर्थ सांगते आहे. त्या अर्थाच्या पर्यंत पोहोचणे वाचकाला सहजशक्य होत नसले तरीही विचार आणि जगण्यातील प्रामाणिकपणा संत साहित्याने जपला आहे. सर्व जाती धर्मातील संतांनी वारकरी संप्रदायाच्या उभारणीस हातभार दिला आहे. अठरा–पगड जाती धर्मातील समुदायाला कवेत घेवून उभा राहिलेला संत संप्रदाय जीवनानुभूतीला व्यक्त करताना दिसतो. जीवनाचे तत्त्वज्ञान आपल्या साहित्यातून सांगीतले आणि तसे आचरण करण्याचा संदेश भक्तांना, अनुयायांना दिला.

संत वाङ्‌मयामध्ये प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत जनाबाई, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत दासोपंत, संत तुकाराम, संत गाडगेबाबा या संताचे वाङ्‌मय उल्लेखनिय स्वरूपाचे आहे. संत ज्ञानेश्वरांनी संपूर्ण विश्वासाठी विश्व कल्याणाचा संदेश पसायदान सारख्या रचनेतून दिलेला आहे. संत जनाबाई यांनी निसर्गामध्ये काम करताना परमेश्वर आपणाला मदत करतो या भूमिकेतून अभंगरचना केली आहे. संत ज्ञानेश्वर ज्ञानाची प्रतीती ही अनुभवांवर आधारलेली आहे, ही ज्ञानेश्वरांची ठाम खात्री आहे. ते सत्य जो त्या वाटेने मुळी विचलित न होता चालतो, तोच त्याचा अधिकारी होतो. बाकीच्यांना सांगूनही ते कळणारच नाही.

**"साचचि बोलाचे नव्हे हे शास्त्र। पै संसारू जिणते हे शस्त्र।**
**आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरे इथे।।"[1]**

या प्रकारे 'अवघाची संसार सुखाचा करीन' या स्वच्छ हेतूने ज्ञानेश्वरांनी घुणघुण्यासारख्या वाजणाऱ्या घणांमध्ये व रूण झुणत वाहणाऱ्या वाऱ्यामध्ये भवतारक कृष्णाच्या भेटीची असोसी चित्रित केली आहे. फुललेल्या मोगऱ्याच्या घमघमाटाने अवघे वातावरण भारावून टाकून, पैलाडी कोकणाऱ्या कावळ्याचा शकुण सुस्पष्ट केला आहे. ज्ञानेश्वरांच्या सोबतीणे आणि त्यांच्या नंतरही वारकरी



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

पंथाची विजय पताका सर्वदूरपर्यंत घेवून जाण्याचे कार्य संत नामदेवांनी केले आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाची पताका पंजाबपर्यंत घेवून जाण्याचे कार्य केले. संत नामदेवांचा परिवार फार मोठा होता. त्यांच्या संपूर्ण परिवाराला विठ्ठल भक्ताने बांधून ठेवले होते. संत नामदेवांचे व्यक्तिमत्व साधे–सरळ आणि मराठी माणसाच्या मनाचे परिपूर्ण दर्शन घडविते. चमत्कार तेथे नमस्कार करण्याची त्यांची स्वभावप्रवृत्ती असल्याचे दिसून येते. संत नामदेव संत मेळ्याचे रसपूर्ण वर्णन करतानाही दिसतात. संतचरित्रे नामदेवांनी लिहिली आहेत. बाळक्रिडेचे अभंग संत नामदेवांनी लिहिलेले आहेत. या काळातील रूढीप्रमाणे द्वर्थी तत्वज्ञान व लोकशिक्षण देणारे रूपकात्मक अभंगही नामदेवांनी लिहिले आहेत.

**'समर्थाचे बाळ पांघरी वाकळ। हासती सकळ। लाज कोणा।।'**

**किंवा 'थिल्लर ते नेणे सागराचा अंत, मुंगीस अग्नीत रीघ नाही।'**

**'श्वान काय जाणे मेरूचे प्रमाण, कोसळल्या गगन न कळे त्यास।'[2]**

या भूमिकेतून संत नामदेवाचा युक्तीवाद पाहायला मिळतो. संत नामदेवांनी हिंदी, व्रज, अवधी, राजस्थानी व पंजाबी भाषेतही मराठी अविटवाणी पोहोचवली आहे. संत नामदेवांच्या रचना वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदा. 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो।' या संत नामदेवांच्या रचना भाविकांच्या ऱ्हदयावर कोरण्यात यशस्वी होतात.

संत नामदेवांनी 'कुश्चळ भूमीवरी उगवली तुळस' या अभंगातून तुळस या पवित्र मानल्या जाणाऱ्या वनस्पतीविषयी माहिती सांगीतली आहे. तुळसीचे कर्तुत्व संपन्न व्यक्तिमत्वाचे पावित्र्य व्यक्त केले आहे. कोणत्याही पार्श्वभूमीचा विचार न करता आपण त्याच्या कर्तुत्व विचारात घ्यावे ही भूमिका विचारात घेतली आहे.

**''कुश्चळ भूमीवरी उगवली तुलसी। अपवित्र तिथेसी म्हणों नये।।**

**....नामा म्हणे तैसा जातीचा मी शिंपी। उपमा जातीची देवू नये''।।[3]**

कुश्चळ अशा भूमीवर म्हणजे जिला स्पर्श केल्यावर माणसाचे हात मळतात, पाय पडले तरीही मळतात, घाण होतात परंतु अशा जमिनीवर, भूमीवर तुळस उगवली तर तिचे महत्व कमी होत नाही. ती कुश्चळ भूमित उगवली म्हणून तिला अपवित्र म्हणता येत नाही. भारतीय संस्कृतीत तुळसीचे महत्व खूप मोठे मानले गेले आहे.

प्रत्येक घराच्या समोर तुळसीचे रोप लावले जाते. तुळसीच्या पुजेशिवाय दैनंदिन व्यवहार सुरू होत नाहीत. तुळशीचे रोप दिव्य आहे. या रोपाची तुलना इतर रोपांशी करता येत नाही. तसेच



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

निसर्गामध्ये पिंपळाचे महत्त्व वर्णन करतात. संत नामदेव म्हणतात की, पिंपळाच्या झाडाचा जन्म काकविष्ठेतून होतो. म्हणून पिंपळाच्या झाडाविषयी वाईट भाव मनामध्ये बाळगत नाही. नामदेव महाराज पिंपळाच्या झाडाविषयी काकविष्ठेतून जन्म होणारा पिंपळ सर्वांना शुध्द हवा, ऑक्सिजन देतो. भगवान श्रीकृष्णाने श्रीमदभगवद्गीतेतील एका श्लोकात म्हटले आहे की, वृक्षात मी पिंपळ आहे. देवस्वरूप पिंपळ कोणाचे उपकार घेत नाही किंवा कोणाचे उपकार ठेवतही नाही. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानानुसार संकटातून बाहेर पडण्यासाठी पिंपळाच्या झाडाची उपासना केली जाते. पिंपळाच्या झाडाचे महत्व भारतामध्ये मोठे आहे. त्याला मंगलमय मानले गेले आहे.

संत दासोपंत यांनी ईश्वर भेटीचा भक्तीभाव व्यक्त करताना हरिणीचे पाडस वाट चुकल्यावर हरिणीची व पाडसाची झालेली अवस्था गुरूच्या भेटीसाठीच्या आर्ततेसाठी हाक घालताना आपली तुलना हरणाच्या बरोबरीने करतात. दासोपंत कवी मुळता नैसर्गिक संपन्नता लाभलेले कवी आहेत. ईश्वराच्या भेटीची तळमळ, आर्हता व्यक्त करताना वत्संभाव दर्शवितात. वनात हरविलेल्या पाडसाला शोधण्यासाठी माय आईच्या वात्सल्याने हंबरडा फोडते आणि चुकल्याने वाट मिळेल तशी धाव घेते. वनामध्ये भरपूर गवत असतानाही तिचे लक्ष त्याकडे जात नाही. ती केवळ आपल्या बाळाचा शोध घेत राहते.

संत तुकारामांच्या अभंगामध्ये निसर्गाविषयीचे चित्रण अधिक प्रमाणात येताना दिसते. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी। वनचरी पक्षीही आळविती।।', 'तुका म्हणे झरा। आहे मूळचाची खरा।।', 'झरा लागला सुखाचा। तेथे भापारी कईचा।', 'आजि सोनियाचा दिनू। अमृताते वर्षे घनु' हा संदेश देणारे साहित्य केवळ साहित्य राहत नाही. तर ते पुढच्या पीढिला मार्गदर्शक ठरते. विविध प्रकारच्या विषमतेची आणि शोषणाची तलवार सामान्याच्या आयुष्याला अर्थ प्राप्त करते. मानवी जीवनातील निर्मळता संत तुकाराम महाराज अभंगातून स्पष्ट करतात,

**"नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।।**
**तैसी चित्रवृत्ती नाही। तेथे करील काई।।**
**वृक्ष न करी पुष्पफळ। काय करील वसंत काळ।।"[4]**

या उपदेशपर अभंगातून संत तुकाराम महाराज म्हणतात, पाणी स्वच्छ नसेल तर तेथे साबण काय करील किंवा मनच शुध्द नसेल तर तेथे साबण काय करील. त्याने मनाचा मळ धुतला पाहिजे. चित्त शुद्ध असावे लागते, फळ, फूल धारण करण्याची समताच नसेल त्या वसंत ऋतुच्या बहराची काय कल्पना त्याला वसंताच्या आगमनाचा काय उपयोग होणार नाही.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

संत साहित्याचा प्रवास प्रदीर्घ आहे. भाषेचे महत्व आणि श्रेष्ठतव सांगताना संस्कृतच्या जोखडाविरूद्ध ते उभे राहिले. संस्कृत साहित्याच्या अभिजात वाङ्मयातील सर्व वेचक धन त्यांनी स्थलकाल, परिस्थितीप्रमाणे मातृभाषेत संकल्पित केले. समाजाचा गोष्टीवेल्हाळ स्वभाव, लोकप्रिय कथाकहाण्यांचा, पारंपरिक दृष्टान्तासोबत व्यावहारिक व परिचित उदाहरणांची चपलख पेरणी, जन हे शहाणे करणे बापा।, या उदास हेतूला, शुध्दाचरण, सोषिकता, अग्निपरिक्षेतून जावूनही 'विश्व रागे झाले वन्ही। तरी संते सुखे पाणी ही धारणा संताच्या महात्मतेला शाश्वताला सोनवर्ग्व चढवून गेली. 'फेडित जगाचे व्यापताप। पोखित तिरीचे पादप। समुद्राजाय आप। गंगेचे जैसे।' ही विनम्रता या साहित्यात दिसते. 'खावे प्यावे ल्यावे। जमाखर्च तुझ्या नावे।' अशा विश्वासाला 'आम्हा गांजी जन। तरी का मेला नारायण।' असा खमक्या सवाल होताच, पाण्याच्या सहजतेने संतांनी सामान्यांना घराघरात, आचरणात व ओठा अंतःकरणात प्रवेश केला. 'जीवा तळी अंथरिती अपुला जीव', ही भूमिका प्रामुख्याने लक्षात घेता येते. शब्द सामर्थ्य शस्त्रासारखे वापरण्याचे सामर्थ्य संतानी वापरले. यामुळे संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत गाडगेबाबांनी निंदकांना शब्द सामर्थ्याने आपल्या समोर झुकविले.

आज संतसाहित्याच्या संदर्भातून अभ्यासक विविध दृष्टिकोणातून अभ्यास करू लागले आहेत. यु.म.पठाण म्हणतात, "नव्वद नंतरच्या काळात संत साहित्याच्या भाषिक, वाङ्मयीन तसेच समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यासाला गती मिळाल्याचं दिसून येत आहे. विविध संताच्या संप्रदायांच्या चिकित्सक अभ्यास या काळात झाला आहे. तसेच मध्ययुगीन काळातले काही अज्ञात संतही या काळात ज्ञात झाले आहेत."[5] संत साधेपनाने जगले. म्हणूनच असामान्य ठरून गेले. संतसाहित्याचा आणि संतवाणीचा मोठा संदेश आहे. हा संदेश अभ्यासक वेगवेगळ्या भूमिकांतून समाजवून घेत आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. प्रश्नशोध, प्रा. केशव मेश्राम, पृष्ठ क्र. 10
2. ऊ.नि., प्रा. केशव मेश्राम, पृष्ठ क्र. 10
3. अक्षरदीप, संपा. म.अ.मंडळ, डॉ. बा.आं.म.वि., औरंगाबाद, पृष्ठ क्र. 58
4. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. सदाशिव सरकटे, पृष्ठ क्र. 250
5. पुण्यभूषण, स्मरणिका, 83 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पृष्ठ क्र. 86



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380 SRJIS ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL- 10, ISSUE-55

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

मुख्य-संपादक
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

संपादक
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख

अदिवासी



स्त्रीवादी



ग्रामीण



अनुवादित



दलित



नव्वदोत्तरी मराठी साहित्य

# समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा

नाटक

कादंबरी

कविता

कथा

समीक्षा

ललित

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 11 | **समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण : 'पाडा'**<br>*प्रा. डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील* | 76-80 |
| 12 | **समकालीन स्त्रीवादी साहित्यप्रवाह**<br>*प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई* | 81-87 |
| 13 | **समकालीन मराठी ग्रामीण कविता**<br>*प्रा. डॉ. राजकुमार मुसणे* | 88-102 |
| 14 | **केशव मेश्राम-दलित मुक्ती लढ्यातील विद्रोही कवी**<br>*डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ* | 103-105 |
| 15 | **समकालीन आदिवासी कवितेतील संवेदना**<br>*प्रा. डॉ. प्रकाश पी. वट्टी* | 106-114 |
| 16 | **समकालीन मराठी कादंबरी : निळ्या डोळ्याची मुलगी**<br>*डॉ. अर्चना काटकर-सोनवणे* | 115-118 |
| 17 | **जागतिकीकरणात समकालीन मराठी कवितेचे स्वरूप**<br>*डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर* | 119-128 |
| 18 | **'कोरकोंडा' कादंबरी — कायद्याच्या वाटेवरून होणारा संघर्ष**<br>*प्रा. डॉ. अरुण लाडे* | 129-134 |
| 19 | **'पोटमारा' या कादंबरीतील समकालीन जाणिवा**<br>*प्रा. प्रदिप केशव चापले* | 135-143 |
| 20 | **समकालीन मराठी नव कवींची ग्रामीण कविता**<br>*प्रा. डॉ. अतुल नारायन चौरे* | 144-151 |
| 21 | **रेखा बैजल आणि माधुरी शानभाग यांची विज्ञानकथा**<br>*प्रा. रंजिता वीरकर* | 152-158 |
| 22 | **'आलोक' समकालीन दीर्घकथेचा यशस्वी अविष्कार**<br>*प्रा. विकास शंकर पाटील* | 159-163 |
| 23 | **समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना**<br>*प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत* | 164-168 |
| 24 | **आदिवासी आत्मकथने स्वरूप व आकलन**<br>*डॉ. विठ्ठल केदारी* | 169-173 |

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# आदिवासी आत्मकथने स्वरूप व आकलन

**डॉ. विठ्ठल केदारी**
*मराठी विभाग सहायक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड-431517*
*ई.मेल: kedarivitthal@gmail.com मो.नं. 9604670208*

मराठी साहित्यात 1960 पासून विविध साहित्यप्रवाह निर्माण झाले. या साहित्य प्रवाहामुळे समाजातील वेगवेगळे स्तर बोलायला लागले. अभिव्यक्ती करण्याचे उत्तम साधन 'साहित्य' आहे. साहित्यातून माणसाने आपापले जीवनानुभव सांगायला सुरूवात केली. प्रत्येकाला जीवनात जगताना विविध स्वरूपाचे अनुभव येत असतात. यातूनच प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडत असते. आपल्या समाज व्यवस्थेत समाजाची रचना उतरंडीच्या स्वरूपाची आहे. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य अशा स्वरूपाची आपली समाजव्यवस्था आहे. माणसाचा संबंध समाजातील सर्व स्तरांतील आपली समाजव्यवस्था आहे. माणसाचा संबंध समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी येत असतो. त्याकडून विविध प्रकारचे अनुभवही माणसाला येतात. ते अनुभव बहुतांशी चांगले असतात. परंतु ज्या ज्या वेळी माणसाला वाईट स्वरूपाचे अनुभवही येतात त्यावेळी तेथे आपल्याला व्यक्तीची मानसिक विकृती पाहायला मिळते. समाजातील या विविध स्तरांतील लोकांशी संपर्क आल्यानेच लेखकाची, स्वभावप्रकृती बनलेली असते.

मराठी साहित्यविश्वात आदिवासी साहित्याची निर्मिती आपणाला कविता, कादंबरी, कथा, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन इ. साहित्य प्रकारात झालेली दिसते. परंतु या सर्व साहित्यप्रकारांतील रचना वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. आदिवासी साहित्यात आत्मकथन स्वरूपात नजुबाई गावित यांचे 'आदोर' (1995) हे पुस्तक आले. आदिवासी आत्मकथन म्हणून 'आदोर' या पुस्तकास प्रथम आत्मकथनाचा मान दिला जातो. आज आदिवासी साहित्यामध्ये बाबाराव मडावी यांचे 'आकांत' व किसन दामोदर डगळे यांचे 'ठिगळ' (2008) ही आत्मकथने निर्माण झालेली दिसून येतात. श्रीमती नजुबाई गावित यांनी आपल्या समाजासाठी कार्य केले व शरद पाटील यांच्यासोबत विविध आंदोलनांमध्ये सहभाग घेतला होता. त्या वेळचा त्यांचा अनुभव त्यांनी नोंदविला आहे. बाबाराव मडावी यांनी 'आकांत'मधून आपल्या शिक्षणासाठी समाजातल्या विविध व्यक्तींचे सहकार्य कसे लाभले, तसेच प्रस्थापित समाजाचा आदिवासी समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे. याबद्दल जे विविध अनुभव आले त्या अनुभवांना मडावी यांनी मुखर केले आहे. 'ठिगळ' या आत्मकथनातून श्री. किसन दामोदर डगळे यांनी नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी समाजाची स्थिती वर्णन केली आहे. पोटासाठी संघर्ष, शिक्षणासाठी संघर्ष, अशा परिस्थितीतून शिक्षण घेऊन किसन डगळे या तरूणाने रेल्वेत 'खलाशी' ते 'विक्रीकर अधिकार गट-अ' प्रवासाचे खडतर वर्णन केले आहे.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## 1. आदोर

नजुबाई गावित यांचे 'आदोर' हे आत्मकथन (1995) मध्ये प्रकाशित झाले. 'आदोर' बरोबरच त्यांची विशेष वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली 'तृष्णा' ही कादंबरी होय. नजुबाई गावित या धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बोढरीपाडा या पाड्यावरील होय. या पाड्यावरील आदिवासी समाजाच्या स्थितीचे वर्णन करताना लेखिका म्हणतात की, अशा हे पात्र माझं प्रतिनिधित्व करते. 'मावची' व 'भिल्ल' या आदिवासी जमातींच्या समाजस्थितीचे चित्रण गावित यांनी 'आदोर'मध्ये केले आहे. परंपरेने जंगलाची जपणूक करणारा, राखण करणारा हा समाज आहे. त्या बदल्यात या माणसाला काहीही दिले जात नाही. येथील लोकांची उदरनिर्वाहाची साधनेही जंगलावरच अवलंबून असतात. त्यातूनच त्यांच्या गरजा भागविल्या जातात. सरकारने दारूबंदीचा कायदा केला आणि दारूबंदीच्या नावाखाली आदिवासींकडून महुची व टोळंबी या वृक्षांची तोड करवून घेतली. यांवर या लोकांचे व्यवसाय अवलंबून होते. उदा. महुची फुले गोळा करणे व टोळंबी या झाडापासून टोळंबीचे तेल काढणे हे या लोकांचे प्रमुख व्यवसाय होते, ते बुडाले. यामुळे या लोकांवर पोटाची खळगी भरण्यासाठी वणवण भटकायची वेळ आली.

गावित यांनी 'आदोर' हे आपले आत्मकथन लिहीत असताना तत्कालीन परिस्थितीचे चित्रण केले आहे. त्यामुळे स्थळ, काल व परिस्थिती या घटकांची त्रिमिती साधली आहे. पहिल्या महायुध्दानंतर जी प्लेगची साथ आली होती, त्यामध्ये माणसे पटापट मरत होती, असे आत्मकथनात गावित यांनी म्हटले आहे. शेतींची अवजारे, बैल, बी-बियाणे इ. चे वर्णनही येते. दारिद्रयावस्थेत जीवन जगणा-या या समाजातील कुटुंबव्यवस्था, चालीरीती, प्रथा, परंपरा, समाज याविषयी लेखिका आत्मकथनातून प्रकाश टाकताना दिसतात.

आदिवासी समाजजीवनाचा विचार करता ते खडतर स्वरूपाचे आहे. या आदिवासींना सतत अन्याय, अत्याचार, शोषण, पिवळणूक, फसवणूक, छळ यांना सामोरे जावे लागते. प्रशासन व्यवस्था ही तर आदिवासींचे आर्थिक, राजकीय व सामाजिक या प्रकारे शोषण करताना दिसते. दारिद्रयावस्थेत जीवन जगणा-या माणसाच्या उन्नतीकडे कोणीही फारसे लक्ष देत नाही. आदिवासींना शिक्षण मिळावे यासाठी आदिवासी भागात नेमलेले शिक्षकही थोड्याच दिवसांत बदली करवून घेऊन कसे पळून जातात याचे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण केले आहे. आदिवासी समाजाबद्दलची सुशिक्षित समूहांमध्ये असलेली न्यूनगंडताही येथे पाहायला मिळते.

एकंदरीतच परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून नजुबाई गावित यांनी कार्य करण्यास सुरूवात केली. त्या आदिवासी समाजातून पुढे आलेल्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत. परिवर्तनवादी विचारसरणी, शोषणविरोधी बोलण्याची भाषा असलेले नजुबाई गावित यांचे व्यक्तिमत्व आदोरमध्ये पाहायला मिळते.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

2. **आकांत**

'परधान' या आदिवासी जमातीत जन्मलेल्या बाबाराव मडावी यांनी 'आकांत' हे आत्मकथन लिहिले आहे. चळवळीत केलेले कार्य आणि गरिबीचे व दारिद्र्याचे चटके सहन करत जगणा-या समाजाचे जीवनचित्रण बाबाराव मडावी यांनी केले आहे. 'आकांत' या आत्मकथनाविषयी डॉ. यशवंत मनोहर यांनी आंबेडकरवादी मराठी साहित्य या ग्रंथात म्हटले आहे, मूळ निवाशांच्या यातनांचे अंतर्मुख करणारे ज्वलंत चित्रण यात असून आदिवासी जीवनाची घुसमट यातून दिसते. बाबाराव मडावी यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेतांना त्यांना विविध प्रकारचे मित्र भेटले. त्यांत काही गरीब होते. काही श्रीमंत होते. त्यांच्यातील परस्पर सहकार्याच्या भावनेमुळेच लेखकाला आपले शिक्षण पूर्ण करता आले. आई सतत आजारी असल्याने घरातील सर्व कामे लेखक व त्याचा भाऊ माधव यांना करावी लागत होती. याबरोबरच दोन पैसे मिळविण्यासाठी लेखक खंतीच्या कामावर जात असे. याविषयी गावातील लोकांच्या विविध प्रतिक्रिया येत होत्या. लोक म्हणत, ''बाबा, तू एवढा अन् खंती खोदतं का रं?'' लेखक म्हणतो की, ''आपली शिक्षणव्यवस्था माणसाला बेकार आणि बरबाद करणारी आहे. सुशिक्षिताला कामधंदा मिळण्याइतपत ती सक्षम नाही.'' लेखकाचे ज्या वेळी कॉलेज सुरू होते त्या वेळी एक मुलगी लेखकावर प्रेम करत होती. तिने लेखकाला चिठ्ठीही दिली होती. लेखक म्हणतात की, ''दारिद्र्याचे चटके सहन करताना मुलीवर प्रेम करणं मला जमलेच नाही.'' जीवनात भौतिक सुखांत न रमणारा किंबहुना त्याला महत्व न देणारे लेखक पाहायला मिळतात. लेखक का◌ॅलेज जीवनापासून चळवळीत काम करत होते. चळवळीत काम करत असल्याने त्यांना जवळजवळ सर्व महाराष्ट्राचा परिचय झाला होता. ज्यावेळी लेखक महाराष्ट्रभर फिरत होते. त्यावेळी लेखकाला असे दिसले की, खूप माणसे ही अडाणी, अज्ञानी, अंधश्रध्दाळू व दारिद्र्यात जीवन जगणारी आहेत. आपल्या शेतात विहिरीला पाणी लागावे म्हणून माणसाचाच बळी देणारे लोक व बळी माणसाच्या रक्ताचे खिळे शेतात टोचावे. त्यामुळे पाणी येते असा समज चंद्रपूर जिल्हयातील भामरागड येथील आदिवासींमध्ये आहे.

आदिवासी समाजाची वस्ती जंगलाच्या आश्रयानेच असलेली आढळून येते. त्यामुळे आदिवासी आणि जंगल यांचा अतूट असा संबंध असल्याचे दिसते. त्यांची उदरनिर्वाहाची साधने ही जंगलावरच अवलंबून असतात. वनखात्याने वनांविषयी कडक भूमिका घेऊन, विविध कायदे करून जंगलाच्या राजाला जंगलाचा मेवा खायला शासनातर्फे बंदी घातली आहे. तरीही आदिवासी समाज दुःखातही सण साजरे करतात, नाचतात. आपली तहान-भूक विसरून आदिवासी आनंद साजरा करतात. लेखक म्हणतो, जी भूक घेऊन मी जन्माला आलो तीच भूक व दारिद्र्य मला माझ्या समाजात पाहायला मिळते. त्यामुळे आकांमध्ये लेखकाने जी व्यथा मांडली आहे ती व्यथा केवळ लेखकाचीच राहात नाही तर ती संपूर्ण आदिवासी समाजाची व्यथा बनते. आकांतच्या मनोगतात लेखकाने म्हटले आहे. ''माझं हे पुस्तक नसून कष्ट करणा-या जीवनाचं पान आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने मला खूप खूप रडता आलं. रडतानाच त्यांच्यासाठी आक्रोश करता आला.'' भूमिका लेखक आकांतमध्ये मांडत आहेत.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

मडावी यांनी आत्मकथनाबरोबरच 'स्वप्नभंग', 'दुःखी' ही, दोन नाटके लिहिली आहेत. आदिवासी समाजाच्या व्यथा-वेदना समजण्यासाठी आपल्या समाजात स्वतःच्या भाषेतून, मनोरंजनाच्या साधनांतून सांगितले तर ते अधिक चांगल्या प्रकारे समजेल म्हणून त्यांनी नाटकासारखा वाङ्मयप्रकारही हाताळला आहे. अन्याय, अत्याचार, शोषण, पिळवणूक यांची जाणीव करून देण्यासाठी लेखकाने विविध प्रकारे लेखन केलेले आहे.

**3. ठिगळ**

नाशिक जिल्हयातील आदिवासी समाजाची जीवन जगण्याची शैली, आदिवासींच्या परंपरा, सण, उत्सव यांची माहिती लेखकाने 'ठिगळ'मधून चित्रित केलेली आहे. श्री. किसन दामोदर डगळे यांनी अनुभव कथनासाठी वापरलेली सहज, साधी व सोपी भाषा वाचकाला खिळवून ठेवते आहे. लेखकाने अनुभवांची मांडणी प्रांजळपणे केलेली आहे. आपले कटू-गोड अनुभव लेखक चिमटीत पकडून त्यांना वाचकाच्या समोर ठेवतो आहे. आपल्या आयुष्यातील महत्वाच्या टप्प्यावर लेखकाला विविध स्वभावाच्या व्यक्ती भेटत गेल्या. त्यांच्याकडून लेखकाला मिळालेली प्रेरणा जीवनात भरारी घेण्यासाठी कारणीभूत ठरली. म्हणूनच लेखक विक्रीकर अधिकारी गट-अ या पदावर असलेला दिसतो.

श्री. किसन दामोदर डगळे या आदिवासी समाजातील तरूणाने आपल्या कुटुंबातील ज्या ज्या व्यक्तींचे सहकार्य लाभले त्या सर्वांवर लेखकाने आत्मकथनातून प्रकाश टाकला आहे. नाशिक जिल्हयातील विविध देव-देवतांचे उत्सव, त्या उत्सवासाठी जाण्याची विविध साधने व प्रवासात येणा-या गमतीजमती लेखक मनमोकळेपणाने मांडतो आहे. लेखक शिक्षण घेऊन नोकरीला लागले. परंतू ते आपल्या कुटुंब, शेती, समाज, जाती यापासून जराही दरावत नाहीत. 'ठिगळ' आत्मकथनाविषयी पत्रकार व लेखक अशोक बेंडकुळे म्हणतात, ''सिन्नर तालुक्यातील सोनांबेगावच्या किसन दामोदर डगळे या महादेव कोळी समाजातील तरूणाचे हे रोचक आत्मकथन, पंचेचाळिशीपर्यंतचे आलेले जीवनानुभव 'ठिगळ'मध्ये मांडले आहेत. या वाटचालीत सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक या दृष्टीने लेखकाने बरेच कार्य करून आपल्या समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे.'' नवशिक्षित आदिवासी समाजातील तरूणांना प्रेरणा देण्यासाठी लेखकाने कार्यकर्त्यांच्या मदतीने विविध परिषदा, मेळावे, व्याख्याने व सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. आपल्या समाजाच्या विकासासाठी, उद्बोधनासाठी लेखक पुढाकार घेतना दिसतो आहे. आधुनिक काळात शिक्षण घेणा-या आदिवासी युवकांना प्रेरणादायी असे 'ठिगळ' हे आत्मकथन महत्वाची भूमिका निभावते आहे.

एकूणच आदिवासी साहित्यामध्ये आत्मकथन हा वाङ्मयप्रकार फारसा हाताळलेला दिसत नाही. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून खूप दूर असलेला, अक्षर ओळख नसलेला, आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगाचा परिचय नसलेला आदिवासी समाज आहे. तो नवशिक्षित आदिवासी तरूणांच्या रूपाने या प्रवाहाकडे येण्याचा प्रयत्न करतो आहे. जंगलात, द-या-खो-या, कड्या-कपा-यात राहणा-या या समाजाची मूळ प्रवाहात



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

येण्याची ही धडपड आहे. या प्रक्रियेच्या वेगाची गती मंद स्वरूपाची आहे. परंतु प्रस्थापित साहित्यविश्वामध्ये आलेला हा साहित्यप्रवाह वाङ्मय व्यवहारात रूढ झाला आहे.

ज्या आदिवासी तरूणांनी शिक्षण घेतले त्यांनी आपल्या स्वतःच्या परिस्थितीविषयी, आपल्या समाजाच्या अवस्थेविषयी विचार करायला सुरूवात केली. आपल्या समाजाच्या व्यथा, वेदना मांडण्यासाठी साहित्य हे माध्यम त्यांनी वापरले आहे. आजपर्यंत साहित्यात आदिवासी जीवन आले नव्हते. जे आले होते ते बिगर आदिवासींनी लिहिलेले साहित्य होते. आदिवासींनी म्हणून जे भोगले, जगले, अनुभवले ते साहित्यात उतरताना आंतरिक तळमळीतून उतरलेले असते. ज्या जीवन विश्वाची प्रस्थापित साहित्य व्यवहाराला माहिती नव्हती. त्या जीवनचित्रणाने नवीन जीवनाचे परिचितीकरण करून देण्याचे कार्य केले आहे. आदिवासी युवकांनी पुन्हा एकदा आपल्या भूतकाळाला साहित्याच्या रूपाने समाजासमोर ठेवले आहे.

**संदर्भ:-**

1. *गावित नजुबाई, आदोर, आदिवासी दुनियेतलं जीवननाट्य, पृष्ठ क्र. 04*
2. *मडावी बाबाराव, आकांत, प्रियंका प्रकाशन, यवतमाळ, पृष्ठ क्र. 09*
3. *तत्रैव, पृष्ठ क्र. 32*



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- (CCXCIX) 299

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. D. B. Tandaljirkar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambajogai, Dist.- Beed

Editor
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambajogai, Dist.- Beed

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक कार्य — डॉ उल्हास उढाण | 1 |
| 2 | यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी नेतृत्वाची जडणघडण व शैक्षणिक योगदान — श्री. रमेश चव्हाण | 4 |
| 3 | यशवंतराव चव्हाण यांचे कायदेभंग चळवळीतील योगदान : ऐतिहासिक विश्लेषण — डॉ प्रवीण जगन्नाथ अढाऊ | 10 |
| 4 | यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य — परसराम एकनाथ शेळके | 15 |
| 5 | कर्तृत्ववान संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण(१९१३—१९८४) — प्रा.आर.बी. वाघ | 19 |
| 6 | बहुआयामी व्यक्तिमत्त्व-यशवंतराव चव्हाण — **प्रा.डॉ.विजयेंद्र विश्वनाथ पाटील** | 23 |
| 7 | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार व कार्य — डॉ. विठ्ठल शंकरराव फुलारी | 27 |
| 8 | यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक कार्ये — डॉ.डी.एस.पटवारी | 30 |
| 9 | यशवंतराव चव्हाणांचे संरक्षण विषयक कार्य — प्रा.डॉ.महादेव गणपत देशमुख | 35 |
| 10 | यशवंतराव चव्हाण यांचे राजकारणातील नेतृत्व भूमिका व योगदान — डॉ. शांताराम चव्हाण | 39 |
| 11 | महाराष्ट्राचे शिल्पकार— यशवंतराव चव्हाण — डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी | 45 |
| 12 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य — सहा.प्रा.दिपक हरी लहासे | 47 |
| 13 | दूरदृष्टीचा नेता : यशवंतराव चव्हाण — डॉ. विठ्ठल केदारी | 50 |
| 14 | यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक विचार — प्रा.डॉ.प्रशांत कोठे | 53 |
| 15 | यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक कार्य — प्रा.डॉ.अनंत दादाराव मरकाळे | 56 |
| 16 | यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य — डॉ.पी.आर. थारकर | 59 |
| 17 | यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य — **डॉ.गजानन आनंता देवकर** | 62 |
| 18 | अष्टपैलू यशवंतराव चव्हाण — **डॉ.शिवाजी धोंडिबा दहिकाबंळे** | 66 |
| 19 | यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य. श्री.एम.के.भाबरदोडे | 71 |





Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

# यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार व कार्य

डॉ. विठ्ठल शंकरराव फुलारी
विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग,
श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद,
Email Id: vithalphulari@gmail-com

**प्रस्तावना :**

सर्वसामान्य बहुजन समाजातून शिवछत्रपतींनंतर आणि आधुनिक काळात लोकमान्य टिळकांनंतर एवढा मोठा नेता महाराष्ट्रात निर्माण झालेला नाही. मागास, दुष्काळी भागातील देवराष्ट्रे सारख्या एका खेडेगावात, गरीब शेतकऱ्यांच्या घरात जन्माला आलेली एक व्यक्ती, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वत:च्या कर्तृत्वातून, व्यासंगातून आणि जिद्दीतून किती मोठा होऊ शकतो, याचे प्रतीक म्हणजे अष्टपैलू यशवंतराव चव्हाण होय. यशवंतराव बळवंतराव चव्हाण (मार्च १२, इ.स. १९१३ — नोव्हेंबर २५, इ.स. १९८४) हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणून काम केले होते. तर काही काळ ते भारताचे संरक्षणमंत्रीसुद्धा होते. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म हेन्द्रे पाटील मराठा समाजात झाला. जन्म १२ मार्च, १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. त्यांनी १ मे १९५८ रोजी धुम्या गडावर जाऊन तिथे पांडुरंगाची मूर्ती स्थापन केली व राष्ट्रसंत भगवानबाबांच्या समोर धुम्या गडास भगवानगड नाव दिले. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. 'युगांतर', 'सह्याद्रीचे वारे', 'कृष्णाकाठ', 'ऋणानुबंध' ही त्यांची साहित्यसंपदा आहे.

**संशोधन अभ्यासाचे उद्दिष्टे :**

संशोधन अभ्यासाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१)यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचाराचा अभ्यास करणे.

२)यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

३)लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि पंचायत पद्धतीचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती :**

शोधनिबंधाची महिती संकलित करण्यासाठी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात आला आहे. त्यात इंटरनेट, विकीपीडिया, पुस्तके, वर्तपत्रे इत्यादींचा समावेश आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार :**

यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार प्रामुख्याने शेती, उद्योग, सहकार, समाजवाद, आर्थिक विषमता, विकासातील समस्या आणि नियोजनाचे महत्त्व इत्यादीशी निगडीत आहेत.

यशवंतराव चव्हाण यांनी कृषिविषयक विचार मांडताना शेतीच्या मालकी हक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठी उपाय यावर अधिक भर दिला. त्यांच्या मते, जमीन कसणारा शेतजमिनीचा मालक असावा. यशवंतरावांनी सामाजिक क्षमता व सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून शेतीचा विचार केला. भारतात शेती क्षेत्रात भूमिहीनांची संख्या अधिक आहे. म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणाऱ्या लोकांनी त्यांच्या जमिनीचा एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी. तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्वाने केली पाहिजे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे. नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत. धरणे बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे.शेतकऱ्यांनी कृषीशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. म्हणून विकास योजना आखताना अविकसित विभागांचा आधी विचार केला पाहिजे.

ग्रामीण औद्योगिकीकरणाबाबत ते म्हणतात की, ग्रामीण भागात उद्योग सुरु करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली जावी. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंढा थोपविता येईल. औद्योगिक विकासासाठी नियोजन महत्त्वपूर्ण आहे. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी ते औद्योगिक विकासाच्या मास्टर प्लानची कल्पना मांडतात. अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. याशिवाय, राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी ते सहकाराचा पुरस्कार करतात. भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या विकासासाठी सहकारी तत्त्वे फार उपयुक्त ठरतात.

**यशवंतराव चव्हाण यांचे कार्य :**

- पंचायत राज या त्रिस्तरीय (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) व्यवस्थेची सुरुवात. (प्रशासकीय विकास)
- राज्य पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ. (आर्थिक विकास)
- कोल्हापूर प्रकारच्या बंधाऱ्यांचा प्रचार. कोयना व उजनी ह्या प्रमुख प्रकल्पांच्या उभारणीला गती. (मूलभूत सोयी सुविधांचा विकास)
- १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना. (सहकाराला चालना)
- मराठवाडा (आत्ताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) व कोल्हापूर विद्यापीठ यांची (शिवाजी विद्यापीठाची) स्थापना. (शैक्षणिक विकास)
- राज्यातील कृषी विद्यापीठांच्या स्थापनेतही संकल्पनात्मक सहभाग. (कृषिविकास)
- मराठी साहित्य संस्कृती महामंडळ व विश्वकोश मंडळाची स्थापना.(सांस्कृतिक विकास)

**लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि पंचायत पद्धती :**

अनेक जणांचं असं मत आहे की ही महाराष्ट्राला यशवंतरावांनी दिलेली अमूल्य देणगी आहे आणि त्यामुळं महाराष्ट्रानं देशातल्या इतर राज्यांनाही रस्ता दाखवला. भारत स्वतंत्र झाल्यावर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी सगळेच आग्रही होते. ब्रिटिशांच्या काळात प्रांतांची निवडून आलेली सरकारं होतीच. त्याखाली लोकल बोर्ड होते. पण खेडं हे केंद्रस्थान मानून गावागावापर्यंत लोकशाही नेण्यासाठी, स्थानिक पातळीवरही निर्णयाचे अधिकार देण्यासाठी पंचायत पद्धती आणण्यावर पंडित नेहरुंचा भर होता. बलवंतराय मेहता समितीनं त्यासाठी केलेल्या शिफारसींनुसार काही राज्यांनी ती प्रत्यक्षातही आणली. पण यशवंतराव चव्हाणांना त्यात काही त्रुटी जाणवत होत्या. त्यानुसार महाराष्ट्रानं स्वतंत्र अभ्यास केला, त्यासाठी वसंतराव नाईकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. यशवंतरावांच्या स्वतःच्या सूचना आणि आग्रह होते. त्यानुसार आठ महिन्यांनी महाराष्ट्रानं स्वतःचं पंचायत राज्य विधेयक आणलं. ८ डिसेंबर १९६१ रोजी ते विधिमंडळानं संमत केलं आणि १ मे १९६२ पासून ते अंमलात आणलं गेलं. यानुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली. महाराष्ट्रामध्ये ही व्यवस्था अन्य कोणत्याही राज्यापेक्षा जास्त यशस्वी ठरली. १९५२–५६ या काळात यशवंतराव



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 299 (CCXCIX )
ISSN : 2278-9308
July, 2021

स्थानिक स्वराज्य संस्था विभागाचे मंत्री होते. या काळातला त्यांचा अनुभव महाराष्ट्राला उत्तम पंचायत राज्य व्यवस्था देण्यात झाला असं म्हटलं जातं.

सारांश :

चव्हाण यांनी शेती, उद्योग, सहकार, आर्थिक नियोजन इत्यादी संबंधीचे जे विचार मांडले ते निश्चितच महत्त्वपूर्ण आहेत. भारताचा विकास शेती विकासाशिवाय शक्य नाही, हे सांगून नियोजनात शेतीला प्राधान्य देण्याची त्यांची कल्पना महत्त्वपूर्ण वाटते. त्याचप्रमाणे भारतात शेती करणारा शेतकरी जोपर्यंत शेती हा व्यवसाय म्हणून करीत नाही तोपर्यंत शेती फायदेशीर होणार नाही. शेतीला पूरक व्यवसायाची जोड देणेदेखील आवश्यक आहे असा जो विचार चव्हाण यांनी मांडला तोदेखील महत्त्वाचाच आहे. भारताच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी नियोजनाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली; परंतु भारताने रशियासारखी नियोजनपद्धी स्वीकारू नये. भारतात ती यशस्वी होणार नाही, असेही त्यांनी सांगितले. भारताला लोकशाही नियोजनाची गरज असल्याचे त्यांचे मत होते. भारताच्या सर्व भागाचा सर्व क्षेत्रांचा विकास साधण्यासाठी भारताने समतोल विकासाचे तंत्र स्वीकारावे. त्यांची ही कल्पना महत्त्वपूर्ण वाटते. भारताच्या आर्थिक विकासात शेतीप्रमाणेच उद्योगधंदेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावितात, हे मान्य करून चव्हाण यांनी उद्योगाच्या विकेंद्रीकरणाची संयुक्त क्षेत्राची कल्पना मांडली. त्याचप्रमाणे उद्योगात, व्यवस्थापनात कामगारांना सहभागी करून घेण्याची त्यांची कल्पना औद्योगिक शांततेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. उद्योग, सार्वजनिक क्षेत्रात, संयुक्त क्षेत्रात, खाजगी, सहकारी क्षेत्रात सुरू करावेत, असाही विचार चव्हाण यांनी मांडला.

संदर्भसूची :


- http://oldisrj.lbp.world/UploadedData/2129.pdf
- https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AF%E0%A4%B6%E0%A4%B5%E0%A4%82%E0%A4%A4%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B5_%E0%A4%9A%E0%A4%B5%E0%A5%8D%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%A3
- Ganesh S. Shendamikar, Prabhas S. Shendamikar Panchayat Raj Institution, Bombay, 1992.
- प्रा. रायखेलकर ए. आर. (जून २००५), 'आर्थिक विचारांचा इतिहास' विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2021

ISSUE No- (CCCXXII) 322

## २१व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सद्यस्थितीत निर्माण झालेल्या समकालीन सामाजिक समस्या



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Sanjay Surewad
Head, Department of Sociology,
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar Publications

For Details Visit To : www.aadharsocial.com

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 19 | काया-स्पर्श : मनोविश्लेषण का साहित्यिक दस्तावेज **डॉ. रमेश माणिकराव शिंदे** | 67 |
| 20 | पुरुष केंद्रित अर्थनीति और भारतीय नारी डॉ. अरविंद अंबादास घोडके | 70 |
| 21 | उपन्यास में चित्रित प्रेम में असफल पुरूष पात्र ( विशेष संदर्भ : आना इस देश- कृष्णा अग्निहोत्री ) **शेख अली जाफर** | 72 |
| 22 | कोरोणा महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था **प्रो. डॉ. डी. बी. तांदुळजेकर** | 74 |
| 23 | साहित्यातील वृद्धांची समस्या(उपरे : एकांकिका) **डॉ. विठ्ठल केदारी** | 76 |
| 24 | करोना काळाचा शिक्षणावर झालेला परिणाम डी.एन.रिठे | 78 |
| 25 | समाजिक स्तरीकरण डॉ. साधना लांजेवार | 81 |
| 26 | भारतीय समाजातील वृद्धांच्या समस्या : कारणे व उपाय प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे | 84 |
| 27 | आंध जमातीच्या शैक्षणिक समस्या प्रा.डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे | 90 |
| 28 | संगीत क्षेत्रातील समस्या व आव्हाने प्रा. डॉ. शिवदास विठ्ठलराव शिंदे | 95 |
| 29 | कोरोना काळातील वाढते महिला अत्याचार : एक आढावा **डॉ.विलास चव्हाण** | 98 |
| 30 | भारताची लोकसंख्या वाढ : एक सामाजिक समस्या **सुप्रिया गणपतराव गडलवाड** | 101 |
| 31 | आरोग्य **प्रा. ततापुरे जे.जी.** | 104 |
| 32 | आत्महत्येची समस्या श्रीमती. धुमाळ सीमा काशिनाथराव | 107 |
| 33 | स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या प्रा.संजय सुरेवाड | 109 |
| 34 | सामाजिक स्तरीकरण **कुमिदिनी जोशी रामचंद्र याडाराम** | 112 |
| 35 | हुंडा बळी एक सामाजिक समस्या प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे | 116 |
| 36 | संत रविदासांच्या काळातील धार्मिक स्थिती डॉ. मिलिंद बळीरामजी भगत /नितीन आनंदराव अंडेलकर | 119 |
| 37 | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय **श्रीकांत दिनकर तांदळे /प्रो. डॉ.डी.आर.तांदळे** | 124 |
| 38 | केंद्रीय कार्यशाळा ताडाळी येथील कर्मचा–यांच्या कार्यसमाधानकारकतेचे अध्ययन प्रिया कृपाशंकर निमजे /प्रा. डॉ. फुलचंद वासुदेव निरंजने | 128 |
| 39 | ग्रामीण महाराष्ट्रातील पारंपरिक समाजसंरचनेत दलित व सवर्ण यांच्या संबंधातील सातत्य आणि बदल : एक समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ.नागोराव आर.कांबळे** | 132 |
| 40 | कोविड-१९, भारतीय पर्यटना समोरील आव्हाने : एक राजकीय अध्ययन स्वामी विरभद्र गुरप्पा | 136 |
| 41 | स्त्रीभ्रुणहत्या : एक सामाजिक समस्या प्रल्हाद दत्तराव भोपे | 141 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
October, 2021

# साहित्यातील वृद्धांची समस्या(उपरे : एकांकिका)

डॉ. विठ्ठल केदारी
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

समाजातील विविध प्रकारच्या समस्या विकासाला मारक ठरत असतात. जीवनातील समस्यांपैकी वृद्धांची समस्या ही मोठ्या प्रमाणात दिसून येते आहे. मानवाच्या जन्माबरोबरच विविध समस्या निर्माण होतात. त्यातून तो यशस्वीरीत्या मार्गक्रमण करीत वृद्धापकालाकडे येत असतो. सर्व जीवनाचे यश-अपयश पचवून त्याची क्रयशक्ती संपली की वृद्धांसमोर असंख्य प्रश्न निर्माण होतात. या समस्या आपण वृत्तपत्रांतून, नियतकालीकांतून, साहित्यातून आणि प्रत्यक्ष जीवनामध्ये आपल्या आजूबाजूला पाहत असतो. मराठी साहित्यामध्ये अनेक लेखकांनी वृद्धांच्या जीवनाचे प्रश्न कथा, कविता, कादंबरी, नाटक या वाङ्मयप्रकारातून व्यक्त केले आहेत. मराठी नाटक वाङ्मय प्रकारामध्ये प्रामुख्याने रा.रं. बोराडे यांनी उपरे या एकांकिकेतून अभिव्यक्त झालेले वृद्धांच्या जीवनाचे चित्रण वास्तवतेने उभे केले आहे. शहर आणि खेडे यांमध्ये वृद्धांच्या समस्या ज्वलंत बनत चालल्या आहेत. रा.रं. बोराडे लातूर जिल्ह्यातील काटगाव या ठिकाणचे ग्रामीण भागातील वास्तव 'उपरे' एकांकिकेतून सांगतात. खेड्यापाड्यांमध्ये, ग्रामजीवनात वृद्धांच्या समस्या गंभीर होताहेत हे प्रकर्षाने दिसून येते.

ग्रामीण संस्कृतीमध्ये जीवन जगताना ग्रामीणतेशी नाळ जोडलेले कुटूंब कोणकोणत्या सामाजिक समस्यांतून जीवन जगते एकत्र कुटूंब पध्दती आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न यांचे चित्रण उपरे एकांकिकेतून प्रखरपणे रा.रं. बोराडे उभे करतात. एकंदरीत ग्रामीण जीवनाने सर्व गोष्टींना एकत्र घेतलेले असते. आपले समजलेले असते. आपलेपणाच्या भूमिकेतून सर्वांना सामावून घेवून जीवन जगणारा ग्रामीण भागातील माणूस आहे. संपूर्ण आयुष्य आपल्या कुटुंबासाठी व्यतीत केल्यावर म्हातारा आणि म्हातारी यांच्या वाट्याला शेवटी तुटलेपण, परकेपण येते. या परकेपणातून त्यांची एकमेकांपासून ताटातूट होते. ताटातूटीन विषण्ण झालेली मने पुन्हा एकत्र येण्याच्या व कुटूंबासारखे जीवन जगण्याचा निश्चय वृद्धावस्थेमध्ये म्हातारा आणि म्हातारी घेवू इच्छिते! ही तळमळ अथवा हा विचार आयुष्याच्या वृद्धावस्थेमध्ये हे दांम्पत्य का घेवू इच्छिते हा विचार 'उपरे'मधून रा.रं. बोराडे स्पष्टपणे मांडतात.

उपरे एकांकितून वृद्धापकालीन समस्या ह्या मानवनिर्मित आहेत. शहरामध्ये वृद्धाश्रमांची निर्मिती झालेली आहे. मुले-वृद्धाश्रमांमध्ये फी भरून आई-वडीलांना वृद्धाश्रमात ठेवतात. त्यांच्या पालणपोषणाचा खर्च देण्याची मानसिकता मुलांची असते. परंतु स्वतः त्यांचे पालन-पोषण करण्याची भूमिका मुलांची दिसून येत नाही. ही समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक वाढताना दिसते. किंबहुना मुलांची मानसिकता त्या पद्धतीने बनत आहे. मुले जन्मदात्यांना सांभाळण्यासाठी कमकुवत होत आहेत. कुटुंबामध्ये आई-वडील त्यांना नको होताहेत.

एकत्र कुटुंबामध्ये आई-वडील, आजी-आजोबा, मुले-नातवंडे याबरोबरच सर्व कुटुंबातील सदस्यांना सामावून घेवून ग्रामीण जीवनातील शेतकरी जीवन जगताना दिसतो. परंतु आज कृषिसंस्कृतीमधील कुटुंबामध्ये वृद्धांच्या विषयीची मानसिकता विकृत होताना दिसून येते आहे. ही मानवी प्रवृत्ती कशामुळे झाली. याचाही विचार साहित्यिक साहित्यातून अभिव्यक्त करताना दिसतात. आज साहित्याने वृद्धांच्या समस्या स्पष्टपणे अधोरेखीत केल्या आहेत. या समस्या वाचकाला विचार प्रवण बनवता ते माणसाची बदलती स्वार्थी प्रवृत्ती या विचाराला जन्म देत आहे.

'उपरे' एकांकिकेतून आयुष्यभर काबाडकष्टाने शेती पिकवून धनधान्य पिकविले. शेती आणि आपला परिवार एकत्र वाढविला या सर्वांना एकत्रित घेवून आपल्या कुटुंबाचे ऐक्य शेवटपर्यंत राहावे या भूमिकेतून म्हातारा आणि म्हातारीने आपले कुटुंब सांभाळलेले आहे. त्यांना सोबत घेवून आपले आयुष्य जगावे अशी भाबडी अपेक्षा बाळगून म्हातारा आणि म्हातारी जीवनाचा आनंद शेवटपर्यंत घेवू इच्छितात.

आपल्या दोन्ही मुलांनी म्हातारी व म्हाताऱ्यांना वाटप करून घेवून दोघांची वृद्धावस्थेत ताटातूट केली. या ताटातूटीने विषण्ण झालेले मन या आई-वडीलांच्या रूपाने लेख रा.रं. बोराडे नाटिकेतून रसिकांसमोर मांडतात. मोठ्या मुलाने वडिलांना सांभाळण्यासाठी घेतले आणि लहान मुलांने आईला सांभाळण्यासाठी घेतले आहे. दोन्ही मुलांनी आपल्या वडिलांच्या संपत्तीचे वाटप करून घेतल्यावर गावकऱ्यांच्या सहमतीने आई-वडिलांना वाटून घेतले. ह्यावेळी दोन्ही मुलांनी आपापला स्वार्थ पाहिलेला आहे. वडिलांच्या रूपाने मोठ्या मुलाला शेतामध्ये राबवण्यासाठी सालगडी मिळाला तर आई लहान मुलाच्या वाट्याला गेल्याने आईच्या रूपाने मोलकरीन लहान सुनेला घरकामासाठी मिळाली. घरातले धुणी-भांडी ह्या करीता तिला मजुरीने मोलकरीन लावणे भाग पडले



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

नाही. अशा स्वार्थी भूमिकेतून घरातील मुले आपल्या आई-वडिलांना वाटून घेताना दिसतात. ज्या वयामध्ये एकमेकांना सोबत राहण्याची गरज आहे. परंतु त्यांना सोबत राहण्यापासून मुलेच मनाई करतात. एकत्र आयुष्य घालविण्याचा विचार म्हातारा-म्हातारी करत असतानाच त्यांना मुलांच्या ह्या भूमिकेला सामोरे जावे लागते.

वडिलांना शेतावरील राखण करण्यासाठी मोठा मुलगा रानामध्ये ठेवतो. दिवसातून एकवेळा भाकरी म्हाताऱ्याला नेवून देणे एवढेच मुलाचे काम राहते. आई आणि वडिलांनी एकमेकांना बोललेले दोघांच्याही घरी आवडत नाही. दोघांच्या वागण्याबोलण्यात फरक झाला की दोघांच्या घरांकडून म्हातारा व म्हातारीला टोमणे देणे सुरू होते. घरामध्ये ज्या दिवशी गोडधोड खायला बनविले जाते. त्यादिवशी म्हातारीला म्हाताऱ्याची आठवण येते. त्या आठवणीने तिला घास गिळत नाही. म्हणून ती दुसऱ्या दिवशी तेलच्या म्हाताऱ्याला खायला घेवून जाते. यावेळी दोघांमध्ये झालेले संवाद हृदयस्पर्शी वाटतात. म्हाताऱ्याला आठवते असे एकत्र जेवण आपण कधी केले होते. त्यावेळी त्यांना दिनू लहान असताना एकत्र केलेल्या जेवणाची आठवण होते. यावेळी म्हाताऱ्याला आपल्या नातवंडांची त्यांच्या शाळेसंबंधी विचारपूस म्हातारीकडे म्हातारा आस्थेने करतो त्यावेळी मला नातवंडांनी पाहण्याची फार इच्छा झाल्याचे ही म्हातारीकडे बोलून दाखवितो.

सुनबाई आपल्याला सतत टोमणे देवून बोलते. यासंबंधी म्हातारी म्हाताऱ्याला सांगते की मला जगण्यापेक्षा मृत्युला जवळ करावेसे वाटते. त्यावर म्हातारा तिची समजूत घालतो की असे केल्यावर आपली मुले, मी जेलमध्ये जावू त्यातून काय होणार नाही. त्यापेक्षा तुला जोपर्यंत सहन होईल. तोपर्यंत तूं सहन कर ज्यादिवशी तुला हे सहन होणार नाही. त्यादिवशी तू सरळ माझ्याकडे ये मग आपण दोघे मिळून ठरवू काय करायचे ते असे म्हटल्यावर म्हातारी घराकडे जाते. म्हातारा तिच्याकडे पाहत उभा राहतो. एकांकिकेचा शेवट होतो.

आज समाजासमोर वृद्धांच्या समस्या गंभीर होत चालल्याचे चित्र पाहायला मिळते. जागतिकीकरण, आधुनिकरण आणि जगण्यातील चंगळवादी प्रवृत्तीमुळे माणसाच्या जगण्यातील माणूसपण, आपलेपण संपत चालले आहे. माणसाला आपलीच माणसे, जन्म देणारे सुद्धा घरामध्ये राहणे अस्वस्थ करत आहे. एकूणच मानवी मनातील भावशून्यता अधिकाधिक कशी प्रबळ होत आहे. एकमेकांतील तुटलेपण, परकेपणाची भावना वाढीस लागल्याने मानवी नात्यातील अंतर वाढत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आपलेपण हरवलेली माणसे आपल्या जन्मदात्यांना विसरायला मागेपुढे पाहत नाही. त्यांना घरामध्ये ठेवणे आवडत नाही. त्यांना पोटाची भूक भागविणे यासाठी पोटभर अन्न देण्यासाठीची मानसिकता राहिली नाही. अशा रीतीने आज साहित्यातून व्यक्त झालेल्या वृध्दांच्या समस्या पहावयास मिळतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१.ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, डॉ. वासुदेव मुलाटे.
२.ग्रामीण साहित्य, रा.रं. बोराडे.
३.नाट्यात्म साहित्य : संपा. भारत हंडीबाग व इतर.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN 2231-57[illegible]
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 17. | लोककवी-वादळवारा वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील डॉ.आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक तत्वज्ञान : एक अनुभवाधिष्टीत अभ्यास<br>- प्रा.डॉ. विजयकुमार जी.वावळे | 63 - 68 |
| 18. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- प्रा. डॉ. गणेश मालटे, भागवत भास्करराव पाटील | 69 - 71 |
| 19. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील रमाई आणि सावित्रीबाई फुले<br>- प्रा. गौतम गायकवाड | 72 - 80 |
| 20. | कविंचे महाकवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. संतोष हंकारे | 81 - 85 |
| 21. | वामनदादा कर्डक आणि आंबेडकरी विचार<br>- प्रा. डॉ. संदीप कडू माळी | 86 - 88 |
| 22. | वामनदादा कर्डक यांचे जीवन कार्य आणि आंबेडकरी चळवळीतील योगदान<br>- सखाराम बाबूराव शिंदे | 89 - 92 |
| 23. | शाहीर वामनदादा कर्डक व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. विठ्ठल केदारी | 93 - 95 |
| 24. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. काकासाहेब रामराव सुरवसे | 96 - 100 |
| 25. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 101 - 105 |
| 26. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- पल्लवी भगवान साबळे | 106 - 109 |
| 27. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- डॉ. अनिल बळीराम बांगर | 110 - 114 |
| 28. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>– संतोष विलास दिवे | 115 - 118 |
| 29. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- पंढरीनाथ हरी मोकळे | 119 - 121 |
| 30. | वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मय<br>- प्रा. डॉ. मीनाक्षी रा. देव | 122 -125 |
| 31. | वामनदादा कर्डक यांच्या गीतकाव्यातून येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>- डॉ. विक्रम अभिमन्यू ओतारी | 126 - 129 |
| 32. | प्रगमनशील समाजभान व्यक्त करणारा लोककवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 130 - 134 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner



# शाहीर वामनदादा कर्डक व्यक्ती आणि कार्य

- डॉ. विट्ठल केदारी
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

स्वातंत्र्यानंतर मराठी शाहिरीमध्ये वामनदादा कर्डक यांच्या शाहिरीने परिवर्तनवादी भूमिका घेवून सर्वसामान्यापर्यंत गौतम बुध्दांचा मानवतावादी विचार व डॉ. बाबासाहेबांचे कार्य कर्तुत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले वामनदादा कर्डकांनी लिहिलेल्या काव्यातून माणसांची समाज जीवनात होत असलेली अवहेलना आणि दलित समाजाला प्रस्थापित व्यवस्थेने दिलेले स्थान यामुळे त्यांचे होणारे शोषण यासंबंधी गीतांच्या माध्यमातूनविचार सर्वांसमोर ठेवले. लोकांच्या समोर शाहिरी सादर करणे आणि त्यातून जनतेला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याचे कार्य अखंडपणे वामनदादा करत रहिले.

वामनदादा कर्डक यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशवंडी या खेडेगावामध्ये झाला. तबाजी व सईबाई या दाम्पत्यांच्या पोटी झाला. कुटुंबामध्ये वामनदादा मोठा भाऊ सदाशिव व बहीण सावित्री ह्या भावंडाबरोबर लहानाचे मोठे झाले. शेतीवर वामनदादांचे कुटुंब आपला उदरनिर्वाह करीत होते असे असले तरीही आई कष्ट करून दोन रूपये कुटुंबासाठी मिळविण्याकरीता सतत काबाडकष्ट करीत राहायची. वामनदादांचे वडिलही शेती सांभाळून कुटुंबाला मदत व्हावी म्हणून टेंभुर्णीच्या पानांपासून विडी वळण्याचा व्यवसाय करीत होते असे करतानाच वडील हेडीचा व्यवसाय करायचे. हया सर्व कामांतून येणारे पैसे यांवर वामनदादांचे कुटुंब जीवन जगत होतेपरंतु हे सर्व करूनही ही त्यांचे कुटुंब पोटाची भूक भागवू शकत नाही. पावसाच्या महिन्यांत श्रावणामध्ये कुटुंबाची आबाळ व्हायची म्हणून जीवन जगण्यासाठी पोटाची भूक पूर्ण करण्याकरीता वामनदादांचे आई-वडील मुलांना तरवट्याची भाजी, माठाची भाजी मिळाली तर खायची अन्यथा भाजीविना भाकरी कोरडीच खावून दिवस काढावा लागायचा. कौटुंबिक जीवनामध्ये सतत भुकेसाठीचा संघर्ष वामनदादांना करावा लागला जमीन असूनही कुटुंबाची गरज भागेल एवढे उत्पन्न वामनदादांच्या कुटुंबाला मिळत नसल्याने लहानपणापासूनच त्यांना पोटाची भूक भागविण्याचा प्रसंग हृदय पिळवटून टाकणारा आहे.

लहानपणापासून गुरे चारणे, खेडोपाड्यांतील यात्रांमध्ये कुस्त्या खेळणे, नंतर गिरणी कामगार म्हणूनही वामनदादांनी काम केले आहे. वामनदादांनी खडी फोडणे, सिमेंट कॉंक्रिटची कामे, चिक्की विकणे, मातीकाम, आईसस्फ्रुट विकणे, ऑयल कंपनीमध्ये काम, अशी विविध प्रकारची कामे त्यांनी पोटासाठी केलेली आहेत. ह्या सर्व कामांतून वामनदादा वाचनाकडे वळलेले दिसतात. वाचनाच्या छंदातून त्यांना अभिनय क्षेत्रामध्ये त्यांचे मन वळले त्यातूनच लल्लाट लेख या प्रयोगामध्ये त्यांनी 'घुमा' नावाची व्यक्तिरेखा साकार केली. यातून त्यांना लोकांच्या समोर शहिरीरूपाने लोकप्रबोधन घडविण्याचे कार्य



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

त्यांनी सुरू केले

एक कवीचे जीवनगाणे या नावाने वामनदादा कर्डकांच्या कार्य-कर्तृत्वावर बबन लोंढे यांनी चरित्रकथा लिहिली आहे. वामनदादांचे कौटुंबिक जीवनामध्ये मीरा नावाची मुलगी झाली. मात्र त्यांचे वैवाहिक जीवन पूर्णत्वास जावू शकले नाही. पुढे मुलीच्या मृत्यूने त्यांना धक्का बसला या दु:खातून ते अखेरपर्यंत सावरू शकले नाही. पुढील काळात वामनदादा मुंबईकडे रवाना झाले. "मुलगी मीराच्यास निधनानंतर पुढे आई सोबत पोटाची खळगी भरण्याकरिता वामनदादा मुंबईत आले त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. कोळशाच्या वखारीत कोळसा उचलला, चिक्की विक्रिचा, आईसफ्रूट विक्रिचा धंदा केला. मिळेल ते काम केले. नंतर त्यांना टाटा कंपनीत नोकरी मिळाली शिवडीच्या बीडीडी चाळीत राहत असताना ते समता सैनिक दलात सामील झाले. इथपर्यंत वामनदादांना अक्षराचा परिचय नव्हता."[1] अडाणी-अशिक्षित वामनदादा पोटपाण्याच्या गरजेतून मुंबईला गेले. देहलवी येथील एका शिक्षकाकडून वामनदादा अक्षरे गिरवायला शिकले. हळूहळू ते जोडाक्षरे, दुकानांच्या पाट्या वाचायला शिकले. शिक्षणाबरोबरच वामनदादांना कुस्तीचा ही छंद होता त्यासाठी ते दररोज भरपूर व्यायाम करत असत.

वामनदादांना हिंदी व मराठी भाषेतील वाचन करायला फार आवडत होते. 1943 मध्ये राणीच्या बागेत बसले असताना हिंदीत विडंबन गीत लिहिले. पुढे हे विडंबन गीत आपल्या चाळीतील लोकांसमोर गायले या गाण्याला त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. यातूनच प्रेरणा घेवून पुढे वामनदादा कर्डक कवी झाले. वामनदादां कवी म्हणून पुढे येत असतानाच दलित चळवळ जोर धरू लागली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या लढ्यामध्ये वामनदादा सक्रिय होवू लागले. त्यांच्यावर आंबेडकरांच्या विचारांचा, कार्याचा प्रभाव होवून माणसाला माणूस पण प्राप्त करून देण्यासाठी शाहिरीतून जनतेचे प्रबोधन करणे व दलित माणसाला स्वत:ची जाणीव होण्यासाठी प्रबोधन करणे व दलित माणसाला स्वत:ची जाणीव व अस्तित्व प्राप्त करून देणे. दलितांवरील हजारो वर्ष होत असलेल्या अन्यायाला कोंडी फोडणे व लोकांची समाजव्यवस्थेतील गुलामीतून मुक्तता होण्यासाठी प्रयत्न करणे हे वामनदादांनी ध्यैय स्वीकारून आपल्या कवितेतून, शाहिरीतून बुध्दांचा मार्ग विचार तत्त्वज्ञान व तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि मानवमुक्तीचा मार्ग समाजाला माणूस म्हणून जीवन जगण्याचा विचार वामनदादा शाहिरीतून लोकांसमोर मांडू लागले शाहिरांच्या वाणीला या काळामध्ये धार प्राप्त होवू लागली होती "वामन कर्डक मात्र दलितांच्या दु:खद अवस्थेला आवर घालण्यासाठी समज देतात की, 'नको म्हणू नाही। भीम आहे सर्व ठाई' ते अमूल्य ग्रंथाच्या रूपाने आपल्यात जिवंत आहेत असे कर्डकांचे मन ग्वाही देते."[2] अशा पध्दतीने या काळात वामनदादा जनतेला डॉ. बाबासाहेबांचे कार्य कर्तृत्व व विचार यांसंबंधी जनतेसमोर डॉ आंबेडकरांना ठेवतात. दलित समाजाच्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य मुख्यत: डॉ. बाबासाहेबांमुळे शक्य झाले दलित समाजाच्या व्यथा, वेदना यांना आवर घालण्याचा प्रयत्न दादा करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येकांच्या जीवनातील स्थान महत्वाचे आहे. जीवनामध्ये प्रकाश दाखविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत त्यांच्यावर विश्वास ठेवून आपण विकास साधला पाहिजे ही भूमिका वामनदादा गीतांमधून व्यक्त करीत राहिले.

दलित समाजामध्ये आपापसातील मतभेद, दुहीचे वातावरण समाजमध्ये तेढ निर्माण करते. याचेही वर्णन गीतांतून करतात. तेढ निर्माण करण्याज्या शक्ती या घातक बनताहेत. यासंबंधीचे चित्रण वामनदादा कर्डकांनी कल्पतापूर्णतेने केलेले आहे. त्या वर्णनातून त्यांनी वास्तवतेचेही मर्मभेदी चित्रण केले आहे. कॉंग्रेस आणि कम्युनिष्ठांनी दलित समाजामध्ये फोडाफोडी केली तिने दलितांचे अतोनात नुकसान केले समंजस व कर्तव्यदक्ष मासोळीच्या रूपाने जणू डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या पिलांना म्हणजे समाजाला सावध होण्याचा इशारा देतात याचे चित्रण वामन कर्डकांनी आपल्या शैलीतून केले आहे त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे येते.

"मासळी बोले आपुल्या पिलाला। खेळ बाळा तू खाली तळाला।
दुनिया पहाण्याच्या फंदात पडता। व्यर्थ लागून जाशील गळाला।।"[3]

वामनदादांनी आपल्या समाजाला हा मासोळीरूपाने दिलेला मार्मिक सल्ला वामनदादांचे सूक्ष्म निरीक्षण दाखवून देते. अगदी सहजतेने त्या परिस्थितीचे चित्रण वामनदादा कर्डक करतात.

दलित कवी / शाहिरांनी 'जयभीम' या प्रात:स्मरणाविषयां, आंबेडकरांच्या जयंतीविषयी आणि काही कर्तृत्वान दलित



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

व्यक्तीच्या कार्य कर्तृत्वाविषयी रचना केल्या. वामनदादांनीही 'जयभीम' हा मार्ग यशाचा, चैतन्य, स्फूर्तीदायी, विद्या, विनय, शील आणि मांगल्यमय भासतो. एवढेच नाही तर हा मार्ग म्हणजे नेतृत्वाचा सानकोश वाटतो. आंबेडकरांची जयंती उत्सव म्हटला की, शाहिरांच्या अंतकरणाला उधाण येते. तो उत्सव जणू त्यांना आनंदोत्सव वाटतो या दिनाचे वर्णन वामन कर्डक, चंद्राची चांदणी येऊ न खाली भीमाला वारा घालते. असे या जयंती सोहळ्यादिवसाचे वर्णन आपल्या शाहिरीतून करतात. "आंबेडकर या 'एक ज्योतीने कोट कोट जोती' या धरतीवर प्रज्वलित केल्या."[4] डॉ. बाबासाहेबांबद्दलचे गौरवोद्गार शाहिर वामन कर्डकांनी या पध्दतीने व्यक्त केलेले आहेत.

आपल्या जीवनामध्ये वामन कर्डकांनी बुध्द तत्वज्ञानालाही महत्व दिले. 'सारे मानव प्राणी' ही रचना बुध्द विचारांचे दर्शन घडविते. ते म्हणतात,' सारे मानव प्राणी ना उच्चनीच कोणी' अशी भूमिका शाहिरीतून सांगतात समतावादी भूमिका सांगताना समाजात जातीयवाद नाही, वर्णभेद नाही, शूद्र, साळी, माळी, ब्राह्मण, कोळी असा कुठलाच भेद नाही अशी भूमिका वामनदादा घेताना दिसतात. सध्याच्या जागतिक पातळीवरचा असमतोल, शस्त्रनिर्मिती, मानवीसंहारासाठी सिध्द झाल्याने मानवाच्या अध:पात थांबविण्यासाठी आज संकटकाळामध्ये हे सर्व थांबवायचे असेल तर'आज संकटकाळी ना बुद्धावाचून वाली' असे आपले परखड मत वामनदादा कर्डक नोंदविताना दिसतात. दादांनी बुद्धविचार अगदी साध्या व सोप्या पद्धतीने विश्वशांतीचे तत्त्व स्पष्ट करून बुद्धधर्माची महानता व्यक्त केली आहे. माणसाच्या जीवनात दु:ख अटळ आहे. दु:खावर विजय मिळविण्यासाठी दु:खाचे अश्रू गाळत न बसता, मनाचा तोल राखणे आवश्यक आहे. हयासाठी बुद्ध तत्त्वज्ञानाची आवश्यकता असल्याचे वामनदादा सांगतात.

अशा रीतीने वामनदादा कर्डकांनी आपल्या शाहिरीतून डॉ. बाबासाहेबांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीने आणि शब्द सामथ्र्यांने लेखनीतून, महाराष्ट्राच्या जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. बुद्ध विचार आणि तत्त्वज्ञानाने मानवाचे अखंड कल्याण साधले जाणार आहे. विश्वशांती व विश्वकल्याणासाठी बुद्धविचार आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आज ही समाजाला आवश्यकता आहे असे दिसते. या प्रेरणेने वामनदादा कर्डक आयुष्यभर शाहिरीतून जनसेवेचे व्रत स्वीकारून जनतेला बुद्धविचार, आंबेडकरी विचारांचे महत्त्व देत राहिले

**संदर्भग्रंथ सूची:-**


1) https://mr.wikipidia.org/s/3rgt
2) दलित शाहिरीचे अनुबंध आशय आणि अभिव्यक्ती, डॉ. के.जे. सोनकांबळे, पृष्ठ क्र. 61.
3) ऊ. नि. पृष्ठ क्र. 70.
4) ऊ. नि. पृष्ठ क्र. 67.


◆◆◆◆◆




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# यशवंतराव चव्हाण आणि पंचायतराज व्यवस्था

संपादक
डॉ. राजेश करपे । डॉ. गणेश मोहिते



ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3
March 2022
Impact Factor : 7.429

UARESM

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# ...अनुक्रम...


६८) सौ. सुजाता सचिन देशमुख, श्रीमंत बाबासाहेब देशमुख — २६५
६९) डॉ. माया वानखेडे — २७१
७०) राहुल शिवाजी तिगोटे, प्रा. डॉ. दीपक भुसारे — २७४
७१) डॉ. एस. एस. बिरंगणे — २७७
७२) डॉ. महेश विनायक रोटे — २८०
७३) योगेश बाबासाहेब कवडे — २८३
७४) प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी — २८७
७५) महेशकुमार एकनाथ जाधव — २९०
७६) गोरे ज्ञानेश्वर प्रभाकर, प्रा. डॉ. दीपक भुसारे — २९५
77) Dr. Vivekanand Laxman Chavhan — 300
७८) प्रा. शिवराम सेगजी वसावे — ३०५
७९) उमेश कमलाकर नवल — ३११
८०) डॉ. संध्या मोहिते — ३१६
८१) अश्विनी शिवदास माने — ३२०
८२) डॉ. आर. बी. म्हस्के, डॉ. बी. के. झिरपे — ३२१
८३) प्रांजली रमेश खबाले — ३२६
८४) प्रा. डॉ. के. जी. पोकळे, गणेश रामराव कदम — ३३०
85) Dr. Madrewar S. G., Dr. Marwadi R. E. — 334
८६) प्रा. डॉ. सुनीता सिनगारे — ३३७
८७) प्रा. शिवराम सेगजी वसावे — ३४६
८८) डॉ. विठ्ठल रामकिशन भोसले — ३५२
८९) भावसार तन्मय प्रभाकर, डॉ. कावळे बंडु नानाभाऊ — ३५७
९०) प्रा. डॉ. नरवाडे जे. एम. — ३६१
९१) वैशाली प्रकाश पवार — ३६५
९२) डॉ. गिरे संजय भाऊराव — ३६८
९३) डॉ. प्रशांत एन. देशमुख — ३७०
९४) प्रा. अहिरे विलास सांडूजी, डॉ. रमाकांत एन. तिडके — ३७४
९५) प्रा. डॉ. मधुकर रामचंद्र साठे — ३७८
९६) डॉ. उमाकांत सुभाष गायकवाड — ३८१
९७) डॉ. मोरे अर्जुन मोहनराव — ३८५
९८) प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण — ३८९
९९) डॉ. लोमटे आर. व्ही., दळवे बालाजी भाऊसाहेब — ३९२
१००) डॉ. ए. बी. मुळीक — ३९६
101) Miss. Kambale Kusum Shivaji, Dr. N. B. Aghav — 402
१०२) डॉ. विठ्ठल केदारी — ४०६
१०३) प्रा. राम गोविंद दळवे — ४०८
१०४) डॉ. म्हस्के अमोल — ४१२
१०५) डॉ. इंगळे चत्रभूज बंकटराव — ४१५
१०६) प्रो. डॉ. गंगणे आर. व्ही. — ४१९
१०७) डॉ. मोराळे सुहास रंगनाथ, गीता शंकर गाडेकर — ४२३
१०८) कु. सुशीला असाराम शेजवळ, कु. छाया अनिल वाकोडे, प्रा. डॉ. सय्यदा रुक्साना तब्बस्सुम — ४२६
१०९) डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले — ४२९
११०) डॉ. गोंदकर तुकाराम दत्तात्रय — ४३३
१११) डॉ. चत्रभुज नारायणराव सोळंके — ४३७
११२) टिपू सुलतान सय्यद नूर सय्यद, योगेश बाबासाहेब कवडे — ४४०
113) Ms. Sanase Archana, Dr. Govardhan Aute — 446
११४) डॉ. मधुकर बैकरे — ४४९
११५) डॉ. कैलास सोनू महाले — ४५३
११६) डॉ. देशमुख एम. बी. — ४५९
११७) गरुड काकासाहेब लक्ष्मण, डॉ. जिगे डी. एन. — ४६३
११८) डॉ. बी. एन. कावळे, अमोल शशीकांत भोसले — ४६७
११९) गणेश पुनमचंद विरूटे, प्रा. डॉ. सुवर्णा पाटील — ४७०
१२०) प्रा. डॉ. शिंदे शाम भागवत — ४७३
१२१) डॉ. सुजाता करांडे — ४७६
१२२) प्रा. डॉ. रामहरी मायकर — ४८४
१२३) प्रा. डॉ. पवार आर. एस. — ४८७
124) Kishor Ganesh Gorde, Yogesh Dnyaneshwar Shinde — 491
१२५) श्री. दत्तात्रय विश्वंभर जाधव, प्रा. डॉ. आर. बी. बनारसे — ४९३
१२६) प्रा. डॉ. दीपक सुभाष वाघमारे — ५००
१२७) डॉ. राजेंद्र साहेबराव धाये, गोधाजी सोपानराव कापसे — ५०४
१२८) प्रा. डॉ. पांडुरंग माणिकराव नवल — ५०७
१२९) जयश्री साहेबराव बनसोड — ५११
१३०) प्रा. डॉ. पंडित रानमाळ — ५१४
१३२) डॉ. श्याम पुंजाराम पवार, मुरलीधर संपतराव राठोड — ५१७
133) Dr. Fulchand Salampure — 521
१३४) निलेश शशिकांत खिल्लारे, आश्रू पांडूरंग मोरे — ५२५




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

# यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य

**डॉ. विठ्ठल केदारी**

प्रमुख, मराठी विभाग, सहाय्यक प्राध्यापक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारूर, जिल्हा - बीड, पिन कोड- 431124.

यशवंतराव चव्हाण यांचे कार्यकर्तृत्व विविधांगी पैलूंनी अभ्यासावे लागते. यशवंतरावांनी शिक्षण, कृषी, अर्थ, साहित्य, संस्कृती, समाज, राजकारण आणि संगीत अशा विविधांगी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अष्टपैलू व्यक्तिमत्व लाभलेले यशवंतराव चव्हाण भविष्यकालीन वेध घेणारे राजकारणी होते. सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. तेथेच त्यांचे बालपण गेले. उद्याच्या उज्ज्वल महाराष्ट्रासाठी दूरदृष्टीने प्रयत्न करणारे, अखंड तेवत राहणारे यशवंतराव चव्हाण होते. भारतीय संस्कृती.... श्रेष्ठता व तिचे प्राचीनत्व हा महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाचा मूलाधार आहे हे त्यांनी अचूकपणे हेरले होते. भारतीय संस्कृती जगातील इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ असून ती भारतीय माणसाला मुक्तपणे विहार करायला लावणारी आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यावर समाजवादाचा प्रभाव पडला होता. समाजवादी दृष्टिकोन आणि विचार हा त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या केंद्रस्थानी होता. लोकशाही मूल्यांवर यशवंतरावांची श्रद्धा होती. लोकशाहीला प्रतिष्ठान आणि संपन्नता मिळवून देण्यासाठी यशवंतरावांनी कार्य केले. राजकारणातील मुत्सद्दीपणा, अभ्यास आणि वैचारिक प्रगल्भता या मूल्यांतून त्यांनी महाराष्ट्रालाच नाही तर भारतीय राजकारणाला नवा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न केला. भारताचे संरक्षण मंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी यशस्वीपणे नेतृत्व केले. संरक्षण खात्याचे मंत्री म्हणून काम करताना यशवंतरावांनी निर्भयपणे निर्णय घेतले. महाराष्ट्रीय माणसाचे सामर्थ्याची व कौशल्याची जाणीव करून दिली. यशवंतराव चव्हाण खेड्यातून आलेले असल्याने ग्रामीण जीवनाची त्यांना जाणीव होती. ग्रामजीवन आणि संस्कृती यांचा विकास झाला. तरच भारताचा विकास होईल यावर त्यांचा विश्वास होता. भारतीय माणूस शेतीवर आधारित असून शेती हा त्याच्या अर्थव्यवस्थेचा मूलाधार आहे. शेतीमध्ये विविध प्रकारची तंत्रज्ञाने आणल्याने अधिकाधिक शेती उत्पन्न वाढेल व शेतकऱ्याला आर्थिक सुबत्ता प्राप्त होईल. यातून सहाजिकच शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन त्याचा विकास होईल. स...हजिकच ग्रामीण भारताचा आर्थिक सक्षमपणा साध्य होईल. यावर यशवंतरावांचा विश्वास होता. ग्रामीण जीवन शैली आणि ग्रामीण अर्थव्यवस्था ह्या यशवंतराव चव्हाण यांनी यांनी जवळून पाहिल्या होत्या. त्यामुळे त्यांनी शेती विकासासाठी नवनवीन योजना महाराष्ट्रामध्ये राबविल्या. यातून हळूहळू शेतकऱ्याचा विकास होत राहिला. यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना सामान्य माणसासाठी, शेतकऱ्यासाठी, उद्योगधंद्यांसाठी, शिक्षणासाठी व सहकार क्षेत्रासाठी विविध योजना राबविल्या. यातून प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीला शासनस्तरावरून मदत व्हायला सुरुवात झाली. "यशवंतराव आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक धोरणाचा त्यांनी 1960 च्या दशकात पाया घातला. यामध्ये कृषी व औद्योगिक वाढ परस्परांना पूरक व पोषक ठरेल हे सूत्र त्यांनी ठेवले होते. धनंजयराव गाडगीळ यांसारख्या अर्थशास्त्रज्ञांनाबरोबर घेऊन सहकारी तत्त्वावर महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया घातला. त्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्रातील समतोल किती महत्त्वाचा असतो हे त्यांनी ओळखले होते. त्यांची आठवण 1986 मध्ये भरलेल्या जागतिक अर्थशास्त्र परिषदेच्या निमित्ताने झाली. कारण कृषी व औद्योगिक क्षेत्रामध्ये समतोल हाच विषय परिषदेसाठी निवडण्यात आला होता. यशवंतरावांनी जी गोष्ट 1960 च्या दशकात ओळखली होती. व त्यासाठी कृषी औद्योगिक विकासाचे प्रारूप महाराष्ट्रासाठी निवडले होते. त्याची जाणीव 1986 मध्ये जागतिक पातळीवर अर्थशास्त्रज्ञांना झाली. यावरून यशवंतरावांची दूरदृष्टी लक्षात येते." यशवंतरावांनी खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचा पाया बळकट करायला सुरुवात केली. यशवंतरावांना यशही मिळत गेले. त्यांच्याच नेतृत्वाने महाराष्ट्राला आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, सहकार आणि कृषी या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवता आले. या सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्राने प्रगती केली. याचे सर्व श्रेय



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

यशवंतराव चव्हाण यांनाच द्यावे लागते. यशवंतराव चव्हाण कोणताही प्रसंग सहजतेने हाताळतात. समाजाला हितकारक ठरणाऱ्या गोष्टीचा प्रामुख्याने स्वीकार करत.

यशवंतराव चव्हाणांनी शिक्षण क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडवला. विद्यापीठीय, महाविद्यालयीन व प्राथमिक शिक्षण यासंबंधी यशवंतरावांची भूमिका स्पष्ट होती. मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी यशवंतराव आग्रही होते. इंग्रजी भाषेतून दिले जाणारे वैद्यकीय व अभियांत्रिकीचे शिक्षण मातृभाषेतून मिळण्याची सोय व्हावी ही भूमिका यशवंतरावांची राहिली. मानवी संसाधनांचा विकास शिक्षणाशिवाय होणार नाही हे यशवंतरावांनी ओळखले होते. राज्याच्या शिक्षण व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले. शिक्षणव्यवस्थेत आमुलाग्र बदल करून गती व दिशा प्राप्त करून दिली. परिणामी महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये बदल झाला. शिक्षण प्रसार व प्रचार यांच्या माध्यमातून सर्वसामान्यापर्यंत पोहोचले. म. फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये शिक्षणासंबंधी भूमिका घेतल्या होत्या. त्या भूमिका यशवंतराव चव्हाण यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवल्या. त्यांचे प्रकटीकरण करून यशवंतरावांनी शिक्षण व्यवस्था सुरु केली. "शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची यामुळे काही संगती लावता येते. त्यांचा योग्य अर्थ समजून घेता येतो आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो. आपल्या व्यक्तिमत्त्व काय घडते. हे समजावून घेता येते आणि समजून घेता येते. त्याला मी शिक्षण मानत आलो आहे."[2] अशा पद्धतीने यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाची व्याख्या केली आहे. या व्याख्येमध्ये यशवंतराव चव्हाणांचा शिक्षणाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन आणि भूमिका पाहायला मिळते.

शिक्षणासंबंधी आपली निर्भीड भूमिका व्यक्त करणारी यशवंतराव चव्हाण भारतीय शिक्षणाचा इतिहास आणि परंपरा विचारांमध्ये घेतात. त्यांचे शैक्षणिक विषयावरील प्रतिपादन लक्षात घेताना शिक्षण कोणत्या माध्यमातून असावे यासंबंधीची त्यांची भूमिका लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्यामध्ये "आमच्या येथील बहुसंख्य समाज हा हजारो वर्षापासून शिक्षणापासून दूर आहे. लोकशाहीचा खरा अर्थ त्यांना समजावून सांगावयाचा असेल आणि लोकशाही मजबूत करावयाची असेल तर शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतूनच दिले पाहिजे. त्यातूनच आमची जनता शहाणी होईल आणि खऱ्या अर्थाने ती लोकशाहीची रक्षण करेल. म्हणूनच ते म्हणतात ज्ञान भाषा एक आणि लोक भाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहानी आहे. ऋषीमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा होती संस्कृत कारण ती देव भाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत हे फार पूर्वी पण नंतरही तेच झाले इंग्रज आले आणि या देशातील ज्ञान भाषा इंग्रजी बनली."[3] लोक भाषाच या पद्धतीने आपल्यापासून दूर गेल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्वसामान्य लोक शहाणे होणार तरी कसे. म्हणून लोकभाषा आणि ज्ञानभाषा एक या धोरणाला त्यांनी कडाडून विरोध केल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात महात्मा फुले यांनी शिक्षणाबाबत अतिशय गांभीर्याने मत व्यक्त केले होते. 'तुम्हाला जर झाड मोठी आणि मजबूत करायचे असेल तर त्याच्या बुंध्याला पाणी घातले पाहिजे.' यशवंतराव स्वतः कायद्याचे पदवीधर होते. साहित्य आणि कलेचे उत्तम जाणकार होते. कायद्याशीसंबंधित मत व्यक्त करताना ते म्हणतात,"कायद्याचे ज्ञान हे विज्ञानाच्या ज्ञानाइतके महत्त्वाचे आहे. कारण शेतकरी हा चांगला होऊनही त्याला कायद्याचे ज्ञान नसेल तर तो फसतो असा आपला अनुभव आहे. कारण कायद्याचे ज्ञान हे प्राणवायू सारखी आहे."[4] इंजिनीयर, डॉक्टर या सगळ्यांना त्यांच्या धंद्याला आवश्यक असे कायद्याचे ज्ञान असावे लागते. लोकशाही हे मुळी कायद्याचे राज्य आहे. तेव्हा कायद्याचे ज्ञान हे आज आवश्यक अशी गोष्ट आहे.

## संदर्भग्रंथ सूची

1) डॉ. नाईकवाडे अशोक - महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण.
2) यशवंतराव चव्हाण - सह्याद्रिचे वारे.
3) यशवंतराव चव्हाण – युगांतर.
4) यशवंतराव चव्हाण - सह्याद्रिचे वारे.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

आज़ादी का
अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- L, 09 April 2022



Kisan Shikshan Prasarak Mandal, Udgir's

## Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur

NAAC Accredited with 'B' Grade
Dist. Latur State : Maharashtra (433515)

One Day International Seminar (Online)
Organized By
Department of Sociology in collaboration with
Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded
On

## "Yugpurush Dr. Babasaheb Ambedkar"

Editor in Chief : **Principal Dr. Vasant Biradar**
Editor : **Dr. Satish Sasane**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 21. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजातील अस्पृश्यता व धर्माच्या संदर्भात समाजशास्त्रातील योगदान | डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 66 |
| 22. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक कार्य | डॉ. विठ्ठल केंदारी | 69 |
| 23. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | डॉ. विक्रम जाधव | 72 |
| 24. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : एक अभ्यास | जामकर अल्का रानबा | 75 |
| 25. | आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय योगदान | डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार | 78 |
| 26. | डॉ. बी. आर. आंबेडकर : धर्मांतराची चळवळ, कारणे, परिणाम | प्रा. डॉ. सुनंदा भद्रशेटे | 82 |
| 27. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक चळवळी" | प्रा. डॉ. सिद्धेश्वर रामचंद्र शेटकर | 86 |
| 28. | 'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर' | सविता भिवा धनवडे | 89 |
| 29. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य | प्रा. डॉ. फड एल.एच. | 92 |
| 30. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार" | प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव | 97 |
| 31. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य | डॉ. गोविंद धोंडीराम उफाडे | 101 |
| 32. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ | प्रा. डॉ. सौ. माधुरी गोविंद गिरी | 105 |
| 33. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | प्रा. बालासाहेब शिवाजी पवार | 108 |
| 34. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा व देशप्रेम : एक आकलन | डॉ. भास्कर वि. नरवाडे | 112 |
| 35. | बहुजनांचे मुक्तीदाते डॉ.बाबासाहेब आंबेडकर | श्री. राहूल भागवत गायकवाड | 115 |
| 36. | डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे शैक्षणिक विचार - एक अभ्यास | प्रा. डॉ. इकबालखान गफारखान | 119 |
| 37. | बाबासाहेबांचे शिक्षणविषयक विचार व शिक्षणविषयक संविधानात्मक तरतूदी | प्रा. विनया केशव कांबळे | 122 |
| 38. | महिलाओं के मुक्तिदाता डॉ. बाबासाहब आम्बेडकर | डॉ. बालिका रामराव कांबले | 125 |
| 39. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | डॉ. चंदन एम. बावलगावे | 129 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक कार्य

**डॉ. विठ्ठल केदारी**

सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारूर, जिल्हा - बीड.

भारतीय समाजव्यवस्थेला जातीयतेचा कलंक लागलेला आहे. समाजामध्ये जातीच्या आधारावर व्यक्तीची प्रतिष्ठा होती. जातीच्या आधारावर व्यक्तीचे कर्म निश्चित केले होते ते कार्य प्रत्येक व्यक्ती निष्ठेने पूर्ण करीत होता. गावाची सेवा चाकरी करणे आणि दिलेल्या मोबदल्यात आपली व कुटुंबाची उदरनिर्वाहाची गरज भागवणे. यावरच व्यक्तीची उपजीविका होती. भारतीय समाज व्यवस्थेतील आजही अठरापगड जातींची जीवन जगण्याची पद्धती फारशी बदललेली नाही. अस्पृश्य म्हणून समाजव्यवस्थेमध्ये त्यांना हिणवले जाते. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार, शोषण व पिळवणूक होताना दिसून येते. काबाड कष्टाची कामे त्यांना करावी लागतात. या मोबदल्यात पैशाच्या वा अन्नधान्याच्या स्वरूपामध्ये मोबदला दिला जातो. यावर या कुटुंबाचे उदरनिर्वाह चाले. आज समाजामध्ये जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला संविधानाने हक्क व अधिकार बहाल केले आहेत. यामुळे आज समाजातील प्रत्येक व्यक्ती घटनात्मक हक्क मागताना दिसत आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्क व अधिकारांच्या जोरावर अस्पृश्य म्हणून हीनवला गेलेला माणूस स्वतःचे अस्तित्व शोधत आहे. अस्मिता शोधताना आपल्यावर आजवर झालेल्या अन्याय-अत्याचाराची जाणीव झाली. ही जाणीव संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृती व विचारातून प्राप्त झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेतील दलित माणसाला हक्क व अधिकार प्राप्त करून दिले. माणूस म्हणून त्याला समाजामध्ये सन्मानाने जगता यावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध पातळ्यांवर संघर्ष केला. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह व मनुस्मृतीचे दहन या कार्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित माणसाला मानवमुक्तीचा मार्ग दाखवून दिला. डॉ. बाबासाहेबांनी केवळ दलित माणसालाच अधिकार व हक्क प्राप्त करून दिले नाहीत. तर भारतीय समाज व्यवस्थेमध्ये महिलांना कायम दुय्यमत्वाची वागणूक होती. समाजव्यवस्थेतील सवर्ण अथवा अस्पृश्य समाजातील महिला प्रस्थापित समाजव्यवस्थेमध्ये मुख्य प्रवाहामध्ये कुठेही नव्हती. महिला म्हणून दुय्यम स्थान व दलित समाजातील तिचे दलित असणे या दोन पातळ्यांवर दलित स्त्रीचे शोषण होत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या उद्धारासाठी घटनात्मक कायदे करून सवर्ण अथवा दलित महिलांना मानाचे-सन्मानाचे जीवन जगता यावे अशी घटनात्मक तरतूद केली. आज भारतीय महिला जागतिक पातळीवर उंच भरारी घेताना दिसून येतात. "हिंदू समाजरचना ही वर्णाधिष्टीत आहे. इथे माणसाला माणूस म्हणून महत्व नाही तर त्याचे मूल्य जात किंवा वर्ण यावर अवलंबून होते. या वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा प्रमुख चार गटात विभागणी केली आहे. या क्रमानुसार त्यांचा सामाजिक आणि सांस्कृतिक स्तर दर्जा कमी कमी होत गेला आहे. शूद्र समाजात पुन्हा दलित माणसाचे जीवन खूपच कष्टप्रद आणि लाचार होते. त्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्कच या समाजव्यवस्थेने नाकारला होता. हजारो पिढ्यांपासून हा दलित समाज केवळ पशुवत जीवन जगत होता. या अन्याय अत्याचाराविरुद्ध पहिले बंड पुकारले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या क्रांतीप्रवण महामानवाने हजारो वर्षांच्या परंपरेत अडकून पडलेल्या गावकुसाबाहेर जीवन जगणाऱ्यांना जात, रूढी, प्रथा व परंपरेच्या बेडीत अडकलेल्या दलिताला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथमतः अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि आत्मोद्धाराच्या सामर्थ्याची युगप्रवर्तक चेतना दिली. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्वाची दीक्षा दिली. त्यांच्या परिवर्तनवादी प्रेरणेतूनच दलित साहित्याचा जन्म झाला. दलित साहित्यात कथा, कादंबरी, कविता आणि आत्मकथन या लेखन प्रकारातून दलित लेखक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेला नकार देत आहे."[1] भारतीय समाजव्यवस्थेत जातीयतेचे चटके डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुभवले होते. दलित समाजात जन्म आणि दारिद्र्य अशा प्रतिकूल परिस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडले होते. या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव डॉ. बाबासाहेबांनी घेतला होता. यामुळेच त्यांनी पुढे '□नहिलेशन ऑफ कास्ट' सारखा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

त्यांनी भारतीय समाजातील जात व्यवस्थेची सूत्रबद्ध पद्धतीने मांडणी केली आहे. "लाहोर येथील जात पात- तोडक मंडळाने या संस्थेने 1936 सालच्या आपल्या वार्षिक संमेलनासाठी डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षपद स्वीकारावे म्हणून आग्रह धरला होता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रस्तावित अध्यक्ष भाषणाचा मसुदा पाहिल्यानंतर त्यातले जहाल विचार स्वीकारणे त्यांना शक्य झाले नाही. डॉ. आंबेडकरांनी अर्थातच आपल्या भाषणात कोणताही बदल करण्याचे नाकारले. शेवटी ते संमेलन रद्द करण्यात आले आणि डॉ. आंबेडकर यांनी आपले ते लिखित भाषण 1936 साली पुस्तकाच्या रुपाने प्रसिद्ध केले."[2] भारतामध्ये सामाजिक सुधारणांचा मार्ग जातीय रचनेमुळे अडथळयांचा झाला आहे हे डॉ. बाबासाहेबांनी हेरले होते. याकरिता भारतामध्ये "आधी सामाजिक समता प्राप्त झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात आपण शाश्वत स्वरूपाची प्रगती करू शकत नाही हा विचार एकेकाळी मान्यता पावला होता. दुष्ट रूढी यांनी केलेल्या उपायांमुळे हिंदू समाज कार्यक्षम नाही, म्हणून या दुष्ट रूढीचा नायनाट करण्यासाठी अविश्रांत-परिश्रम केले पाहिजेत हे सर्वमान्य झाले होते. त्यामुळेच राष्ट्रीय काँग्रेसच्या जन्माबरोबरच सामाजिक परिषदेचा पाया घातला गेला. ज्या वेळी काँग्रेस देशाच्या राजकीय संघटनेतील कच्च्या दुव्यांचा शोध घेण्यात गुंतली होती, त्याच वेळी हिंदू समाजातील कच्चा दुव्यांचा सामना करण्यात सामाजिक परिषद मग्न होती. काही काळ काँग्रेस आणि सामाजिक परिषद यांनी एकाच कार्याच्या दोन बाजूंनी काम करावे त्याप्रमाणे कार्य केले; आणि त्यांनी आपली वार्षिक संमेलने ही एकाच मंडपात भरवली. परंतु लवकरच या दोन्ही बाजूंचे रूपांतर दोन स्वतंत्र पक्षांत झाले, एक राजकीय आणि दुसरा समाजसुधारकांचा पक्ष. या दोन गटांत तीव्र स्वरूपाचा वादही पेटला. राजकीय सुधारणावाद्यांच्या गटाने काँग्रेसला उत्तेजन दिले तर समाजसुधारकांनी सामाजिक परिषदेचे समर्थन केले अशा रीतीने हे दोन गट परस्परांचे शत्रू झाले. राजकीय सुधारणांच्या आधी सामाजिक सुधारणा अनिवार्य आहेत काय, हा त्यांच्यासमोर वादाचा विषय होता. दहा वर्षांपर्यंत दोन्ही गटांचे वजन तुल्यबळ होते आणि हे वाक्युद्ध कोणत्याही बाजूचा विजय न होता चालू होते. तथापि नंतरच्या काळात सामाजिक परिषदेचे नशिबाला जलद ओहोटी लागण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली होती. बहुसंख्य सुशिक्षित हिंदू राजकीय प्रगतीच्या पक्षाचे समर्थन करतात आणि समाज-सुधारणेविषयी उदासीन आहेत, असे मोठ्या दुःखाने सामाजिक परिषदेचे अध्यक्ष पद भूषवणारे सदगृहस्थ आपल्या भाषणांतून हेच सांगत होते. काँग्रेसच्या वार्षिक संमेलनाला उपस्थित राहणाऱ्यांची संख्या फार मोठी होती आणि काँग्रेसबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्यांची संख्या तर त्याहूनही मोठी होती. सामाजिक परिषदेच्या वार्षिक संमेलनाला उपस्थित राहणाऱ्यांची संख्या त्या मानाने अतिशय कमी होत. ही उदासीनता आणि सभासदांची रोडावलेली संख्या त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून त्यानंतर लवकरच राजकारणी लोकांकडून उघडपणे शत्रुत्वाची कृत्य करण्यास सुरुवात झाली."[3] तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा याबाबतीत दोन वेगवेगळे विचार प्रवाह होते. समाजाची प्रगती व्हायची असेल तर जात निर्मूलन होणे महत्त्वाचे आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजामध्ये प्रथमतः सामाजिक सुधारणा घडून आल्या पाहिजेत यासाठी सामाजिक सुधारणांना प्राधान्याने स्थान दिले. सामाजिक प्रगती झाल्याशिवाय माणसाची उन्नती होणार नाही. याकरिता समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, जातीयता स्पृश्य-अस्पृश्य, भेदभाव या गोष्टी समूळ नष्ट झाल्या पाहिजेत हा आग्रह धरणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या विचारातून व कृतीतून सामाजिक सुधारणा घडवण्यासाठी प्रयत्नशील राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सुधारणा समाजाला सोबत घेऊन घडवून आणायला सुरुवात केली. यावेळी त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेचा रोष पत्करला व होणाऱ्या कोणत्याही परिणामाची तमा बाळगली नाही. भारतातील सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय आपण राजकीय सुधारणांसाठी पूर्णपणे अपात्र आहोत असे डॉ. बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. मध्य भारतात 'बलाई' नावाची एक अस्पृश्य जात आहे. या जमातीवर हिंदूंकडून त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची बातमी तत्कालीन दैनिक 'टाइम्स ऑफ इंडिया' (04.01.1928) प्रसिद्ध केली होती. या वर्तमानपत्राने नमूद केल्याप्रमाणे सवर्ण हिंदूंनी इंदोर राज्यातील कनारिया, बिचोली-हाफशी बिचोली हापशी बिचोली-मर्दाना आणि इतर पंधरा खेड्यांतील बलाई लोकांना गावात



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

राहावयाचे असेल तर बाल आई लोकांनी रंगीत किनारीची किंवा सुंदर किनारीची धोत्रे वापरू नयेत. बालाई स्त्रियांनी सोन्या-चांदीचे अलंकार वापरू नयेत. त्यांनी सौंदर्यपूर्ण झगे किंवा पोलके घालू नयेत. हिंदू स्त्रियांच्या सर्व बाळंतपणात बालाई महिलांनी त्यांची सेवा करावी. बालाई लोकांनी मोबदला न मागता हिंदूंची सेवा करावी आणि स्वखुशीने हिंदू जे काही देतील त्याचा त्यांनी स्वीकार करावा. या नियमांचे बंधन पाळणे असं जर बालाई लोक कबुल नसतील तर त्यांनी गाव सोडून चालते व्हावे. असा आदेश बालाईना देण्यात आला. बालाई लोकांनी ही बंधने अमान्य केली. म्हणून हिंदुनी त्यांच्याविरुद्ध कारवाई सुरू केली. बालाई लोकांना गावातील विहिरीवर पाणी भरण्यास मनाई केली. रानात जनावरे चरावयास बंदी केली. हिंदूंच्या मालकीच्या शेतातून लोकांचे जाणे-येणे बंद केले. त्यामुळे बालाई माणसाच्या शेताभोवती हिंदूंची शेती असल्यास त्याला स्वतःच्या शेतात जाण्यास रस्ता बंद झाला. याशिवाय हिंदूंनी आपली गुरे या लोकांच्या शेतात मोकाट सोडली. अत्याचाराविरुद्ध दाद मागण्यासाठी बालाई लोकांनी दरबारात अर्ज दाखल केले. परंतु त्यांना तत्परतेने मदत मिळाली नाही आणि त्यांच्यावर अत्याचार सुरूच राहिला. त्यामुळे शेकडो लोकांना आपल्या बायका-मुलांसह बापजाद्यानपासून पिढ्यानपिढ्या चालत आलेले वस्तीस्थान सोडून शेजारच्या राज्यातील खेड्यांत स्थलांतरित व्हावे लागले. अशा पद्धतीने भारतातील दलित समाजातील माणसावर अन्याय अत्याचारांची मालिका दररोज सुरू असलेली पाहायला मिळत होती. गुजरातमध्ये कविठा या गावात अस्पृश्य समाजाविषयी असाच हुकुम हिंदूंनी काढला होता. गुजरातमध्ये झानू या गावात 1935 मध्ये अस्पृश्यांनी धातूच्या भांड्यातून पाणी आणले म्हणून हिंदूंनी अस्पृश्यांवर हल्ला केला. जयपुर राज्यातील 'चकवारा' या गावी एक अस्पृश्य तीर्थयात्रा करून परत आल्यानंतर त्याने धर्मकृत्य म्हणून आपल्या अस्पृश्य बांधवांना जेवण देण्याची व्यवस्था केली म्हणून अस्पृश्य पंक्तीत बसून जेवण करताना शेकडो हिंदू काठ्या लाठ्या घेऊन पंक्तीत शिरले व अन्नाची नासधूस केली त्यांना झोडपून काढले. या रीतीने भारतीय समाजात दररोज अन्याय अत्याचार घडत होते. हे अन्याय-अत्याचार घटनात्मक तरतुदी च्या माध्यमातून कायमचे संपुष्टात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात तरतूद केली व कायद्याने अन्याय, अत्याचार, शोषण व पिळवणूक बंद करण्यासाठी प्रयत्न केले. आज सुद्धा जातीभेदाला समर्थक लाभलेले पाहायला मिळतात. जातिव्यवस्था म्हणजे केवळ श्रम विभाजनाचे दुसरे नाव असे त्यांना वाटते. वंश आणि रक्ताच्या शुद्धतेसाठी जातीय संरक्षण करणे हेतू काही समूह सांगतात. मात्र शुद्ध वंशाचे लोक जगाच्या पाठीवर कोठेही अस्तित्वात नाहीत. जगाच्या सर्व भागातून मिश्र वंशाचे लोक आहेत असे वंश शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. अशा विविध प्रकारचे तर्कवितर्क निर्माण करून धर्म, जात, वंश यासंबंधीचे पावित्र्य, श्रेष्ठत्व यादृष्टीने लोकांच्या मनामध्ये जातीभेदाचे वातावरण निर्माण केले जाते. जात,धर्म व वंश यासंबंधी लोकांच्या मनातील अज्ञान दूर झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. तसेच व्यक्तीच्या मनातील श्रेष्ठत्वसंबंधीचा अहंभाव दूर होणे आवश्यक आहे. यासाठी भारतीय समाजव्यवस्थेतील सर्व जाती-धर्मांनी आपापसातील धर्मश्रेष्ठत्व बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे. त्याशिवाय समाजाची प्रगती सर्वांगीन दृष्टिकोनातून घडू शकणार नाही असे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर भारतीय समाजव्यवस्थेतील जाती निर्मूलनासाठी प्रयत्न केले. भारतातील जातींचे उच्चाटन होणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. जाती-जातींमध्ये अडकलेला भारतीय समाज भेदभावातून बाहेर आल्याशिवाय समाजाचा विकास होणार नाही. समाजातील एकमेकांविषयीची तुच्छतेची भावना संपणार नाही. यासाठी भारतीय समाजामध्ये आंतरजातीय विवाह घडून आले पाहिजेत. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. एकूणच आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाती निर्मूलनसंबंधी कार्य करत राहिले. त्यांच्या विचारातून व कृतीतून समाजामध्ये बदल घडवण्यासाठी प्रयत्न केले. संविधानामध्ये जात निर्मूलन विषयक कलमांचा समावेश करून जातीव्यवस्था घटनात्मक दृष्टिकोनातून संपुष्टात आणण्याचा प्रयत्नही केला.

**संदर्भग्रंथ सूची**


1. दलित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाट्यविश्व - प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ.
2. 'प्रज्ञा महामानवाची' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य (खंड दोन)-संपादक, डॉ. नरेंद्र जाधव
3. तत्रैव, संपादक डॉ. नरेंद्र जाधव


***



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol.I, Issue-LXIV, June 2022

Editor : Mrs. Pallavi Laxman Shete

## Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | राजकारणाची स्थिती व गती | | |
| 15. | भाषाविज्ञान व अभ्यास पद्धती | प्रा. डॉ. विजय पाटील | 59 |
| 16. | मराठी समकालीन कथा | डॉ. विठ्ठल केदारी | 64 |
| 17. | भारतातील पंचायतराज व्यवस्थेचे लोकशाहीच्या विकासात योगदान : एक अभ्यास | Dr. Panjab Shivharrao Padul | 70 |
| 18. | बदलत्या शिक्षणाच्या स्वरूपानुसार मुलांना सहायभूत ठरणारी पालकांची भुमिका | गौरी चंद्रशेखर चिंचोळकर | 75 |
| 19. | "शिक्षण हक्क कायदा 2009 : सद्यस्थिती " | राजकुमार सायलू लिंगदळे | 79 |
| 20. | जागतिक संघटना आणि त्यांचा विस्तार | प्रा. डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे | 84 |
| 21. | भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान : एक अभ्यास | डॉ. एस. एल. मेढे | 89 |
| 22. | बागलाणातील १९४२ ची चळवळ | प्रा. डॉ. संदीप भामरे | 93 |
| 23. | नाटो संघटना आणि आंतरराष्ट्रीय राजकारण | डॉ. राम पांडूरंग साबदे | 96 |
| 24. | राजा कृष्णदेवराय त्याची आमुक्त् – माल्यदा | डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार | 99 |
| 25. | गुंतवणुकीच्या दृष्टीने शेअर बाजाराचे महत्व | प्रा. मनोहर नारायण मोरे | 102 |
| 26. | गिरीश खारकर यांच्या 'जाणिवांची स्पंदने' (काव्यसंग्रह) : एक आकलन | डॉ. भगवान जे. साबळे | 104 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# मराठी समकालीन कथा

डॉ. विठ्ठल केदारी

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई. जिल्हा - बीड,

मराठीतील कथालेखनाला खूप जुनी परंपरा आहे. मराठी साहित्याने कथा लेखनामध्ये भरारी घेतली आहे. आधुनिक कालखंडामध्ये मराठी कथेला सुरुवात झाल्यावर अव्वल इंग्रजी कालखंडात कथालेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. गोष्ट सांगणे आणि ऐकणे ही माणसाची प्रवृत्ती आदिम अवस्थेपासून आहे. भाषा अवगत झाल्यापासून करमणुकीसाठी व मनोरंजनासाठी माणसाने गोष्ट सांगण्याची कला अवगत केली. कथा माणसाच्या गरजेतूनच स्वतःचा आकार घेऊ लागली. जसजसा मानवी मनाचा विकास होऊ लागला तसतसा माणसाच्या आवडी मध्ये ही बदल होऊ लागला. कथेच्या विकासाचा आजचा टप्पा विशिष्ट अवस्थेवर पोहोचला आहे. "कोणत्याही भाषेत सुरुवातीच्या काळात कथात्मक साहित्याला जास्त बहर आलेला आढळेल. मराठी भाषा जन्मल्याबरोबर तत्वज्ञानाचे विचार बोलू लागली. असे असले तरी तिला कथेचे वावडे नाही. तत्त्वज्ञान सामान्य जनतेच्या गळी उतरविण्यासाठी तत्कालीन कवी आणि तत्वज्ञ यांना दृष्टांतांचा व आख्यानाचा आश्रय घ्यावा लागला होता."[1] अशा प्रकारे सुरुवातीची कथा आकार घेत विकसित अवस्थेकडे प्रवास करू लागल्याचे लक्षात येते. एकूणच सुरुवातीची कथा ही करमणूक, मनोरंजन आणि उपदेश करण्यासाठी लिहिल्याचे दिसून येते. हे जाणकार वाचक आणि रसिक यांना पटणारे आहे. सुरुवातीच्या काळात गोष्टीचा प्रवास एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होताना मौखिक स्वरूपाने झाला. नंतरच्या काळात लिपीचा शोध लागल्यावर कथा लिखित स्वरूपाने वाचकांसमोर आली.

करमणूक पूर्व मराठी कथा, करमणूक कालखंडातील मराठी कथा, मनोरंजन कालखंडातील मराठी कथा असे विकासाचे टप्पे अभ्यासासाठी मानले जातात. मुख्यतः मराठी कथा ही करमणूक कालखंडामध्ये सुरू झाली. आधुनिक कथा प्रारंभी सुरू झाल्याचे लक्षात येते. करमणूक कालखंडातील कथेने स्वतःची ओळख प्राप्त केली. मात्र तिला दुय्यम महत्त्व प्राप्त होते. मराठी ज्ञानप्रसारक आणि विविध ज्ञानविस्तार या नियतकालिकांनी कथा समृद्ध केली. यामध्ये मराठीतील नियतकालिकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या कालखंडात गुर्जर यांनी मराठी कथेला लोकप्रिय बनविले तसेच यादरम्यान कृष्णाजी केशव गोखले, सहकारी कृष्ण, नारायण हरी आपटे, सरस्वती कुमार, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वामन जोशी, न. चि. केळकर, शि. म.परांजपे यांनी मराठी कथा लेखन केले. गुर्जरांच्या कथेने मराठी कथेला स्वतःचे स्थान प्राप्त करून दिले. मराठी वाचकांच्या मनात कथेची आवड निर्माण केली तसेच नियतकालिकांच्या सृष्टीत स्वतंत्र स्थान मिळवून द्यायचे व तिला स्वतःचे खास रूप देण्याचे श्रेय मुख्यतः गुर्जरांनी केले. गुर्जरांनी अनुवादित कथेवर अधिक भर दिल्याचे दिसून येते. पुढच्या काळात हरिभाऊ आपटे यांची कथा तिच्या स्वरूपामुळे सुमार वाटते. हरिभाऊंच्या कथेपेक्षाही गुर्जरांची कथा अधिक आहे. गुर्जरांच्या कथांमध्ये विनोदही येताना दिसतो. मात्र तो प्रसंगनिष्ठ असून, गैरसमज, गडबड-गोंधळ, मनाला हवीहवीशी वाटणारी, कट-



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN : 2278-8204

International Monthly Research Journal For All Subject

# AKSHARDEEP

Year - III

May 2015

Editor

Ganpu Lahane

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep ISSN 2278-8204 Vol.III. Issue : XI, May, 2015

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Dr. Ambedkar's contribution to economic thoughts | Prof. Tuplondhe Ramdas | 01 |
| 2. | रहीम के दोहों में नीतिकथन | डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन | 06 |
| 3. | मंजुल भगत के उपन्यासों में नारी | डॉ. राठोड गुलाब | 10 |
| 4. | "झाँसी की रानी" उपन्यास में नारी चेतना का प्रतिबिंब | प्रा. डॉ. बाहेती गोपाल | 13 |
| 5. | बुद्ध आणि त्यांचा धम्म : सामाजिक दृष्टिक्षेप | केदारी विठ्ठल | 16 |
| 6. | संत जनाबाईच्या अभंगातील विठ्ठलभक्ती : एक अभ्यास | लहाने गणेश | 20 |
| 7. | भारताच्या राजकीय जडणघडणीत महाराष्ट्रातील स्वातंत्र्यपूर्वकालिन स्त्री संघटनांचे योगदान | मुंढे / केंद्रे कोमल | 23 |
| 8. | ग्रामसभेचे स्थान आणि वास्तव | प्रा. डॉ. मुंढे पांडुरंग | 26 |
| 9. | स्त्री - भ्रूण हत्या | डॉ. मरवाळीकर स्मिता | 29 |
| 10. | लातूर जिल्ह्यातील प्रमुख खरिप कृषी पिकांच्या उत्पादकतेचा भौगोलिक अभ्यास | प्राचार्य डॉ. गोण सदानंद<br>थोरे श्रीमंत | 32 |
| 11. | महाराष्ट्रातील वीज : सद्य स्थिती, समस्या आणि उपाय | प्र. डॉ. बिरादार बी. एम. | 34 |
| 12. | "अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षणाच्या सोयी सुविधाचा एक दृष्टीक्षेप" | प्रा. डॉ. बच्चेवार दीपक<br>प्रा. गायकवाड एस. बी. | 37 |


Scanned with CamScanner

Research Paper
In
Marathi

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : XI,
May, 2015

# बुद्ध आणि त्यांचा धम्म : सामाजिक दृष्टिक्षेप

विठ्ठल केदारी
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यात सर्वात शेवटचा लिहिलेला ग्रंथ म्हणजे "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म" हा होय. आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये केलेल्या चिंतनाचे व मिळविलेल्या ज्ञानाचे सार सांगण्यासाठी त्यांनी हा ग्रंथ लिहिला. वर्तमान समाजवास्तव, समाजाची अंधदृष्टी, धर्मभोळेपणा, कर्मकांडे व एकूणच मानवी मूल्यांचा ऱ्हास होत चालला होता या अवस्थेत मानवाला मानवी जीवनाच्या उद्धारासाठी मानव कल्याणकारी मूल्यव्यवस्था हवी होती. एकंदरीतच बदलत्या कालान्वये अथवा कालौघात समाजाची जीवन जगण्याची शैली, परस्परांतील एकात्मता, सामंजस्य हरवून माणूस अनैतिकतेकडे वाटचाल करू लागला होता. यावेळी समाजाला एका योग्य दिशेची आवश्यकता होती. ती दिशा प्राप्त करून देणारा एक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या पुस्तकाच्या रूपाने दाखवून दिला.

दोन समाज गटांत जो कलह होतो तो कलह हा स्वत: जीवन जगताना जी काही एक धर्माच्या रूपाने आपण स्वत:ला एका चौकटीत बंदिस्त करून जीवन जगत असतो. ती चौकट आपण धारण केलेली असते. स्वत: जो धारण करतो तो धर्म वागायला शिकवितो. परंतु धर्म ज्या व्यक्तिसाठी असतो. या समाजात त्या व्यक्ती समाविष्ट असतात. त्या कोणत्याही एका समुहाच्या अथवा गटाच्या नसतात. त्यांत भिन्नता असते. त्यांची श्रेष्ठ कनिष्ठता ही एका विशिष्ठ प्रकारे बंदिस्त झालेली असते. हिंदू, जैन, शिख, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध असे विविध धर्म आपणाला सांगता येतात. परंतु या सर्व धर्मात माणसाचा उद्धारच योजिलेला आहे व प्रत्येक धर्मात त्यासाठीचा मार्ग कसा असावा या साठीचा मार्ग थोड्या फार फरकाने एकसारखाच आहे. यातील हिंदू धर्मात विशिष्ट स्वरूपाची उतरंड दिसून येते. ही व्यवस्था मानवाच्या उद्धाराला मारक ठरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू धर्मात जन्मलेले होते. त्यांनी हिंदू धर्मातील वर्ग व्यवस्था अनुभवलेली होती. मानवाला पशुवत वागणूक देणाऱ्या हिंदू धर्मातील वृत्ती त्यांना नको होती. यासाठी त्यांनी जगातील विविध धर्मांचा अभ्यास केला व माणसाला माणूस म्हणून वागविणारा 'बौद्ध धर्म' निवडला.

"गौतम बुद्धांनी आपल्या धर्माच्या शिकवणूकीत कार्यकारणभावावर विशेष भर दिला आहे. हिंदूंच्या कर्मसिद्धांताचा बराच प्रभाव यावर पडलेला दिसतो. जन्म हा पूर्व जन्माचे फळ असून या जन्मातील कर्मामुळे पुनर्जन्म प्राप्त होतो. कर्मामुळे व्यक्ती जन्म - मृत्यूच्या फेऱ्यात अडकतो. कर्मबंधनातून मुक्त झालेला मानव "निर्वाण" प्राप्ती करतो. कारण कार्यबंधने नसल्याने जन्म - मृत्यू, सुख - दुख नाही व पुन्हा जन्म ही नाही. मानवी जन्मातील दु:ख नाहीसे करण्यासाठी गौतमाने प्रवृत्तीवर सदाचरणाचा मार्ग दाखविला. याशिवाय अनित्य आत्मतत्वाचा विचारही बौद्ध धर्माची महत्वपूर्ण देणगी होय. समाजशास्त्रीय दृष्टीने 'सामाजिक सत्य' सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला."[1]

निरोगी समाजाच्या उभारणीसाठी माणसाला सामाजिक स्वातंत्र्य, बौद्धिक स्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य या गोष्टी अत्यंत महत्वाच्या असतात. आजचा समाज हा चरित्रहीन, संप्रदाय पोषक वैरपूर्ण परस्परांबद्दल द्वेष, अंधश्रद्धा अशा दुर्विचाराचा व्यसनाधीन झाला आहे. अशा या समाजासाठी जे प्रयत्न करणे आवश्यक आहेत आणि त्या प्रयत्नांस कितपत यश प्राप्त होईल अशी परिस्थिती निर्माण झाली

Scanned with CamScanner

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.III. Issue : XI,
May, 2015

आहे. अशा स्थितीत जे या विकारांपासून दूर आहेत त्यांना लांब ठेवणे आणि या गर्तेत सापडलेल्यांना या विकारातून मुक्त करणे कठीण आहे. परंतू त्यांत काही प्रमाणात बदल होऊ शकतो. त्यांना बदलविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा समाजाच्या निर्मितीसाठी आपणास बुद्ध विचार कसे उपयुक्त आहेत हे आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथातून सांगितले आहे. हा ग्रंथ म्हणजे ज्याद्वारे समाजाला धार्मिक सामाजिक व नैतिक जीवन जगण्यासाठी निश्चित दिशा मिळू शकेल. डॉ. आंबेडकरांच्या एकूण चिंतनातून जसा माणूस हवा होता त्यासाठी आवश्यक असलेली चौकट कशी असावी त्यासाठीचा धर्म कसा असावा त्या धर्माची पवित्रता, न्यायिकता, उपयोगिता आणि जीवन जगण्यासाठीचा योग्य मार्ग उपलब्ध करून देणारा बौद्ध धर्म हवा होता. तसेच त्यांच्या या धर्मात सर्वसाधारण जनताही बौद्ध अभ्यास करण्यास व धार्मिक जीवन जगण्यास प्रेरणा देण्यासाठी योग्य होता.

हिंदू धर्मात जी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था कार्य करत होती. ती व्यवस्था मानवाला माणूस म्हणून जगण्यास घातक ठरली. ज्या धर्मात माणसाला माणसासारखे जगता येत नाही. स्पृश्य - अस्पृश्यतेची वागणूक एका विशिष्ट समाजाला दिली जात होती त्या समाजाची कामे, त्यांचा उद्योगधंदा, केवळ गाव पांढरीची कामे करणे असा शोषितांचा, वंचितांचा वर्ग होता. त्या वर्गाला हा धर्म केव्हाही आपला वाटला नाही. देवाच्या, मोक्षाच्या, उद्धाराच्या नावाने धार्मिक विधींच्या रूपाने आर्थिक उधळपट्टी करणारा हा उच्चभ्रुंचा वर्ग होता. तो माणसासारख्या माणसांना आपले समजत नव्हता त्यांना कायम दुजाभावाची वागणूक देत होता. "जातीसंस्था ही हिंदू धर्माचा अविभाज्य घटक असल्यामूळे माणसां -माणसांमधील भेद पुरातन तटबंदीला सुरूंग लावण्याचे खंबीर प्रयत्न झाले पाहिजे. दुर्दैवाने जाती व्यवस्था ही नुसतीच आर्थिक समस्या नाही. तर ती धार्मिक समस्याही आहे. हिंदू धर्मातील तत्वज्ञान स्वतंत्र भारतातील चालू पिढीच्या इच्छेनूसार आमुलाग्र बदलले पाहिजे. पदोन्नती, कार्यक्षमता, शारिरीक व मानसिक विकास, अभ्युदय यासाठी वर्णाश्रमधर्म श्रेयस्कर नाही. माणसाचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी उचित संधी प्राप्त करण्यात त्यांची अवहेलना होते. परिणामत: नैराश्य व दुर्बलता यामुळे त्यांचा आत्मघात होता कामा नये. यासाठी जुन्या घातकी, देवांतील विचारसरणीत गढून - शाश्वत, समता व ज्ञान या मूल्यांचा पुरस्कार करणे आवश्यक आहे. आजच्या या स्पर्धेच्या युगात स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या वर्गापेक्षा सर्व मानवाचे कल्याण यासाठी पुढाकार घेणारा युगधर्म अपेक्षित होता. या समाजाबद्दलचे जे समज - गैरसमज, अंधश्रद्धा, चातुर्वर्ण्यव्यवस्था, स्पृश्य - अस्पृश्य भाव या गोष्टींना तिलांजली देणे गरजेचे आहे. हा मानवाच्या उद्धारासाठी समता व न्यायबुद्धी यांना महत्व देणारा नवा युगधर्म उभा राहिला. हा धर्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तिद्वेषातून, धर्मद्वेषातून स्वीकारला असे नाही. तर हिंदू धर्मात काही सुधारणा होईल. म्हणून अहर्निश शरीराचा कण् न कण मुख्यत्वे झिजवूनही जेव्हा बाबासाहेबांच्या पदरी निराशा आली तेव्हा त्यांनी हा निर्णय घेतला असे दिसून येते.

अस्पृश्य लोकांना कायदेशीर स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याचा काहीही फायदा नाही. माणसाला शारीरिक स्वातंत्र्य आहे. म्हणजे कायद्याची मनाई नाही तिकडेजाता येते, त्याप्रकारे बोलता येते हे खरे. परंतु या स्वातंत्र्याचा काय उपयोग? जितकी शारीरिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. तितकीच मानसिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. नुसत्या शारीरिक स्वातंत्र्याचा काहीही उपयोग नाही. जो परिस्थितीचा दास झाला नाही. ते स्वातंत्र्य नव्हते. या अर्थाने अस्पृश्य समाज स्वतंत्र नव्हता. या समाज्याच्या दास्यत्वाला सीमा राहिलेली नव्हती. हिंदू धर्मात राहणाऱ्याला विचार स्वातंत्र्य असू शकणार नव्हते. बुद्धी आणि विचाराला या धर्मात स्वातंत्र्य नव्हते. हिंदूने वेदांची गुलामगीरी करावी, स्मृतीची कास धरावी, विचारशक्तिचा त्याने वापर करू नये. हिंदू धर्मातील सर्वच बौद्धिक

Scanned with CamScanner

ISSN 2278-8204
Vol.III. Issue : XI,
May, 2015

गुलामगिरीत अडकलेले होते. त्याचे परिणाम सर्वांना सारखे भोगावे लागत नव्हते. ऐहिक वर्गावर बौद्धिक गुलामगिरीचा परिणाम झाला नव्हता. त्यांना हिंदू धर्माच्या व्यवहारात वेदांनी उच्च पद दिले होते. दुसऱ्यांवर हुकुमत गाजविण्याचा अधिकार दिला होता. सारा हिंदू धर्म वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंच्या संबंधांकरीता रचलेला आहे, हे निर्विवाद आहे. ज्याला ते धर्म म्हणतात त्या धर्मात तुम्हाला गुलामाची भुमिका दिली आहे. एवढेच नाही तर त्या गुलामगिरीतून सुटका होऊ नये अशी व्यवस्थाही येथे केलेली दिसते. अशा प्रकारे हा हिंदू धर्म दोन्ही तऱ्हेने मारक झाला आहे. अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'मुक्ति कोन पथे?' या लेखात घेताना दिसतात. यातून त्यांनी हिंदू धर्मातला मुलभूत भेद दाखवून दिला आहे.

धर्माच्या विविध व्याख्या आपणाला सापडतील परंतू लोकमान्य टिळक यांनी जी धर्माची व्याख्या केलेली आहे. ती व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर योग्य समजतात. "ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म"[3] म्हणजे समाजाच्या धारणेसाठी घातलेली बंधने कशाप्रकारे असावित हे व्याख्येवर अवलंबून नसते तर योग्य धारणेसाठी समाजाची बंधने कशी असावीत यावर अवलंबून आहे. त्यावरच समाजाचा विकास अवलंबून असतो.

समाजात बदल घडविण्यासाठी बौद्ध धर्म महत्वाची भूमिका घेताना दिसतो. या धर्मात तत्कालीन परंपरागत धर्म कल्पनेपेक्षा एक विशिष्ठ नवता समाविष्ठ होती. मानव परंपरागत पद्धतीने जे जीवन जगत होता. जगताना त्याला वास्तवात ज्या गोष्टींचा सामना करावा लागतो त्या सर्व गोष्टींच्या मुळाशी तृष्णा आहे. तृष्णेमुळेच त्याला विविध दु:खांचा सामना करावा लागतो. मानवाला सुखकर जीवनासाठी, जीवनातील दु:ख नाहिसे करण्यासाठी साधी सरळ व सोपी विचारसरणी मांडणारा गौतम बुद्धाचा बुद्ध धम्म सामाजिक दृष्ट्या समाजाचे आरोग्य निर्मळ राखण्यासाठी उपयुक्त आहे. असे म्हणता येते. संपूर्ण विश्वात महत्वाचा असलेला मानव जीवन साहचर्याने आनंदाने जगण्यासाठी काही गोष्टी महत्वाच्या असतात. त्यामध्ये व्यक्तिचे सद्सद्विकाने होणारे आचरण महत्वाचे असते. "प्रज्ञा व करूणा, ज्ञान व सेवा, त्याग व संयम ही विश्व धर्माची वैशिष्ट्ये बौद्ध धर्मात सामावलेली आहेत. अलौकिक व्यक्तिमत्वाचा धर्मप्रर्वतक, बुद्धिवाद, सद्सद्विवेक यावर आधारित मानवतावादी धर्म समाजात समता व विश्वबंधूत्वाची भावना वृद्धींगत करणाराच ठरतो. यामुळे यासंदर्भात बौद्ध धर्माचे योगदान अत्यंत मौलिक ठरते,"[4] आदर्श समाजासाठीचा विचार सांगणारा, स्वतंत्र विचार देणारा, माणुसपणाचा विचार करणारा, माणूस म्हणून जगायला शिकविणारा बुद्ध विचार आहे. सामाजिक जीवनातील दरी कमी करण्यासाठी आशा प्राप्त करून देणारा स्वयं प्रेरणा देणारा असा विचार या धर्मात पाहायला मिळतो.

'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी समाजव्यवस्था सिद्धांत सांगितला आहे तो असा "समजाव्यवस्थेत समाजाला आपल्या भूमिका ठरवाव्या लागतात, भूमीकांना यशस्वी करण्यासाठी संस्थांनी संघटित व्यवस्था असते, संस्था व भूमिकांना यशस्वी करण्यासाठी सामाजिक नियम बनविले जातात, सामाजिक नियम योग्य की अयोग्य हे सांस्कृतिक मूल्य ठरवितात."[5] डॉ. आंबेडकरांनी हा समाजव्यवस्थेचा सिद्धांत इतर धर्मात मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. भावनिक व्यक्ती अंधश्रद्धा, व्यक्तीपूजा, अराजकता कशी निर्माण होते व त्यातून व्यक्तीचा कसा अध:पात होतो हे समजते. बुद्ध धम्म व्यवस्थेतला समाज हा बुद्ध शासनानूसार आचरण करणारा राहणार तो कसा राहिल हे सांगण्यासाठी आंबेडकरांनी नववा सिद्धांत सांगितला तो असा "धम्मसंहितेत, धम्म संचलनाची नियमावली असेल, नियमावलीचे नियंत्रक धम्म शासन व

Scanned with CamScanner

धम्म मॅजिस्ट्रेट असतील, धम्म शासन व धम्म मॅजिस्ट्रेटचे नियंत्रण धम्माचरणावर राहिल, धम्माचरणामुळे आदर्श समाजाची निर्मिती होईल"[6] अशी समाजाची रचना असणार आहे. एका सशक्त समाजाची उभारणी व्हायची असेल तर डॉ. आंबेडकरांनी निवडलेला बुद्ध धम्म हा योग्य ठरतो. समाजाची विषमतारहित, सर्वांना समान न्याय व विश्वबंधूत्वाची भावना या नैतिक मूल्यांची रूजवात करणारा हा पहिला वैश्विक धर्म होय.

ईश्वर संकल्पना नाकारणारा बुद्ध धम्म आंबेडकर स्वीकारतात, आंबेडकरांच्या मते धर्म म्हटला की ईश्वर येतो. बुद्ध धम्म वगळला तर संपूर्ण विश्वाची ओळख ही धर्मानेच होते. "डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले नसून धम्मांतर केले. पूर्वी ईश्वराशी असलेले पाश तोडून टाकून त्यांनी मानवाशी नाते प्रस्थापित करणारा बुद्ध धम्म स्वीकारला याचा अर्थ आंबेडकरांनी एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी प्रवेश केला व पुन्हा परतीचे दोर छाटून टाकले. म्हणजे डॉ. आंबेडकरांचे ते मार्गांतर होय मग बुद्ध धर्म म्हणजे नेमके काय हा प्रश्न निरूत्तरच राहतो. तर बुद्धाने फक्त धम्म स्थापला डॉ. आंबेडकरांनी सुद्धा फक्त धम्म घेतला व इतरांना सुद्धा तो दिला. पुढे धर्म या शब्दाचा जन्म झालेला आहे."[7] नैतिकता, बहुतांचे बहुत हित, सुख व समाधान या बाबींना प्राधान्य देवून या धम्माची उभारणी केली. सदाचरण, सत्य व्यवहारवादी स्वानुभव यांना प्रमाण मानून मानवाला आचरण करण्यास सांगणारा वैचारिक दृष्टिकोन या धम्मात सामावलेला आहे. या धम्माविषयी जी प्रा. ज्योती डोईफोडे म्हणतात, "मानवी प्रज्ञेतून जन्मास आलेला देव ही कल्पना न मानणारा स्व - प्रयत्नाने आत्मोन्नती साधणारा वैश्विक धर्म आहे."

यावेळी एखादा धर्म उदयाला येतो त्यावेळी त्यासंबंधीची त्याची एक स्वत:ची विचारसणी घेवून उदयाला येतो. समाजातील दोष दूर करणे, बौद्धिक प्रकाश देणे, कार्यकारण भाव सांगणे असा विचार घेवून कोणताही धर्म उदय पावतो. तत्कालीन समाजव्यवस्थेत जे काही धर्म होते त्या सर्व धर्मांन शह देणे असा उद्देश या धर्मांचा नव्हता. परंतु त्या धर्मात मानवाला अहितकारक ज्या गोष्टी होत्या त्या नाकारणे, त्या दूर करण्यासाठी एका नव्या विचाराने हा धर्म उदयास आला. अहिंसा, समानता ही मूल्ये मानव जातीला देवून अहिंसेचा नवा दृष्टिकोन जगाला देवून समतावादी दृष्टीने जातीसंस्थेला खिळ बसविली. याधर्माने नवी समाजव्यवस्था उभी करण्याची नांदी सुरू केली. हळूहळू जातीयता शिथिल व्हायला लागली. माणसांना माणसांसारखे जगता यायला लागले. यामुळे मानव धर्म म्हणून बुद्ध धम्म उभा राहिला. सामाजिकदृष्ट्या बुद्ध धम्म हा मानवकेंद्री, बुद्धी प्रामाण्यवादी, विज्ञानवादी, पर्यावरणवादी दृष्टिकोनातून मानवाला नवी दिशा देणारा आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. डोईफोडे प्रा.ज्योती., भारतीय समाजातील प्रमुख धर्म, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्र. आ. १९९९, पृ. क्र. ८९
२. आंबेडकर, भीमराव रामजी, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, अनु. घन:श्याम तळवटकर, प्राचार्य म. भि. चिटणीस, शां. शं. रेगे, प्रकाशक भिक्खु सुमण वण्णो, चंद्रपुर, विशेष आवृत्ती १९९७, पृ. क्र. १९
३. संपा. कांबळे अरूण व इतर, मराठी वैचारिक गद्य प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. जून २००४, पृ. क्र.९८
४. ऊ. नि. डोईफोडे ज्योती, पृ. क्र. ११३
५. काकडे, प्रा. ॲड. दिलीप डी., बुद्ध ते आंबेडकर एक धम्मचिंतन, प्रकाशन अखिल भारतीय भिक्खु संघ, अखिल भारतीय भिक्खु महासंघ, प्र. आ. १४.०१.२००८ पृ. क्र. ३८
६. तत्रैव, पृ. क्र. ३९
७. रूके विश्वास, जागतिक बुद्ध, वाङ्मय प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २००७, पृ. क्र. ३७५

Scanned with CamScanner

ISSN : 2278-8204

International Monthly Research Journal For All Subject

# AKSHARDEEP

Year - III

April 2015



Editor

Ganpu Lahane

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Npa Management Of Public Sector Banks In India | Dr. Biradar B. M. | 01 |
| 2. | Problems And Prospects Of Teaching And Research In Public Administration | Prin. Dr. D. M. Muley | 04 |
| 3. | A Study On Tourist's Destination Of Sivasagar District | Dr. Paban Ch. Dutta | |
| | In Assam With Special Reference To Ahom Kingdom | Ms. Beauty Boruah | 10 |
| 4. | Social Anxiety Among Vitiligo Parsons | Dr. Vaishali N Mehetre | 17 |
| 5. | A Research Paper Yoga Practices In Other Traditions | Dr. Swami Nitesh | 20 |
| 6. | दलित युवा शक्ति का मुखपत्र : छप्पर | प्रा. बी. आर. गायकवाड | 23 |
| 7. | सूर्यबाला के कहानियों में चित्रित सामाजिक स्थिती | प्रा. खलंग्रे राम | 25 |
| 8. | चित्रा मुद्गल की कहानियों में नारी - चेतना | डॉ. राठोड गुलाब | 29 |
| 9. | हिंदी कथा साहित्य में नारी चेतना का बदलता रूप | प्रा. डॉ. बाहेती गोपाल | 32 |
| 10. | पारधी समाजाचे जीवनचित्रण करणारे 'चोरटा' आत्मकथन | श्री. केदारी विठ्ठल | 36 |
| 11. | "अखंड प्रेमाची वात्सल्यमूर्ती आई : आई समजून घेताना" | प्रा. लहाने गणेश | 38 |
| 12. | धर्मनिरपेक्षता स्वीकारण्यामागील पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका | प्रा. चालिकवार राजेश | 41 |
| 13. | लातूर जिल्ह्यातील जलसिंचन प्रकल्प | डॉ. गोणे सदानंद<br>थोरे श्रीमंत | 48 |


Scanned with CamScanner

Research Paper
In
Marathi

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

36
ISSN 2278-8204
Vol.III. Issue : X,
April, 2015

# पारधी समाजाचे जीवनचित्रण करणारे 'चोरटा' आत्मकथन

श्री. विठ्ठल केदारी
सहाय्यक प्राध्यापक,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

साठोत्तरी मराठी वाङ्मयामध्ये समाजातील विविध स्तरातील लेखकाचे साहित्य निर्माण झाले. मुलतः भारतीय समाजव्यवस्था ही उतरंडी सारखी आहे. ह्या व्यवस्थेत श्रेष्ठ, कनिष्ठ, शूद्र, स्पृश - अस्पृश्य असा भेदभाव केला जातो. शूद्र, अस्पृश्य म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजाला स्वातंत्र्यापूर्वी शिक्षण घेणे सहजासहजी शक्य नव्हते. स्वांतत्र्यानंतर समाजातल्या विविध स्तरातील लोक शिक्षण घेऊ लागले. शिक्षणाचा हक्क सर्वांना घटनात्मक पद्धतीने मिळाल्याने सर्व स्तरातील घटक शिकले आणि आपआपले जीवनानुभव साहित्याच्या विविध प्रकारातून लोकांसमोर मांडायला लागले. जगण्याचे विदारक चित्र वाचकांसमोर येऊ लागले आणि माणूस म्हणून जीवन जगतांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाच स्वरूप वाचकांमध्ये अस्वस्थता निर्माण करायला लागले.

मराठवाड्यामध्ये उस्मानाबाद, लातूर, बीड या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पारधी समाज वास्तव्य करताना दिसतो आहे. परंपरेने यांना चोर म्हणून समजले जाते. राहायला घर नाही, जमीन नाही. निश्चित वास्तव्यांचे ठिकाण नाही. सतत भटकंती करीत राहणे हेच त्यांना प्रस्थापित व्यवस्थेने जिणं बहाल केले आहे. गावात कोठेही चोरीची घटना घडली की, प्रथम त्यांना जाब विचारला जातो. बहुतांशी त्यांच्यावरच तो चोरीचा गुन्हा लावला जातो. असा पारधी समाज पिढ्यान् - पिढ्या असेच जीवन जगतांना दिसतो आहे. आज काही पारधी कुटूंबामध्ये मुले शिक्षण घेत आहेत. संतोष देवराव पवार या पारधी समाजातील तरुणाने आपलं जगणं 'चोरटा' या आत्मकथनातून वाचकांसमोर ठेवलं आहे.

संतोष देवराव पवार यांनी 'चोरटा' हे आत्मकथन लिहिले आहे. 'पारधी' समाजाच्या व्यथा, वेदना त्यांनी 'चोरटा' या आपल्या आत्मकथनातून व्यक्त केल्या आहेत. या आत्मकथनामुळे महत्त्वाची भर टाकली आहे. एकोणिसशे साठनंतर दलित साहित्य चळवळीने आकार घेऊन स्वतःची अस्मिता निर्माण केली. दलित साहित्याने समाज व्यवस्थेचे विविध चेहरे साहित्याच्या रूपाने वाचकांसमोर ठेवले. साहित्यात वेगळ्या जीवन विश्वाचे चित्रण येण्यास सुरुवात झाली. अपरिचीत जिवनाचे परिचितिकरण या साहित्याच्या माध्यमाने मध्यमवर्गीय जीवनाला झाली. ह्या साहित्यातील जीवन चित्रणाच्या रूपाने साहित्य विश्वात बंडखोरी केली. यापासून प्रेरणा घेवून मराठी साहित्यात विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मानवतावादी विचारसरणी आणि माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी शिकविणारी कृतिप्रवणता यामुळे दलित, पददलित, आदिवासी, भटका - विमुक्त या स्तरांतला माणूस साहित्याच्या रूपाने प्रस्थापितांना व व्यवस्थेला प्रश्न विचारु लागला. साहित्य हे आपल्या समाजाच्या व्यथा वेदना मांडण्यासाठी प्रभावी साधन बनेल.

समाज व्यवस्थेने चोर ठरविलेल्या 'पारधी' या आदिवासी समाजाचे जीवन चित्रण 'चोरटा' या आत्मकथनात संतोष पवार यांनी मांडले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाज आणि त्यांच्या वाट्याला आलेले अगतिक जीवन ... संतोष पवार 'चोरटा' या आपल्या आत्मकथनातून समाजासमोर ठेवतात. फासेपारध्यांच्या पालातलं जगणं दारिद्र्याचं जगणं, घर नाही, जमीन नाही, कोणत्याही एका गावात स्थीर राहत नाहीत. सतत भटकंती आणि पोटासाठी चोऱ्या करणारा हा समाज आहे. माणूस चोरी करतो. परंतु तो चोरी का करतो याविषयी आपण काहीही विचार करत नाही. गावात एखादी चोरी झाली की, पहिल्यांदा या पारध्यांना त्याविषयी विचारले जाते. चोरी कोणीही केली तरी पोलीस पारध्यांना हाणमार करतात. पारधी स्त्रियांचा विनयभंग करतात. एवढे सर्व प्रकार करूनही शेवटची धमकी देवून निघून जातात.

Scanned with CamScanner

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : X,
April, 2015

लेखकाला भारती ही बहीण व दोन लहान भाऊ आहेत. कुटूंबात आईवडीलांचा लाडका म्हणजे लेखक होय. लेखक ज्यावेळी प्राथमिक शाळेत होता त्यावेळी डुंबरे गुरुजींचे विशेष सहकार्य लागले. त्यांच्या प्रेरणेनेच लेखकांचे शिक्षण सुरु झाले. ज्यावेळी लेखक १०वीच्या वर्गात आला त्यावेळी त्याची भोळी - भावडी आई देवाला म्हणते, "माझ्या संत्याला पास कर देवा तुला बकर कापत्ये" अशी पारंपरिक वृत्तीची अंधश्रद्धाळूपणे दैवाला महत्त्व देणारी लेखकाची आई दिसते. लेखक कॉलेजला असताना प्राध्यापक जळकोटे यांचा सहवास व मनमिळावू वृत्तितून लेखकाला माणूसपणाचा प्रत्यय येतो. ज्यावेळी लेखक जातीच्या दाखल्याच्या कामासाठी तहसिलदाराकडे जातो त्यावेळी, "साहेब म्या फासेपारध्यांचा पोरगा असून मला सरकारी कामाकरता जातिच्या दाखल्याची लय गरज हाय तेवढ आजच्या आज दिल तर लय उपकार होत्याल." अशा लेखकाच्या बोलण्यान तहसिलदारही लेखकावर खूष होतात. त्यावेळी लेखकाला आधिकाऱ्यातला माणूस दिसतो.

गिरीष प्रभूने मंत्री असतांना त्यांनी तुळजापूर येथे यमगरवाडीला पारधी समाजाची सभा घेतली. त्यावेळी पारधी समाजाच्यावतीने लेखकाने प्रभूने यांच्या समोर आपल्या समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, छळ, आम्हांला मिळणारी वागणूक, पारधी समाजाबद्दलची पोलीस आणि प्रस्थापित व्यवस्था यांच्या मनात असलेली प्रतिमा लेखक परखडपणे सांगतो. यातूनच लेखक आपल्या समाजासाठी कार्य करण्यास सुरुवात करतो. पोटाची भूक भागविण्यासाठी पारधी समाज दररोज भटकतोय, हिंडतोय, कधी शेतातील ज्वारीच्या, गव्हाच्या ओंब्या चोरणे त्यावरच पोटाची भूक भागविणे अंगावर व्यवस्थित कपडे नाही, राहण्यासाठी स्वतंत्र घर नाही. अशा दुभंगलेल्या अवस्थेत जगणारा हा समाज व्यवस्थेने चोर ठरविला आहे. या सर्वच गोष्टींना आणि पारध्यांच्या अवस्थेला ही व्यवस्था आणि शासन जबाबदार आहे. जोपर्यंत समाजातील वंचिताला आपले अधिकार आणि कर्तव्य याविषयी कोणतीही जाणीव होणार नाही तोपर्यंत त्यांची अशी अवस्था राहणार आहे. शासकीय सोयी, सुविधा फायदा या समाजाला होत नाही तोपर्यंत हा समाज दारिद्र्य, अन्याय, शोषणातून मुक्त होणार नाही. त्यासाठी या समाज घटकाला शिक्षित करून अन्याय अत्याचाराविरूद्ध विद्रोह करण्यास हा युवक तयार झाला तर त्याचा विकास होईल व त्यांना माणूस म्हणून जगता येईल.

या पद्धतीने 'चोरटा' या आत्मकथनाच्या माध्यमातून संतोष पवार या तरुणाने पारधी समाजाचे दाहक अनुभव वाचकांना परिचित करून देऊन साहित्य विश्वात नवजीवन दर्शन वाचकांना करून दिले आहे. त्यातून समाज व्यवस्थेत विदीर्ण अवस्थेत जगणारा हा समाज मानवीय मूल्यांच्या पातळीवर वाचकाला गंभीर बनवितो. एकूणच संतोष पवार यांचे हे अनुभव वाचकाला वेगळ्या जीवन विश्वात घेऊन जाताना दिसतात. समाज संस्कृतीचे विविध पदर या निमित्ताने वाचकांसमोर येतात.

**संदर्भ ग्रंथ :**

१. चोरटा : संतोष पवार
२. पारधी : गिरीष प्रभुणे

Scanned with CamScanner

ISSN : 2321 – 0141 (CD-ROM)

# INDIAN JOURNAL(S) OF RESEARCH STUDIES (IJORS) IN LANGUAGES & LITERATURE

IJORS LL

**Combine Thematic Issue**

**Volume I, Issue 5** **September – October, 2013**
**Volume I, Issue 6** **November – December, 2013**

## " आदिवासी लोकसंस्कृती : स्वरूप, विकास आणि व्याप्ती "

IJORS

**Enriching Your Print & Digital Library**

INDIAN JOURNAL(S) OF RESEARCH STUDIES
**[A Series of International, Peer-reviewed, Indexed, Bi-Monthly Journal(s)]**
www.ijors.com

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## CONTENTS

**[Volume I, Issue 5]**
**[September – October, 2013]**


| | | |
|---|---|---|
| 1. | 'तृष्णा' कादंबरीमधील समाजजीवन<br>– प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 03-05 |
| 2. | आदिवासी समाज आणि साहित्य<br>– प्रा. डॉ. वेदश्री वि. थिगळे | 06-08 |
| 3. | भुजंग मेश्राम यांची नागवंशीय कविता<br>– प्रा. डॉ. प्रभाकर रा. पवार | 09-12 |
| 4. | आदिवासी साहित्य : स्वरूप व वाटचाल<br>– प्रा. डॉ. द. के. गंधारे | 13-14 |
| 5. | मूलनिवासी संस्कृती<br>– प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 15-16 |
| 6. | आदिवासी लोकसंस्कृती व लोकगीते<br>– प्रा. डॉ. विकास प्र. वीर , प्रा. आप्पा द. माने | 17-19 |
| 7. | आदिवासींचे चरित्रलेखन<br>– प्रा. विठ्ठल केदारी | 20-21 |
| 8. | वारली जीवन व लोककलेतून घडणारे आदिवासी लोकसंस्कृतीचे दर्शन<br>– प्रा. राजा नि. जगताप | 22-24 |




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## ७. आदिवासींचे चरित्रलेखन

– प्रा. विठ्ठल केदारी

चरित्र वाङ्मयामध्ये 'आदिवासींचे चरित्रलेखन' वेगळेपण दर्शविणारे आहे. आदिवासीसंबंधी झालेल्या चरित्रात्मक साहित्याची संख्या अल्प स्वरूपात आहे. संख्येने कमी असलेल्या आदिवासींच्या चरित्रवाङ्मयात स्वातंत्र्यपूर्वकाळात इंग्रजांविरोधी लढे देणाऱ्या विविध आदिम जमातीतील कांतिकारकांच्या चरित्रांचे योगदान महत्त्वाचे आहे. इंग्रजांविरोधी लढणाऱ्या आदिवासी समाजात तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा, शंकर शहा, राघोजी भांगरे, देवजी आव्हाड, वीर बाबुराव सेडमाके, वीर होनाजी केंगले, हरी नवले, बाळा पिचड, सत्तू मराडे, भीमा नायक इत्यादींचे कार्य उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. इतिहास लेखकांनीही या आदिवासी क्रांतिवीरांकडे दुर्लक्ष केलेले दिसते. आदिवासी समाजातील इतर अनेक तरूणांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. परंतु त्यांची दखल इतिहासाने कोठेही घेतलेली आढळत नाही. यासंबंधी पी.सी.झांबाडे म्हणतात, "भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक महापुरूषांनी भाग घेतला. ते लढले आणि देशासाठी शहिददेखील झाले. परंतु अशा क्रांतिवीरांचा इतिहास लिहिला गेला नाही. याला कारण इतिहास लिहिणारा समाज हा उच्चवर्णीय होता. हजारो वर्ष ज्या समाजाला मनुस्मृतीच्या कायद्याने येथील बहुजनांवर या समाजाने खूप अन्याय केलेला आहे. तरी सुध्दा अन्याय हीच आमची जीवनशैली आहे असे माणून या गरीब आदिवासी व इतर बहुजन समाजाने देशामध्ये परकीयांच्या अन्यायाला बळी न पडता वेळोवळी संघर्ष केला व आजही करत आहेत. त्याचप्रमाणे नुसता संघर्ष केला नाही तर आपल्या सर्वस्वाचा होम केला. घरादारावर पाणी सोडले आणि समाजवरील अर्थात देशाच्या स्वातंत्र्यासाठी परकीयांशी संघर्ष केला उठाव केले, त्याला काहींनी बंड असेही म्हटले आहे. तर काही स्वयंम घोषित इतिहासकारांनी त्यांना दरोडेखोर, चोर, बंडकरी अशा नावांनी आपल्या साहित्यात अधोरेखीत केले आहे."[१] अशा प्रकारचे आदिवासी कांतिकारकांसंबंधी प्रस्थापित व्यवस्थेमध्ये समज–गैरसमज पसरविलेले पहायला मिळतात. आदिवासी समाजात होवून गेलेल्या क्रांतिवीरांची माहिती चरित्रांच्या माध्यमातून शब्दबद्ध होत आहे. जंगलातील अडाणी माणसानेही देशप्रेम व देशाला गुलामगिरीतून सोडविण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. इंग्रजांबरोबरचे प्रारंभीचे लढे आदिवासीनींच दिलेले आहेत. खरेतर स्वातंत्र्याची प्रेरणा ही आदिवासींपासून घेतली आहे. शिक्षित आदिवासी स्वतःचा इतिहास तपासून आपल्या समाजातील आदर्श व्यक्तित्वांचा शोध घेऊन त्यांची ओळख समाजाला करून देत आहेत.

डॉ. गोविंद गारे यांचे चरित्रलेखनातील योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी 'इतिहास आदिवासी वीरांचा', 'आदिवासी विकासाचे दीपस्तंभ', 'स्वातंत्र्यलढयातील आदिवासी क्रांतिकारक' ही पुस्तके लिहून आदिवासी समाजात होवून गेलेल्या क्रांतिकारकांचे जीवन साहित्यात आणले. त्यांनी सत्ताधाऱ्यांचे धाक, दडपशाहीचे वागणे, अन्याय, अत्याचार व शोषणविरोधी दिलेल्या लढ्यांचे चित्रण करून अशा क्रांतिकारकांचे जीवन प्रकाशात आणण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यासंबंधी श्रीपाल सबनीस म्हणतात, इतिहास नायक समाजातील अन्याय–अत्याचाराविरूध्द बंड पुकारून मोठे होत असतात. शोषण, अन्याय, अत्याचार, फसवणूक, दमन करणाऱ्या धेंडांच्या विरोधात त्या–त्या काळात आदिवासी वीरांनी रान पेटवून स्वतःची मर्दानगी गाजवली. हेच आदिवासींचे दीपस्तंभ ठरू शकतात. बिगर आदिवासींचे 'हायलाईट' इथे उपरे ठरवत डॉ. गारे यांनी परिश्रमपूर्वक त्यांच्या चरित्रग्रंथांची व संशोधनाची साधने संकलित केली. रेखाचित्रे, राजमुद्रा, गोंडवनातील विशिष्ट स्थळांचे निर्देश. भूतकालीन वास्तवातील व्यक्तिंची नावे, त्यांचे पराक्रम, त्यांच्या संघर्षपर्वाचे तपशील हा सर्वच भाग डॉ. गारे यांच्या लेखनात आला आहे. आदिवासींच्या प्रत्येक नव्या पिढीचे वाचन–आकलन–चिंतन करावे अशी ग्रंथसंपदा डॉ. गोविंद गारे यांनी निर्माण करून आदिवासींसह एकूणच समाजावर मोठे ऋण केले आहे.[२] डॉ. गारे यांनी चरित्र रेखाटनाचा केलेला प्रयत्न चरित्रवाङ्मयाची योग्य दिशा दर्शविणारा आहे. ज्या व्यक्तित्वांची ओळख वाङ्मयाला तसेच समाजाला होणे आवश्यक आहे. त्यासाठीचा त्यांचा प्रयत्न पुढील चरित्रलेखकांसाठी प्रेरणास्पद आहे. डॉ. गारे यांनी गोंडवाना प्रांतातील राणी दुर्गावतीच्या बलिदानाची कथा, महाराणा प्रताप व छत्रपती शिवरायांच्या खांद्याला खांदा भिडवून आदिवासींनी केलेल्या योगदानाची साक्ष अरवलीचे डोंगर आणि सह्याद्रीच्या कुशीतील जुन्नर येथील महादेव कोळ्यांच्या काळ्या चबुतऱ्याच्या रूपाने उभ्या केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनीही गड किल्ल्यांच्या रक्षणाची जबाबदारी आदिवासींवर टाकली होती. यावरून त्यांचा आदिवासींवरील दृढ विश्वास लक्षात येईल. 'दोन क्रांतिवीर' या चरित्राच्या रूपाने व्यंकटेश आत्राम यांनी शंकरशहा व रघुनाथ शहा या पितापुत्रांच्या विरत्वांची कथा लिहून त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा परिचय करून दिला आहे. जंगलातल्या, वनातल्या माणसांनी इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरूद्ध आवाज उठविला म्हणून या पितापुत्रांना तोफेच्या तोंडी देऊन संपविले, अशा वीरांची चरित्रकथा या पुस्तकात वर्णलेली आहे. इतिहासाने नाकारलेल्या आदिवासी वीरांचे जीवन साहित्याच्या रूपाने वाचकांसमोर आणण्याचे कार्य केले.

डॉ. विनायक तुमराम यांनी 'धरतीअबा: जनचेतनेचे विद्रोही रूप', 'संत मुंगशुजी: एक कृतिशील तपस्वी', 'गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह ऊईके' ही तीन चरित्रे प्रकाशित आहेत. आदिवासी समाजामध्ये संत मुंगशुबोवासारखे संतही होवून गेले. त्यांची समाजपरिवर्तनाची भूमिका आणि समाजाला आपल्या स्थितीची जाणीव करून देणारे परखड व्यक्तिमत्त्व विनायक तुमराम आपल्यासमोर उभे करतात. आपल्या समाजातील विविध समज–गैरसमज, अंधश्रध्दा दूर होण्यासंबंधी त्यांनी कार्य केले. त्यांच्या विचारसरणीविषयी विनायक तुमराम म्हणतात, "संत मुंगशूजीच्या वाङ्मयात कुठल्याही धर्मपंथाचा विचार वा पुरस्कार आढळत नाही, हे विशेष होय. संत चोखामेळ्यांप्रमाणे जातीहीनतेची झळ सोसलेले संत मुंगशूजी हे वेगळे संत होते. ते पुस्तकी विचारवंत नव्हते. जनभावनेशी तादात्म्य पावलेले समतावादी साधक होते. एक जागरूक लोककवी होते. लोकमानस जागवून संस्कारित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला. म्हणून त्यांना एक 'क्रांतिकारी' सुधारक म्हणणे योग्य ठरेल."[३] असे व्यक्तिमत्व वाङ्मयाच्या रूपाने समोर आणले. तुमराम यांनी 'धरतीअबा: जनचेतनेचे विद्रोही रूप' या चरित्रातून बिरसा मुंडा या क्रांतिपुरूषांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख वाचकांना करून दिली. मुंडा जमातीतील क्रांतिकारक, रणझुंजार म्हणजे बिरसा मुंडा होय. जनसामान्याचे जन्मसिद्ध अधिकार हिरावणाऱ्या धुंद पाशवी प्रवृत्तीला व निर्मम दडपशाहीला वठणीवर आणण्यास प्रतिज्ञाबद्ध झालेले धाडस म्हणजे बिससा! विनायक तुमराम या चरित्रविषयी म्हणतात, "एक सत्यपुरूष सेवक, सुधारक, विचारवंत, वीर योध्दा, लोकनेता, लोकसंग्राहक, कुशल संघटक व सेनापती, कलावंत, कुटुंबवत्सल व्यक्ती, प्रखर



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

देशभक्त, क्रांतिकारक आणि तत्वचिंतक अशा विविध गुणांनी बिरसाचे व्यक्तिमत्त्व मंडीत झाले आहे. अशा अष्टपैलू बिरसाच्या जीवन कर्तृत्वाचा व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा परिचय नव्या पिढीला करून देण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणजे प्रस्तुत चरित्र होय."[४] समाजातील अन्यायी अत्याचारी व्यवस्था जुलमी प्रवृत्ती, जमीनदारांचे, सावकारांच्या मनमानी धोरणास विरोध करून त्यांना धडा शिकविणाऱ्या व्यक्तीचे कार्य या चरित्रांच्या माध्यमातून वाचकांसमोर येते.

डॉ. विनायक तुमराम यांचा महत्त्वाचा चरित्रग्रंथ म्हणजे 'गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह ऊईके' हा होय. ह्या व्यक्तित्वाची माहिती माजी आमदार सुखदेव बापू ऊईके, अॅड. ज्योतीरामजी कोवे, देवचंदजी मसराम, मनिरामजी ऊईके, मारोतरावजी नरोटे, का.सु. भलावी, रामरावजी वाडीवे या सर्व व्यक्तिंकडून नारायणसिंहांसबंधीची माहिती मिळवून तिची खात्री करून घेवून डॉ. तुमराम यांनी हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. त्याविषयी लेखक म्हणतात, "गोरगरीबाबद्दल त्यांची निष्काम कळकळ मी अनुभवली आहे. साधे दर्शन, सतत प्रवासाची आवड, सरळमार्गी चाल, संस्कारी, सन्मार्गी व सेवाभावी वृत्ती, कणखर स्वभाव, कार्यात पारदर्शकता ठेवण्याची सवय, संघटन कौशल्य, प्रतिपक्षाला सडेतोड उत्तर देऊन निरूत्तर करण्याचे कसब, प्रसंगावधानता आणि स्वभाषा साहित्य व संस्कृती याविषयीचा अकृत्रिम जिव्हाळा व अभिमान ही त्यांची काही वैशिष्ट्ये या वैशिष्ट्यांनीच माझे बालमन नकळत प्रभावित झाले होते. आजही तो प्रभाव कायम आहे. त्याचीच फलश्रुती म्हणजे हा चरित्रग्रंथ होय."[५] समाजाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या कुशल नेतृत्वाची ओळखऱ्या चरित्राच्या रूपाने होते. आदिवासी समाजाच्या मुक्तीसंघर्षाची प्रेरणा घेवून आयुष्यभर कार्य करणारे लोकनेते म्हणजे नारायणसिंह ऊईके होय. आपल्या समाजाची राजकीय, सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणारा कार्यकर्ता, जनसामान्याविषयी कळवळा असणारे खंबीर नेतृत्व या चरित्राच्या रूपाने आपणासमोर उभे राहते.

आदिवासी चरित्र वाङ्मयात प्राणहितेचा वीर–वीर बाबूराव शेळमाके (ह.मो.कोटनाके), दशरीबेन (वीरसींग पाडवी), महान शहीद बिरसा मुंडा (१९९८, लटारी कवडू मडावी), बिरसा मुंडा (२००९, सौ. शुभा साठे), आदिवासी क्रांतिचा दीपस्तंभ शहीद बिरसा मुंडा (२००६, देवराम गावित), आठवणीतील बाबुराव मडावी (२००८, सी.बी. मडावी), आदिवासी आयकॉन्स (२०११, डॉ. तुकाराम रोंगटे) इत्यादी लेखकांनी आदिवासी चरित्र लेखनात भर टाकलेली आहे. हे कार्य निश्चितच चरित्र वाङ्मयाची उंची वाढविणारे आहे.

आदिवासी चरित्र वाङ्मयाविषयी डॉ. हेमलता जोहरापूरकर म्हणतात, "अन्याय सहन करण्यालाही सीमा असते. ही सीमा ओलांडली की दुबळा मनुष्यदेखील आपले दुबळेपण पणाला लाऊन या अन्यायाचा प्रतिकार करण्यास सज्ज होतो. आदिवासींनी त्यांच्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी बंड केले, उठाव केले. त्यांना दोन पातळ्यांवर लढावे लागले. त्यांचा एक शत्रू होता सावकार, जमिनदार, मालगुजार, सामंत, पुरोहित, व्यापारी, महाजन वगैरे. संस्कृतीचे ठेकेदार आणि दुसरा शत्रू होता ब्रिटिश राज्यकर्ते. या दोन्ही दिक्कुंशी लढणाऱ्या व शहीद होणाऱ्या वीरांमध्ये तिलका माझी, सिध्दू, कान्हू, बाबुराव सेडमाके, तंट्या भिल्ल, यैनशहा, भीमा गोंड, वीर नारायणसिंह, प्रविणचंद्र भंजदेव इत्यादी होते. दुर्दैवाने या वीरांच्या कर्तृत्वाचा सुसंबध्द इतिहास उपलब्ध नसल्याने त्यांचे कर्तृत्व भारतीयांसमोर आले नाही."[६] अशा प्रकारे आदिवासी चरित्र वाङ्मयाच्या निर्मितीचे प्रेरणास्थाने लक्षात घेता येतात.

"आदिवासींच्या हक्कांसाठी आदिवासींच्या आत्मसन्मानासाठी तात्या मामा, बिरसा मुंडासहित असंख्य आदिवासी क्रांतिवीरांनी इंग्रज व इथल्या भांडवलशाही भांडवलदारांबरोबर जो संघर्ष केला त्यांची आठवण ठेवा. त्यांच्या मार्गाने चालत जात आजच्या ब्राह्मणशाही भांडवलशाही धार्जिण्या सत्ताधाऱ्यांशी संघर्ष करावा लागेल. आपले हक्क मिळविण्यासाठी एकजूट करून उभे रहावे लागेल. आदिवासी अस्मिता व अस्तित्व नाकारण्यासाठी ब्राह्मण्यवादी, विश्व हिंदू परिषद सारख्या संघटना आदिवासींना वनवासी म्हणून आदिवासी विरूध्द खिश्चन अशी भांडणे निर्माण करण्याचे कारस्थान रचित आहेत. त्यामुळे सर्वांनी या कटकारस्थानांना बळी न पडता आपल्या हक्कांसाठी तंट्या मामा, खाज्या नाईक, यांचा आदर्श घेऊन संघर्ष करण्यास व आपली संस्कृती आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सज्ज व्हावे."[७] असे आवाहन केले. अशा प्रकारे मराठीतील आदिवासी चरित्र वाङ्मयाचे स्वरूप विचारात घेता येते. संख्येने चरित्रांची संख्या अल्प असली तरी या चरित्रांच्या माध्यमातून मराठी वाङ्मयात वेगळ्या जीवनविश्वाचे चित्रण येऊन त्याची माहिती वाचकांना होत आहे. आदिवासी समाजात बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तित्वांची ओळख या माध्यमातून साहित्य व्यवहाराला होत आहे.

## संदर्भ

१. 'स्वातंत्र्यलढ्यातील आद्य क्रांतीनायक' – झांबाडे पी.सी., सह्याद्री प्रकाशन, ठाणे, प्र.आ.२०१०, मनोगत, पृ. ५ व ६.
२. 'आदिवासी मुस्लीम खिश्चन साहित्यमीमांसा' – डॉ.सबनीस श्रीपाल अनुबंध प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००७, पृ. ८१.
३. 'संत मुंगशुजी: एक कृतिशील तपस्वी' – डॉ. तुमराम विनायक, मुद्रक भूषण बनहट्टी, नागपूर, प्र. आ. १९९८, पृ. ७.
४. 'धरतीअबा:जनचेतनेचे विद्रोही रूप' – डॉ. तुमराम विनायक, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, १९९९, पृ. ८.
५. 'गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह ऊईके' – प्रा.डॉ. तुमराम विनायक, पृष्ठ. हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, द्वि. आ. २०११, पृ. १५.
६. 'आदिवासी साहित्य: दिशा आणि दर्शन' – (संपा.) डॉ. तुमराम विनायक, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ. २०१२, पृ. १७४.
७. 'सत्यशोधक जागर' – (प्रकाशक) किशोर ढमाले, पुणे, ऑगस्ट २०१२, वर्ष ५ वे, अंक ४८ वा, पृ. २.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

ISSN 2231-6671
MAHMUL 02922/2011

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for All Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

Hi-Tech Research Analysis

CHIEF EDITOR
DR. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

MAHMUL 02922/2011
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
Half yearly Research Journal
ISSN 2231- 6671
Vol. I, Issue : III, Feb. 2012to July 2012


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 33 | मध्ययुगीन शेतीचे स्वरुप व शिवरायांचे कृषी धोरण | हिंगमिरे दत्ता पिलाप्पा | 178-182 |
| 34 | चंदाताई जरीवाला यांचे जीवन कार्य | डॉ. मिनाक्षी नामदेव अंबोरे, डॉ. यु.एस. सावंत | 183-186 |
| 35 | कुमारेश्वर मंदिर स्थापत्य व वैशिष्ट्यपूर्ण नंदी मंडप (गाव - केळसूला, ता. सेनगांव, जि. हिंगोली) | कांचन जाधव (राठोड), डॉ.नितिन बावळे | 187-191 |
| 36 | भारतीय स्त्रियांची राजकीय जागृती आणि सशक्तीकरण : एक अभ्यास | एस. एस. पवार | 192-196 |
| 37 | 'तृतीय रत्न' नाटकाचे मराठी रंगभूमी व दलित रंगभूमीवरील स्थान | डॉ.रमेश तुकोजीराव देशमुख | 197-201 |
| 38 | सत्ता संघर्षाच्या चिरंतन वास्तवाचा शोध : ऐसे कुणबी भूपाळ | वर्षा निरगुडे | 202-205 |
| 39 | साठोत्तरी ग्रामीण कवितेतील ग्रामीण वास्तवता | दिलीप भिसे | 206-211 |
| 40 | आदिवासी समाजाला जोडलेले 'ठिगळ' | विठ्ठल केदारी | 212-217 |
| 41 | आदिवासी जमातीच्या लोकगीतातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन | डॉ. शिवानंद गिरी | 218-223 |
| 42 | सत्यशोधकी साहित्य विचार आणि महात्मा फुले यांची ग्रंथ संपदा एक अवलोकन | डॉ. बाबासाहेब दादाराव ढेंबरे | 224-228 |
| 43 | ' किनवट तालुक्यातील कोलामाची गाणी ' | पंजाब लक्ष्मणराव शेरे | 229-235 |
| 44 | वाचावे पण वेगाने | ए.एस. धुमाळ | 236-239 |
| 45 | स्त्री भृणहत्या आणि महिलांची भुमीका | डॉ. निता एम. गभणे | 240-245 |
| 46 | चर्मकार समाजाचा राजकीय इतिहास - एक दृष्टीक्षेप | डॉ. कैलास सोनवणे | 246-251 |
| 47 | महर्षी शिंदे यांचे शैक्षणिक विचार | शिवाजी बाबूराव मोहाळे | 252-255 |
| 48 | आपत्ती प्रशासन : संकल्पना आणि स्वरुप | शिवशंकर कसबे | 256-261 |
| 49 | लोकशाहीचे बळकटीकरण व ग्राम सभा | वसंत पांडुरंग सरोदे, सुनिल लक्ष्मण गावंडे | 262-266 |
| 50 | लातूर जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास सेवा : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. त्र्यंबक मगर | 267-272 |
| 51 | सामाजिक परिवर्तनात लोकसहभागाची गरज | डॉ. खंडेरावजी एस. काळे | 273-277 |
| 52 | दूरदर्शनचे सामाजिक परिणाम | डॉ. कुलकर्णी ए.व्ही. | 278-282 |


Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

MAHMUL 02922/2011
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
Half yearly Research Journal
ISSN 2231- 6671 212
Vol. I, Issue :III, Feb. 2012 to July 2012

40

# आदिवासी समाजाला जोडलेले 'ठिगळ'

**विठ्ठल केदारी**
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

*Research Paper - Marathi*

१९८० नंतर उदय पावलेल्या आदिवासी साहित्यप्रवाहाने विविध साहित्यप्रकारांत ठसा उमटविला आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन यांसारख्या वाङ्मय प्रकारांतून आदिवासी लेखक आपल्या समाजाचे प्रतिबिंब मांडायला लागला आहे. आदिवासी साहित्य प्रवाहामध्ये 'आत्मकथन' हा साहित्य प्रकार फारसा हाताळलेला दिसत नाही. आदोर, आकांत व अलीकडीलच्या काळात श्री. किसन दामोदर डगळे यांचे 'ठिगळ' हे आत्मकथन प्रकाशित झाले आहे. असे असले तरीही जी आत्मकथने निर्माण झाली आहेत. त्यांनी त्या त्या भागाची परिस्थिती अतिशय बारकाईने मांडली आहे.

'ठिगळ' या आत्मकथनात श्री. किसन दामोदर डगळे यांनी समाजाची जी स्थिती वर्णन केली आहे. ती स्थिती एकूणच आदिवासींच्या जगण्याचे चित्रण मांडते. याबरोबरच एका विशिष्ट भौगोलिक भागातील आदिवासी समुहाचे जीवणचित्रण करते. आदिवासींना स्वतःच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कोणकोणत्या स्वरूपाची कामे करावी लागतात. या समाजात परस्पर साहचर्याची भूमिका कशी आहे. याचाही वाचकाला बोध होतो. आदिवासी समाजामध्ये प्रस्थापिताबद्दल कोणती भूमिका आहे. प्रस्थापित समाजात आदिवासीबद्दल कोणता दृष्टिकोन आहे ह्याविषयीची भूमिका स्पष्ट होते. समाजाच्या मूळ प्रवाहात न आलेला माणूस प्रस्थापित व्यवस्थेविषयी कोणती भूमिका आहे. या माणसाला या समाजाविषयी कोणत्या प्रकारचा आदरभाव आहे. या प्रकारच्या गोष्टीविषयी लेखकाने 'ठिगळ' मधून दृष्टिक्षेप टाकाला आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

आदिवासी आत्मकथनांच्या प्रवासात 'ठिगळ' या आत्मकथनाने आदिवासी जीवनातल्या जाणीवांचा परिचय साहित्यविश्वाला करून दिला. उच्चशिक्षण घेऊन प्रथमवर्ग अधिकारी असलेली व्यक्ती ज्यावेळी आपले जीवनानुभव सांगते त्यावेळी ते अनुभव केवळ त्या व्यक्तीचे राहत नाहीत तर ते संपुर्ण समाजाचे होतात. साहजिक त्या अनुभवांना सार्वत्रिकता प्राप्त होते. सार्वत्रिकतेमुळे आत्मकथनकाराच्या अनुभवांना वैश्विकतेचे मूल्य प्राप्त होते. आदिवासी लेखकांनी साहित्यातून जी भूमिका घेतली आहे. ती प्रामुख्याने जीवनातील आमानवी प्रवृत्ती नष्ठ करणे अशी आहे. आजपर्यंतच्या मराठी साहित्यात जे आदिवासीं जीवनासंबंधी लेखन झाले होते. त्याचे स्वरूप वरवरचे किंवा बेगडी स्वरूपाचे होते. ते चित्रण आदिवासी लेखकांना अवास्तव असे वाटते. "मराठीत आदिवासी जीवन केंद्रस्थानी ठेवून लिहिणाऱ्या बहुतांशी नव्या लेखक कवींच्या साहित्यकृती मधून एक गोष्ट मात्र प्रामुख्याने दिसते. मागासलेपण, नैतिकता, शहाणपण, आणि विकासाच्या तथा कथित प्रगत कल्पना या गोष्टी सापेक्ष आहेत. स्वतःला मुख्य प्रवाहातील मानणाऱ्या समाजाने स्वतःचे अस्सलपण एकदा तपासून पहायला पाहिजे. आजच्या मध्यमवर्ग वसाहती दिखावू जीवनशैलीच्या गुलामगिरीत स्वतःचे सत्व हरवून बसला आहे. या वर्गाने आदिवासींमध्ये सुधारणा करण्याच्या वल्गना करू नयेत. किमान अनैसर्गिकपणे सुजलेल्या शहरात दूषित

रूचींच्या मनोरंजनासाठी अपना उत्सवसारख्या प्रदर्शनात आदिवासींचे उघडेनागडे प्रदर्शन तरी मांडु नये असा एकंदर सुर या आदिवसी लेखकांचा दिसतो.[1] आदिवासी साहित्याने स्वतःचे अस्तित्व जपले आहे. बिगर आदिवासी लेखकांनी जे आदिवासीसंबंधीचे साहित्य लिहिले. त्यामध्ये न पाहिलेल्या भोगलेल्या, अनुभवलेल्या जीवनसंबंधी जे लिहिले गेले ते वरवरचे असेच आहे. त्या साहित्यामध्ये अस्सलपण अवतरले नाही. सद्यःकालीन परिस्थितीत जे आदिवासी साहित्यिक साहित्य निर्माण करताहेत ते जगलेल्या, भोगलेल्या, यातनांना पुन्हा एकदा साहित्याच्या रूपाने अनुभवतात त्यामुळे साहित्याला सकसता प्राप्त होते आहे.

आपल्या जीवनाची सुरूवात ज्या गावातून झाली त्या गावाविषयी केलेले कार्य लेखकाच्या समाजाशील वृत्तीचो द्योतक आहे. लेखकाने ग्रामीण जीवनातील, कृषी जीवनाशी संबंधीत अतिशय सूक्ष्म संदर्भ नोंदविले आहेत. एकत्र कुंटुंबपध्दतीत प्रत्येकास वाहुन कामे, घरी असणारी गुरे यासंबंधी लेखक प्रामाणिकपणे चित्रण करतो आहे. मुक्या प्राण्यांच्या चित्रणासंदर्भात लेखक म्हणतो की, च्मला आठवते जेव्हांपासून वडील गाई राखण्याचेच काम करीत असत. वडीलांना आम्ही घ्दादाङ व आईला घ्बाईङ म्हणत असू. दादांचा गाई गुरांवर भारी जीव असे. गुरांचे राखण, आजारपण, बाळंतपण, दूध पिळणे म्हणजे दूधाची धार काढणे या सर्व बाबतीत दादांचा हातखंड होता. गाईगुरांना कोणत्याही प्रकाराचा आजार झाला तरी वनौषधी वापरून त्यांना खात्रीलायक गुण येतच असे. गावामध्ये नामदेव घोडे, जगन्नाथ बेंडकुळे, पांडुरंग डगळे यांच्या गाईचे माठे कळप होते. यापैकी कोणत्याही गाईगुरांना

किंवा कोणाच्याही गाई, म्हशी, बैलांना आजार झाला तर सर्वजन 'दामुदादा' कडे येत. दादा त्यांना स्वत:च्या पेटीमध्ये असलेल्या जडीबुटीचे औषध देत किंवा जंगलात जाऊन औषध आणून देत. गाईना 'खुऱ्या' (खरकूत) नावाचा रोग येत असे. अशा वेळी खुराच्या मधल्या बेचक्यामध्ये जीव (म्हणजे सफेद किडे) पडत असत. त्यावर नकतेलाचा बोळा फिरवायचा बेचक्यातील किडे काडीने हळूहळू एकेक करून काढायचे, हे काम करीत असताना खूप किळस वाटायची, अंगावर शहारे यायचे पण दादा मात्र पोटच्या मुलासारखे त्याचा परिवारच गाई-गुरं असा होता.[2] लेखकाने केवळ माणसांच्या जीवनाकडे बारकाईने पाहिले नाही तर आपल्या सभोतालच्या पशू जीवनाकडेही गांभीर्याने लक्ष दिले आहे. मुक्या जीवांच्या समस्या मांडताना लेखक सूक्ष्मपणे प्रसंग टिपतो आहे. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून अथवा आपल्या जीवनातील जोड व्यवसाय पशूपालनसारखा व्यवसाय आजही आदिवासी समूह करताना आढळतात. आदिवासींची निसर्गाशी संबंधीत संस्कृतीचे दर्शनही घडते. माणसारखेच प्राण्यांवर प्रेम करणारा माणूस येथे पहायला मिळतो.

लेखक ज्यावेळी प्राथमिक शिक्षण घेत होता त्यावेळेस त्याला विविध अनुकूल-प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जावे लागले. अतिशय हलाकीच्या आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटुंबात लेखकचा जन्म झाला. परंतु लेखकाकडे शिकण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती होती. कधी लेखकाचा प्रामाणिकपणा आई-वडीलांची मुलाला शाळा शिकविण्याची इच्छा त्यासाठी आई-वडीलांची पाहिजे ते कष्ट करण्याची मानसिकता याबरोबरच शिकविणाऱ्या शिक्षकांची मदत करण्याची प्रवृत्ती यातून लेखकाचे शिक्षण पूर्ण झाले. शिक्षकांनी केलेल्या मदतीतून लेखकाला जबाबदारीची जाणीव होत गेली. विद्यालयीन जीवनात निरगुडे सर, देशमुख सर यांनी सतत लेखकाच्या आई-वडीलांसमोर शैक्षणिक प्रगतीची प्रसंशा केली. किसनला पाहिजे तेवढे शिकू द्या अशी अपेक्षा व्यक्त केली. ही प्रेरणा घेऊन लेखकाच्या आई-वडीलांनी लेखकाला शिकू दिले. ज्यावेळी लेखक अकरावीच्या शिक्षणासाठी बाहेरगावी गेला त्यावेळेस लेखकाला कधी भाकरी यायला उशीर होत असल्याने लेखकाला भूकेच्या समस्येला तोंड द्यावे लागले.

दलित आत्मकथनामध्ये जशा व्यथा, वेदना चित्रित होतात. त्यांना गावगाडयाबाहेरचे स्थान होते. आदिवासींना गावगाडयाबाहेरचेही स्थान नव्हते. ते जंगलाच्या आश्रयानेच जीवन जगताना दिसतात. आदिवासी साहित्याची चळवळ ज्या हेतूने सुरू झाली तो हेतू आज आदिवासी साहित्यिक आदिवासी साहित्यातून पुढे नेताना दिसतात. लेखकाने आपल्या बांधवांना विकासाची वाट दाखविण्याचा प्रयत्न ठिगळमधून केला आहे. शिक्षणाने स्वत:चा विकास साधला जाईल, साक्षरांची संख्या वाढल्याने समाजाची प्रगती होईल. त्यामुळे आदिवासी समाजाची संख्या वाढल्याने समाजाची प्रगती होईल. त्यामुळे आदिवासी समाजाची परिस्थिती बदलण्यास मदत होईल. लेखकाने शिक्षण या घटकाला आत्मकथनात विशेष महत्व दिले आहे. कारण शिक्षण केवळ व्यक्तीचा विकास करत नाही. तर

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

संपूर्ण समाजाचा समाज मनाचा सर्वांगीण विकास शिक्षणामुळे होतो. शिक्षण पूर्ण करण्यासाठी लेखकाला कधी रोजंदारीने कामाला जाणे. विहिरी खोदणे, दुसऱ्याच्या शेतात मजुरीने जाणे, सुरडी तयार करणे अशी कामे लेखकाने करून आपल्या शिक्षणासाठी पैसा मिळविला. कष्टाने मिळविलेला पैसा चांगल्या कामासाठी वापरला गेला पाहिजे. म्हणून लेखकाने कधी हौसेची वस्तूही घेतली नाही. परिस्थितीचे गांभीर्य राखणारा लेखकाचा दृष्टिकोन दिसून येतो. माणसाने आयुष्यात कोणत्याही कामाची लाज बाळगू नये. माणसाने 'चाकर रहावे परंतु बेकार राहू नये.' अशी लेखकाची भूमिकाही पहायला मिळते. लेखकाने आपल्या घरच्या शेतीसंबंधीही चित्रण केले आहे. त्यामध्ये शेतातील पीक, गाई, वासरे, बैल, म्हशी इत्यादीच्या जीवनासंबंधी लेखकाने चित्रण केले आहे.आदिवासी समाज हा प्रस्थापित व्यवस्थेपासुन खूप दुर लोटला गेला आहे. या व्यवस्थेत त्याच्या वाटयाला शोषण, पिळवणूक, फसवणूक या गोष्टी आल्या आहेत. समाजव्यवस्थेत गावगाडयाबाहेरचे स्थान आदिवासींना मिळाले आहे. याविषयी डॉ. सुमनोहर म्हणतात, 'आदिवासी समाज हा शहरी व ग्रामीण समाजापासून अंतरलेला असून भारतीय समाजात त्याला शेकडो वर्ष स्थान नव्हते. तो शेती व मजुरीसारखी कष्टाची कामे करून, तर कधी जंगलात हिंडणे, शिकार करणे, फळे-कंदमुळे, वनौषधी गोळा करणे हा त्यांचा चरितार्थाचा उद्योग असे. त्यामुळे तो निसर्ग व सजीव सृष्टीशी एकरूप झाला आहे. गावगाडा आणि गावगाडयाबाहेरच्याही समाजापेक्षा या जमातीची अवस्था मोठी भयंकर असल्याने त्यांना पुरातन काळापासून उपेक्षित रहावे लागले आहे. तो प्रस्थापित समाजाकडून अनेक कारणांनी छळला गेला असून पोटासाठी धडपणाऱ्या या आदिवासींच्या वाटयाला लाचारी व भटकंती आली आहे.[3] शहरी जीवन संस्कृती व ग्रामीण जीवन संस्कृती यांचा आदिवासींना गंधही नाही. आदिवासी समूह जेथे राहतो. तो भाग आधुनिकीकरण, नागरीकिरण, यंत्रसंस्कृतीपासून दुर आहे. ज्ञान-विज्ञान, औद्योगिकीकरण, समाजजीवनात झालेले बदल याविषयी आदिवासी अनभिज्ञ आहेत. शिक्षणाचा गंधही नाही यामुळे आदिवासींची दयनीय अवस्था झाली आहे.

दैनदिन उदरनिर्वाहाची साधने यातच आदिवासी समूह अडकला आहे. स्वभावतः लाजरा, बुजरा, अडाणी, अशिक्षित, घाबरट आदिवासी समाज जोपर्यंत समाजात मूळ प्रवाहात येत नाही. तोपर्यंत आदिवासी समाजाची शैक्षणिक प्रगती होणार नाही. अन्यथा त्याच्या वाटयाला डोंगर, दऱ्या, कपाऱ्याशिवाय काहीही येणार नाही. आदिवासीमधील ज्या ज्या समूहांतील व्यक्ती शिकल्या त्यांनी आपल्या समाजासाठी कार्य करायला सुरूवात केली. शिक्षित आदिवासी तरूणांनी आपणास आलेले अनुभव वाड्मयाच्या रूपाने कविता, कांदबरी, कथा, नाटक, आत्मकथन इत्यादी वाड्मय प्रकारांतुन अनुभव सांगायला सुरूवात केली आहे. आदिवासी साहित्य कारण त्या जीवनाच्या संबंधीचे अनुभव त्या व्यक्तीच्या यातना दुःखं आदिवासी म्हणून त्याला वाटयाला आलेले जीवन यांसंबधीची त्याची खदखद साहित्यात अंतरिक दृष्टीने उतरवू शकतो. त्याने सोसलेले भोगलेले जीवनानुभव त्याच्या

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

भाषेत तो चांगल्या प्रकारे मांडू शकतो. त्यामुळे त्या कथनास जीवंतपणा प्राप्त होतो. घटनेने दिलेले अधिकार आणि मानवमुक्तीचा लढा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार यामुळे समाजव्यस्थेतील प्रत्येक घटक जागा झाला व आपल्या अवनती विषयी विचार करायला लागला. आपले हक्क, अधिकार, याविषयी तो बोलायला लागला. प्रस्थापित व्यवस्थेत पिचलेला, भरडलेला, तळागाळात अडकलेला समाज जागा होवून बोलण्यास तयार झाला.

लेखक ज्यावेळी महाविद्यालयीन शिक्षण घ्यायला लागला त्यावेळी त्यांच्या वाचनात विविध लेखकांची पुस्तके आली. त्यामध्ये 'आठवणींचे पक्षी' प्र.ई.सोनकांबळे, 'बलुत' दया पवार, 'उपरा' लक्ष्मण माने, 'उचल्या' लक्ष्मण गायकवाड, 'आमचा बाप अन् आम्ही' नरेंद्र जाधव तसेच 'माझी जन्मठेप' वि.दा.सावरकर यांसारखी पुस्तके लेखकाच्या वाचनात आली व त्यातूनच लेखकाचा साहित्यिक पिंड बनत गेला. या सर्व ग्रंथात जे दारिद्रय, दुःख दैन्य आहे. ते आपल्याही समाजात आहे. ते समाजासमोर मांडावे या हेतूने लेखकाने 'ठिगळ' हे आत्मकथन लिहिले. नाशिकमधील महादेव कोळी समाज या समाजाची जीवन जगण्याची शैली, उदनिर्वाहाची साधने यांचे दर्शन लेखकाने रेखाटले आहे. आपले चुलते, आई, वडील, पत्नी, कलंत्री मामा, शैक्षणिक काळात लाभलेले सर्व शिक्षक आणि शिक्षण घेताना कचरू यांसरख्या अनेक पात्रांना लेखकाने जिवंत केले आहे.

अनुभव कथनासाठी लेखकाने प्रथमपुरूषी निवेदन केलेले आहे. परंतु या अनुभव कथनामध्ये सहज, साधी भाषा वाचकाला खिळवून ठेवते. लेखकाने लेखन करताना ललित्यपूर्ण शैली वापरलेली दिसते. वाक्यप्रचार, म्हणी, पल्लेदार वाक्यरचना यामुळे लेखकाकडील शाब्दिक वैभव ही पाहायला मिळते उदा. 'मन कृतकृत्य झाले'.[४] यासारख्या वाक्यप्रचार किंवा जेथे हात फिरे तेथे लक्ष्मी वसे.[५] धरावे तर चावते व सोडले तर पळते.[६], 'आदिला पदी आणि गद्दीला गादी,'[७] 'कणगीत दाणा तर भिल्ल उताणा.'[८] 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.'[९], 'नित्य मरे त्याला कोण रडे.'[१०] यासारख्या म्हणी लेखकाने लेखनात वापरल्या आहेत. 'फाटलेला असला तरी चालेल पण बाटलेला नको.'[११] यासारखी काही सुभाषितेही लेखक वापरताना दिसतो लेखकाने लेखनात पल्लेदार वाक्यरचनाही वापरल्या आहेत. 'आयुष्य म्हणजे सुदंर फुलबाग नसून वैशाखातील रणरणत्या उन्हाचा वणवाच आहे. पण याच उन्हामुळे पुढे पर्जन्यमान सुरू होवून धरणीमाता सुजलाम-सुफलाम होते. हेही तितकेच सत्य आहे. हीच परिस्थिती मानवी जीवनाला देखील लागू होते.'[१२] तर कधी लेखक लिहितो, 'आठवणी या मधमाशीच्या पोळयाला असलेल्या माशीसारख्या असतात'.[१३] अशा प्रकारे लेखक भाषा शैलीस आलंकारीक शब्दयोजना यांचा उपयोगही केलेला आहे. डगळे यांनी लिहिलेल्या आत्मकथनाचे वेगळेपण म्हणजे ते वाचकाच्या मनात प्रसंग वाचताना उत्सुकता निर्माण करते. ही उत्सुकता वाचकास शेवटपर्यंत खिळवून ठेवते. आपल्या आयुष्यात घडलेल्या घटना प्रसंगाचे लेखन करताना अपमान-मान यांचे समर्थन म्हणून लेखक लेखन करत नाही. लेखकाकडे आपल्याला काहीतरी नवे

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

सांगायचे आहे. आपल्याला आलेले अनुभव हे इतरांसही येत असतील. परंतु सर्वांनाच ते पुस्तक रूपाने आणणे शक्य होत नाहीत. लेखकाने ज्यावेळी आपल्या मुलीचा निबंध स्पर्धेत नंबर आला आणि बक्षीस घेण्यासाठी गेल्यावर त्याठीकाणी दुसराच कार्यक्रम सुरू होता. अशा वेळी आपली झालेली फजितीही लेखकाने निसंकोचपणे वर्णन केली आहे. किंवा विद्यालयीन शिक्षण घेत असताना उन्हाळयाच्या सुट्टीत शेळया राखणे, आमराई राखण्यासाठी घेणे या कामांचेही भावस्पर्शी असे लेखन केले आहे. लेखकाकडे अनुभव मांडताना ते संवेदनशिलपने मांडलेले आहेत. त्या मांडणीत लेखकाच्या प्रांजळपणाचाही वाचकास प्रत्यय येतो. आदिवासी समाजाला चिकटलेले ठिगळ हे आत्मकथन विशेष महत्वपूर्ण ठरणारे आहे.

## संदर्भ सुची

१. संपा. मेश्राम केशव, 'वाङ्मयीन प्रवृत्तीः तत्वशोध,' (डॉ.दादा गोरे गौरव ग्रंथ), प्रतिमा प्रकाशन, पुणे-३० पृष्ठ क्रं.४२९
२. डगळे किसन, 'ठिगळ', संवेदना प्रकाशन, पुणे, प्र.आ. ६ एप्रिल २००८, पृष्ठ क्रं.२०२
३. संपा. पानतावणे गंगाधर, 'अस्मितादर्श- वार्षिक विशेषांक',२००४ पृष्ठ क्रं.७५
४. ऊ.नि., किसन डगळे, पृष्ठ क्रं.२०७
५. तत्रैव, पृष्ठ क्रं.६९
६. तत्रैव, पृष्ठ क्रं.१२६
७. तत्रैव, पृष्ठ क्रं.१६६
८. तत्रैव, पृष्ठ क्रं.१६६
९. तत्रैव, पृष्ठ क्रं.१७०
१०. तत्रैव, पृष्ठ क्रं.२०४
११. तत्रैव, पृष्ठ क्रं.२०४
१२. तत्रैव, पृष्ठ क्रं.६८
१३. तत्रैव, पृष्ठ क्रं.२०७

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner